# लोकराज्य

ऑगस्ट २०१४/ पाने ८८/ किंमत ₹ १०




## हा प्रवास सारा उज्ज्वल भवितव्याचा

**सर्वांत पुढे महाराष्ट्र माझा**


# विकासदूत


**सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून 'सर्वांत पुढे महाराष्ट्र माझा' ही मोहीम राबवण्यात आली. ही माणसे स्वतःच्या उदाहरणातून, अनुभवातून विकासाचा संदेश देऊ लागली. एका अर्थाने हे सामान्यजन राज्याचे विकासदूत बनले.**






































**सर्वांत पुढे महाराष्ट्र माझा**

वर्ष ६६ वे | अंक ३ | ऑगस्ट २०१४

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

# लोकराज्य

## संपादन

- अतिथी संपादक मनीषा पाटणकर-म्हैसकर
- मुख्य संपादक प्रल्हाद जाधव
- संपादक सुरेश वांदिले
- सहसंपादक किरण केंद्रे

## प्रशासन

- प्रशासन व वितरण अधिकारी दिगंबर पालवे
- वितरण अधिकारी विलास बोडके
- साहाय्य विद्या कदम

## मांडणी

- मुखपृष्ठ श्रावण गुरव
- मांडणी, सजावट संदीप पवार
- मुद्रण एच.टी. मीडिया लि. दिघे, नवी मुंबई

## पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, दालन क्र. ३३, तळ मजला, मंत्रालय, मुंबई-३२. संपादकीय संपर्क : ०२२-२२६२२२१६
**email :** lokrajya2011@gmail.com

## वितरण आणि वर्गणीदार

वर्गणीदार व तक्रार निवारण - ०२२-२२०२१५३०
वितरण - ०२२-२२६१६९७६
**email :** lokrajyavitaran@gmail.com
lokvitaran@dgipr.maharashtra.gov.in

ई - लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

# अंतरग


| | |
|---|---|
| हा प्रवास उज्ज्वल भवितव्याचा | ५ |
| सार्वजनिक हिताच्या कामांना प्राधान्य | ७ |
| गतिमान वाटचालीचे गौरवशाली पर्व | ९ |
| उद्योगात महाराष्ट्रच पुढे | १२ |
| समृद्धीचे महामार्ग | १४ |
| सुरक्षित आणि समर्थ | १६ |
| आत्मसन्मानाने जगण्याची संधी | १८ |
| प्रगतीच्या नव्या संधी | २० |
| मदतीचा हात | २२ |
| नवी ऊर्जा... नवा विश्वास... | २४ |
| उत्पन्न वाढले... समृद्धी आली... | २६ |
| हरित गावे... हायटेक गावे... | २८ |
| सहकाराचे सामर्थ्य | ३० |
| सागरी सेतू ते द्रुतगती महामार्ग | ३२ |
| सुरक्षित औषधे... सुदृढ आरोग्य | ३४ |
| सामान्यांची चिंता मिटली | ३५ |
| लोकाभिमुख गतिमानता | ३७ |
| गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार | ३९ |
| शिक्षणातून सक्षमीकरण... | ४१ |
| समानसंधीचे नवे पर्व | ४३ |
| समन्यायी सिंचनसमृद्धी | ४५ |
| महाराष्ट्राची वाटचाल सुदृढतेकडे | ४७ |
| जलक्रांतीतून टँकरमुक्ती | ४९ |
| क्रीडासंस्कृतीला जोमदार चालना | ५१ |
| महिलांना नवे सामर्थ्य | ५३ |
| सुरक्षित आणि सुलभ | ५५ |
| उज्ज्वल सांस्कृतिक वारसा | ५७ |
| ग्रामस्वच्छतेचा नवा अध्याय | ५९ |
| कृष्णेने आणली हरितक्रांती | ६१ |
| श्वेतक्रांती ते नीलक्रांती | ६३ |
| दर्जा सुधारणार... गुणवत्ता वाढवणार... | ६५ |
| कामगारांना दिलासा | ६७ |
| सर्वांत पुढे महाराष्ट्र माझा | ६९ |
| घरकुलाची स्वप्नपूर्ती | ७० |
| सक्षम महिला... समर्थ महिला | ७१ |
| गावांचा चौफेर विकास | ७२ |
| सुयोग्य नियोजन... गतिमान प्रगती | ७३ |
| दर्जेदार उच्चशिक्षण | ७४ |
| आदिवासींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी | ७५ |
| तत्पर प्रशासन... तत्काळ दिलासा | ७६ |
| गौरव मराठीचा; सन्मान मराठीचा | ७७ |
| सर्वांचा सन्मान.. सर्वांना न्याय | ७८ |
| महाराष्ट्र अनलिमिटेड | ७९ |
| लोकाभिमुख प्रशासन आणि पारदर्शकतेतेवर भर | ८० |
| मेकिंग ऑफ सर्वांत पुढे महाराष्ट्र माझा | ८२ |

**लोकराज्य एक अमृतानुभव**

लोकराज्य मासिकामुळे वाचनाची मला गोडी लागली याचे कारण लोकराज्य मासिक परिपूर्ण आहे. कुठेच उणीव भासत नाही. लेख सुंदर, माहिती उपयुक्त, रंगीत, आकर्षक, बिनचूक सर्वांनाच हवेहवेसे हे मासिक केवळ दहा रुपयात मिळते. हे मासिक भरपूर माहितीपूर्ण आणि अभ्यासपूर्ण असते. सचिव मनीषा पाटणकर-म्हैसकर यांचे अतिथी संपादकीय उत्कृष्ट असते.

एक अमृतानुभव म्हणून मी लोकराज्य मासिकाकडे पाहतो. कारण गावांचं, शहरांचं महत्त्व इमारतींच्या उंचीवरून समजत नाही तर वाचनालयाच्या उंचीवरून ठरते. चांगली मासिके वाचल्यानंतर आपले विचार बदलतात, कृती बदलते, वर्तन बदलते, समाज बदलतो. वाचनाची श्रीमंती लोकराज्य मासिक वाचल्यानंतरच कळते.

**– राम शेळके,** नांदेड

**उपयुक्त जीवनदायी**


जून २०१४ चा लोकराज्य अत्यंत आवडला. या अंकामधून राजीव गांधी जीवनदायी योजनेची माहिती मिळाली. ही योजना अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. गरीब लोकांना जीवन जगण्याचा आधार देणारी आहे. अनेक दु:खितांना, कुटुंबांना जीवन जगण्याचा न्याय दिला आहे. त्यामुळे हा अंक आवडला.

**– प्रज्ञानंद रा. दामोदर**

**आनंदाची पर्वणी**

मी 'लोकराज्य' या मासिकाची नियमित वाचक आहे. त्यामधील सर्वच लेख उत्कृष्टच असतात. प्रत्येकवेळी त्यातील वेगवेगळे विषय आम्हा वाचकांसाठी आनंदाची पर्वणी असतात. आम्हांला असेच नवनवीन विषय या मासिकात वाचायला नक्कीच आवडतील.

**– सौ. करुणा सुहास मोरे,** पनवेल




**पुन्हा पुन्हा वाचावे वाटते**

मी प्रथमच लोकराज्य वाचलं. वाचून झाल्यावर पुन्हा एकदा वाचले. तुमचे जुने अंक कोणकोणत्या विषयावरील होते पण लवकरच मी ते सुद्धा डाऊनलोड करेनच. या वेळचा जो अंक आहे तो मला खूपच आवडला. या अंकात जी माहिती दिली यापासून आम्ही अलिप्तच होतो. रोजच्या बातमीपत्रामध्ये ही माहिती वाचायला मिळत नाही. आपण आपल्या मासिकाद्वारे आम्हाला सरकारची धोरणे आणि महाराष्ट्राबद्दलची जी माहिती दिली त्यापासून आम्ही अनभिज्ञ होतो. या माहितीबद्दल मी लोकराज्य मासिकाला मनापासून धन्यवाद देतो. नव्या वेगवेगळ्या विषयावरील अशीच माहिती आमच्यापर्यंत सदोदित पोहचवाल अशी आशा आहे.

**– अरुण भेंडे**

**सुसंवाद घडतो**

माहे जून २०१४ चा लोकराज्य वाचला. या अंकामधून 'फुलणारे हसू-घडणारा महाराष्ट्र' यांची प्रचिती १००% आली. विकासाच्या दृष्टीने शासन अनेक योजना सामान्य जनतेपर्यंत पोहोचवत असते. मात्र सर्वसामान्य जनतेला त्याविषयी माहिती नसते. लोकराज्य या मासिकातून ते सर्वांपर्यंत पोहचते. हक्काचे घर, शिष्यवृत्ती योजना, दुग्ध उत्पादन, अवकाळी पावसामुळे शासनाने शेतकऱ्यांना केलेली मदत याची माहिती मिळाली. यामुळे शासनाविषयीचा लोकांचा दृष्टिकोन बदलण्यास मदत होते. 'लोकराज्य'च्या माध्यमातून शासन व जनता यांच्यातील सुसंवाद घडला जाऊन महाराष्ट्र प्रगतिपथाकडे जात आहे. किंमत केवळ १० रुपये असल्याने गरिबातल्या गरीब व्यक्तीस लोकराज्य वाचण्यास परवडत आहे.

**– ऋषिकेश रामचंद्र भिसे,** सातारा

**प्रतिक्रियांचे स्वागत**

लोकराज्य हे महाराष्ट्राच्या जनतेचे हक्काचे व्यासपीठ आहे. प्रत्येक अंकात अधिकाधिक उपयुक्त माहिती आकर्षक स्वरूपात देण्यात येते. या अंकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य वाढवण्यासाठी आपल्या प्रतिक्रिया अवश्य पाठवा. या प्रतिक्रियांची योग्य ती दखल घेण्यात येईल.

**पत्ता : संपादक, लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, पाचवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, नवीन मंत्रालय, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई-४०० ००१**

## वार्षिक वर्गणी

**वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई-४०००२१ या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वटणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा. (प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००)**

'लोकराज्य'मधील लेखांचे पुनर्मुद्रण केल्यास आम्हाला आनंदच होईल...

लोकराज्यची वर्गणी ऑनलाईन भरण्यासाठी

http:``dgipr.maharashtra.gov.in

अतिथी संपादकीय

# हा प्रवास उज्ज्वल भवितव्याचा



**नु**कत्याच संपलेल्या राष्ट्रकूल क्रीडास्पर्धेमध्ये भारतीय संघातील महाराष्ट्राचे खेळाडू राही सरनोबत, अयोनिका पॉल, गणेश माळी, ओंकार ओतारी यांनी उत्तम कामगिरी करून देशासोबत महाराष्ट्राच्याही सन्मानात वाढ केली याचा आपणा सर्वांनाच आनंद आणि अभिमान आहे. गेल्या काही वर्षांत खेळाडूंच्या नैपुण्यात वृद्धी व्हावी यासाठी शासनाने ज्या विविध सोई, सुविधा आणि क्रीडांगणे उपलब्ध करून दिली, त्यातूनच राज्यात क्रीडासंस्कृतीचा विकास होताना दिसत आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरवशाली कामगिरी करणाऱ्या महाराष्ट्राच्या क्रीडापटूंचे मन:पूर्वक अभिनंदन.

गेल्या काही दिवसात राज्यातील जवळपास सर्वच भागात पावसाने दमदार हजेरी लावून क्रीडा क्षेत्रातील यशाचा हा आनंद द्विगुणित केला. महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनता, शेतकरी यांच्या मनातील मळभ या पावसाने दूर केले आहे. शेतकरी नव्या उत्साहाने शेतीच्या कामाला लागला आहे.

पुणे जिल्ह्यातील माळीण येथे दरड कोसळण्याच्या दुर्घटनेत शेकडो लोकांना प्राण गमवावे लागले, ही अत्यंत वेदनादायी आणि मन विषण्ण करणारी घटना आहे. अशावेळी शासकीय यंत्रणा अत्यंत गतिमानतेने आपत्तीत सापडलेल्यांच्या साहाय्याला धावून जाते. गेल्या काही वर्षात महाराष्ट्रावर विविध स्वरूपाच्या नैसर्गिक आपत्ती सतत कोसळत आहेत. त्यावर मात करण्यासाठी आणि आपत्तीग्रस्तांच्या साहाय्यासाठी गेल्या एक-दीड वर्षांत १२ हजार कोटी रुपयांहून अधिक रक्कम खर्ची करण्यात येऊन त्यांना दिलासा देण्यात आला. माळीण दुर्घटनेतही शासकीय यंत्रणेने तत्पर कार्यवाही करून मदतकार्य अल्पावधीत पूर्ण केले. मृत पावलेल्या सर्व दुर्दैवी व्यक्तींना आम्ही लोकराज्य परिवारातर्फे श्रद्धांजली वाहत आहोत.

वेगवेगळ्या आपत्तींच्या व्यवस्थापनात महाराष्ट्राने अतिशय चांगली कामगिरी केली आहे. त्याचप्रमाणे इतरही क्षेत्रात महाराष्ट्राची कामगिरी वैभवशाली राहिली आहे. थेट परकीय गुंतवणुकीत देशातील २३ टक्के गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात झाली आहे. त्यामुळे महाराष्ट्र हे औद्योगिक विकासात नंबर एकचे राज्य असल्याचे पुन्हा सिद्ध झाले आहे. फळांच्या उत्पादन आणि निर्यातीतही राज्याने आघाडी घेतली आहे. रस्त्यांचे चौपदरीकरण, सर्वसामान्यांना परवडणारी दर्जेदार आरोग्यव्यवस्था, उत्तम शैक्षणिक सुविधा अशा विविध बाबींनी महाराष्ट्र सर्वांत पुढे असल्याचे दिसून येते. मेट्रो, मोनो रेल्वे, द्रुतगती मार्ग, अनेक उड्डाणपूल, स्कायवॉक आदी कामांमुळे मुंबई शहराने आंतरराष्ट्रीय महानगर होण्याच्या दिशेने दमदार पाऊल टाकले आहे.

महाराष्ट्राने केलेल्या अशा विविध क्षेत्रातील सर्वांगीण प्रगतीचा आणि त्यामुळे आलेल्या समृद्धीचा आढावा या अंकात घेतला आहे. या सर्व प्रगतीमुळे आपले जीवन सुसह्य, सुरक्षित आणि समृद्ध झाले आहे.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या दिलखुलास या आकाशवाणीवरील कार्यक्रमाने २००० चा टप्पा गाठून एका विक्रमाची नोंद केली आहे. शासकीय माहितीचा लोकांना समृद्ध करणारा व त्यांच्या जीवनाला अधिक अर्थपूर्ण करणारा हा कार्यक्रम २००० वा टप्पा गाठल्यावरही ताजा, नावीन्यपूर्ण आणि श्रोत्यांना आकर्षित करून घेणारा ठरतोय हे विशेषत्वाने नमूद करायला हवे.

लोकराज्यच्या इतर अंकांप्रमाणे हा अंकही आमच्या वाचकांना आवडेल याची खात्री वाटते.

**मनीषा पाटणकर-म्हैसकर**
सचिव
(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)



पृथ्वीराज चव्हाण
मुख्यमंत्री

# वैयक्तिक कामांपेक्षा सार्वजनिक हिताच्या कामांना प्राधान्य

महाराष्ट्राच्या शाश्वत विकासाच्या दृष्टीने अनेक महत्त्वाचे निर्णय आघाडी सरकारने घेतले आहेत. लोककल्याणाच्या अनेक योजना आणि कार्यक्रम व्यापकपणे राबवले आहेत. वैयक्तिक लाभाच्या कामांपेक्षा सार्वजनिक आणि व्यापक हिताच्या कामांना प्राधान्य देण्याचे धोरण आम्ही पहिल्यापासून जाणीवपूर्वक ठेवले. याची प्रचिती आपल्याला आमच्या अनेक निर्णयांमधून येईल.

राज्यातील आघाडी शासनाने जनकल्याणकारी राज्याची संकल्पना प्रत्यक्षात आणत विकासविषयक प्रयत्नांना संवेदनशीलतेची जोड दिली. जनहिताला सर्वोच्च स्थान देताना जनतेच्या राहणीमानातही सुधारणा घडवून आणण्याचे प्रामाणिक प्रयत्न आम्ही केले. जनतेला काही काळासाठी आकर्षित करणाऱ्या घोषणांपेक्षा त्यांच्या जीवनात अनुकूल बदल घडवून आणणारे दीर्घकालीन नियोजन करण्यावर आघाडी शासनाने जास्त भर दिला. गेल्या काही वर्षात दूरदृष्टीने घेतलेल्या अशा अनेक निर्णयांचे चांगले परिणाम दिसून येत आहेत.

देशातील सर्वाधिक परकीय गुंतवणूक असलेले राज्य म्हणून ओळख प्रस्थापित करतानाच कृषिक्रांतीच्या माध्यमातून शेतकरी बांधवांच्या आर्थिक प्रगतीकडेही विशेष लक्ष देण्यात आले. त्यामुळे ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेला बळकटी मिळाल्याचे चित्र राज्यात दिसते आहे. शैक्षणिक आणि वैद्यकीय सुविधांच्या विस्तारामुळे ग्रामीण मानव विकास निर्देशांकातही सुधारणा होण्यास मदत होत आहे. पायाभूत सुविधांचे जाळे निर्माण करण्याच्या दृष्टीने घेण्यात आलेले अनेक निर्णय क्रांतीकारी आणि मोठे परिवर्तन घडवून आणणारे ठरले आहे. अविकसित भागाचा विकास आणि लोकांच्या क्रयशक्तीत झालेल्या वाढीच्या रूपाने आमच्या प्रामाणिक प्रयत्नांना आलेले यश स्पष्टपणे दिसते आहे.

**लाभधारक सामान्य माणूस**

राज्याचा वेगाने विकास होत असताना या विकासाचा लाभधारक सामान्य माणूस असला पाहिजे, ही विचारधारा समोर ठेवून आघाडी



शासनाने अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. विज्ञाननिष्ठ समाजाच्या निर्मितीत अडसर ठरणाऱ्या चालीरितींना प्रतिबंध करणारा अंधश्रद्धा व जादूटोणा विरोधी कायदा, सर्वसामान्य जनतेला परवडणाऱ्या किंमतीत घरे मिळावी म्हणून करण्यात आलेला कायदा, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेची राज्यभरात अंमलबजावणी, कोरडवाहू शेती अभियान, ई- प्रशासन, अन्न सुरक्षा योजनेची अंमलबजावणी, सुकन्या योजना, मेट्रो आणि मोनो रेल्वे प्रकल्प आदी निर्णय राज्याला प्रगतीच्या वाटेवर वेगाने पुढे नेणारे ठरतील.

**आव्हानांचा सामना**

हे सर्व करीत असताना अनेक आव्हानांचा सामनाही आम्हाला करावा लागला. राज्यात सलग दोन वर्षे पडलेला दुष्काळ, काही भागात आलेला पूर आणि अगदी अलीकडे झालेली गारपीट अशी मोठी संकटे आली. पण आम्ही त्यावर मात करून खचलेल्या बळीराजाला पुन्हा त्याच्या पायावर उभा करण्याचे मनापासून प्रयत्न केले.

गेल्याच वर्षी राज्याने अभूतपूर्व अशा दुष्काळाचा यशस्वीरीत्या सामना केला. या अस्मानी संकटातून आम्ही योग्य तो बोध घेतला असून भविष्यात अशा स्वरूपाची आपत्ती उद्भवू नये, उद्भवल्यास तिला तोंड देण्यासाठी संबंधित घटक सक्षम असावेत, या दृष्टीने सिंचन आणि पिण्याचे पाणी या दोन्हींबाबत आमचे विशेष नियोजन आहे.

**औद्योगिक प्रगतीला एक नवा आयाम**

राज्यातील औद्योगिक प्रगतीला एक नवा आयाम देण्यात सरकार यशस्वी ठरले आहे. भविष्यातील प्रगत औद्योगिक महाराष्ट्राची उभारणी करण्यासाठी शासन वेगवेगळ्या आघाड्यांवर जोरदार प्रयत्न करीत आहे. त्यासाठी आवश्यक असणाऱ्या मजबूत पायाभूत सुविधांचे जाळे निर्माण करून त्याच्या पायावर औद्योगिक महाराष्ट्र उभारणार आहे.

शिक्षणाची गंगा समाजातल्या शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचवण्यात आम्हाला यश आले असले तरी या शिक्षणाची सर्वांगीण गुणवत्ता वाढवणे हे आमचे ध्येय आहे. नव्या ज्ञानाधिष्ठित समाजव्यवस्थेत महाराष्ट्र ताकदीने उभा राहावा यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण राज्यात दिले जाईल, यासाठी आमचे कसोशीचे प्रयत्न असतील.

देशात सर्वाधिक शहरीकरण महाराष्ट्रात होत आहे. जवळपास निम्मी लोकसंख्या शहरांमध्ये सामावणाऱ्या महाराष्ट्रातील नवे नागरिकरण अनिर्बंध असू नये, यासाठी शासन कटिबद्ध आहे. सुनियोजित नागरिकरणाचा निर्धार आमच्या सरकारने केला असून तो सर्व पद्धतीने अमलात आणला जाईल.

**सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा खरा अर्थ**

महसूल आणि विविध विभागाच्या योजना, माहिती आणि दाखले थेट गावपातळीवर शिबिर भरवून देण्यात येत आहेत. राज्यामध्ये ३४ लाख लोकांना दाखले मिळाले आहेत, यातून लोकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा खरा अर्थ कळला पाहिजे. रांग दिसली, की आपले कुठेतरी चुकते, हे अधिकाऱ्यांनी लक्षात ठेवावे हे नेहमी मी सांगतो.

मुलींच्या हितासाठी उपयुक्त ठरणाऱ्या सुकन्या योजनेसाठी चालू वर्षी ३५ कोटी ६० लाख तर पुढील वर्षी ५७६ कोटींची तरतूद. मुलींना चांगले शिक्षण मिळणे, त्यांचे आरोग्य सुधारणे, बालविवाह थांबविणे, मुलींच्या भविष्यासाठी आर्थिक तरतूद करणे, मुलींचा जन्मदर वाढविणे यासाठी ही योजना कार्यान्वित.

**प्रमुख शहरांमध्ये २४ नवीन विमानतळ**

हवाई दळणवळणाचे राज्यातील जाळे विकसित व्हावे यासाठी प्रमुख शहरांमध्ये २४ नवीन विमानतळ निर्माण केले जाणार आहेत. विदर्भाच्या विकासाचे एक महाद्वार मिहान प्रकल्पाच्या निमित्ताने उघडले जाईल. विदर्भाला जागतिक दळणवळणाच्या नकाशावर महत्त्वाचे स्थान या प्रकल्पामुळे मिळेल. शासन या दृष्टीने त्याच्या पूर्णत्वासाठी प्रयत्नशील आहे. शिर्डी येथे ग्रीन फिल्ड विमानतळ विकसित करण्यात येणार आहे. परिसरातील पर्यटनासाठी त्याची मोठी उपयुक्तता असेल. विमानतळांच्या उभारणीमुळे पायाभूत सुविधांचे जाळे अधिक वेगवान होईल. मागास भागात येणाऱ्या औद्योगिकीकरणाची वाट अधिक सुलभ होईल.

**टाऊनशिप प्रकल्पांसाठी आकर्षक धोरण**

लहान व मध्यम शहरांच्या प्रश्नांबाबत विशेष प्रयत्न करीत आहोत. टाऊनशिप प्रकल्पांसाठी आकर्षक धोरण आखण्यात आले असून भाडेतत्त्वावरील गृहनिर्मितीसाठी सवलती देण्यात येत आहेत. विकास नियंत्रण नियमावलीमध्ये सुधारणा केल्याने अत्यल्प, अल्प, मध्यम आणि उच्च उत्पन्न गटासाठी वाढीव चटईक्षेत्रासह अधिक सदनिका उपलब्ध झाल्या आहेत. मुंबईतील कोळीवाडे आणि गावठाणांच्या विकासासाठी वाढीव चटईक्षेत्राचा वापर करता येईल.

सर्व तालुक्यांचा मानव विकास निर्देशांक ठरवून त्यानुसार विकास कामांना प्राधान्य

## गतिमान निर्णय

राज्य सरकारने घेतलेल्या प्रमुख निर्णयांची जंत्री करायला गेल्यास वेळ पुरणार नाही, अशी अवस्था आहे. मराठा समाजातील शैक्षणिक व सामाजिक दुर्बलांसाठी १६ टक्के आरक्षण, मुस्लीम समाजातील शैक्षणिक व सामाजिक दुर्बलांसाठी ५ टक्के आरक्षण, १०८ क्रमांकावर फोन केल्यास अत्याधुनिक रुग्णवाहिका विनामूल्य सेवेसह तत्काळ हजर, १०४ क्रमांकावर फोन केल्यास रक्त पुरवण्यासाठी ब्लड ऑन कॉल योजना, राज्यातील रुग्णांना शासकीय रुग्णालयातून मोफत औषधे, १ जानेवारी २००० पर्यंतच्या झोपड्यांना संरक्षण, सिमेंट साखळी नाला बंधाऱ्यांचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम, मदरसा आधुनिकीकरणासाठी विशेष निधी, गिरणी कामगारांना अतिशय स्वस्तात घरे उपलब्ध, सहकारी गृहनिर्माण संस्थांना जमिनीचा मालकी हक्क, गृहनिर्माणातील तक्रारींसाठी स्वतंत्र नियंत्रक, ठाणे जिल्ह्याचे विभाजन करून पालघर या नवीन जिल्ह्याची निर्मिती, शेतकऱ्यांना कृषिपंपाच्या वीजबिलात सवलत देणारी कृषिसंजीवनी योजना असे कितीतरी निर्णय वानगीदाखल देता येतील.






पूर्व द्रुतगती मार्ग

- पूर्व मुक्त मार्गाचा पहिला आणि दुसरा टप्पा वाहतुकीसाठी खुला. तिसरा टप्पा पूर्णत्वाच्या मार्गावर.
- पश्चिम द्रुतगती मार्गांचे काम पूर्ण.
- मीलन रेल्वे उड्डाणपूल वाहतुकीला खुला. या उड्डाणपुलामुळे पूर्व-पश्चिम जोडणी शक्य झाली असून पावसाळ्यातील वाहतूक कोंडीवर कायमचा तोडगा.
- सहार उन्नत मार्गामुळे आंतरराष्ट्रीय विमानतळ थेट पश्चिम द्रुतगती मार्गाला दोन्ही बाजूंच्या वाहतुकीने जोडले गेले.
- सांताक्रुझ-चेंबूर जोडमार्गामुळे पूर्व-पश्चिम उपनगरांची जोडणी. हा मार्ग ७० हजारांहून अधिक वाहनांसाठी उपयुक्त. प्रकल्पग्रस्त कुटुंबांचे पुनर्वसन पूर्ण.
- वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर मेट्रो कॉरिडॉरमुळे वर्सोवा ते घाटकोपर दरम्यान प्रवासाला लागणारा वेळ ७० मिनिटांवरुन २० मिनिटांवर. मेट्रो रेल्वेची प्रवासी क्षमता १,१७८.
- मोनोरेल- चेंबूर-वडाळा- मोनो कॉरिडॉरचा पहिला टप्पा पूर्ण. मोनोरेल सेवा सुरू.
- १७ उड्डाणपूल, ३६ स्कायवॉक प्रवाशांसाठी खुले. १२ नवे मार्ग
- विस्तारित मुंबई उरण पायाभूत प्रकल्पामध्ये २७५ किलोमीटरहून अधिक लांबीच्या रस्त्यांचा विकास. यात १४ उड्डाणपूल, ३ खाडी पूल आणि २ रेल्वे उड्डाणपुलांचा समावेश. प्रकल्पातील पनवेल, वायबीळ, मानपाडा, पाटलीपाडा हे उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुले.
- कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो रेल कॉरिडॉर प्रकल्पामधून उत्तर-दक्षिण भागांची जोडणी. सध्या उपनगरीय रेल्वेसेवा नसलेल्या क्षेत्रांनाही याचा लाभ. प्रकल्पासाठी निविदा मागविण्यात आल्या आहेत.
- विरार-अलिबाग कॉरिडॉर (१२६ किमी), टप्पा-१- विरार (नवघर) ते चिरनेर (जेएनपीटी) ७९ किमी. या ८ वाहिका असलेल्या कॉरिडॉरमध्ये बीआरटीएस, मेट्रो, मोटारवाहतूक आणि बिगर-मोटार वाहतुकीसाठी स्वतंत्र वाहिका (लेन).

देण्याची भूमिका मी घेतली आहे. त्यासाठी शिक्षण, आरोग्य, पाणी, स्वच्छता, दरडोई उत्पन्न आदी निकषांच्या आधारे तालुक्यांचा मानव विकास निर्देशांक ठरवण्यात येईल.

**ब्लड ऑन कॉल**

रुग्णांना सुरक्षित आणि दर्जेदार रक्त वेळेत पुरविणारी ब्लड ऑन कॉल ही योजना सुरू झाली आहे. १०८ क्रमांक डायल करताच सुसज्ज रुग्णवाहिका काही मिनिटात धावून येईल. अशा ९७६ रुग्णवाहिका सध्या कार्यरत आहेत. ही सेवा सुरू झाल्यापासून २० हजार लोकांना वेळीच मदत झाली आणि त्यांचे प्राण वाचले आहेत.

**मोफत औषधे**

राज्यातील शासकीय इस्पितळे आणि वैद्यकीय केंद्रांमध्ये रुग्णांना मोफत औषधे देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय आम्ही घेतला. यामुळे गंभीर आजारावरील औषधांसाठी रुग्णांना दुकानांमध्ये जावे लागणार नाही. या निर्णयाचा फायदा गोरगरिबांना मोठ्या प्रमाणात होत आहे.

**अर्भक मृत्युदर देशात कमी**

आमच्या आरोग्य यंत्रणेने विविध प्रभावी उपाय योजल्यामुळे गेल्या ७-८ वर्षात अर्भक मृत्युदर ३६ वरून २५ पर्यंत कमी झाला आहे. माता मृत्युदर १३० वरून ८७ वर आला आहे.

**शुभमंगल सामुदायिक विवाह**

केवळ गरीब कुटुंबासाठी असलेल्या शुभमंगल सामुदायिक विवाह योजनेचा लाभ विधवा, परित्यक्त्या, बेघर महिला यांना देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यातून जास्तीत जास्त दोन मुलींच्या विवाहासाठी आर्थिक साहाय्य केले जाईल.

**महिला, ज्येष्ठ, भूमिहीन सर्वांचा विचार**

राज्यातल्या वाड्या-पाड्यांवर ग्रामपंचायती स्थापन करता याव्यात, यासाठी आम्ही 'पेसा' (पंचायत 'एक्स्टेंशन टु शेड्युल्ड') ॲक्टमध्ये आवश्यक सुधारणा केली. केंद्र सरकारने खरेदी केलेल्या धानावर प्रति क्विंटल २०० रुपये बोनस देण्याचा निर्णय, कोरडवाहू शेती अभियान, दारिद्र्यरेषेखालील बेघर कुटुंबांना इंदिरा आवास योजनेतून सुमारे ५ लाख घरकुले अशा अनेक निर्णयांचा उल्लेख या ठिकाणी करावा लागेल.

**सामाजिक सुरक्षितता**

सर्वात महत्त्वाचे म्हणजे सर्व घटकांसाठी सामाजिक सुरक्षितता हे आमच्या सरकारचे उद्दिष्ट आहे. ते गाठण्यासाठी समाजातील सर्व घटकांना त्यांना अनुरूप सुरक्षा देणे यासाठी सरकारची वाटचाल सुरू आहे. महिला, अनुसूचित जाती-जमाती, धार्मिक अल्पसंख्य, ज्येष्ठ नागरिक, बालके अशा विविध घटकांचे हित सदैव आमच्या नजरेसमोर असेल. त्याकडे कधीही दुर्लक्ष होणार नाही, याची मी ग्वाही देतो. विकासप्रक्रियेत जनतेचा सहभागही अत्यंत महत्त्वाचा असतो. सर्वांच्या सहकार्याने नव्या युगाला सामर्थ्यानिशी सामोऱ्या जाणाऱ्या प्रगत महाराष्ट्राचे स्वप्न निश्चितच साकार होईल, असा विश्वास मला वाटतो.

**- शब्दांकन : सतीश लळीत**
(मुख्यमंत्र्यांचे मुख्य जनसंपर्क अधिकारी)

आम आदमी विमा योजनेने ग्रामीण भागातील भूमिहीन शेतमजुरांना विम्याचे कवच मिळाले. ३९ लाख जणांना लाभ.



**अजित पवार**
उपमुख्यमंत्री

# गतिमान वाटचालीचे गौरवशाली पर्व

आपला महाराष्ट्र आज देशातीलच नव्हे तर जगातील आघाडीच्या राज्यांपैकी आहे. महाराष्ट्राची आघाडी सर्वसमावेशक आहे. ती केवळ पायाभूत सुविधांच्या निर्मितीपुरती मर्यादित नाही, तर पुरोगामी विचारधारा, सामाजिक सुधारणा, तसंच राज्य शासनाच्या क्रांतीकारी निर्णयांमध्ये ही आघाडी ठळकपणे दिसते. राज्याच्या आघाडीचं खरं मूळ आहे ते अनेक महापुरुषांनी, संत-महात्म्यांनी इथल्या मातीत रुजवलेल्या पुरोगामी आणि प्रगतशील विचारांमध्ये. या महापुरुषांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा पाठीशी असल्यामुळेच विकासाच्या दिशेनं असलेली राज्याची वाटचाल ही नेहमीच गतिमान राहिली आहे.

राज्याचे पहिले मुख्यमंत्री, आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार स्वर्गीय यशवंतराव चव्हाण साहेबांपासून सुरू झालेली राज्याच्या नियोजनबद्ध विकासाची प्रक्रिया आजही अखंडपणे सुरु आहे. गेल्या दहा-पंधरा वर्षात, विशेषत: गेल्या पाच वर्षात ही प्रक्रिया अधिक गतिमान करू शकलो, याचा आम्हाला निश्चितच आनंद आणि अभिमानसुद्धा आहे. राज्याचे कृषी उत्पादन वाढते आहे. औद्योगिक प्रगती होते आहे. आर्थिक गुंतवणुकीत पहिला क्रमांक कायम आहे. शैक्षणिक प्रगतीचे अनेक मापदंड स्थापन केले आहेत. या सगळ्याच्या बरोबरीने इथल्या सर्वसामान्य माणसाच्या वैयक्तिक आणि सामाजिक जीवनाचा स्तर उंचावण्यातही यशस्वी ठरलो आहोत. त्यासाठी आघाडी शासनाने अनेक क्रांतिकारी निर्णय घेतले. या निर्णयांचे सकारात्मक परिणाम अनुभवयाला मिळत आहेत.

**महिलांसाठी पन्नास टक्के जागा**

उदाहरणच द्यायचे झाले तर महिलांसाठी स्थानिक स्वराज संस्थांमध्ये पन्नास टक्के जागा राखीव ठेवण्याच्या निर्णयाचे देता



येईल. राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या जवळपास निम्मी संख्या महिलांची आहे. एवढ्या मोठ्या लोकसंख्येला निर्णयप्रक्रियेत सामावून घेण्यासाठी सर्व स्थानिक स्वराज संस्थांमध्ये महिलांसाठी पन्नास टक्के जागा राखीव ठेवण्याचा क्रांतिकारी निर्णय आम्ही घेतला. या निर्णयामुळे गाव, खेडी आणि शहरातली महिलाशक्ती थेट समाजाच्या मुख्य प्रवाहात येऊन विकासाच्या प्रक्रियेशी जोडली गेली.

**अन्न सुरक्षा योजना**

राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना तत्कालीन केंद्र सरकारने लागू केली. जगात सर्वाधिक व्याप्ती असलेली आणि देशातल्या नागरिकाला पोट भरण्याची हमी देणारी ही योजना आहे. आपल्या राज्याने या कायद्याची व्याप्ती आणखी वाढवून राज्यातल्या जवळपास ७५ टक्के नागरिकांना यात सामावून घेतले. या निर्णयानंतर राज्यात एकही व्यक्ती उपाशी राहणार नाही, याची खात्री आपण दिली आहे.

वैद्यकीय उपचारांचा खर्च आज खूप वाढला आहे. गरीब आणि मध्यमवर्गीय नागरिकांसाठी गंभीर आजारांवरील उपचार ही मोठी समस्या आहे. त्यावर उपाय म्हणून राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना आपण लागू केली. या योजनेंतर्गत एकूण ९७२ गंभीर स्वरूपाच्या आजारांवर कमाल दीड लाख रुपये खर्चापर्यंत मोफत उपचार करण्यात येतात. किडनी ट्रान्सप्लांटसारख्या उपचारांसाठी अडीच लाख रुपयांपर्यंतचा खर्च आपण देतो. यामुळे गरीब व्यक्ती निश्चिंत मनाने आयुष्य जगत आहे. आतापर्यंत अडीच लाख रुग्णांवर या योजनेंतर्गत उपचार करण्यात आले. एकही व्यक्ती गंभीर आजारांवरील वैद्यकीय उपचारांपासून वंचित राहणार नाही, याची काळजी या योजनेंतर्गत घेतली आहे.

मोफत इमर्जन्सी मेडिकल सर्व्हिसेस आणि ब्लड ऑन कॉल या दोन योजना आपण सुरू केल्या. अपघातातील जखमींना किंवा गंभीर रुग्णांना तातडीने रुग्णालयात नेण्यासाठी अत्याधुनिक वैद्यकीय सुविधांनी सुसज्ज अशा ९३७ रुग्णवाहिकांचा समावेश असलेली मोफत इमर्जन्सी मेडिकल सर्व्हिसेस योजना सुरू करण्यात आली आहे. रुग्णांची रक्ताची तातडीची गरज पूर्ण करण्यासाठी ब्लड ऑन कॉल सेवा कार्यान्वित झाली आहे. १०४ या टोल फ्री क्रमांकावर दूरध्वनी केल्यास तातडीने रक्ताचा पुरवठा केला जातो. रुग्णांचा जीव वाचण्यासाठी या योजनांचा उपयोग होत आहे.

युवकांसाठी स्वतंत्र क्रीडा आणि युवक धोरण

## वीज स्वयंपूर्णतेचे ध्येय साकार



राज्याच्या प्रगतीत असलेले विजेचे महत्त्व लक्षात घेऊन भारनियमनमुक्त महाराष्ट्राचे ध्येय साकार केले. विजेचे उत्पादन वाढवले, गळती रोखली. त्यासाठी वीजनिर्मिती आणि क्षमतावाढीचा ११ हजार कोटींचा पायाभूत आराखड्याचा पहिला टप्पा पूर्ण झाला असून साडे सहा हजार कोटींच्या दुसऱ्या टप्प्याचे काम सुरू आहे. आजच्या घडीला जिथे वीजबिले भरण्याचे प्रमाण कमी आहे त्याच भागात नाईलाजाने भारनियमन करावे लागत आहे, ही वस्तुस्थिती सर्वांनी समजून घेतली पाहिजे. शैक्षणिक संस्था, दवाखाने तसेच सार्वजनिक सेवाक्षेत्रातील ग्राहकांना वाणिज्य दरापेक्षा कमी दराने वीज देण्याचा निर्णय घेतला आहे.

**वीज ग्राहकांना सवलत**

घरगुती, व्यापारी, औद्योगिक, कृषी अशा सर्व प्रकारच्या ग्राहकांच्या वीजदरात २० टक्के कपात करण्याचा निर्णय. ३०० युनिटपर्यंत मासिक वापर असलेल्या घरगुती ग्राहकांना आपण ही सवलत देत आहोत. त्यामुळे नागरिकांच्या वीजबिलावरचा भार कमी झाला आहे.

**८२ टक्के महाराष्ट्र भारनियमन मुक्त**

वीज उपलब्धतेत वाढ करण्याचा कालबद्ध कार्यक्रम प्रभावीपणे अंमलात आणला. वीज वितरणासाठी सक्षम प्रणाली उभारली. त्यामुळे महावितरणच्या वीज उपलब्धतेत वाढ झाली. सद्य:स्थितीत वितरण व वाणिज्य हानीवर आधारित अ,ब,क, ड गटातील भारनियमन मागे घेण्यात आले आहे. औद्योगिक वाहिन्यांवरील ग्राहकांना भारनियमनमुक्त करण्यात आले आहे. अधिक वितरण वाणिज्य हानी असलेल्या वाहिन्यांवर वीजबील वसुली वाढवण्याची व चोरी शोधण्याची मोहीम युद्धपातळीवर हाती घेतली. या सर्व उपाययोजनांमुळे सद्य:स्थितीत ८२ टक्के महाराष्ट्र भारनियमन मुक्त झाला आहे. राज्यात सध्या वाहिनीनिहाय भारनियम करण्यात येत असून ज्या वाहिनीवर वीजबील वसुली जास्त व वीज वितरण हानी कमी आहे अशा वाहिन्यांवरील भारनियम कमी अथवा मुक्त करण्यात आले आहे.

**वीज उपलब्धता**

अ,ब,क,ड गटात येणाऱ्या सिंगल फेजिंग व एस.डी.टी. असणाऱ्या कृषिवाहिन्यांना २४ तास सिंगल फेज वीज पुरवठा देण्यात येत आहे. स्वतंत्र वाहिन्यांवरील उपसा जलसिंचन योजनांना १६ तास ३ फेज वीज उपलब्ध करण्यात येत आहे. नक्षलग्रस्त विभागात सायंकाळी ६ ते सकाळी ६ या कालावधीत भारनियमन करण्यात येत नाही. १० वी व १२ वी च्या परीक्षांच्या कालावधीत राज्यात सर्वत्र भारनियमन संध्याकाळी ६.३० ते १० पर्यंत रद्द करण्यात आले होते. राज्यातील वीज वितरण हानी मागील चार वर्षात २०.६० टक्क्यावरून ६ टक्याने कमी करून १४.६७ टक्के एवढी आहे. ही देशातील सर्वात कमी वितरण हानी आहे. जुलै २०१३ अखेर गावठाण फिडर सेपरेशन योजनेंतर्गत १६४८० इतक्या गावांना फायदा करून देण्यात आला. सिंगल फेजिंग योजनेंतर्गत १४९४७ इतक्या गावांना फायदा झाला आहे. मंडळाची पुनर्रचना होण्याअगोदर साधारणत: वर्षाला ६५००० कृषिपंपांस वीजपुरवठा केला जात होता परंतु कंपनी स्थापनेनंतर वर्षाला १,२०,०० कृषिपंपांना वीजपुरवठा केला जातो.

लागू केले. तालुका आणि गाव पातळीवर क्रीडासंस्कृती जोपासण्याचा आणि वाढवण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. विश्वविजेत्या भारतीय महिला कबड्डी संघातील दीपिका जोसेफ, सुवर्णा बारटक्के आणि अभिलाषा म्हात्रे या महाराष्ट्राच्या तीन खेळाडूंना प्रत्येकी १ कोटी आणि प्रशिक्षक डॉ. रमेश भेंडीगिरी यांना २५ लाख रुपयांचं पारितोषिक दिले. महिला खेळाडूंनाही प्रोत्साहन मिळाले पाहिजे, हा हेतू यामागे होता.

आघाडी शासनाने जे जे निर्णय घेतले त्यामागे दूरदृष्टी आणि सर्वसामान्य जनतेच्या व्यापक हिताचा विचार होता. असे अनेक निर्णय सांगता येतील. काही उदाहरणेच द्यायची झाली तर... मराठा समाजाला १६ आणि मुस्लीम समाजाला ५ टक्के आरक्षण देण्याचा क्रांतिकारी निर्णय आपण घेतला. त्यामुळे या दोन्ही समाजांचा शैक्षणिक आणि सामाजिक स्तर उंचावण्यासाठी साहाय्य होणार आहे.

**महापुरुषांची स्मारके**

छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही खरे तर आपली दैवते आणि प्रेरणास्थान आहेत. त्यांची प्रेरणादायी स्मारके असावीत यासाठी मुंबईनजीक अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे आंतरराष्ट्रीय स्मारक उभारण्यात येणार आहे. या स्मारकासाठी चालू आर्थिक वर्षात १०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. कोल्हापूर येथील राजर्षी शाहू महाराजांच्या स्मारकासाठी साडे तीन कोटी रुपये राखून ठेवले आहेत. मुंबईतील चैत्यभूमी येथील इंदू मिलच्या जागेवर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आंतरराष्ट्रीय स्मारक उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या स्मारकाचे काम लवकरच सुरू होईल, असा विश्वास आहे.

**गतिमान मुंबई**

एमएमआरडीएच्या माध्यमातून मुंबई आणि परिसराच्या विकासावर लक्ष केंद्रित केले. वर्सोवा ते घाटकोपर धावणारी मुंबई मेट्रो रेल्वे, वडाळा ते चेंबूरपर्यंतचा मोनो रेल प्रकल्प कार्यान्वित झाला. वांद्रे-वरळी सी लिंक, इस्टर्न फ्री वे, सहार उन्नत मार्ग, सायन-पनवेल रस्ता असे अनेक प्रकल्प पूर्ण झाले. नवी मुंबई विमानतळ, पुणे आणि नागपूर येथील मेट्रो प्रकल्प मार्गी लागण्याच्या वाटेवर आहेत. जेएनएनआरयुएमच्या माध्यमातून मध्यम श्रेणीच्या शहरांच्या विकासाने गती घेतली आहे. राज्यात पुणे, पिंपरी-चिंचवड, नागपूरसह अनेक छोट्या-मोठ्या शहरांच्या आसपास आंतरराष्ट्रीय दर्जाचे औद्योगिक, शैक्षणिक, आर्थिक प्रकल्प उभे राहत आहेत. त्यातून रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत.

**सामाजिक विकासाची प्रक्रिया**

पायाभूत सुविधांच्या प्रक्रियेने वेग घेतला असताना सामाजिक विकासाची प्रक्रियादेखील त्याच गतीने सुरू राहिली पाहिजे, असा आमचा प्रयत्न आहे.

**सुधारित टोलधोरण**

वाहनांवरील टोलचा विषय महत्त्वाचा होता. त्यासंदर्भात राज्याचे सुधारित टोलधोरण जाहीर केले. त्याआधी राज्यातील ४४ टोलनाके बंद केले. त्याचा सामान्यांना लाभ झाला. सर्वसामान्यांच्या वाहतुकीचे मुख्य साधन असलेल्या सर्व एसटी बसगाड्यांना सार्वजनिक बांधकाम विभाग आणि एमएसआरडीसीच्या सर्व टोलनाक्यांवर टोल माफी लागू केली. केंद्र शासनाच्या टोलनाक्यांवरही एसटीला माफी असावी, असा प्रयत्न करण्यात येत आहे.

**देशासाठीही अनुकरणीय**

महाराष्ट्राने वेळोवेळी घेतलेले निर्णय, राबवलेले विकास प्रकल्प आणि धोरणे ही अनेकदा देशासाठीही आदर्श आणि अनुकरणीय ठरली आहेत. रोजगार हमी योजना, माहितीचा अधिकार कायदा अशा अनेक योजना केंद्र सरकारने देशपातळीवर नेल्या. महाराष्ट्राने वीज चोरी रोखण्यासाठी राबवलेल्या महाराष्ट्र मॉडेलचे खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कौतुक केले असून हे मॉडेल आता अन्य राज्यांनीही स्वीकारण्याचे ठरवले आहे. हा राज्याचा एका वेगळ्या अर्थाने झालेला गौरव आहे, असे मला वाटते.

महाराष्ट्राच्या विकासासंदर्भात शासनाने अनेक निर्णय घेतले, या प्रत्येक निर्णयामागे जनतेच्या सर्वांगीण हिताची प्रेरणा होती. जनतेचा स्नेह, समर्थन आणि सक्रिय सहकार्य असल्यामुळेच आघाडी शासन यशस्वी वाटचाल करू शकले. त्यामुळे या यशाचे सर्व श्रेय जनतेचेच आहे, हे मी कृतज्ञतापूर्वक नमूद करतो.

**– शब्दांकन : संजय देशमुख,**
उपमुख्यमंत्र्यांचे जनसंपर्क अधिकारी




## कृषी संजीवनी

- शेतीचे उत्पन्न वाढावे म्हणून कृषिपंपांना वीज देण्याचे धोरण राबवून देशात महाराष्ट्र अग्रेसर
- गेल्या पाच वर्षात १० लाख कृषिपंपांना वीज जोडण्या.
- बहुतेक ठिकाणी ज्या वर्षात अर्ज आले त्याच वर्षात वीज जोडणी देण्यात आली.
- आजपर्यंत एकूण ३६ लाख ६६ हजार ८६६ कृषी ग्राहक. शेतकऱ्यांना वीज जोडण्या देण्यामध्ये महाराष्ट्र देशात अग्रेसर

## पायाभूत सुविधा

- विद्युत वितरण प्रणालित वीज हानी कमी करण्यासाठी तसेच ग्राहकांना सुरळीत व पुरेशा दाबाने वीजपुरवठा व्हावा म्हणून पायाभूत सुविधा आराखडा-१ प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी
- मागील तीन वर्षात या कार्यक्रमांतर्गत ६०६ नवीन उपकेंद्रे व ३७६ उपकेंद्रांची क्षमतावाढ. ६९,८७० नवीन वितरण रोहित्रे, उच्चदाब वाहिनी ४,२८९ कि.मी., लघुदाब वाहिनी १२,१२७, कि.मी. ही कामे पूर्ण
- पायाभूत आराखडा टप्पा दोनची कामे सुरू २०१५-१६ पर्यंत ऊर्जेची संपूर्ण गरज भागविण्यात येणार
- ३३/११ किव्होची ४७३ नवीन उपकेंद्रे, ३२ हजार ८९८ नवीन वितरण रोहित्रांची उभारणी, १०९ विद्युत रोहित्रांची क्षमता वाढ. यामुळे १९ लाख २५ हजार ४२१ घरगुती व वाणिज्यिक ग्राहकांना सिंगल फेजच्या नवीन जोडण्या, ५ लाख ८४ हजार ३६९ कृषी व औद्योगिक ग्राहकांना थ्री फेज व ३४,००५ औद्योगिक ग्राहकांना सिटी ऑपरेटेड मीटर्सच्या वीज जोडण्या शक्य.

**– हेमंत खैरे**




**नारायण राणे**
उद्योग, बंदरे आणि
रोजगार व स्वयंरोजगार मंत्री


'देशातील परकीय गुंतवणुकीत सर्वाधिक वाटा महाराष्ट्राचा आहे. राज्याच्या समतोल औद्योगिक विकासासाठी नवीन औद्योगिक धोरणाची निर्मिती करण्यात आली. त्याद्वारे ५ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित करणे, नव्याने २० लाख रोजगार निर्मिती करणे तसेच उत्पादन क्षेत्रात १२ ते १३ टक्के वाढ साध्य करणे, एकूण जीडीपीमध्ये उत्पादन क्षेत्राचा सहभाग २८ टक्क्यांपर्यंत वाढविणे ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी शासन प्रभावी उपाययोजना करत आहे.'

# उद्योगात महाराष्ट्रच पुढे

औद्योगिकीरणात महाराष्ट्राचा क्रमांक एक आहे. अलीकडे काही राज्ये ते अग्रक्रमावर आहेत असा दावा करतात. मात्र विविध निकषांचा अभ्यास केल्यास हे दावे फोल आहेत असे दिसून येते. राज्याचे एकूण स्थूल उत्पन्न १३ लाख ७० हजार कोटी आहे. गुजरातचे उत्पन्न ६ लाख ७२ हजार कोटी आहे.एकूण विदेशी गुंतवणुकीपैकी ४८ टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात झाली आहे. राज्याच्या एकूण स्थूल उत्पन्नाच्या कर्जाचे प्रमाण गुजरातमध्ये २६ टक्के असून महाराष्ट्रात हेच प्रमाण १७ टक्के आहे. साक्षरता, मानवी विकास निर्देशांक आणि दरडोई उत्पन्न या साऱ्यांमध्येच महाराष्ट्र गुजरातपेक्षा पुढे आहे.

असोसिएटेड चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज (असोचॅम) या संस्थेने भारतातील २० राज्यांची आर्थिक गुंतवणूक पाहाणी केली. त्यामध्ये महाराष्ट्र, गुजरात, आंधप्रदेश, ओडिशा आणि कर्नाटक या ५ राज्यांना गुंतवणूकदारांनी पसंत केले आहे. डिसेंबर -२०१३ अखेर एकूण रु. १,३०,५०,४६७ कोटी रुपये प्रस्तावित गुंतवणुकीपैकी ४८.२ टक्के गुंतवणूक या राज्यांनी आकर्षित केली आहे. पहाणी केलेल्या २० राज्यांमधील प्राप्त गुंतवणूक प्रस्तावांपैकी ११.३ टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात आहे. १०.७ टक्के गुंतवणूक गुजरात, ९.१ टक्के गुंतवणूक आंधप्रदेशमध्ये तर ८.९ टक्के गुंतवणूक ओडिसा आणि ८.२ टक्के गुंतवणूक कर्नाटक राज्यात प्रस्तावित आहे. त्यामुळे उद्योगाच्या क्षेत्रात महाराष्ट्र सर्वांत पुढे असल्याचे स्पष्टपणे दिसून येते.

**गुंतवणुकीसाठी ई-पोर्टल**

राज्यात मोठ्या प्रमाणात उद्योजक गुंतवणूक करतात. परंतु काही प्रकल्प तांत्रिक बाबींमुळे वेळेवर सुरू होऊ शकत नाहीत. त्यामुळे प्रकल्पांची किंमत वाढते त्याचा परिणाम औद्योगिक विकासावर होतो. ही अडचण सोडवण्यासाठी शासनाने वेब पोर्टल सुरू केले आहे. त्याद्वारे या गुंतवणूकदार राज्यातील १०० ते १००० कोटी रुपये गुंतवणुकींच्या प्रकल्पांवर ऑनलाइन सहनियंत्रण करू शकतात. प्रकल्प तातडीने कार्यान्वित करण्यासाठी आणि शासनाच्या विविध विभागांसोबत समन्वय



साधण्यासाठी या वेबपोर्टलची मदत होत आहे.

**नवीन औद्योगिक धोरण**

२०१३ च्या नवीन औद्योगिक धोरणामध्ये औद्योगिकदृष्ट्या मागास भागावर जास्त लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. नक्षलग्रस्त भागाचे औद्योगिकीकरण होण्यासाठी उद्योगांना चांगल्या सुविधा व जास्तीची प्रोत्साहने देऊ केली आहेत. सूक्ष्म, लघू आणि मध्यम उपक्रमांच्या विकासासाठी सर्वकष दृष्टिकोन, विशाल उद्योगांना कस्टमाईज पॅकेज स्वरूपात प्रोत्साहने, गुंतवणूकदारांसाठी सर्व प्रकारच्या सोयी-सुविधा मिळण्यासाठी स्वतंत्र गुंतवणूक कक्ष, जमिनीचा पर्याप्त वापर, आजारी उद्योग घटकांसाठी पुर्नवसनासाठी साहाय्य व अभय योजना, शाश्वत विकास योजनांसाठी प्रोत्साहने, मूलभूत सुविधांचा अडसर दूर करण्यासाठी स्वतंत्र निधीची निर्मिती इत्यादी बाबींवर भर देण्यात आला आहे.

**विकासासाठी एकात्मिक दृष्टिकोन**

सूक्ष्म, लघू व मध्यम उपक्रमांच्या विकासासाठी एकात्मिक दृष्टिकोन स्वीकारण्यात आला आहे. त्या अनुषंगाने या उपक्रमांना आर्थिक सवलती तसेच एमआयडीसीच्या भूखंड वाटपामध्ये १० टक्के आरक्षण ठेवण्यात आले आहे.

**धोरणात्मक उपाययोजना**

राज्याला स्पर्धात्मक बनविण्याच्या दृष्टीने आणि उद्योगांच्या गरजा लक्षात घेऊन नवीन धोरणात्मक उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत. नवीन माहिती तंत्रज्ञान/ माहिती तंत्रज्ञान साहाय्यभूत धोरण ,नवीन जैव तंत्रज्ञान धोरण, शेती व अन्न प्रक्रिया धोरण, उत्पादन धोरण, इलेक्ट्रॉनिक धोरण, विशेष आर्थिक क्षेत्र व निर्यातप्रधान घटकांसाठी धोरण, किरकोळ विक्री धोरण, नवीन भांडार खरेदी धोरण कार्यान्वित करण्यात आली आहेत.

**विशाल प्रकल्प धोरण**

विशाल प्रकल्प धोरणाला चांगला प्रतिसाद मिळत असून या धोरणांतर्गत ३,२३,८०२ कोटी रुपयांची गुंतवणूक आणि ३,६२,४९३ लाख व्यक्तींना रोजगार देणाऱ्या ४१३ विशाल प्रकल्पांना शासनाने मान्यता दिली आहे. विशाल प्रकल्पांपैकी १०९ प्रकल्पांत उत्पादन सुरु आहे. त्यातून ३७९२९ कोटी रुपयांची गुंतवणूक आणि ७०,८०४ लाख व्यक्तींना रोजगार उपलब्ध झाला आहे. विशाल प्रकल्पामध्ये ऑटोमोबाइल, इंजिनिअरींग, टेक्सटाइल, स्टील सीमेंट, पेपर अशा विविध उद्योगांचा समावेश आहे.

**देशातील सर्वाधिक परकीय थेट गुंतवणुकीत २३ टक्के वाटा महाराष्ट्राचा. केंद्र शासनाकडे आलेल्या औद्योगिक प्रस्तावांच्या एकूण गुंतवणुकीपैकी सर्वाधिक १८ टक्के वाटा एकट्या महाराष्ट्राचा. त्यातून १०,३२,२८० कोटी इतकी गुंतवणूक अपेक्षित.**

**मैत्री कक्ष**

गुंतवणूकदारांना प्रोत्साहने व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी गुंतवणूक सुविधा कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. हा कक्ष 'मैत्री' या नावाने ओळखला जातो. १० कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक करणाऱ्या प्रकल्पांना औद्योगिकीकरणाशी निगडित १० विभागांच्या ३१ सेवा या कक्षामार्फत पुरवल्या जातात.

**दिल्ली, मुंबई इंडस्ट्रीयल कॉरिडॉर**

या कॅारिडॅार'मुळे राज्यात विकासाचे नवे पर्व सुरू होत आहे. या प्रकल्पांतर्गत महाराष्ट्राचे १७ टक्के क्षेत्र येत असून मुंबई, ठाणे, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अहमदनगर, धुळे, नंदुरबार आणि रायगड हे जिल्हे देशाच्या राजधानीशी जोडले जाणार आहेत. या प्रकल्पांतर्गत येऊ घातलेली उद्योगक्षेत्रे आंतरराष्ट्रीय दर्जाची आहेत. या कॉरिडॉरमुळे उत्पादन क्षेत्रात अधिक प्रमाणात आघाडी घेऊ शकणार आहे. या प्रकल्पामुळे सुमारे ३ लाख ३० हजार नवीन रोजगार निर्मिती अपेक्षित आहे.

या कॉरिडॉरमुळे औद्योगिक शहरांच्या विकासाला चालना मिळणार असून परिणामकारक आणि कार्यक्षम तंत्रज्ञान असणारी परिवहन व्यवस्था, अखंडित ऊर्जा पुरवठा यांची जोड मिळणार आहे.

**सामूहिक प्रोत्साहन योजना**

औद्योगिक विकेंद्रीकरणासाठी सामूहिक प्रोत्साहन योजना तयार करून ती अमलात आणणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. या योजनेद्वारे अधिकाधिक औद्योगिक गुंतवणुकीला आकर्षित करून इतर राज्यांच्या स्पर्धेत अग्रेसर राहण्यासाठी तसेच, राज्यात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून घेण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे

म्हणूनच आज महाराष्ट्र हा सर्वांत पुढे आहे. राज्याचा औद्योगिक विस्तार वेगावे व्हावा यासाठी शासनस्तरावर वेळोवेळी महत्त्वपूर्ण पावले उचलली जात आहेत.

**- शब्दांकन : काशीबाई थोरात**



## ॲडव्हॅन्टेज विदर्भ

- विदर्भाचा औद्योगिक विकास व्हावा, विशाल प्रकल्प आकर्षित होऊन स्थानिक लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात आणि गुंतवणुकीच्या संधी उद्योजकांपुढे अधिक प्रभावीपणे मांडता याव्यात यासाठी नागपूर येथे फेब्रुवारी २०१३ मध्ये 'ॲडव्हॉंटेज विदर्भ' ही औद्योगिक क्षेत्रातील गुंतवणूकदारांची परिषद आयोजित
- त्यामध्ये १४,८३८ कोटी रुपये गुंतवणुकीचे २८ करार, त्यापैकी ५ प्रकल्पांचे उत्पादन सुरू, त्यातील प्रत्यक्ष गुंतवणूक रुपये ६९२ कोटी
- विदर्भात प्रथमच: सार्वजनिक क्षेत्रातील नामंकित कंपनीद्वारे भंडारा जिल्ह्यात ५०० कोटी रु. गुंतवणुकीच्या प्रकल्पाची उभारणी
- विदर्भात गुंतवणूक करणाऱ्या कंपन्यांमध्ये भेल, अंबुजा सिमेंट, माणिकगड सिमेंट, अंबा आर्यन, धारीवाल इन्फ्रास्ट्रक्चर, सूर्यलक्ष्मी कॉटन मील, रेमंड्स यूको डेनिम व भूषण स्टील या उद्योग समूहांचा समावेश
- विदर्भामध्ये पायाभूत सुविधांसाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाद्वारे ४५० कोटी रुपये अंदाजित खर्चाच्या कामांना प्रशासकीय मंजुरी
- नव्या वस्त्रोद्योग धोरणात उद्योजकांना पूरक सवलती दिल्यामुळे उद्योजक विदर्भाकडे आकर्षित



**छगन भुजबळ**
सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) आणि पर्यटन मंत्री

> 'एखाद्या राज्याच्या विकास हा त्या राज्यातील गतिमान रस्त्यांवरून ठरविला जातो. आपल्या राज्यात विकासाची पायाभरणी करताना रस्ते, महामार्ग, उड्डाणपूल यांच्या गुणवत्तापूर्ण उभारणीवर लक्ष दिले गेले. गेल्या अनेक वर्षात रस्त्यांचे जाळे उभारण्यात आले. त्यामुळे शहरांबरोबरच गावोगावीही विकासाचा मार्ग खुला झाला.'

# समृद्धीचे महामार्ग

विकासाला गती देण्यासाठी राज्यातील रस्ते, महामार्ग, पूल, दळणवळणाची सुविधा या पायाभूत सुविधांच्या उभारणीत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत गेल्या अनेक वर्षात भरीव असे कार्य करण्यात आले आहे. यामुळे प्रगतीला मोठी चालना मिळाली आहे. दळणवळणाच्या पायाभूत सुविधांचा विकास झापाट्याने झाला आहे.

मला सांगायला आनंद वाटतो की, राज्यातल्या २ लाख ४३ हजार १७२ किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची बांधणी, देखभाल आणि दुरूस्ती तसेच चौपदरीकरणातून २३ जिल्ह्यांना जोडण्याचे काम झाले आहे. ४० हजार १५८ खेडी बारमाही रस्त्यांनी जोडण्यात आली आहेत. ग्रामीण वस्त्या पाडे यांना शहरांशी जोडण्याचे काम करण्यात येत आहे. नक्षलग्रस्त भागात झालेले रस्ते आणि पूल तर वाखाणण्याजोगेच आहेत.

सर्व रेल्वे क्रॉसिंगवर उड्डाणपूल बांधण्यात येणार आहेत. त्या अनुषंगाने १८ रेल्वे उड्डाणपुलांची कामे सुरू झाली आहेत. सर्व राज्यमार्ग व प्रमुख जिल्हा मार्ग पावसाळ्यासह बाराही महिने वाहतुकीसाठी सुस्थितीत राहण्यासाठी कार्यवाही करण्यात येत आहे. विभागाने कामकाजात सुलभता व पारदर्शकता आणण्यासाठी निविदा प्रक्रिया ई-टेंडरद्वारे केली जाते.

शासनाने खाजगीकरणाच्या माध्यमातून रस्ते व पुलांची बांधकामे करण्याबाबत सर्वसाधारण धोरण ठरवले आहे. मुख्यत: शहरीकरण, नागरीकरण, कृषी आणि औद्योगिकीकरण असल्यामुळे ज्या रस्त्यांवर वाहतुकीची वर्दळ जास्त आहे, अशा ठिकाणांच्या रस्त्यांचा विकास खाजगीकरणातून करण्यात येतो.

### पथकर धोरण

राष्ट्रीय महामार्गासह ५४८७ कि.मी.लांबीचे रस्ते खाजगीकरणातून बांधण्यात आले आहेत. राज्यातील एकूण रस्ते लांबीपैकी फक्त २.२५ टक्के लांबीचे रस्ते खाजगीकरणातून करण्यात आले





आहेत. पथकर वसुलीमध्ये पारदर्शकता आणण्यात येणार आहे. पथकरच्या ठिकाणी सोयीसुविधा निर्माण व्हाव्यात यासाठी नवीन पथकर धोरण आखण्यात आले आहे. यात ई-टेंडरिंग व संगणकीय पद्धतीने वाहतूक वर्दळीची नोंद घेण्याची तरतूद आहे.

१ जुलै २०१४ पासून एकूण ४४ पथकर स्थानके बंद करण्याचा निर्णय.

**रस्ते विकासाचा नवीन आराखडा**

वाढती लोकसंख्या, औद्योगिकीकरण, पर्यटन क्षेत्राचा विकास, दळणवळणाची सुधारणा या सर्व बाबी विचारात घेऊन २००१ ते २०२१ हा २० वर्षीय रस्ते विकासाचा नवीन आराखडा तयार केला आहे. त्यानुसार एकूण ३,३६,००० कि.मी. लांबीचे रस्ते बांधले जातील. १०० किंवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्येची गांवे किमान एका बारमाही रस्त्याने जोडणे, सर्व तालुके मुख्यालयांना बायपासची सुविधा, जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी रिंगरोडची सुविधा, जिल्हा मुख्यालयांना किमान चौपदरी रस्त्याने जोडणे, बंदरे, औद्योगिक क्षेत्रे, राज्य मार्ग दर्जाच्या रस्त्याने जोडणे या बाबींचा अतर्भाव या आराखड्यात करण्यात आला आहे.

केंद्रीय साहाय्याने आतापर्यंत ३०,१२९ कि.मी. लांबीच्या रस्त्यांची सुधारणा करण्यात आली आहे. २७३४ लहान आणि मोठ्या पुलांची कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

कोकणामध्ये ७८७ कि.मी. लांबीचा सागरी महामार्ग बांधण्यात येत आहे. यापैकी ७५९ कि.मी. रस्ता बांधून पूर्ण झाला आहे. केवळ तीन पुलांची कामे व २८ कि.मी. रस्ते लांबी बाकी आहे.

**पायाभूत सुविधा**

रस्त्यांना नवसंजीवनी देतानाच पायाभूत सुविधा उभारण्यासाठी गेल्या अनेक वर्षात भरीव अशी कामगिरी करण्यात आली आहे. महामार्गांचे चौपदरीकरण, उड्डाणपूल, खेड्यांना जोडणारे रस्ते यामुळे महाराष्ट्रात विकासाची गंगा गावोगावी पोहोचवण्याचे काम रस्त्यांनी आणि त्यावरील उड्डाणपुलांनी केले आहे. राज्यातल्या महानगरांमध्ये करण्यात आलेल्या उड्डाणपुलांमुळे होणारी वाहतुकीची कोंडी नाहीशी झाली आहे. यासाठी नाशिक शहरातील उड्डाणपुलाचे उदाहरण देता येईल. या पुलामुळे शहराची दोन टोके एकमेकांना जोडली गेल्याने शहरांतर्गत वाहतुकीवरचा ताण नाहीसा झाला. वेळेची बचतही झाली. गुळगुळीत रस्त्यांमुळे राज्याच्या विकासाला अधिकच गती मिळाली.

**शब्दांकन : अजय जाधव**



## रस्त्यांचे चौपदरीकरण

रस्त्यांच्या चौपदरीकरणाचे काम वेगात सुरू आहे. २३ जिल्हे चौपदरी रस्त्यांनी जोडण्यात आले आहेत. सध्या १३९ विविध रस्त्यांच्या प्रकल्पांची कामे सुरू आहेत. त्याचप्रमाणे १६६३ लहान व मोठ्या पुलांचे बांधकामदेखील पूर्ण करण्यात आले आहे.



आर. आर. पाटील
गृहमंत्री

महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा आलेख दिवसागणिक उंचावत आहे. यात गृह विभागाचे मोठे योगदान आहे. या विभागाने कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्याबरोबरच दहशतवाद व नक्षलवादाचा प्रभावी मुकाबला करण्यासाठी प्रयत्न करण्यात आला आहे. महिलांच्या सुरक्षिततेसाठी आम्ही विशेष लक्ष पुरवले असून, प्रत्येक पोलीस ठाण्यात त्यांच्यासाठी साहाय्य कक्ष, महिला सुरक्षा समित्या नेमल्या. महिला अत्याचार व बलात्काराचे खटले त्वरेने निकाली काढण्यासाठी १३ विशेष न्यायालये स्थापन केली.

# सुरक्षित आणि समर्थ

२००९ मध्ये गृह विभागाची सूत्रे स्वीकारल्यानंतर अनेक आव्हाने समोर होती. २००८ मध्ये झालेल्या २६/११ च्या दहशतवादी हल्ल्याने आणि गडचिरोलीतील नक्षल कारवायांमुळे पोलिसांच्या जबाबदाऱ्या अधिक वाढल्या होत्या. या पार्श्वभूमीवर पोलीस दलाला अधिक सक्षम, सुसज्ज करण्याचे नियोजन केले. त्यात प्रामुख्याने गुप्तचर यंत्रणा अधिक सक्षम करण्यावर भर दिला. त्या विभागात स्वतंत्र इंटेलिजन्स ऑफिसरचे केडर तयार केले, रिक्त जागा भरल्या. या अधिकाऱ्यांच्या शास्त्रोक्त प्रशिक्षणासाठी राष्ट्रीयस्तरावरची पहिलीच इंटेलिजन्स ॲकॅडमी पुण्यात स्थापन केली. त्यानंतर अतिरेकी कारवायांना तत्काळ प्रत्युत्तर देण्यासाठी एनएसजीच्या धर्तीवर राज्यात फोर्सवन हे या विशेष कमांडो पथके आणि १५ महानगरांमध्ये जलद प्रतिसाद पथक कार्यरत आहेत. या जवानांना आधुनिक प्रशिक्षणासाठी गोरेगावला कायमस्वरूपी नागरी दहशतवादविरोधी प्रशिक्षण केंद्र स्थापन केले. आतंकवादाविरोधातली लढाई अधिक तीव्र करण्यासाठी जवानांना अत्याधुनिक शस्त्रे, उपकरणे आणि इतर सर्व आवश्यक गोष्टी उपलब्ध करून दिल्या. सागरी सुरक्षेवर भर देताना आज ७२ बोटी समुद्रात गस्त घालत असून पोलिसांबरोबरच नेव्ही, कोस्टगार्ड हेदेखील अहोरात्र सागरी सुरक्षा करीत आहेत. सागरी भागात ४४ सागरी पोलीस स्टेशन्स आणि ९२ चेकपोस्ट निर्माण करण्यात आले.

**महिला सुरक्षेला प्राधान्य**

महिला सुरक्षेचा मुद्दा आमचा प्राधान्याचा विषय आहे. नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्यूरोच्या २०१३ च्या अहवालानुसार महिलांशी संबंधित गुन्ह्यांत देशात महाराष्ट्राचा सोळावा क्रमांक असून, हे गुन्हे घडू नयेत यासाठी ठोस पावले उचलली आहेत. प्रत्येक पोलीस ठाण्यात महिला साहाय्य कक्ष, महिला सुरक्षा समित्या नेमल्या तर पीडित महिलांच्या मानसिक आधारासाठी समुपदेशन केंद्रे सुरू आहेत. महिला अत्याचार व बलात्काराचे खटले त्वरेने निकाली काढण्यासाठी अहमदनगर, अकोला, अमरावती, औरंगाबाद, बुलढाणा, बीड, जळगाव, नागपूर, यवतमाळ, ठाणे, पुणे, कोल्हापूर आणि मुंबई येथे १३ विशेष न्यायालये



स्थापन झाली असून त्याव्यतिरिक्त बृहन्मुंबई, भंडारा, चंद्रपूर, धुळे, जालना, लातूर, नांदेड, नाशिक, उस्मानाबाद, परभणी, सांगली, सातारा, सोलापूर आणि वर्धा या १४ जिल्ह्यात विशेष न्यायालये स्थापन झाली आहेत. महिला अत्याचार प्रतिबंधासाठी प्रचलित कायद्यातील तरतुदींचा अभ्यास करून त्यात सुधारणा सूचविण्यासाठी न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी समितीचे गठन करण्यात आले. समितीच्या बहुतांशी शिफारशींवर अंमलबजावणी सुरू आहे. महिलांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी विनाशुल्क हेल्पलाइन कार्यरत केली. महिलांशी संबंधित संवेदनशील गुन्ह्यांच्या तपासासाठी स्वतंत्र महिला अत्याचार प्रतिबंधक कक्षाची मुंबईत निर्मिती केली. मुंबईतील मध्य, पश्चिम आणि हार्बर मार्गावरील उपनगरी रेल्वेतून प्रवास करणाऱ्या महिलांच्या सुरक्षेसाठी ५०० होमगार्ड तैनात करण्याचा निर्णय घेतला. त्याशिवाय मुंबई महानगराच्या विविध भागात दुचाकीवरून नियमित गस्तीसाठी २०० महिला कमांडोंचे पथक लवकरच कार्यरत होईल. महिलांबरोबरच ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांच्या सुरक्षेसंदर्भात विविध उपाययोजना पोलिसांनी केल्या.

**ॲट्रॉसिटीच्या गुन्ह्यांबद्दल गंभीर**

अनुसूचित जाती-जमातीच्या आमच्या बांधवांशी संबंधित घडणाऱ्या गुन्ह्यांबद्दल मी अतिशय गंभीर असून ज्या ठिकाणी ॲट्रॉसिटीचे गुन्हे दाखल होत नसतील अशा ठिकाणी अपर पोलीस महासंचालकांकडे दूरध्वनीवरून तक्रार दिल्यास ती शून्य क्रमांकाने नोंदवून संबंधित पोलिसांकडे वर्ग करण्यात येईल. तक्रार नोंदवण्यास टाळाटाळ करणाऱ्यांवर प्रसंगी बडतर्फीचा बडगा उगारू. एखाद्यावर ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल केल्यानंतर संबंधित व्यक्ती फिर्यादीवर दरोड्याचा गुन्हा दाखल करते. या गुन्ह्यानंतर फिर्यादीलाच अटक होत असल्याचे प्रकार पाहता ॲट्रॉसिटीच्या गुन्ह्याचा व फिर्यादीवर अन्य गुन्हे नोंद असेल तर एकच पोलीस उपअधीक्षक या प्रकरणांचा तपास करणार आहे.

एखाद्या गुन्ह्यात बळी पडलेल्या व्यक्तीस किंवा त्यांच्या कुटुंबीयांना नुकसानभरपाई देण्यासाठी व्हिक्टीम कॉम्पेन्सेशन योजनादेखील गृह विभागाने सुरू केली आहे.

**नक्षल कारवायांना चाप**

दहशतवादाच्या मुकाबल्यासाठी यंत्रणा सुसज्ज करतानाच गडचिरोलीतील नक्षल कारवायांनादेखील चाप लावला आहे. नक्षल आत्मसमर्पण योजनेला मिळणारा प्रतिसाद अतिशय चांगला असून २००५ नंतर ४६० पेक्षा अधिक नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करली आहे. गडचिरोली जिल्ह्यातील पोलीसदल अधिक सक्षम करण्यासाठी २०१० पासून आजअखेर २,७१२ नवीन पोलिसांची पदे भरली आहेत. विशेषत: यात तरुणींचाही मोठा सहभाग आहे. जिल्ह्यातील जनतेमध्ये प्रशासनाबद्दलचा विश्वास वाढवण्यासाठी लोकसंपर्कावर विशेष भर पोलिसांनी दिला असून त्यासाठी जनजागरण मेळावे, महाराष्ट्र दर्शन योजना, पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण, नवजीवन, स्वावलंबन योजना, व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रम, गावभेटी आणि स्वयंरोजगार कार्यक्रम राबवीले जात आहेत.

> ॲट्रॉसिटीच्या प्रकरणांसाठी ६ जलदगती न्यायालये कार्यरत होणार असून त्यातील औरंगाबाद, नागपूर येथील न्यायालये सुरू.

गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्रीपद मी स्वत:हून स्वीकारले. नक्षल संपवण्यासाठी जिल्ह्याचा विकास झाला पाहिजे, लोकांना पाणी, आरोग्य, शिक्षण, रस्ते आदी सुविधा मिळाल्या पाहिजेत, ही धारणा त्यामागे होती. त्याअनुषंगाने जिल्ह्यात विविध कामे करण्याचा प्रयत्न केला.

जिल्ह्यात झालेल्या विकासकामाची व नक्षलविरोधी कामगिरीची देशस्तरावर दखल घेऊन गडचिरोली पॅटर्न सगळीकडे राबवण्याचा केंद्र सरकारने मनोदय केला आहे. पोलीस दलाला स्वतंत्र हेलिकॉप्टर देऊन पोलिसांची संख्यादेखील वाढवली आहे. गडचिरोली-अहेरी या स्वतंत्र पोलीस जिल्ह्याचे चांगले परिणाम दिसत आहेत.

एकूणच, राज्यातील कायदा-सुव्यवस्थेला सर्वोच्च प्राधान्य देताना विविध अंगाने उपाययोजना केल्या. त्यातूनच पोलीस दलाला लोकाभिमुख बनविण्याबरोबरच सुरक्षित आणि सक्षम महाराष्ट्राचा लौकिक यापुढच्या काळातही टिकवून ठेवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

**– शब्दांकन : किशोर गांगुर्डे,**
जनसंपर्क अधिकारी



## पोलीस दलाचे आधुनिकीकरण

- पोलीस आधुनिकीकरणावर ४४ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च, शस्त्र, दारूगोळा, यंत्रसामग्री, वाहने, कार्यालये-निवास बांधकामे, प्रशिक्षण साहित्य, दळणवळण आदींसाठी या निधीचा वापर
- मुंबई-पुण्यात सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याची प्रक्रिया सुरू
- सोशल मीडियाच्या माध्यमातून होणाऱ्या गुन्ह्यांवर अंकुश ठेवण्यासाठी सायबर गुन्हे शाखा अद्ययावत
- युवकांमध्ये सायबर क्राइमविषयी जाणीवजागृती
- आर्थिक गुन्ह्यांसाठी ठेवीदारांच्या हितसंबंधाचे रक्षण करणाऱ्या कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करून संबंधितांच्या मालमत्तांचा लिलाव करण्याची प्रक्रिया सुरू
- मोठ्या शहरांमध्ये बिनतारी संदेश यंत्रणेने सुसज्ज अशी ५०० वाहने महिला सुरक्षेसाठी तैनात
- पाच टप्प्यात ५५ हजारपेक्षा अधिक पोलिसांची भरती
- पुढील पाच वर्षात ६१४९४ नवीन पोलिसांची भरती
- यावर्षी १५ हजारांपेक्षा अधिक पोलिसांची भरती प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे
- देशात सर्वाधिक महिला पोलिसांची भरती करण्याचा विक्रम देखील महाराष्ट्राच्या नावे असून २० हजारपेक्षा अधिक महिला पोलीसदलात कार्यरत
- महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेद्वारे ९ लाखांपेक्षा अधिक तंटे मिटले



**शिवाजीराव मोघे**
सामाजिक न्याय, विमुक्त/भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय कल्याण आणि व्यसनमुक्ती कार्य मंत्री

# आत्मसन्मानाने जगण्याची संधी

दुर्बल घटकांच्या कल्याणाच्या दृष्टीने सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य विभाग अत्यंत महत्त्वाचा असून या विभागाचा मंत्री म्हणून जबाबदारी घेतल्यानंतर अस्तित्वात असलेल्या योजनांना गती दिली. त्यात काळानुरूप सुधारणा केल्या. काही नव्या योजनांची सुरुवात केली.

**मराठा समाजाला आरक्षण**

दुर्बल घटकांच्या कल्याणाप्रमाणे मराठा समाजातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या घटकांना १६ टक्के (अल्पसंख्याक घटकाला ५ टक्के) शिक्षण आणि नोकरीत आरक्षण देण्याचा क्रांतिकारी निर्णय शासनाने घेतला. हा निर्णय माझ्या मंत्रिपदाच्या कारकीर्दित झाला याचा मला आनंद आहे.

अज्ञानावर आधारित अनिष्ट व दुष्ट प्रथा नरबळी व अघोरी प्रथांपासून सामान्य माणसाचे रक्षण व्हावे यासाठी शासनाने १८ वर्षाच्या प्रयत्नानंतर कायदा संमत केला. याची प्रभावी अंमलबजावणी राज्यात करण्यात येत आहे.

**व्यसनमुक्तीसाठी धोरण**

व्यसनामुळे सर्वात जास्त नुकसान मागासवर्गीय आणि गरीब माणसांचे होते. ते थांबवण्यासाठी शासनाने व्यसनमुक्ती धोरण जाहीर केले. त्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे सुरू आहे. याचाच एक भाग म्हणून व्यसनमुक्ती साहित्य संमेलन आयोजित करण्यात येत आहेत.

'महात्मा जोतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर या थोर महापुरूषांकडून लोककल्याणाचा वारसा राज्याला लाभला आहे. हा वारसा समर्थपणे पुढे चालवण्याच्या अनुषंगाने गेली साडे चार वर्षे समाजकल्याण विभाग अथक प्रयत्नशील आहे. या कालावधीमध्ये विभागामार्फत समाजातील दुर्बल घटकांचा सर्वांगिण विकास व्हावा यासाठी अनेक योजना राबवण्यात आल्या. नवे निर्णय घेण्यात आले. या घटकांना मूळ प्रवाहात येणे शक्य व्हावे म्हणून शैक्षणिक आणि इतर सोयी-सुविधासुद्धा उपलब्ध करून देण्यात आल्या. त्यामुळे या घटकांना आत्मसन्मानाने जगण्याची संधी मिळाली. याचा मला विशेषत्वाने उल्लेख करावासा वाटतो.



व्यसनमुक्तीसाठी सल्ला, समुपदेशन, उपचार व पुर्नवसन यासारखे कार्य करणाऱ्या संस्थांना अनुदान देण्यात येते.

**स्वयंरोजगारासाठी कर्ज**

सामाजिक न्याय विभागाच्या आधिपत्याखाली कार्यरत महामंडळामार्फत स्वयंरोजगार सुरू करण्यासाठी कर्ज उपलब्ध करून देण्यात येते. या महामंडळाचे भागभांडवाल वाढवण्यासाठी ३३० कोटी रुपयाचा निधी देण्यात आला. २००८ पूर्वीचे ४२१ कोटी रुपयाचे थकीत कर्ज व्याजासह माफ करण्यात आले. कर्ज वाटपात पारदर्शकता यावी याकरिता लॉटरी (सोडत) पद्धतीचा अवलंब करण्यात आला. या महामंडळासाठी नुकतीच २५८ कोटीची हमी शासनाने राष्ट्रीय महामंडळाला दिली आहे. यामुळे ३५ हजार मागासवर्गीय तरुणांना रोजगारासाठी लाभ होणार आहे.

कर्मवीर दादासाहेब गायकवाड स्वाभिमान व सबळीकरण योजनेंतर्गत ४,८७२ भूमिहीनांना जमीन देण्यात आली आहे. परंतु संबंधितांना जमीन मिळण्यास अडचण येत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे पात्र व्यक्तींना जमीन पसंत करण्याची सुविधा देण्यात आली आहे. अशा जमिनी खाजगी जमीन रेडीरेकनर दरानुसार रुपये ३ लाख प्रति एकर विकत घेऊन संबंधितांना देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

शेतीसाठी पॉवर टिलर देण्यात येत होते त्यात आता बदल करून मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने देण्यात येत आहेत. व्यक्तीऐवजी बचत स्वयंसाहाय्यता बचत गटाला हे मिनी ट्रॅक्टर देण्यात येतात. नुकतेच ५०१ मिनी ट्रॅक्टर्सचे राज्यात वाटप करण्यात आले आहे.

**अपंगाच्या कल्याणासाठी**

अंपगासाठी सुरू करण्यात आलेल्या शाळांना १०० टक्के अनुदान देण्यात येते. ६३७ विशेष शाळा सुरू आहेत. सामाजिक न्याय मंत्री म्हणून माझ्याकडे असलेल्या १५ टक्के कोट्यापैकी ५ टक्के जागा शासकीय वसतिगृहांत अपंगासाठी ठेवण्याचा निर्णय घेतला. अशा युवकांना स्वंयरोजगार करता यावा यासाठी अपंग कल्याण विकास महामंडळामार्फत पूर्वी २५ हजार कर्ज मिळते होते ते आता १ लाख रुपये करण्यात आले. नोकरीमधील अपंगांचा अनुशेष भरून काढण्यासाठी विशेष मोहीम राबवून जवळपास १० हजार पदे भरली. अपंग व्यक्तींबरोबर अपंग नसलेल्या व्यक्तीने विवाह केल्यास या दाम्पत्यांला ५० हजार रुपये साहाय्य देण्यात येत आहे.

**रमाई घरकूल**

अनुसूचित जाती व नवबौध्द कुटुंबाला हक्काचे घर मिळावे यासाठी रमाई घरकूल योजना राबवण्यास सुरुवात केली. मागील चार वर्षात २ लाख २५ हजार घरे बांधून पूर्ण झाली. ६९ हजार घरकुले प्रगतिपथावर आहेत.

**दलित वस्ती धोरणात बदल**

दलित वस्ती सुधारणा योजनेचे नाव अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे असे करण्यात आले आहे. पूर्वी ५० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या वस्तींसाठी या योजनेत निधीची तरतूद नव्हती. आता ती करण्यात आली आहे.

**विमुक्त भटक्या समाजाकरिता विशेष प्रयत्न**

पालामध्ये राहणाऱ्या भटक्या जाती व भटक्या जमाती या घटकास मूळ प्रवाहात आणण्यासाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना राबवण्यात येत आहे. यामध्ये ग्रामपंचायत, पंचायत समिती क्षेत्रातील विमुक्त या घटकास २६९ चौ.फू. क्षेत्रफळाची पक्की घरे बांधून देण्यात येणार येतील. या वस्त्यांमधील लाभार्थ्यांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी कार्यरत असलेली कार्यालये एका छताखाली आणण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात सामाजिक न्यायभवन बांधण्यात येत आहे. आतापर्यंत एकूण २१ सामाजिक न्यायभवनाचे काम पूर्ण झाले आहे.

अनुसूचित जाती/जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत खटले लवकर निकाली लागावे यासाठी विभागीय स्तरावर स्वतंत्र न्यायालये सुरू झालीत. जातपडताळणी समित्या वाढवण्यात आल्या. ही पडताळणी ऑनलाइन करण्यात आली.

सर्वसमावेशक ज्येष्ठ नागरिक धोरणानुसार ६५ वर्षावरील नागरिकांना विविध लाभ मिळाले.

**शब्दांकन- विष्णू काकडे**



## शैक्षणिक क्रांती

- मॅट्रिकोत्तर शिक्षण शिष्यवृत्तीचे वाटप ऑनलाइन पद्धतीने
- १७.३३ लाख विद्यार्थ्यांच्या राष्ट्रीयीकृत बँक खात्यात त्यांची शिष्यवृत्ती थेट जमा
- या अभिनव योजनेला २०११ चे केंद्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाचे पारितोषिक
- १०.३० लाख विद्यार्थिनींच्या बँक खात्यात सावित्रीबाई फुले ऑनलाइन शिष्यवृत्ती जमा करण्यास प्रारंभ
- जवळपास ३२ लाख ३६ हजार विद्यार्थी महाविद्यालयीन व उच्च शिक्षणासाठी विविध शिष्यवृत्तींसाठी पात्र
- परदेशात जाऊन उच्च शिक्षण घ्यायचे आहे अशा अनुसूचित जातींच्या ५० विद्यार्थ्यांसाठी विशेष शिष्यवृत्ती योजना. जवळपास १५० विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती मिळाली
- परदेशात पीएच.डी. अभ्यासक्रमासाठीच्या वयोमर्यादेत ३५ वर्षावरून ४० वर्षे अशी वाढ
- तालुकास्तरावर वसतिगृहे. जिल्हा स्तरावर २७१ शासकीय वसतिगृहे होती. २०११ ला १०० नवीन वसतिगृहे सुरू. प्रत्येक महसूल विभागात १००० क्षमतेचे मुला-मुलींसाठी नवीन वसतिगृह बांधण्याचा निर्णय
- या वर्षापासून शासकीय वसतिगृहात प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन
- अनुसूचित जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शासनमान्य खाजगी, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेण्यासाठी शैक्षणिक खर्चाची प्रतिपूर्ती. यूपीएससी परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी ५० विद्यार्थ्यांना नामांकित संस्थेत प्रशिक्षण



**मधुकरराव पिचड**
आदिवासी विकास मंत्री

# प्रगतीच्या नव्या संधी

'आदिवासी विकास हा माझा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय. आदिवासींसाठी अनेक योजना शासन राबवत असले तरी काही योजना या कालबाह्य ठरल्याचे दिसून आले. त्यामुळे नवीन योजनांची भर घालणे आवश्यक ठरले. म्हणूनच आदिवासी उपयोजनेच्या नियोजन व अर्थसंकल्पीय पद्धतीचे पुनर्विलोकन करण्यासाठी व आदिवासी उपयोजनेच्या अंमलबजावणीमध्ये बदल व सुधारणा सुचविण्यासाठी एका समितीचे गठण करण्यात आले.

राज्यातील आदिवासींच्या जीवनात समृद्धी यावी आणि त्यांनासुद्धा विकास आणि प्रगतीच्या विविध संधी उपलब्ध व्हाव्यात यावर मी लक्ष केंद्रित केले. त्या अनुषंगाने विविध योजना प्रभावीपणे कशा राबवता येतील, याकडे लक्ष पुरवले. नियोजनाची दिशा निश्चित केली आणि विभागाला अधिक सक्षमतेने कार्यरत केले.

आदिवासींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण हा सर्वात प्रभावी मार्ग ठरू शकतो. म्हणूनच राज्यात शिक्षणसंस्थांचे जाळे विणण्यात आले. इंग्रजी माध्यमांच्या पब्लिक स्कूलची स्थापना करण्यात आली. विद्यार्थ्यांकरिता विविध शैक्षणिक सवलतींसोबतच शिष्यवृत्ती योजनाही सुरू आहेत. आदिवासींमध्ये असलेली निरक्षरता लक्षात घेता शिक्षणाच्या प्रसारासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात येत आहेत.

**लाभार्थी निवडीचे अधिकार ग्रामसभेला**

आदिवासींसाठी असलेल्या योजनांसाठी लाभार्थी निवडीचे निकष ठरलेले आहेत. अशावेळी गरजू आणि योग्य व्यक्तीला लाभ मिळावे यासाठी लाभर्थींची निवड करण्याचे अधिकार ग्रामसभेला देण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला. अनेक वर्ष प्रलंबित असलेल्या वनहक्क समितीसंदर्भात निर्णय घेऊन वनहक्क कायद्यांतर्गत असलेले जमिनीचे दावे तत्काळ निकाली काढण्याबाबत निर्देश दिले.

आदिवासी क्षेत्रातील विविध विभागातील वर्ग ३ व ४ ची रिक्त पदे भरताना स्थानिक आदिवासी उमेदवारांना प्राधान्य देण्यात येणार आहे. यासाठी अर्हतेमध्ये काही सूट देण्याबाबत राज्यपालांनी अधिसूचना नुकतीच जारी केली.

स्थानिक पातळीवर तातडीने व प्रभावीपणे विविध योजना कार्यान्वित करून गरजू अदिवासींना प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यासाठी केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्यूक्लिअस बजेट) राबवण्यात येतो. केंद्रवर्ती अर्थसंकल्प या योजनेची प्रतिलाभार्थी अनुदान मर्यादा रुपये १५,०००/- वरून रुपये ५०,०००/- करण्यात आली. हा एक महत्त्वाचा निर्णय आहे.

**हक्काचे घर**

आदिवासींना कायमस्वरूपी हक्काचे घर मिळावे यासाठी शबरी आदिवासी घरकूल योजना राबवण्यात येत आहे. या घरकुलात



एक बैठकीची खोली, बेडरूम, स्वंयपाक घर, स्नानगृह, व शौचालय यांचा समावेश आहे.

आदिवासी उपयोजना बाह्यभागामध्ये मोठया संख्येने आदिवासींचे वास्तव्य असलेल्या ठिकाणी, शासनाच्या सध्याच्या धोरणानुसार पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आदिवासी उपयोजनेच्या निधी मधून तरतूद उपलब्ध करून देता येत नाही. यामुळे अशा भागांचा विकास इतर भागांच्या तुलनेने कमी प्रमाणात होतो. तसेच अशा वस्त्या दुर्लक्षित राहतात. ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा कार्यक्रमांतर्गत विकासासाठी आवश्यक असलेल्या सामूहिक विकासाच्या सुविधा पुरवण्याची योजना राबवण्यात येत आहे. त्यासाठी २६१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

आदिवासी विकास विभागासाठी सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी एकूण ६५१२ कोटी रुपयांची तरतूद.

**खावटी कर्ज**

पावसाळ्यात जून ते सप्टेंबर या कालावधीत आदिवासींना रोजगार उपलब्ध होत नसल्यामुळे आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आदिवासी अल्पभूधारक, भूमिहीन व शेतमजूर यांना आर्थिक अडचण निर्माण होऊ नये म्हणून खावटी कर्ज देण्यात येते. पूर्वी खावटी कर्जाचे वाटप ७० टक्के वस्तू स्वरूपात व ३० टक्के रोख स्वरूपात होत होते. आदिवासी लाभार्थ्यालाच ही कर्जाची रक्कम मिळावी तसेच भ्रष्टाचाराला आळा बसावा यासाठी ही रक्कम धनादेशाद्वारे देण्यात येत आहे. आता खावटी कर्जाचे वाटप १०० टक्के रोखीने करण्यात येईल. लाभार्थी कुटुंबातील महिलेच्या नावाने राष्ट्रीयीकृत बँकेमध्ये बचत खाते उघडून रोख स्वरूपातील रक्कम भरण्यात येईल. जर लाभार्थी कुटुंबात महिला सदस्य नसेल तरच पुरुष सदस्याच्या नावाने बँकेत बचत खाते उघडण्यात येईल. एखाद्या ठिकाणी १० कि.मी. पर्यंत कोणतीही राष्ट्रीयीकृत बँक नसेल तेथे सहकारी बँकेत बचत खाते उघडण्यात येईल.

**रोजगाराची संधी**

अनुसूचित जमातीच्या युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी यासाठी पांढरकवडा व गडचिरोली येथे मोटर वाहनचालक प्रशिक्षण केंद्र सुरू आहे. शारीरिक व शैक्षणिकदृष्ट्या योग्य असणाऱ्या आदिवासी तरुण,तरुणींना सैन्यदल किंवा पोलीसदलात भरती होणे सुलभ जावे यासाठी भरतीपूर्व प्रशिक्षण देण्यात येते. रोजगारक्षम होण्यासाठी आदिवासी उमेदवारांना नामांकित प्रशिक्षण संस्थामार्फत कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात येते. कौशल्य विकास योजनेंतर्गत उत्पादन व प्रक्रिया, टेक्सटाइल्स, ॲग्रोप्रोसेसिंग, ऑटोमोबाइल्स, रिटेलमार्केटिंग, माहितीतंत्रज्ञान (आय.टी), हॉस्पिटॅलिटी, मनुष्यबळविकास, आरोग्यसंवर्धन, बांधकाम इत्यादी अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण देण्यात येते.

**विकासनिधी**

आदिवासी विकास उपयोजनेंतर्गत विभागनिहाय तरतूद करण्यात आली आहे. यात रस्ते व पूल विकास ४४५ कोटी रु , जलसंपदा विभाग १३९ कोटी रु, आरोग्य २५७ कोटी रु, महिला व बाल विकास ९२ कोटी रु, ग्रामीण विद्युतीकरण ९५ कोटी रु, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता ५९ कोटी रु, कृषी व संलग्न सेवा ३१३ कोटी रु, शबरी घरकूल योजना ८० कोटी रु, आश्रमशाळा व वसतिगृह बांधकाम ५३६ कोटी रुपये. या निधीद्वारे आदिवासींचे जीवन अधिक सुखकर आणि समृद्ध होईल, यासाठी कालबद्धरीत्या प्रकल्प राबवले जातील.

महाराष्ट्र हे देशातील आघाडीचे राज्य आहे. या राज्यातील विविध सामाजिक घटकांनी राज्याचा सर्वांगीण विकास करण्यात फार मोठा सहभाग दिला आहे. यामध्ये आदिवासींचाही समावेश आहे. राज्य शासनामार्फत आदिवासींसाठी व्यक्तिगत आणि सामूहिक योजना राबवल्या जातात. त्याचा लाभ आदिवासी समाजातील प्रत्येक घटकाला मिळावा यासाठी मी जाणीवपूर्वक प्रयत्न करत आहे. नव्या नव्या योजना आणि उपक्रम राबवण्यात येत आहेत. आदिवासी बांधव हा मुळातच हुशार आणि शरीराने काटक आहे. सुयोग्य संधी मिळाली तर तो जीवनाच्या विविध क्षेत्रात प्रगतीचे नवे टप्पे निश्चितपणे गाठू शकेल, याची मला खात्री आहे. आदिवासी विभाग या अनुषंगाने अत्यंत प्रभावीपणे कार्य करीत असल्याचे ठामपणे सांगावेसे वाटते.

**– शब्दांकन : अर्चना शंभरकर**




## पाऊल पडते पुढे...

- आदिवासी मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणाची संधी मिळावी यासाठी राज्यात सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन (केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ) च्या धर्तीवर ठाणे, अमरावती, नाशिक व नागपूर या प्रादेशिक कार्यक्षेत्रात प्रत्येकी एक याप्रमाणे एकलव्य रेसिडेन्शियल पब्लिक स्कूलची स्थापना.
- आदिवासी उपयोजनेंतर्गत शिक्षण या घटकांतर्गत मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण व परीक्षा फी, अनुदानित आश्रमशाळा अनुदान, शासकीय आश्रमशाळा, शासकीय वसतिगृह व सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्ती इ करिता २२१७ कोटी इतका निधी सुपुर्द.
- आदिवासी विकास विभागाच्या स्वतंत्र शिक्षण विभागास शासनाची मान्यता. नवीन १९६१ पदांची निर्मिती. यात शिक्षण कक्ष, स्त्री अधीक्षिका (अनुदानित शाळा), पहारेकरी (अनुदानित शाळा) यांचा समावेश.
- शासकीय आश्रमशाळेतच जातपडताळणी प्रमाणपत्र देण्याचा निर्णय.
- शासकीय आश्रमशाळांमध्ये अन्नधान्य वेळेत मिळावे यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत धान्य पुरवठ्यास मान्यता.
- प्रकल्प अधिकाऱ्यांना शाळा, वसतिगृह व कार्यालयीन कर्मचाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करण्याचे अधिकार प्रदान.

आदिवासी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहांतील प्रवेशप्रक्रिया अधिक सुकर केल्याने ५०,५०० आदिवासी विद्यार्थी शिक्षण घेऊ शकतील.

# मदतीचा हात



## डॉ. पतंगराव कदम

वने, पुनर्वसन व मदतकार्य आणि भूकंप पुनर्वसन मंत्री

'गेल्या काही वर्षात निसर्गाने आपले चक्र बदलल्याचे दिसून येते. पाऊस अवेळी येतो. एकीकडे अतिवृष्टी कधीही होत असते तर दुसरीकडे राज्याच्या काही भागात अत्यंत कमी पाऊस पडतो. त्यामुळे त्या भागात अवर्षणाची परिस्थिती निर्माण होते. अतिवृष्टी, पूर, दुष्काळ, गारपीट, वीज कोसळणे, दरड कोसळणे अशी वेगवेगळी संकटे गेल्या काही वर्षात राज्यावर कोसळली आहेत. मात्र शासनाने अत्यंत खंबीरपणे आपत्तीग्रस्तांच्या पाठीशी राहून त्यांना तत्काळ मदत दिली आणि आपत्तीग्रस्तांचे अश्रू पुसले.'

राज्यात फेब्रुवारी व मार्च २०१४ या कालावधीत गारपीट व अवेळी पावसामुळे मोठ्या प्रमाणावर जीवित व वित्तहानी झाली. शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. अशा वेळी शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी प्रचलित दरापेक्षा अधिक दराने एक विशेष पॅकेज जाहीर केले. ३०,९३,६५८ गारपीटग्रस्त शेतकऱ्यांना विक्रमी वेळेत २,४५९ कोटी रु. रकमेचे वाटप करण्यात आले. मदत व पुनर्वसन विभागाने अत्यंत दक्ष राहून शेतकऱ्यांना तत्काळ मदत कशा प्रकारे करता येईल यासाठी प्रभावी नियोजन केले. शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट रक्कम जमा करण्यात आली. महसूल व कृषी विभागामार्फत करण्यात आलेले सर्वेक्षण व तातडीने मदतीचे वाटप यामुळे शेतकऱ्यांनी या मदतीबद्दल समाधान व्यक्त केले.

### आपत्ती प्रतिसाद निधी

राज्यामध्ये नैसर्गिक आपत्तीच्या घटनांमध्ये बाधित होणाऱ्या व्यक्तींना मदत देण्याकरिता राज्य आपत्ती प्रतिसाद निधीची स्थापना केली आहे. २०१० ते १५ या कालावधीकरिता वर्षनिहाय निधी निश्चित केला आहे. केंद्र शासनाने आपद्ग्रस्तांना द्यावयाच्या मदतीत वेळोवेळी वाढ केली आहे. नैसर्गिक आपत्तीच्या प्रकारातही प्रसंगानुसार अन्य नैसर्गिक आपत्तीचा अंतर्भाव केला आहे. केंद्राच्या मदतीच्या निकषात अथवा प्रमाणात बदल केल्यास हे बदल सुधारित स्वरूपात राज्यामध्येही लागू झाले. शेती पिकाच्या नुकसानीसह आकस्मिक आग, समुद्राचे उधाण, वीज कोसळणे या आपत्तीकरिताही मदत लागू करण्यात आली आहे.

### आपद्ग्रस्तांना मदत

आपद्ग्रस्त मृत व्यक्तीच्या कुटुंबीयांना दीड लाख रु. मदत देण्यात येते. अवयवांचे नुकसान झाल्यास अथवा डोळे निकामी झाल्यास ४० ते ८० टक्के, अपंगत्व आल्यास ४३,५०० रु. आणि ८० टक्क्याहून अधिक अपंगत्व आल्यास ६२,००० रु. आर्थिक साहाय्य देण्यात येते.

### शेतनुकसानीला साहाय्य

शेतजमीन व इतर नुकसानीसाठी ८,१०० रु. प्रति हेक्टर मदत देण्यात येते. दरड



कोसळणे, जमीन खरडणे व खचणे तसेच नदी पात्र अथवा प्रवाह बदलल्यामुळे शेत जमिनीचे नुकसान याकरिता महसूल अभिलेखानुसार शेतजमिनी मालक असलेल्या फक्त अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना २५,००० रु. प्रतिहेक्टर या दराने मदत देण्यात येते.

माझ्या विभागाने जून, जुलै, २०१३ मध्ये राज्यात झालेल्या अतिवृष्टी व पूर परिस्थितीत पुणे, कोकण, नागपूर, अमरावती, नाशिक, औरंगाबाद या सहा विभागांना ४५ कोटी ५८ लक्ष रु. निधी वितरित केला. या निधीतून मृत व्यक्तींच्या कुटुंबीयांना १० कोटी ७१ लक्ष रु. तर ११३ घरांच्या दुरुस्ती व पुनर्बांधणीसाठी ३१ कोटी ४७ लक्ष आणि पशधन खरेदीसाठी शेतकऱ्यांना २, कोटी ७६ लाख रु. तसेच राहत केंद्रात निवारा,अन्न,वस्त्र, औषधे यांच्या पुरवठ्यासाठी ६ कोटी, ४० लक्ष रु. निधी दिला. मदतीच्या रकमेतून कोणत्याही बँकेने कोणत्याही प्रकारची वसुली करू नये, यासाठी सहकार विभागाने योग्य ते आदेश निर्गमित केले. विदर्भातील सर्व जिल्ह्यात जुलै २०१३ च्या अतिवृष्टी बाधित कुटुंबांना एक विशेष बाब म्हणून प्रतिकुटुंब २० किलो अन्नधान्य (१० किलो गहू अथवा ज्वारी आणि १० किलो तांदूळ) १० लि. केरोसिन मोफत देण्यात आले.

## दुष्काळावर मात

- या वर्षी दुष्काळग्रस्त भागात १० हजार सिमेंट बंधारे बांधले.
- गेल्या ५ वर्षात पाणी टंचाईवर मात करण्यासाठी ५०० कोटी रुपये खर्च करून कायमस्वरूपी उपाययोजना. एक लाख शेततळ्यांचे बांधकाम.
- १५ हजार वस्त्यांमध्ये ५५०० टँकरने पाणीपुरवठा. यामुळे दुष्काळी परिस्थितीत लोकांचे स्थलांतर थांबले.



- दुष्काळी कामांच्या साहाय्यासाठी केंद्र सरकारची २५५९ कोटी रुपयांची मदत.
- २०११ आणि २०१२ साली आणि २०१३ च्या प्रारंभी पडलेल्या दुष्काळावर यशस्वी मात. ५० टक्क्यांपेक्षा कमी पर्जन्यमान झालेल्या भागात दुष्काळ घोषित.
- या परिस्थितीवर मात करण्यासाठी खाजगी आणि शासकीय टँकरद्वारे मे-जून २०१३ मध्ये १३१७ चारा छावण्या सुरू. त्यांचा सुमारे १० लाख जनावरांना लाभ. दुग्धोत्पादनात वाढ.
- दुष्काळग्रस्त भागातील खेड्यांना विजेच्या बिलात ६७ टक्के सूट.

## अतिवृष्टीशी मुकाबला

- शेतपिकांच्या नुकसानीसाठी १०४१ कोटी रुपयांचे वाटप.
- मृतांच्या वारसांना प्रत्येकी अडीच लाख रुपयांप्रमाणे सुमारे ७ कोटी रुपयांचे वाटप.
- मृत जनावरांच्या मालकांना सुमारे २ कोटी रुपये इतकी मदत.
- सर्व आर्थिक मदत संबंधितांच्या बँक खात्यात थेट जमा.
- विशेष बाब म्हणून प्रतिकुटुंब २० किलो धान्य व १० लीटर केरोसिन मोफत.
- पूरपरिस्थिती उद्भवताच बचाव व मदतकार्य तत्काळ सुरू.
- केंद्रीय आपत्ती प्रतिसाद निधीतून ९२२ कोटी रुपये निधी प्राप्त.
- रस्ते दुरुस्ती व देखभालीसाठी सुमारे ९०० कोटी रुपयांचा निधी.
- ग्रामीण रस्ते दुरुस्ती व देखभालीसाठी सुमारे ४४८ कोटी रुपयांचा निधी.
- पूर्णत: व अंशत: पडझड झालेल्या घरांच्या मालकांना सुमारे ३० कोटी रुपयांचे वाटप.



## गारपीटग्रस्तांना मदत

- कोरडवाहु शेतीस प्रती हेक्टर एकूण रुपये १०,०००/- इतकी मदत.
- ओलिताखालील शेतीस प्रतिहेक्टर एकूण रुपये १५,०००/- इतकी मदत.
- फळपिकांकरिता एकूण रुपये २५,०००/- इतकी मदत.
- पेरणी केलेल्या क्षेत्राच्या मर्यादेत जास्तीत जास्त २ हेक्टर मर्यादेपर्यंत मदत.
- गारपीटग्रस्त शेतकऱ्यांची जानेवारी ते जून २०१४ या कालावधीची वीज देयके शासन भरणार.
- आपद्ग्रस्त शेतकऱ्यांकडून संबंधित बँकांकडून डिसेंबर २०१४ अखेरपर्यंत कर्ज वसुली नाही. डिसेंबर २०१४ अखेरपर्यंत शेतीपिकाच्या कर्जाच्या परतफेडीस मुदतवाढ.
- २०१३-१४ या कालावधीकरिता गारपीटग्रस्त शेतकऱ्यांचे कर्जाचे व्याज शासन भरणार.
- आपद्ग्रस्त शेतकऱ्यांच्या कर्जाचे २०१४-१५, २०१५-१६ व २०१६-१७ या वर्षाकरिता पुनर्गठन.
- गारपिटीमुळे मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींचे वारस तसेच घरांचे नुकसान झालेल्यांना तातडीने मदत.

# नवी ऊर्जा... नवा विश्वास...



**गणेश नाईक**
नवीन व नवीकरणीय ऊर्जा व
राज्य उत्पादन शुल्क मंत्री

‘राज्याच्या विकासात ऊर्जा निर्मितीला अत्यंत महत्त्व आहे. यामुळे राज्य शासनाने अपारंपरिक व नित्यनूतनशील ऊर्जा स्रोतांद्वारे वीजनिर्मिती करण्यावर भर दिला आहे. या विभागाची जबाबदारी घेतल्यानंतर अपारंपरिक ऊर्जा स्रोताद्वारे अधिकाधिक वीजनिर्मिती कशी करता येईल, यावर मी लक्ष केंद्रित केले. या क्षेत्राच्या विकासासाठी अपारंपरिक ऊर्जा निर्मितीचे धोरण आखले. २०१५ पर्यंत वीज निर्मितीच्या १० टक्के वीज अपारंपरिक ऊर्जेची असावी, असा माझा संकल्प आहे.’

अपारंपरिक ऊर्जा मंत्री म्हणून कार्यरत असताना माझ्या असे लक्षात आले की, नेहमीच्या पद्धतीने वीजनिर्मिती करण्यामध्ये लागणारा इंधनसाठा मर्यादित आहे. दिवसेंदिवस घरगुती, शेतीसाठी व औद्योगिक कामांसाठी विजेची मागणी वाढत आहे. मागणी आणि पुरवठा यामध्ये मोठी दरी पडलेली आहे. ही दरी बुजवण्यासाठी अपारंपरिक ऊर्जानिर्मितीचे स्त्रोत उपयुक्त ठरू शकतात.

सद्य:स्थितीत अपारंपरिक ऊर्जेमार्फत वीजनिर्मिती करण्याला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. शासनाने अपारंपरिक ऊर्जा स्रोतांचा प्रसार, प्रचार व विकास करणे तसेच ऊर्जा संवर्धन कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) ही स्वायत्त संस्था स्थापना केली आहे. या संस्थेमार्फत अपारंपरिक स्रोतापासून ऊर्जा निर्मितीस प्रोत्साहन देणे ही कामे करण्यात येत आहेत.

**पवनऊर्जा**

आशिया खंडातील सर्वात मोठा ५४५ मे.वॅट क्षमतेचा पवनऊर्जा प्रकल्प धुळे जिल्ह्यातील ब्राम्हणवेल येथे विकसित करण्यात आला आहे. पवनऊर्जा निर्मिती स्थळांचा अभ्यास करण्याकरिता मोठया प्रमाणात वारापरिमापन केंद्रे उभारण्यात येत आहे. आजवर ४६ पवन ऊर्जानिर्मिती स्थळे घोषित करण्यात आली आहे. १०० मी. उंचीची ३० वारामापन केंद्रे उभारणीस मान्यता देण्यात आली आहे. पवनऊर्जा प्रकल्पासाठी पवन क्षेत्र वर्गीकरण करण्यासाठी कार्यप्रणाली तयार करण्यात आली आहे. अशी कार्यप्रणाली तयार करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले आहे.

**सौर ऊर्जा**

सौरऊर्जेपासून वीजनिर्मिती प्रकल्पांच्या उभारणीस चालना देण्यासाठी राज्यातील निरनिराळ्या भौगोलिक क्षेत्रांमध्ये सौरप्रारणाचा अभ्यास करणे आवश्यक आहे. त्यासाठी सौरप्रारण मापन केंद्रांची स्थापना करण्यात येत आहे. राज्य शासनाच्या निधीतून ठाणे, औरंगाबाद, नांदेड व पुणे या जिल्ह्यांमध्ये सौरप्रारण मापन केंद्राची उभारणी करण्यात आली आहे. राज्य शासनाच्या निधीतून सौर प्रारण मापन केंद्रे उभारणारे महाराष्ट्र हे पहिलेच राज्य ठरले आहे.



**सौर उष्णजल**

आतापर्यंत एकूण आस्थापित सौर उष्णजल सयंत्रामुळे विजेच्या उच्चतम मागणीच्या वेळी ६४० मे.वॅट विजेची बचत झाली. ९.६० लाख टन कार्बन डायऑक्साईड उत्सर्जन कमी करण्यासाठी मदत झाली. सौर उष्णजल संयंत्र आस्थापनेसाठी देशात सर्वोकृष्ट कामगिरी करणारी संस्था म्हणून केंद्र शासनाने महाऊर्जास २०११-१२ व २०१२-१३ या वर्षासाठी सलग दोनवेळा राष्ट्रीय पातळीवरचा पुरस्कार प्रदान केला आहे.

**ग्रामीण पाड्यांचे विद्युतीकरण**

अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांच्या साहाय्याने ग्रीड जोडणी न झालेल्या दुर्गम गावाचे विद्युतीकरण करण्याचे ठरवण्यात आले आहे. मागील ५ वर्षाच्या कालावधीत दुर्गम व आदिवासी भागामधील १८९ गावे व १७९ पाड्यांमध्ये अपारंपरिक ऊर्जाद्वारे विद्युतीकरणाची महत्त्वाची योजना राबवण्यात आल्या आहेत. यापैकी १३८ गावे नक्षलग्रस्त भागातील आहेत.

ग्रामपंचायतीमध्ये सौरऊर्जेवर आधारित सामुदायिक अभ्यासिका स्थापित करण्यात आला आहे. त्याचा फायदा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना झाला.

भूगर्भीय औष्णिक ऊर्जेच्या विकासासाठी १८१०३ गावांत सौर अभ्यासाचे सर्वेक्षण करणे व व्यापारी तत्त्वावर वीजनिर्मिती करण्यासाठी महाराष्ट्र मॉडेल तयार करण्यात आले असून त्याची अंमलबजावणी सुरू आहे. याच पद्धतीने भूगर्भीय औष्णिक ऊर्जेच्या विकासासाठी इतर राज्यांनीही उत्सुकता दाखविली आहे. या क्षेत्रात महाराष्ट्र देशातील इतर राज्यांना दिशा देत आहे.

**ऊर्जा बचत, ऊर्जा निर्मिती**

ऊर्जा कार्यक्षमतेसाठी शासकीय इमारती, स्थानिक स्वराज्य संस्था यांमध्ये विविध योजना राबवून प्रोत्साहन देण्यात येते. यामध्ये ऊर्जा परीक्षण व उपाययोजना यासाठी आर्थिक साहाय्य देण्यात येते. आतापर्यंत २७ शासकीय / निमशासकीय इमारतींमध्ये व २४ नगरपालिका / महानगरपालिकांमध्ये ऊर्जा कार्यक्षमता / ऊर्जा बचत पथदर्शी प्रकल्प राबवण्यात आले. ऊर्जा कार्यक्षम पथदिवे स्थापित करण्यासाठी ग्रामपंचायतींना आर्थिक साहाय्य उपलब्ध करून देण्यात येते.

मोठे उद्योग तसेच लघू व मध्यम उद्योगांनी ऊर्जा परीक्षणासाठी पुढे यावे म्हणून आर्थिक साहाय्य उपलब्ध करून प्रोत्साहन देण्यात येत आहे. गेल्यावर्षी ६४२ घटकांनी या योजनेचा लाभ घेतला असून सुमारे ८२ कोटी रुपयांची ऊर्जा बचत केली आहे. महाऊर्जा तसेच इतर विविध घटकांनी केलेल्या प्रयत्नांमुळे मागच्या वर्षात सुमारे ३६० मे.वॅट एवढी ऊर्जा बचत साध्य झाली. ऊर्जा बचत म्हणजेच ऊर्जा निर्मिती असल्याने ऊर्जा बचतीला विशेष महत्त्व आहे. उष्णजल सौर यंत्रणेमध्ये ६४० मे.वॅट विजेची बचत झाली आहे.

प्रकल्प विकासकांना प्रोत्साहन म्हणून मूलभूत सुविधा उभारणीसाठी हरित ऊर्जा निधीमधून अनुदान देण्यात येते.

राज्यास (महाऊर्जा) ऊर्जा संवर्धन क्षेत्रातील अत्युत्कृष्ट कामगिरीबद्दल राष्ट्रीय स्तरावरील प्रथम पुरस्कार सलग दुसऱ्यांदा मिळाला आहे. सौर उष्णजल संयंत्र उभारण्यामध्ये उत्तम कामगिरीबद्दल पुरस्कारदेखील राज्यास प्रदान करण्यात आला आहे. अपारंपरिक साधनांद्वारे ऊर्जानिर्मितीमध्ये वाढ करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य महाऊर्जा करत आहे. पाच वर्षांत अपारंपरिक ऊर्जा व ऊर्जा संवर्धन / ऊर्जा कार्यक्षमता वाढावी यासाठी नवीन योजना जाहीर केल्या आहेत. औरंगाबाद, नागपूर व नवी मुंबई येथे तसेच नांदेड येथे अपारंपरिक ऊर्जा व ऊर्जाबचत साधनांचा प्रसार करण्यासाठी मोठी प्रदर्शने व चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

**भविष्यातील लक्ष्य**

महाराष्ट्राला विजेच्या बाबतीम स्वयंपूर्ण करण्याच्या अनुषंगाने अपारंपरिक ऊर्जा स्रोतांपासून वीजनिर्मिती करण्याला प्रोत्साहन देण्यासाठी माझ्या विभागाने कालबद्ध कार्यक्रमाची आखणी केली आहे. त्या अनुषंगाने अपारंपरिक वीजनिर्मिती प्रकल्पांची सध्याची स्थापित क्षमता दुपटीने वाढविण्यात येईल. या ऊर्जा निर्मितीस पोषक धोरणे आखून प्रोत्साहन देण्यात येईल. २०१५ पर्यंत भूगर्भीय ऊर्जेपासून वीजनिर्मिती करण्यात येईल. पवन व सौर ऊर्जा प्रकल्पांसाठी असलेला वाव निश्चित करण्यासाठी अधिकाधिक वारामापन व सौरप्रारण मापन केंद्रांची उभारणी करण्यात येईल. या बाबींमुळे अपारंपरिक ऊर्जा महाराष्ट्राच्या विकासप्रक्रियेला गतिमान करेल, अशी मला खात्री आहे.

**- शब्दांकन : विष्णू काकडे**

मागील पाच वर्षात १८,१०३ गावातील सार्वजनिक ठिकाणी सौर अभ्यासिकांची निर्मिती करण्यात आली.



## ऊर्जेचे नवे मापदंड

- महाऊर्जामार्फत राबवण्यात आलेल्या विविध प्रकल्पांमार्फत अपारंपरिक ऊर्जा निर्मितीमध्ये मोठी वाढ.
- मार्च २००९ अखेर अपारंपरिक ऊर्जा प्रकल्पाच्या स्थापित क्षमतेत २५०६.२३५ मे.वॅट वरून मार्च २०१४ अखेर ६१५५.२० मे.वॅट एवढी वाढ. ही वाढ अडीचपट (२४५ टक्के) इतकी आहे.
- पुढीलप्रमाणे अपारंपरिक ऊर्जा निर्मितीत वाढ. पवनऊर्जा ४०८०.१५ मे.वॅट, ऊसाच्या चिपाडावर आधारित सहवीज निर्मिती १३५४.७५ मे.वॅट , कृषी अवशेषावर आधारित ऊर्जा प्रकल्प १९० मे. वॅट, औद्योगिक कचऱ्यापासून वीज निर्मिती २९ मे. वॅट, सौरऊर्जा २३०.३० मे.वॅट, लघू जलविद्युतनिर्मिती २७१ मे. वॅट.
- गेल्या चार वर्षात २१८६.८० मे. वॅट क्षमतेचे पवन ऊर्जा प्रकल्प स्थापित करून राज्याचा देशात उच्चांक
- देशात सर्वात जास्त १९४८ किलोवॅट क्षमतेची पवन-सौर संकरित संयंत्रांची स्थापना. आणखी ५०० कि.वॅ. क्षमतेची संयंत्रे स्थापण्याचे काम प्रगतिपथावर
- २००९ अखेर २.०० लक्ष चौ.मी. (१२५.०२) लक्ष लीटर प्रतिदिन क्षमतेची सौर उष्णजल संयंत्रे स्थापित. गेल्या पाच वर्षात यात भरीव वाढ होऊन मार्च २०१४ अखेर ती १०.२४ लक्ष चौ.मी. (६४० लक्ष लिटर प्रतिदिन) क्षमतेची संयंत्रे विविध क्षेत्रात स्थापित



राधाकृष्ण विखे-पाटील
कृषी व पणन मंत्री

'शेतकऱ्यांना गेल्या काही वर्षांत विविध नैसर्गिक आपत्तींचा सामना करावा लागला. या संकटांशी सामना करण्यासाठी शासन खंबीरपणे पाठीशी उभे आहे हा विश्वास शेतकऱ्यांना देण्यात आम्ही यशस्वी ठरलो. शेतकऱ्यांनी दाखवलेल्या विश्वासामुळेच महत्त्वाचे निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी करणे शक्य झाले. प्रतिकूल परिस्थितीत चांगले उत्पादन घेता आले. शेतकऱ्यांना खत, बियाणे, सिंचन सुविधा यांचा वेळेवर व मुबलक पुरवठा केल्याने उत्पादनात भरघोस वाढ झाली.'

# उत्पन्न वाढले... समृद्धी आली...

मला सांगण्यास अतिशय आनंद होती की, शासनाने शेती उत्पादनामध्ये वाढ होण्यासाठी जे विविध निर्णय घेतले आणि उपाययोजना केल्या त्यामुळे राज्यातील अन्नधान्याच्या उत्पादनात भरघोस वाढ झाली.

मंत्रालयात बसून कागदपत्रांच्या आधारे निर्णय घेण्यापेक्षा प्रत्यक्ष शेतावर जाऊन शेतकऱ्यांचे प्रश्न समजून घेऊन त्यानुसार कामाची आखणी केली. शेतमाल उत्पादकांना ग्राहकांसोबत थेट संपर्क साधू शकणारी सक्षम यंत्रणा निर्माण करणे गरजेचे आहे हे लक्षात आले. मधल्या काळात जेव्हा भाज्यांचे भाव गगनाला भिडू लागले तेव्हा ग्राहकांना किफायतशीर दरात भाजीपाला मिळावा व शेतकऱ्यांना शेतमालाची वाजवी किंमत मिळावी यासाठी उत्पादक ते ग्राहक हे अभियान सुरू करण्यात आले. या अभियानाचा एक भाग म्हणून प्रायोगिक तत्त्वावर मुंबई शहरात थेट भाजीपाला विक्री केंद्रे सुरू करण्यात आली. या विक्री केंद्रावरील भाजीपाल्याचे दर यात सुमारे ३० ते ५० टक्क्यांपर्यंत फरक आढळून आला आहे. मुंबईतील ग्राहकांनी या योजनेचे मोठ्या प्रमाणात प्रतिसाद देऊन स्वागत केले.

पिकांना सुयोग्य पद्धतीने व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पाणी द्यावे व पाण्याची बचत व्हावी  यासाठी भविष्यात सूक्ष्म सिंचन व ठिबक सिंचनाशिवाय पर्याय नाही. त्यासाठी जागतिक निविदा प्रक्रियेद्वारे ठिबक सिंचन पद्धतीचे दर निश्चित करण्यात आले. त्यामुळे शेतकऱ्यांच्या खर्चात २५ ते ५० टक्क्यांपर्यंत बचत झाली.

अपुऱ्या व अनियमित पावसामुळे राज्यातील दुष्काळसदृश्य ६ जिल्ह्यांमधील १५ तालुक्यात ४९९ गावांमध्ये साखळी पद्धतीने १४७७ सिमेंट नालाबांध बांधकामासाठी रुपये १५० कोटी मंजूर करण्यात आले होते. त्यातून ४९९ गावांमध्ये २३९९ बंधारे बांधण्यात आले. १५ जिल्ह्यांतील ७२ तालुक्यांत साधारण १९०० सिमेंट नालाबांध बांधकामासाठी १८७ कोटी रुपयांहुन अधिक निधी उपलब्ध करून देण्यात आला.

राज्यात खरीप हंगामपूर्व बैठका



मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली यापूर्वी विभागीय स्तरावर घेण्यात येत होत्या. मात्र जिल्हास्तरावरील कृषीविषयक प्रश्नांना योग्य न्याय देता यावा व प्रत्येक जिल्हयातील कृषी विकासाचे सूक्ष्म व प्रभावीरीत्या नियोजन आणि अंमलबजावणी होण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली खरीपपूर्व हंगामी सभांचे आयोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**बियाणे विक्री**

राज्यात खरीप हंगामात साधारण २० लाख क्विंटल व रब्बी हंगामात ७ लाख क्विंटल बियाणे विक्री होते. यात सार्वजनिक व खाजगी क्षेत्राचा वाटा साधारणत: ५० :५० टक्के असतो यातील मोठया प्रमाणावर बियाणे हे सत्यतादर्शक बियाणे म्हणून विक्री केली जाते. मात्र त्यांच्या उत्पादनाबाबतचा कोणताही तपशील कृषी विभागाकडे येत नव्हता. त्यामुळे कंपनीने कोणत्या पिकाचे, कोणत्या वाणाचे, बीजोत्पादन कोणत्या जिल्ह्यात किती क्षेत्रावर घेतले इत्यादी माहिती प्राप्त होत नसल्याने गुणनियंत्रणाबाबत समस्या निर्माण झाल्या. त्यांना आळा घालण्यासाठी खाजगी कंपन्या राज्यात घेत असलेले जिल्हानिहाय बीजोत्पादन कार्यक्रम, बीजोत्पादन शेतकऱ्यांच्या याद्या कृषी विभागाला सादर करणे बंधनकारक केले आहे. कृषी विद्यापीठांकडे किमान २ वर्षे चाचणीनंतर शिफारस प्राप्त झाल्यावर या वाणांच्या विक्रीस परवानगी देण्यात येते.

पीक उत्पादन वाढीसाठी रासायनिक खतांचा जवळपास ७३ लाख मे.टन प्रतिवर्ष वापर होतो. शेतकऱ्यांचे खतांचे लिंकिंग करणे, अधिक दराने विक्री करणे यापासून संरक्षण करण्याच्यासाठी खरीप २०१२ च्या हंगामापासून शेतकऱ्यांचे गट तयार करून त्या माध्यमांतून त्यांना आवश्यक खते सरळ कृषी उद्योग, मार्केटिंग फेडरेशन किंवा कंपनीकडून थेट त्यांच्या शेतावर पोहोचविण्याचा उपक्रम राबविण्यात आला.

कीड व रोग सर्वेक्षण प्रकल्प २००८-०९ पासून राबवण्यात येत आहे. कीड रोग सर्वेक्षण हे प्रत्येक आठवड्यातील ठरावीक दिवशी निवडलेल्या शेतात जाऊन केले जाते. तेथील कीड व रोगाची तीव्रता शास्त्रीय पद्धतीने मोजून ऑनलाइन पद्धतीने ही माहिती कृषी संशोधन केंद्रातील शास्त्रज्ञ व इतर संबंधितांपर्यंत पोहोचवली जाते. कृषी शास्त्रज्ञांकडून करावयाच्या उपाययोजनांची माहिती शेतकऱ्यांना एसएमएसद्वारे तसेच ग्रामपंचायतीच्या माहिती फलकावर लावून देण्यात येते. हा प्रकल्प यशस्वीरीत्या राबवल्यामुळे याला राष्ट्रीय स्तरावरील सन २०११-१२ चे सुवर्णपदक मिळाले आहे.

राज्य शेतमाल भाव समिती ही राज्यातील विविध पिकांच्या उत्पादन खर्चावर आधारित किमान आधारभूत किंमत निश्चित करण्यासाठी केंद्रीय कृषीमूल्य आयोगाला शिफारस करत असते. या समितीची पुनर्रचना करण्यात आली. शेतमाल भाव तांत्रिक समिती शेतमालाचा उत्पादन खर्च काढण्याची पद्धत निश्चित करते. या उत्पादन खर्च काढण्याच्या पद्धतीबाबत विविध स्तरावर लोकप्रतिनिधी व शेतकऱ्यांचा असंतोष होता. यापूर्वी ही समिती प्रधान सचिव, कृषी यांच्या अध्यक्षतेखाली होती. पुनर्रचनेनुसार ती कृषी विद्यापीठ कुलगुरू यांच्या अध्यक्षतेखाली चक्रीय पद्धतीने राहणार आहे.

जगभर कीडनाशक अंशमुक्त अशा सेंद्रीय पद्धतीने उत्पादित केलेल्या शेतमालास मोठी बाजारपेठ उपलब्ध झाली असून त्यात दिवसेंदिवस वाढ होत आहे. या पार्श्वभूमीवर अधिकाधिक उत्पादन सेंद्रीय पद्धतीने घेण्यासाठी राज्याचे सेंद्रीय शेती धोरण आखण्यात आले आहे.

**पणन विभागाची वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी**

गेल्या काही वर्षात पणन विभागाने वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी बजावली आहे. बाजार समित्यांची संख्या २९५ वरून ३०२ झाली असून वार्षिक उलाढाल रु.३८,७४३ कोटीवरून रु.४६,२८७ कोटी पर्यंत वाढली, उत्पन्न रु.४३९ कोटीवरून रु.५४२ कोटीपर्यंत वाढले आहे. राज्यशासनाच्या पाठपुराव्यामुळे केंद्राने कांदा निर्यात बंदी मागे घेतली. २०१० पूर्वी राज्यात १३ निर्यात सुविधा केंद्र होती तसेच शीतगृह क्षमता- ६०५ मे.टन, प्रशीतकरणगृह क्षमता- ५५ मे.टन, रायपनिंग चेंबर क्षमता- ७० मे.टन. होती, तर गुंतवणूक रु.५६ कोटी होती. शेती आणि शेतकरी हाच महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा असल्याने त्या अनुषंगाने आम्ही आखलेल्या विविध योजनांमुळे महाराष्ट्र आज एका नव्या हरितक्रांतीचा अनुभव घेत आहे. महाराष्ट्राच्या शेतकऱ्याचे जीवनमान समृद्ध होत आहे. याचे मला निश्चितच मोठे समाधान आहे.

**- शब्दांकन: अर्चना शंभरकर**



## चौफेर कृषी प्रगती

- २००४-०५ साली १०.५३ दशलक्ष टन एवढे अन्नधान्याचे उत्पादन होते. २००८-०९ साली ११.३६ दशलक्ष टन तर २०१३-१४ साली सुमारे १५.४६ दशलक्ष टन इतके उत्पादन झाले.
- प्रमुख फळपिकांच्या उत्पादनातही लक्षणीय वाढ झाली. २००४-०५ साली ३६.०८ लाख टन, २००८-०९ साली ५१.७७ लाख टन तर २०१२-१३ साली ६५.८३ लाख टन एवढे उत्पादन झाले.

फलोत्पादन निर्यातीत दहा वर्षात चौपट वाढ



- निर्यात धोरणात सुटसुटीतपणा आल्याने २००४-०५ साली १०८७ कोटी रुपये, २००८-०९ साली २९०२ कोटी रुपये तर २०१२-१३ साली ४०८२ कोटी रुपयांची फळे निर्यात.
- चाऱ्याची टंचाई जाणवू नये यासाठी २०१२-२०१३ खरीप आणि रब्बी हंगामामध्ये ३० लाख मे. टन चाऱ्याचे उत्पादन.
- पाणी उपलब्ध असलेल्या ठिकाणी शेतकऱ्यांना मका, बाजरी, ज्वारी, न्यूट्रिफीड अशा चारापिकांचे साधारणत: १८,००० क्विंटल बियाणांचे मोफत वाटप.
- राज्यातील ८३ टक्के कोरडवाहू क्षेत्राची उत्पादकता वाढवण्यासाठी कोरडवाहू शेती अभियान. पाच वर्षांसाठी १०,००० कोटी गुंतवणुकीचा कार्यक्रम निर्धारित. यामुळे उत्पादनात सातत्य मिळवणे शक्य.
- सेंद्रीय शेती उत्पादनास प्रोत्साहन देण्यासाठी सेंद्रीय शेती धोरणाची आखणी. यामुळे शाश्वत शेतीची प्रक्रिया जोमाने सुरू.

# हरित गावे... हायटेक गावे...



जयंत पाटील
ग्रामविकास मंत्री

'गावातल्या माणसाला रस्ते, वीज, पाणी, रोजगाराच्या संधी, मुलांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण या सुविधा जर गावातच उपलब्ध करून दिल्या तर ही माणसे शहराकडे न धावता 'गड्या अपुला गावच बरा' म्हणत गावातच राहतील. गावकऱ्यांच्या मनातला हाच गाव साकार करण्याला माझ्या विभागाने प्राधान्य दिले. गावांचे पर्यावरण रक्षण, गावातील मूलभूत पायाभूत सुविधांचा विकास, गावातील रोजगार संधींचा विकास यासोबत बदलत्या तंत्रज्ञानाचाही विचार करण्यात आला.'

माहिती तंत्रज्ञान आज गावांच्या उंबरठ्यापर्यंत जाऊन पोहोचले आहे. त्याच्या प्रभावाने ग्रामीण जीवनातही बदल घडत आहेत. या बदलांचा सकारात्मक परिणाम साध्य करण्यासाठी ग्रामविकास विभागानेही पाऊल पुढे टाकले आहे. या बदलांच्या वेगाशी सांगड घालत विभागाने राज्यातील ग्रामीण भागास अधिक लोकाभिमुख, पारदर्शक आणि गतिमान प्रशासन उपलब्ध करून देण्यात गेल्या काही वर्षांत उत्तम यश मिळवले आहे, याचे मला विशेष समाधान वाटते.

राज्यातील सगळ्या पंचायतराज संस्थांमध्ये संगणक, प्रिंटर आणि इंटरनेटसह सर्व संगणकीय सुविधा शासनाने उपलब्ध करून दिल्या आहेत. जवळपास २० प्रकारच्या संगणकीय प्रणाल्या आपण दैनंदिन कामकाजात उपयोगात आणतो. संगणकीकृत ग्रामीण महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत संग्राम कक्षाद्वारे आपण गावकऱ्यांना १९ प्रकारचे दाखले गावातच उपलब्ध करून देत आहोत. मला सांगायला आनंद वाटतो की ई-पंचायत कार्यक्रम अतिशय प्रभावीपणे राबवणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असून यासाठी राष्ट्रीयस्तरावर महाराष्ट्राचा गौरवदेखील झाला आहे.

**ग्रामपंचायती झाल्या बहुविध सुविधा केंद्र**

संग्रामच्या माध्यमातून आपण ग्रामपंचायतीचे बहुविध सुविधा केंद्रात रूपांतर केले. हेतू हाच आहे की, गावातील जनतेला अधिकाधिक दर्जेदार सुविधा गावातच मिळाव्यात. मग यात रेल्वे आरक्षण असेल, बस आरक्षण असेल किंवा विविध शासकीय योजनांचे लाभ असतील. काळाच्या गतीशी पावले जुळवत आपण मोबाइल, वीज आणि टेलिफोन बिले ऑनलाइन भरण्याची सोयही उपलब्ध करून देत आहोत.

संग्राम सॉफ्ट नावाच्या एका सॉफ्टवेअरमध्ये आजमितीस जवळपास ३ कोटी ३७ लाख डाटा एन्ट्री झाल्या आहेत. यात जन्मनोंदणीच्या १ कोटी ४२ लाख तर मृत्युनोंदणीच्या ६६ लाख ५० हजार नोंदी आहेत. राज्यात नमुना क्रमांक आठमध्ये जवळपास १ कोटी २८ लाख ११ हजार १९३ नोंदी झाल्या आहेत. विविध प्रकारच्या ५४ लाख दाखल्यांचे वितरण आपण



आतापर्यंत केले आहे.

**पुरस्कारांची मोहोर**

पंचायतराज उत्तरदायित्व आणि प्रोत्साहन योजनेंतर्गत पंचायतराज संस्थांना अधिकारांचे सर्वाधिक हस्तांतरण आणि नावीन्यपूर्ण उपक्रमांच्या अंमलबजावणीत राज्य सलग तिसऱ्यांदा देशपातळीवर पहिले आले आहे. विभागाला यावर्षी ३ कोटी रुपयांचा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार जाहीर झाला आहे.

हे ग्रामविकास विभागाच्या सातत्यपूर्ण कामगिरीचे फलित आहे असे मला वाटते. राज्यातील इतर १८ पंचायतराज संस्थांनाही २ कोटी २० लाख रुपयांचे पुरस्कार घोषित झाले आहेत.

**महिलांना ५० टक्के आरक्षण**

शासनाने महिलांना पंचायतराज संस्थांमध्ये ५० टक्के आरक्षण देऊन त्यांच्या नेतृत्वगुणांचा सन्मान केला. त्याचबरोबर गावविकासातील त्यांचा सहभागही मोठ्या प्रमाणात वाढवला आहे. महिला अतिशय चांगल्याप्रकारे गावगाडा हाकत असून आम ग्रामसभेपूर्वी वॉर्ड आणि महिलासभा घेणे आपण बंधनकारक केले आहे. यामुळे कुपोषण निर्मूलन किंवा दारूबंदी यासारखे सामाजिक विषय ग्रामसभेच्या कार्यक्रमपत्रिकेवर येऊ लागले आहेत.

राज्यात जवळपास २८ हजार ग्रामपंचायती आहेत. यातील अंदाजे ५५०० गावात बँक शाखा आहेत, उर्वरित गावात नाहीत. त्यामुळे या गावातील लोकांना त्यांच्या बँकिंग व्यवहारासाठी १५ ते २० कि.मी अंतरावरील बँक शाखा असलेल्या गावात जावे लागते. त्यांची हीच गरज लक्षात घेऊन विभागाने पुढाकार घेऊन ग्रामपंचायतीत बँकिंग सेवा सुरु करण्याचा निर्णय घेतला.

अखंडित इंटरनेट सेवा उपलब्ध असलेल्या आणि बँक शाखा नसलेल्या ग्रामपंचायतींमध्ये टप्प्याटप्प्याने ही सेवा उपलब्ध करून देत आहोत.

राज्यात 'उमेद' अर्थात महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची अंमलबजावणी सुरू आहे. यात आपण नावीन्यपूर्ण योजनांची अंमलबजावणी करताना टीआयएसएस, माविम, केरळच्या कुटुंबश्रीसारख्या नामवंत संस्थांचा सहभाग घेतला आहे.

**तीर्थक्षेत्र विकास**

तीर्थक्षेत्र आणि पर्यटनविकासातून स्थानिक भागात रोजगार संधींची निर्मिती होते, भाविकांना उत्तम मूलभूत सुविधा उपलब्ध होतात हे लक्षात घेऊन ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनंतर्गत ब वर्ग तीर्थक्षेत्र विकासाचा निधी एक कोटी रुपयांनी वाढवून तो २ कोटी रुपये केला आहे.

**पर्यावरणस्नेही शाश्वत विकास**

आज सगळीकडे वाढत्या जागतिक तापमानाची चर्चा होते. पण ग्रामविकास विभागाने पुढाकार घेऊन गावांच्या पर्यावरणस्नेही शाश्वत विकासाच्या दिशेने पावले टाकली आहेत. उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन आणि संवर्धन करून गावविकासाला चालना देण्यासाठी मागील तीन वर्षांपासून 'पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजने'ची अंमलबजावणी करत आहे. योजनेत ग्रामीण लोकसंख्येएवढी वृक्षलागवड, प्लास्टिक बंदी, सांडपाणी–घनकचऱ्याचे व्यवस्थापन, गाव निर्मल असणे, गावात अपारंपरिक ऊर्जेचा वापर वाढणे या गोष्टीला महत्त्व दिले आहे.

राज्यातील गावांनी या सर्वच निकषांवर खूप चांगले काम केले आहे. जवळपास १६ हजार ग्रामपंचायतींनी पहिल्या वर्षाचे, ९ हजार ग्रामपंचायतींनी दुसऱ्या वर्षाचे तर ४,१७४ ग्रामपंचायतींनी तिसऱ्या वर्षाचे निकष पूर्ण केले आहेत. राज्यात ग्रामीण लोकसंख्येएवढी वृक्ष लागवड होतांना ग्रामपंचायतींची करवसुली योजनेने ८५ टक्क्यांच्यावर वाढवली आहे. गावात शौचालयाचा, अपारंपरिक ऊर्जा साधनांचा वापर वाढत असल्याचे नमूद करताना मला विशेष आनंद आहे. निकष पूर्ण करणाऱ्या ग्रामपंचायतींना शासनाने जवळपास ७७३ कोटी रुपयांचं अनुदान दिले आहे. योजनेला मिळालेला प्रतिसाद लक्षात घेऊन ही योजना आता कायमस्वरूपी राबवणार आहोत. योजनेतील तीनही वर्षांचे निकष पूर्ण केलेल्या ग्रामपंचायतीचा सीएसआर अंतर्गत विकास करण्याचे तसेच ५ हजार लोकसंख्येवरील गावांचे सूक्ष्म तसेच पर्यावरण विकास आराखडे तयार करण्याचे निश्चित केले आहे.

कुठलाही विकास हा लोकसहभागाशिवाय होत नाही असे माझे मत आहे. माझ्या विभागाने सर्वोत्तम सार्वत्रिक ग्रामविकासाची पावले लोकांना विश्वासात घेऊन टाकल्याने त्यांना अधिक बळ मिळाले आहे. त्यांच्या सहकार्यातूनच महाराष्ट्राची पंचायतराज व्यवस्था ऑनलाइन झालीच शिवाय ती जगाशीही जोडली गेली.

**– शब्दांकन : डॉ. सुरेखा मुळे**

१५७२ ग्रामपंचायतीत बँकिंग सेवा सुरू. जवळपास १०,४३७ नागरिकांनी बँकेत खाते उघडले.



## समृद्धीच्या पाऊलवाटा

- रस्त्यांच्या विकास कामासाठी राज्याने सातत्याने केंद्र शासनाकडे पाठपुरावा केल्याने पंतप्रधान ग्राम सडक योजना टप्पा-२ ही नवी योजना जाहीर केली. या योजनेंतर्गत राज्यातील १५७२ कोटी रुपये खर्चाच्या आणि २६२० कि.मी. लांबीच्या रस्त्यांच्या श्रेणीवर्धनास मान्यता.
- शासकीय प्रकल्पांसाठी जमीन दिलेल्या पुनर्वसित गावांच्या विकासाचा प्रश्न मार्गी. अशा पुनर्वसित गावची लोकसंख्या ३५० ते १ हजाराच्या दरम्यान असली तरी तिथे ग्रामपंचायत स्थापन करण्याचा निर्णय.
- 'पाणी साठवा- गाव वाचवा' अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीतून सुजल ग्रामीण महाराष्ट्राची पायाभरणी. पाण्याच्या दृष्टीने गावे स्वावलंबी करणारी महत्त्वाकांक्षी योजना.
- ग्रामपंचायतींचे कामकाज आज बहुतांशी संगणकाद्वारे.
- जिल्हा परिषदा आणि पंचायतराज संस्थांमध्ये ई-टेंडरिंग.
- नेहमीच्या व्यवस्थेबरोबर ग्रामसभेची सूचना गावकऱ्यांच्या हातातील मोबाइलवर देण्याची व्यवस्था.
- इंदिरा आवास योजनेतील राज्याचा अतिरिक्त हिस्सा २५ हजार रुपयांनी वाढवून प्रति घरकुलाची किंमत १ लाख रुपये केल्याने दारिद्र्यरेषेखालील लाखो बेघर कुटुंबाना लाभ.




हर्षवर्धन पाटील
सहकार आणि
संसदीय कार्य मंत्री


# सहकाराचे सामर्थ्य

आपणा सर्वांना ज्ञात आहे की, आपल्या राज्याच्या विकासात सहकार क्षेत्राने फार मोठी भूमिका बजावली आहे. राज्यातील ग्रामीण भागात सहकार क्षेत्र खोलवर रुजले आहे. या क्षेत्राच्या माध्यमातून सहकारी पतपुरवठा संस्था, दूधसंघ, सूतगिरण्या, सहकारी बँका, गृहनिर्माण संस्था तसेच साखर कारखानदारी आदींच्या रूपाने सहकाराची चळवळ व्यापक प्रमाणात पसरल्याचे दिसते.

सहकार खात्याचा मंत्री या नात्याने सहकार चळवळ बळकट होऊन सर्वसामान्यांना याचा लाभ अधिकाधिक मिळेल याकडे कटाक्षाने लक्ष दिले. गत पाच वर्षांच्या कालावधीत सहकार क्षेत्रात अनेक क्रांतिकारी व जनहिताचे निर्णय घेण्यात आले. सर्वसामान्य माणसाला केंद्रबिंदू मानूनच नवीन कायदे करण्यात आले. वेगवेगळ्या निर्णयाची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी मी यंत्रणेला अधिक कार्यरत केले.

'महाराष्ट्राच्या विकासात सहकाराचा मोठा वाटा आहे. या क्षेत्राने ग्रामीण भागाचा कायापालट केला. सहकारी संस्था, दूधसंघ, सूतगिरण्या, सहकारी बँका, गृहनिर्माण संस्था आणि साखर कारखानदारीच्या रूपाने सहकार चळवळ व्यापक प्रमाणात पसरली. गेल्या साडेचार वर्षांत सहकार चळवळ अधिकाधिक सक्षम करण्याकडे कटाक्षाने लक्ष दिले. या कालावधीत अनेक क्रांतिकारी व जनहिताचे निर्णय घेण्यात आले. सर्वसामान्य माणसाला केंद्रबिंदू मानूनच नवीन कायदे करण्यात आले. वेगवेगळ्या निर्णयाची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी यंत्रणेला मी कार्यरत केले.'

### ९७ वी घटना दुरुस्ती

भारतीय संविधानात केंद्र शासनाने ९७ वी घटना दुरुस्ती केली. सहकार क्षेत्राच्या दृष्टीने हा महत्त्वाचा आणि क्रांतिकारी निर्णय आहे, असे मला वाटते. या घटना दुरुस्तीच्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये आवश्यक सुधारणा करण्यात आल्या आहेत. त्या अंतर्गत सहकारी संस्थेची निवडणूक घेण्यासाठी नवीन नियमावली तयार करण्यात आली. या निवडणुका आता राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणामार्फत घेण्यात येतील. या कायद्यातील सुधारणांमुळे सहकारी



संस्थांना स्वायत्तता मिळेल. क्रियाशील सभासद ही संकल्पना सहकार कायद्यात सामाविष्ट झाल्यामुळे सभासद संस्थेच्या कामकाजात अधिक सक्रियपणे भाग घेतील.

९७ व्या घटना दुरुतीच्या अनुषंगाने सहकार कायद्यात ज्या सुधारणा झाल्या त्या सुधारणांबाबतत जनतेला, सहकारी संस्थांना मार्गदर्शन व्हावे यासाठी राज्याच्या विविध भागात मी सहकार मेळावे घेतले. या मेळाव्यातील सहकारी संस्थांचे पदाधिकारी, सभासद यांचा प्रतिसाद पाहता सहकार क्षेत्राचे जाळे किती दूरपर्यंत पसरले आहे हे लक्षात येते.

**अवैध सावकारीला लगाम**

कर्जदार शेतकऱ्यांच्या सावकाराकडून होणाऱ्या पिळवणुकीस आळा घालण्यासाठी राज्यात महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ लागू करण्यात आला आहे. शेतकऱ्याने घेतलेल्या कर्जावर चक्रवाढ पद्धतीने व्याज आकारणी करता येणार नाही. शासनाने निश्चित केलेल्या दरापेक्षा अधिक व्याजाची आकारणी करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

या कायद्यातील महत्त्वाची तरतूद म्हणजे मागील पंधरा वर्षांत एखाद्या कर्जदाराने सावकाराला आपली मालमत्ता गहाण/तारण म्हणून दिली असेल, ती मूळ कर्जदाराकडे किंवा त्याच्या वारसाकडे हस्तांतरित करण्याची तरतूद करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना दिलासा देणारा हा निर्णय त्यांच्यासाठी हितावह ठरणार आहे.

**मानीव अभिहस्तांतरण**

विकासकाकडून सहकारी गृहनिर्माण संस्थेला जमिनीचे कायदेशीर हक्क मिळवून देण्याच्या उद्देशाने सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या मानीव अभिहस्तांतरणासाठी एक विशेष मोहीम राबवण्यात आली. ही मोहीम राबवण्यापूर्वी राज्यातील ८८४७२ गृहनिर्माण संस्थांपैकी ९४३७ संस्थांचे अभिहस्तांतरण झाले होते. या मोहिमेनंतर २०६२ संस्थांचे अभिहस्तांतरण करण्यात यश मिळाले.

मानीव अभिहस्तांतरण करण्याच्या कार्यवाहीतील अडचणी दूर करून ही प्रक्रिया सहज व सुलभ करण्यासाठी पूर्णत: ऑनलाइन पद्धती अनुसरण्यात आली. यामुळे मानवी हस्तक्षेपही टाळता येणे शक्य होणार आहे.

२०१२ हे आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून साजरे करण्यात आले. महाराष्ट्राच्या विकासाचे शिल्पकार स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षात आंतरराष्ट्रीय सहकार वर्षही साजरे करता आले याचा विशेष आनंद आहे. सहकाराच्या माध्यमातून चांगल्या जगाची निर्मिती हे या सहकार वर्षाचे घोषवाक्य होते. याला अनुसरून आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त सहकाराविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी विविध कार्यक्रम राबवण्यात आले.

> राज्यात २ लाख २७ हजार सहकारी संस्था कार्यरत. या संस्थांमध्ये सुमारे ४ लाख कोटींच्या ठेवी.

**साखर कारखानदारी**

महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत मोठी भर घालणारा साखर उद्योग हा सहकारी साखर कारखाने, ऊस उत्पादक शेतकरी आणि ग्राहकांच्यासाठी महत्त्वाचा उद्योग आहे. त्यामुळे साखर उद्योगाला भेडसावणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी नेहमीच सकारात्मक भूमिका घेतली गेली आहे.

आजारी साखर कारखाने आता लिलावात काढण्यात येणार नाहीत वा त्यांची परस्पर विक्री करण्यात येणार नाही असा निर्णय घेण्यात आला आहे. असे कारखाने आर्थिकदृष्ट्या सक्षम सहकारी साखर कारखान्यांना चालविण्यास देण्यात येणार आहेत. आर्थिकदृष्ट्या सुस्थितीत आल्यावर ते पुन्हा मूळ कारखान्याकडे देण्यात येणार आहेत.

**सहवीज निर्मिती**

सहकारी साखर कारखान्यांना सहवीज निर्मिती प्रकल्प राबवण्यासाठी प्रकल्प खर्चाच्या ५ टक्के खर्च मंजूर करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. राज्यातील ६१ सहकारी साखर कारखान्यांना सहवीज निर्मिती प्रकल्प राबवण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी ४६ सहकारी साखर कारखान्यांचे सहवीज निर्मिती प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. गाळप हंगाम २०१३-१४ मध्ये या कारखान्याने २०६.४९ कोटी युनीट्स एवढी वीजनिर्मिती केली आहे.

सहकार ही महाराष्ट्राची शक्ती आहे. राज्याच्या ११ कोटी लोकसंख्येपैकी सुमारे साडेपाच कोटी लोक विविध सहकारी संस्थांचे सभासद आहेत. इतकी ताकद व व्याप्ती या क्षेत्राची आहे. त्यामुळे सहकार क्षेत्राची प्रतिष्ठा कायम राहून अधिकाधिक जनतेला त्याचा लाभ मिळावा यासाठी मी सर्वतोपरी योगदान देण्यासाठी वचनबद्ध आहे. शंभर वर्षात राज्यात ग्रामीण आणि शहरी परिवर्तन जे झाले त्यात सहकार क्षेत्राचा महत्त्वाचा वाटा आहे. हे क्षेत्र टिकवण्याची आणि अधिकाधिक सक्षम करण्याची जबाबदारी आपणा सर्वांचीच आहे.

**– शब्दांकन : शांताराम शेरवाडे**



## दिलासा...

- डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना ही शेतकऱ्यांना अत्यंत फायदेशीर आणि दिलासा देणारी योजना.
- जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, राष्ट्रीयीकृत बँका, ग्रामीण बँका व खाजगी बँकांमार्फत दिलेल्या पीककर्जास ही योजना लागू
- या योजनेंतर्गत मुदतीत कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना रु. १ लाख पर्यंतचे पीक कर्ज बिनव्याजी तर ३ लाखापर्यंत फक्त २ टक्के व्याज आकारणी
- २०१३-१४ या वर्षात राज्यातील २६.१८ लाख शेतकऱ्यांना एकूण रुपये २४४ कोटी अनुदान
- गारपीटबाधित शेतकऱ्यांच्या पीक कर्जावरील व्याज शासनामार्फत देण्याचा निर्णय. त्यांच्या पीक कर्जास ३१ डिसेंबर, २०१४ पर्यंत मुदतवाढ
- आर्थिक अडचणीत असलेल्या सहकारी पतसंस्थांमध्ये ठेवीदार असलेल्या उपवर मुलींच्या पालकांना (आई/वडिल)ठेवी परत करण्यासाठी अर्थसाहाय्य
- अशा ठेवीदारांच्या रु. १ लाख पर्यंतच्या ठेवी परत करण्यासाठी बिनव्याजी कर्ज स्वरूपात शासकीय अर्थसाहाय्य ६ कोटी ४ लाख रु. इतक्या निधीची यावर्षी उपलब्धता
- विनापरवाना/बेकायदेशीर सावकारीचा व्यवसाय करणे हा दखलपात्र गुन्हा. या कायद्यानुसार दोषी ठरणाऱ्या व्यक्तीस २ ते ५ वर्षापर्यंत तुरुंगवास, ५ ते५० हजार रुपये दंडाची तरतूद

# सागरी सेतू ते द्रुतगती महामार्ग



**जयदत्त क्षीरसागर**
सार्वजनिक बांधकाम
(सार्वजनिक उपक्रम) मंत्री

'सागरी सेतू ते द्रुतगती महामार्गापर्यंत अनेक प्रकल्पांची निर्मिती करून रस्ते विकास महामंडळ राज्याच्या पायाभूत सुविधांच्या विकासात महत्त्वपूर्ण कामगिरी सातत्याने करीत आहे. राज्यातील दळणवळण यंत्रणा जलद करण्यासाठी आणि वाहतूक सुविधेचा दर्जा सुधारण्यासाठी महामंडळाने केलेल्या प्रयत्नांना यश लाभले आहे. मुंबईसह अनेक शहरांमध्ये रस्त्यांचा आम्ही विकास केला. विविध उड्डाणपुलांच्या माध्यमातून सार्वजनिक वाहतूक गतिमान केली.'

राज्याच्या पायाभूत सुविधांच्या विकासात महत्त्वपूर्ण कामगिरी करण्याचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मागील १६ वर्षांहून अधिक काळ सातत्याने करीत आहे. राज्यातील दळणवळण यंत्रणा प्रामुख्याने जलद करण्यासाठी आणि राज्याच्या वाहतूक सुविधेचा पायाभूत विकास आणि दर्जा सुधारण्यासाठी महामंडळाने सातत्याने गुणवत्तापूर्ण कामगिरी केली आहे.

नुकतेच आम्ही मुंबई शहरातील ग्रँटरोड येथील आकाशी पादचारी पुलाचे उद्‌घाटन केले. या पुलाचे वैशिष्ट्य म्हणजे, वांद्रे-वरळी सागरी सेतूनंतर पहिल्यांदाच हा स्कायवॉक केबलवर भार देऊन बनवण्यात आला आहे. या स्कायवॉकचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे या स्कायवॉकला एकूण सहा पैकी तीन सरकते जिने आहेत. याशिवाय ठाणे शहरातील कापूरबावडी उड्डाणपुलाच्या घोडबंदर-नाशिक मार्गिकेचे उद्घाटन नुकतेच करण्यात आले आहे. स्कायवॉक आणि ही मार्गिका वाहतुकीसाठी खुली करण्यात आली असून, मुंबईकरांना पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यावर महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ प्रयत्नशील आहे.

१९९६ साली सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत राज्य रस्ते विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. आघाडी सरकारच्या काळात आम्ही या महामंडळाच्या माध्यमातून मुंबईसह अनेक महत्त्वपूर्ण शहरांमध्ये रस्ते विकासाचे आणि विविध उड्डाणपुलांच्या माध्यमातून वाहतूक जलद करण्याचे काम केले आहे. सागरी सेतू पासून ते द्रुतगती महामार्गापर्यंत अनेक प्रकल्पांची निर्मिती करून महामंडळाने राज्याच्या विकासात मोठे योगदान दिले आहे.

**सागरी सेतू**

वरळी ते वांद्रे जोडणारा राजीव गांधी सागरी सेतू म्हणजे महाराष्ट्राच्या अभियांत्रिकी - स्थापत्यकलेचे आणि रस्ते विकास महामंडळाच्या उत्कृष्ट कामाचे एक प्रतीक आहे, असे मला वाटते. ४.७ किलोमीटरचा हा समुद्र सेतू ८ ते १० मिनिटांत ओलांडला जातो. या सागरी सेतूने राज्याच्या लौकिकात भर घातली आहे.

**मुंबईसाठी ५० उड्डाणपूल**

मुंबईतील वाहतूक समस्यांवर प्रभावी उपाय म्हणून मुंबईसाठी ५० उड्डाणपूल बांधण्यात आले आहेत. या उड्डाणपुलांमुळे



मुंबईतील वाहतूक कोंडीची समस्या काही प्रमाणात दूर होण्यास मदत झाली असे मला वाटते.

**भविष्यासाठी प्रकल्प**

महामंडळाने भविष्यात मुंबईसाठी काही महत्त्वपूर्ण प्रकल्प आखले आहेत. यात प्रामुख्याने पेडर रोडवरील उड्डाणपुलाची निविदा काढण्यात आली आहे. या कामसाठी कंपनीचीही निवड करण्यात आली आहे. हा उड्डाणपूल दक्षिण मुंबई आणि उपनगराला जोडणारा महत्त्वाचा दुवा ठरेल. त्याचबरोबर वेस्टर्न फ्री वे वरील ४.५ किलोमीटर लांबीचा वरळी ते हाजीअली सी लिंक प्रकल्प, ९ किलोमीटरचा हाजीअली ते नरीमन पॉईंट आणि ९.८ किलोमीटरचा वर्सोवा ते वांद्रे सी लिंक प्रकल्प या महत्त्वाच्या टप्प्यांचे काम आम्ही हाती घेत आहोत. हा प्रकल्प पूर्ण झाला तर मुंबईचा पश्चिमेकडील उपनगराचा भाग थेट सी लिंकने शहराला जोडला जाईल. जेणेकरून मुंबईकरांचा वेळ आणि इंधन मोठ्या प्रमाणावर वाचेल, असा मला विश्वास आहे. या प्रकल्पाला पर्यावरण विभागाची मंजुरी मिळाली आहे.

मुंबई-पुणे यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्ग म्हणजे मुंबई-पुणे एक्सप्रेस वे हा महामंडळाने पूर्ण केलेला आणखी एक महत्त्वाचा प्रकल्प आहे. या प्रकल्पाने राज्याच्या विकासात मोलाची भर घातली आहे असे मला वाटते. यशवंतराव चव्हाण मुक्त द्रुतगती मार्गावरील जमिनीचे व्यावसायिकीकरण झाल्याने महामंडळास यातून निधी मिळेल. या निधीचा विनियोग विकासकामांसाठी केला जाईल, हे मी सांगू इच्छितो.

**चौफेर रस्ते**

मोठ्या शहरांच्या रस्ते विकासाबरोबरच आमच्या महामंडळाने राज्यातील इतर भागातील रस्ते विकासावरही भर दिला आहे. उर्वरित महाराष्ट्रात सातारा-कागल चौपदरी रस्ता, पायाभूत रस्ते विकास योजनेंतर्गत बारामती, लातूर, सोलापूर येथील रस्ते, ठाणे घोडबंदर, सार्वजनिक बांधकाम विभाग व इतर प्रकल्पासाठी, महाराष्ट्रातील आरओबीसाठी (१९५ कोटी) तर बांधा, वापरा आणि हस्तांतर करा (बिल्ट-ऑपरेट-ट्रान्सफर-बीओटी) तत्त्वावर तयार झालेल्या प्रकल्पांमध्ये भिवंडी-कल्याण-शिळफाटा, वरोरा आरओबीसाठी, नागपूर-औरंगाबाद-सिन्नर-घोटी-मुंबई रस्त्यासाठी तर मुंबई-पुणे जुन्या राष्ट्रीय महामार्ग चारची कामे महामंडळाने पूर्ण केली आहेत.

**प्रस्तावित प्रकल्प**

भविष्यातील अडचणींचा विचार करून रस्ते विकासासंदर्भात महामंडळाने काही प्रकल्प प्रस्तावित केले आहेत. यात प्रामुख्याने

■ पुणे शहरासाठी बाह्य वळण रस्ता - हा वळण रस्ता झाल्यानंतर पुणे शहरात होत असलेली वाहतुकीची कोंडी मोठया प्रमाणात दूर होऊन काही अंशी अपघाताचे प्रमाणही कमी होईल.

■ एकात्मिक रस्ते विकास प्रकल्पांतर्गत नागपूर- अचलपूर, अकोला, अंबेजोगाई, दौड, पंढरपूर, तुळजापूर, सांगली, सोलापूर या ठिकाणी रस्त्यांचा विकास होईल. त्यामुळे पर्यायाने या भागातील नागरिकांना वाहतुकीच्या चांगल्या सोयी मिळतील.

■ रेसिंग ट्रॅकचा व थीम पार्कचा विकास - राज्यात करमणुकीसाठी असलेल्या या क्षेत्राचा विकास झाला तर नागरिकांना करमणुकीसाठी एक नवे साधन उपलब्ध होईल आणि पर्यटनाला चालना मिळेल.

■ पूर्ण - मुंबई द्रुतगती मार्ग क्षमतावृद्धी करण्याचे प्रस्तावित आहे. यामुळे जवळपास ६ कि.मी. अंतर कमी होईल. याद्वारे मोठी इंधन बचत अपेक्षित आहे. खोपोली आणि सिंहगड इन्स्टिट्यूट कुसगाव असा हा मार्ग असून यामुळे जवळपास २० ते २५ मिनिटाचे अंतर कमी होऊ शकेल. या मार्गाला ८ कि.मी लांबी असलेले ४+४ मार्गी भुयारी मार्ग (टनेल) आहेत. तर १.६ कि.मी लांब रस्ताविस्तार आहे.

**आश्वासक वाटचाल**

महाराष्ट्रात सर्वोत्कृष्ट पायाभूत सुविधा विकसित करणे हे महामंडळाचे उद्दिष्ट आहे. त्याच्या पूर्तीसाठी महामंडळाची वाटचाल सुरू आहे. हे महामंडळ राज्यातील द्रुतगती मार्ग, सागरी रस्ते, पूल, उड्डाणपूल, बंदर, विमानतळ, रेल्वे प्रकल्प तसेच नागरी भागात रस्त्यांचे जाळे निर्माण करीत आहे.

राज्याच्या विकासात राज्य रस्ते विकास महामंडळाने महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली असून भविष्यातही महामंडळाची ही घोडदौड अशीच सुरू राहील आणि राज्याला नव्या उंचीवर नेईल, असा मला विश्वास आहे.

**- शब्दांकन : वर्षा फडके**

महामंडळाने आतापर्यंत ७,९६६ कोटी रुपयांचे १५ महत्वाचे प्रकल्प पूर्ण केले आहेत.



## प्रगतीचा नवा अध्याय

- महामंडळामार्फत सध्या जवळपास चार हजार कोटी रुपयांचे प्रकल्प सुरू
- एकात्मिक रस्ते विकासांतर्गत नांदेड, अमरावती, नंदूरबार, सोलापूर, औरंगाबाद, पुणे आणि नागपूर येथील रस्ते विकास तसेच पेडर रोड उड्डाणपूल आणि पूर्व व पश्चिम भागासाठी जलवाहतुकीची (वॉटर ट्रान्सपोर्ट) कामे सुरू
- जलवाहतुकीमध्ये दक्षिण मुंबई ते नवी मुंबई, दक्षिण मुंबई ते मांडवा रायगड आणि नरीमन पॉईंट ते बोरीवली अशा कामांचा समावेश
- राज्यातील सीमेवरील तपासणी नाक्यांचे अत्याधुनिकीकरणाचे कामही सुरू
- महामंडळाची नावीन्यपूर्ण कामे - बस, ट्रक टर्मिनलचा विकास, करमणुकीच्या क्षेत्रात संदर्भात थीम पार्क, रेसिंग ट्रॅक व वॉटर स्पोर्ट्स निर्मिती. व्यावसायिक क्षेत्रात, आय टी पार्क व तत्सम विकास, धार्मिक व पर्यटन क्षेत्रात पर्यटनस्थळ व तीर्थक्षेत्र विकास, बंदर संपर्क क्षेत्रात छोट्या बंदराचा विकास व त्यांना रस्ते व रेल्वे सुविधांची उपलब्धता.
- रस्ते विकास महामंडळाकडे उपलब्ध असलेला अनुभव, तांत्रिक मनुष्यबळ व सागरी सेतूसारखे प्रकल्प उभारण्याची ख्याती लक्षात घेऊन अन्य राज्यात तसेच परदेशात महामंडळाची वेगळी एम.एस.आर.डी.सी. इंडिया इंटरनॅशनल कंपनी स्थापन करण्याची बाब विचाराधीन



मनोहर नाईक
अन्न व औषध प्रशासन मंत्री

# सुरक्षित औषधे... सुदृढ आरोग्य

अन्न व औषध प्रशासन विभागाने राज्यातील तरुणांमधील व्यसनाधीनता पूर्णपणे संपवण्यासाठी गुटखा, पानमसाला व तत्सम पदार्थांवर बंदी घालण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. अशा प्रकारचा निर्णय घेणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. त्याचबरोबर सुरक्षित, निर्भेळ व सकस अन्न उपलब्ध व्हावे म्हणून राज्यात अन्न सुरक्षा कायद्याची अतिशय प्रभावीपणे अंमलबजावणी करून अन्न व्यवसायिकांवर नियंत्रण ठेवण्यात आम्हाला यश मिळाले. राज्यातील जनतेला सुयोग्य अशी औषधे मिळावित म्हणून आम्ही केलेल्या प्रयत्नांना उत्तम यश प्राप्त झाले, याचा मला अभिमान आहे.

अन्न व औषध प्रशासन ही ग्राहकाच्या हिताचे रक्षण करणारी प्रमुख संस्था आहे. शासन जनतेच्या आरोग्याबाबत संवेदनशील असून, नागरिकांच्या आरोग्यावर कोणतेही दुष्परिणाम होणार नाहीत याकरिता कायमस्वरूपी सतर्क आहे.

गुटखा, पानमसाला व तत्सम पदार्थांच्या सेवनामुळे महाभयंकर दुष्परिणाम व कॅन्सरसारखे दुर्धर आजार राज्यामध्ये वाढीस लागल्याचे दिसून आल्याने या पदार्थांवर या वर्षीही बंदी घालण्यात आली आहे. अशी बंदी घालणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. या पदार्थांच्या विक्रीद्वारे मिळणाऱ्या प्रचंड उत्पन्नाचा तोटा सहन करूनही बंदी घालण्याचा निर्णय नागरिकांच्या हितासाठी शासनाने घेतला आहे.




**अन्न व्यावसायिकांवर नियंत्रण**

जनतेला सुरक्षित, निर्भेळ व सकस अन्न उपलब्ध व्हावे म्हणून राज्यात अन्नसुरक्षा कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करून अन्न व्यवसायिकांवर नियंत्रण ठेवण्यात येत आहे. या व्यावसायिकांना नोंदणी आणि परवाने सक्तीचे करण्यात आले आहे. आतापावेतो १ लाख २७ हजार ५२८ परवाने मंजूर करण्यात आले. २ लाख ८१ हजार ३८७ जणांना नोंदणी देण्यात आली. यामुळे शासनाला ३७.८२ कोटी रूपयांचा महसूल मिळाला. हे देशातील कामाच्या एक तृतीयांश आहे. अशाप्रकारे याबाबत महाराष्ट्र देशात अग्रेसर ठरले आहे.

औषध किंमत नियंत्रण अध्यादेश २०१३ लागू करण्यात येऊन ३४८ औषधांच्या किंमती नियंत्रित. त्यामुळे अत्यावश्यक औषधांच्या किमती कमी.

**औषध : जीवनावश्यक वस्तू**

औषध हे जीवनावश्यक वस्तू म्हणून अधिसूचित करण्यात आले आहे. त्याद्वारे औषध निर्मिती, ठोक विक्री व किरकोळ विक्री यामध्ये कोणताही अडथळा निर्माण होणार नाही, अशी तरतूद करण्यात आली. त्याप्रमाणे विक्रेत्याने आपला व्यवसाय चालावावा अशी अपेक्षा आहे. परंतु गेल्या ३०/४० वर्षात औषध विक्रेता संघटनांच्या माध्यमातून एक अनिष्ट मक्तेदारी देशामध्ये उदयाला आली. त्यामुळे औषधे जीवनावश्यक वस्तू असूनसुद्धा त्यांच्या विक्रीवर अडथळा निर्माण झाला. या अडथळ्यामुळे काही संघटनांनी मोठ्या प्रमाणात अर्थाजन करून रुग्णांची आर्थिक पिळवणूक केली. या विक्रेत्यांविरूध्द कडक कारवाई करण्यात येऊन ४७ लाख रुपयांचा दंड त्यांना ठोठावण्यात आला आहे.

**पारदर्शकता आणि गतिमानता**

औषधांची विक्री व परवाने, चाचणी याबाबत प्रशासनात अत्याधुनिक संगणकीय कार्यप्रणाली अवलंबण्यात आल्याने अर्जदारांना त्वरित परवाना मिळणे सोयीचे झाले आहे. कामकाजामध्ये पारदर्शकता आली आहे. या संगणकीय प्रणालीला प्रधानमंत्री यांचा गोल्ड ॲवॉर्ड मिळाला आहे.

विभागाच्या पुढील वर्षासाठी अनेक प्रस्तावित योजना असून औषध निर्यात वाढवण्यासाठी उपाययोजना करणे, औषध उत्पादक राज्याकडे कसे आकर्षित होतील यावर लक्ष केंद्रित करणे, अन्न सुरक्षा व्यवस्थापन स्थापन करणे, विभागीय स्तरावर अन्न व औषध चाचणी प्रयोगशाळा पुरविणे, अन्न व्यावसायिकांना परवाना आणि नोंदणीचे कामकाज राज्यासाठी ऑनलाइन करणे, असे विविध कार्यक्रम प्रभावीपणे राबवण्यात येणार आहेत, अशी मी ग्वाही देतो.

**– शब्दांकन : हेमंतकुमार खैरे**

## औषधविक्रेत्यांवर नियंत्रण

- औषधांचे अनिष्ट परिणाम टाळण्यासाठी फार्मासिस्टच्या देखरेखेखाली औषध विक्री होणे आवश्यक असल्याने विभागामार्फत राज्यभर धडक मोहीम
- ज्यांच्याकडे नोंदणीकृत फार्मासिस्ट नाही अशा औषध विक्रेत्यांचे परवाने रद्द किंवा दीर्घ मुदतीसाठी निलंबित
- रुग्णांना बनावट औषधे, भेसळयुक्त औषधे तसेच गैरमार्गाने विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या औषधांपासून संरक्षण देण्यासाठी औषधविक्री बिलाद्वारे केली जावी अशी तरतूद करून तिची प्रभावीपणे अंमलबजावणी
- औषधांच्या आक्षेपार्ह जाहिरातींवर बंदी
- औषधे व सौंदर्यप्रसाधने यांचा दर्जा योग्य प्रमाणात मिळाला नाही तर त्यांच्यावर कारवाई करून न्यायालयात खटले दाखल
- जी औषधे अप्रमाणित आढळून येतात त्यांची विक्री थांबवण्यात येते.



अनिल देशमुख
अन्न व नागरी पुरवठा
आणि ग्राहक संरक्षण मंत्री

'जीवनावश्यक अन्नाच्या गरजेची पूर्तता करण्यासाठी अन्न व नागरी पुरवठा विभाग महत्त्वाचा आहे. या विभागाचा मंत्री म्हणून कार्यभार स्वीकारल्यानंतर जनतेला अधिक जलद व प्रभावीपणे धान्यवितरण करता यावे यासाठी नियोजन करण्यात आले. त्यानुसार प्रभावीपणे अंमलबजावणी केली गेली. त्यामुळे राज्यात पारदर्शकपणे स्वस्त धान्याचा पुरवठा होत आहे. राज्यातील ७ कोटी जनतेला अन्न सुरक्षा कायद्याचा लाभ मिळाल्याने त्यांना आता दोन वेळेच्या जेवणाची चिंता राहणार नाही, याचे मला विशेष समाधान आहे.'

# सामान्यांची चिंता मिटली

शिधापत्रिकेनुसार प्राधान्य अंत्योदयाच्या लाभार्थ्यांना प्रत्येक कुटुंबाला ३५ किलो धान्य तर प्राधान्य इतरच्या लाभार्थ्यांना प्रत्येक महिन्याला प्रतिव्यक्ती ५ किलो धान्य वितरित केले जाते. दोन्ही लाभार्थ्यांना एकसमान दराने धान्य वितरण करण्यात येत असून यामध्ये गहू प्रतिकिलो २ रु., तांदूळ ३ रु. तर भरड धान्य १ रु. प्रतिकिलो याप्रमाणे देण्यात येत आहे. जे नागरिक या योजनेत समाविष्ट होऊ शकत नाहीत अशा उर्वरित १ कोटी ७७ लाख लाभार्थ्यांना शासनाने रु. १, ५०० कोटी रु. इतका वार्षिक अधिभार सोसून या लाभार्थ्यांना ७.२० प्रतिकिलो दराने गहू व रु. ९.६० प्रतिकिलो या दराने तांदूळ असे एकूण १५ किलो धान्य देण्याचा निर्णय घेतला आहे.

महिला सक्षमीकरणासाठी कुटुंबातील महिलेच्या नावाने तिचे छायाचित्र असलेली बारकोड शिधापत्रिका वितरित केली जाणार आहे. नवीन शिधावस्तू दुकान महिला बचत गटांना देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**सकस अन्नाची हमी**

अन्न सुरक्षा कायद्यान्वये गर्भवती महिला व स्तनदा माता तसेच १४ वर्षे वयापर्यंतच्या मुलांसाठी सकस अन्नाची हमी दिली आहे.

जर काही कारणास्तव त्या महिन्यांमध्ये लाभार्थ्यांना धान्य वितरित करता आले नाही तर त्यांना अन्न सुरक्षा भत्ता दिला जाईल.

**तक्रार निवारण यंत्रणा**

या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता तक्रार निवारण यंत्रणा उभारण्यात आली आहे. या कायद्याची अंमलबजावणी करताना संबंधित यंत्रणेतील कोणताही अधिकारी, कर्मचारी दोषी आढळल्यास त्याला ५ हजार रुपयांपर्यंत दंड करण्यात येईल.

**साठवणूक क्षमतेत वाढ**

राज्यात सध्या राज्य शासनाची ५.६५ लाख मे. टन साठवणूक क्षमता असलेली १,०२४ धान्य गोदामे आहेत. राज्यास प्राप्त होणारे धान्य, राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेची अंमलबजावणी व धान्याची वाढती गरज पहाता सदरहू गोदामे अपुरी पडत असून त्याचा पुरवठा यंत्रणेवर ताण येत असल्याने राज्यामध्ये रु.२,०००/- कोटी गुंतवून सुमारे ६११ गोदामे बांधकामाचा गत ५० वर्षातील सर्वात मोठा कार्यक्रम राबववण्यात येत आहे. याद्वारे धान्य साठवणुकीसाठी अतिरिक्त १३.५० लाख मे.टन क्षमता



निर्माण होणार आहे. ही कामे प्रगतिपथावर असून त्यापैकी ७० टक्के बांधकामे पूर्ण झाली आहेत.

**सक्षम व पारदर्शक वितरण**

सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी निर्धारित दराने योग्य दर्जाचे धान्य शिधापत्रिकाधारकांना खात्रीशीररीत्या उपलब्ध होईल याची हमी देणारी सुधारित धान्य वितरण पद्धत राबवण्यात येत आहे. संपूर्ण राज्याकरिता प्रत्येक महिन्याची ७ तारीख हा दिवस अन्न दिन म्हणून पाळण्यात येतो.

अन्नदिन किंवा अन्नसप्ताहात शिधापत्रिकाधारकाला धान्याचे वाटप होऊ शकले नाही तर त्याच महिन्यातील इतर दिवशी धान्य वाटप करणे बंधनकारक करण्यात आले आहे. अन्नदिन व अन्नसप्ताह या काळात सकाळी ८ ते रात्री ८ वाजेपर्यंत धान्याचे वाटप सुरु ठेवणे बंधनकारक असून स्वस्तधान्य दुकानदाराने तसे केले नाही तर त्याला दंड ठोठावला जातो.

> अन्न सुरक्षा कायद्याची अंमलबजावणी सुरू. राज्यातील ७ कोटी जनतेला या कायद्याने अन्नाचा हक्क प्राप्त.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण करण्यात येत असून त्यासाठी राज्यातील सर्व शिधापत्रिकांचे डिजिटायजेशन करण्यात आले आहे. सदर नोंदींचे प्रमाणीकरण झाल्यानंतर लाभार्थ्यांना बारकोडेड शिधापत्रिका वितरित करण्यात येणार आहेत. सद्य:स्थितीत पुणे व औरंगाबाद जिल्ह्यात काही ठिकाणी रास्तभाव दुकानावर बायोमेट्रीक प्रणालीचा वापर करुन धान्य वितरित करण्यात येत आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये दिल्या जाणाऱ्या धान्याची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर प्रायोगिकतत्त्वावर जीपीएस यंत्रणा बसविण्यात येणार आहे.

शासकीय गोदामातून स्वस्त धान्य दुकानाकडे वाहन निघाले की, त्या दुकानांच्या परिसरातील लोक, शासकीय गोदाम वा तालुका कार्यालयांना ग्रुप एसएमएसद्वारे धान्याच्या आकडेवारीची व वाहनाची माहिती दिली जाते. यामुळे रेशनिंगवरील धान्याचा अपहार टाळण्यासाठी मदत होत आहे.

**केरोसिनवरील अनुदान बँक खात्यात**

केरोसिन वितरणातील गैरव्यवहार दूर करण्यासाठी यापुढे केरोसिनवरील अनुदान थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येत आहे. ही योजना मुंबई, मुंबई उपनगर शिधावाटपक्षेत्र, अमरावती, नाशिक, वर्धा, पुणे व नंदूरबार या सहा जिल्ह्यांत राबवण्यात येणार आहे.

**शेतकऱ्यांना दिलासा**

शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाला योग्य मोबदला मिळावा यासाठी आधारभूत किंमत योजना राबवण्यात येते. या वर्षी विदर्भातील धान उप्तादक शेतकऱ्यांची मागणी व त्यांचे हित विचारात घेऊन राज्य शासनाने उन्हाळी धान खरेदी करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार सुमारे ३ लाख क्विंटल इतकी उन्हाळी धान खरेदी करून धान उत्पादक शेतकऱ्याला मोठा दिलासा दिला आहे.

**साखरेचे वितरण**

जुलै, २०१४ पासून सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत दारिद्र्यरेषेखाली पात्र लाभार्थ्यांना १३ रु.५० पैसे प्रतिकिलो या दराने प्रतिव्यक्ती ५०० ग्रॅम व सणासुदीच्या महिन्यात प्रतीव्यक्ती ६६० ग्रॅम इतकी साखर वितरित करण्यात येणार आहे.

**केंद्राकडून अपेक्षा**

नुकतेच दिल्ली येथे केंद्रिय अर्थमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली राज्यांच्या अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांच्या बैठकीला मी उपस्थित राहिलो होतो. जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ ची परिणामकारक अंमलबजावणी होण्यासाठी या कायद्यामध्ये बदल करून या कायद्यांतर्गत गुन्हा अजामीनपात्र करावा, कांद्याच्या किंमती नियंत्रणात राहण्यासाठी व त्याचा सुरळित पुरवठा होण्यासाठी बफर स्टॉक करावा, सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत सवलतीच्या दराने पाम तेल व तूरडाळ वितरण करण्याची योजना पुन्हा सुरू करावी, राज्याच्या केरोसिनच्या कोट्यामध्ये वाढ करावी, कल्याणकारी संस्था वसतिगृहे इ.साठी धान्य मिळण्याची व्यवस्था व्हावी, अशा मागण्या या बैठकीत मी आग्रहाने मांडून राज्यातील वितरण व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाचे लक्ष वेधले.

**– शब्दांकन : विष्णू काकडे**



## ग्राहकांच्या हितासाठी

- ग्राहकांच्या तक्रारींची दखल घेण्यासाठी राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग आणि जिल्हा पातळीवर जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच या यंत्रणा कार्यरत
- ग्राहकांना नुकसान भरपाईपोटी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाकडे २० लाखांपर्यंत तर राज्य ग्राहक आयोगाकडे २० ते १ कोटींपर्यंत आणि राष्ट्रीय आयोगाकडे १ कोटीपेक्षा जास्त नुकसान भरपाईपोटी किंमत मागता येते.
- तक्रारींची संख्या अधिक असलेल्या मुंबई, ठाणे, पुणे व नागपूर या जिल्ह्यांच्या ठिकाणी अतिरिक्त मंचांची स्थापना
- तक्रारींचा निपटारा लवकर होऊन ग्राहकाला न्याय मिळण्यासाठी जिल्हा मंचासाठी स्वतंत्र कर्मचारी नेमण्याचा निर्णय
- तक्रारींचा तत्काळ निपटारा होण्यासाठी कागदपत्रांचे डिजीटायझेशन करणे, ई फायलिंग करणे इत्यादी स्वरूपाची कार्यवाही सुरू
- तक्रारींची ऑनलाइन सुनावणी सुरू करण्यासाठी कार्यवाही करण्यात येत आहे
- खोट्या वजनमापांचा वापर करण्याबाबत नोंदविलेल्या तक्रारीवर खटला दाखल करण्यात येऊन एका महिन्याच्या कालावधीत त्यावर कार्यवाही केली जाते.
- सार्वजनिक वितरण व्यवस्थेबाबत तक्रारी नोंदविण्यासाठी १८००२२४९५०/ १८००२२२२६२या टोल फ्री क्रमांकावर हेल्पलाइन सुरू.
- विभागाचे www.mahafood.gov.in हे संकेतस्थळही कार्यान्वित.



**बाळासाहेब थोरात**
महसूल व खार जमीन मंत्री

# लोकाभिमुख गतिमानता

'महसूल विभाग हा शासनाचा अतिशय महत्त्वाचा विभाग आहे. नागरिकांच्या विविध प्रकरणांची हाताळणी गतिमान पद्धतीने व्हावी तसेच हे प्रशासन लोकाभिमुख व्हावे यासाठी मी सातत्याने आग्रही आहे. सामान्य नागरिक हा केंद्रबिंदू मानून पारदर्शक व नावीन्यपूर्ण पद्धतीने काम करता यावे यासाठी अभिनव योजना सूरू करण्यावर मी भर दिला. महसूल विभगाच्या बळकटीकरणाला सर्वोच्च प्राथमिकता दिली.'

एकदा पैठणवरून एक शेतकरी मला भेटण्यासाठी आला. त्याच्या डोळ्यातील अश्रू थांबत नव्हते. थोडा शांत झाल्यानंतर तो म्हणाला, 'साहेब जे आम्हाला गेल्या तीस वर्षात जमलं नव्हतं ते तुम्ही करून दाखवलंत. माझ्याच शेतात जायला माझा भाऊ रस्ता देत नव्हता. शेतातून माल बाहेर काढायला खूप त्रास व्हायचा. नेहमी भांडण होत असे. नकाशामध्ये रस्ता असतानादेखील मला शेतात जाता येत नसे. मात्र सुवर्ण जयंती राजस्व अभियानांतर्गत कोणतीही समस्या न येता भावाने त्याच्या शेतातून रस्ता मोकळा करून दिला. माझ्या शेताने तुमच्यामुळे इतक्या वर्षांनी मोकळा श्वास घेतला. तुमचे कितीही आभार मानले तरी कमीच आहेत.'

हे ऐकूण माझे मन भरून आले. ज्या गोरगरीब शेतकरी आणि सर्वसामान्यांसाठी आपण मनापासून जे काम केले त्याचा लाभ मिळतो, हे प्रत्यक्ष कळल्यावरचा आनंद आणि मानसिक समाधान शब्दातीत आहे. शेतरस्ते मोकळे करण्याच्या अभियानातून आज शेकडो किलोमीटर रस्ते मोकळे झाले आहेत. मात्र हे सर्व श्रेय माझ्या एकट्याचे नाही तर सर्व महसूल यंत्रणेचे आहे.

महसूल विभाग हा शासनाचा महत्त्वाचा विभाग आहे. या विभागाचा मंत्री म्हणून कार्यभार स्वीकारल्यानंतर महसूल प्रशासन लोकाभिमुख व्हावे ही गरज ओळखून नियोजन करण्यास मी सुरुवात केली. शेतकरी व सामान्य नागरिकांचा महसूल विभागाशी नियमित संपर्क येतो. नागरिकांच्या विविध प्रकरणांची हाताळणी गतिमान पद्धतीने व्हावी यासाठी नावीन्यपूर्ण आणि पारदर्शक उपाययोजना करण्याचा निर्धार केला.

महसूल विभागाला इतर विभागांशी संनियंत्रण व समन्वय करताना अनेक प्रशासकीय अडचणी येतात. त्या सोडवण्यावर मी भर दिला. शासनाच्या योजना जनतेपर्यंत परिणामकारकरीत्या पोहोचवण्यासाठी महसूल प्रशासन बळकट केले.

जे अधिकारी व कर्मचारी अथक प्रयत्न करतात त्यांचा दरवर्षी महसूल दिनी यथोचित सत्कार करण्यास सुरुवात केली. शाबासकीची अशी थाप पडल्यामुळे महसूल यंत्रणेने यावर्षी उद्दिष्टापेक्षा १४३ टक्के जादा महसूल गोळा केला आहे.

### ई-तंत्रज्ञानावर भर

बदलत्या काळानुसार अधिकाधिक ई



तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यावर भर दिला. मोजणी प्रकरणांचे नियोजन करण्याकरिता ई-मोजणी ही आज्ञावली तयार करण्यात आली. मुद्रांकशुल्क कार्यालयांचे अद्ययावतीकरण करण्याचे काम सुरू केले.

**विभागाला वेगळी दिशा**

गेल्या काही वर्षात महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन विभागाला वेगळी दिशा दिली आहे. शाळा सोडल्याचा दाखल ग्राह्य धरून अधिवास प्रमाणपत्राची अट शिथिल केली. यामुळे अनेक विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला.

चार खंडकरी शेतकऱ्यांच्या जमिनीचा अनेक वर्ष प्रलंबित असलेला प्रश्न सोडवला. कोकणातील बेदखल कुळांना मालकी हक्क प्राप्त करून दिले. संपूर्ण विदर्भातील भूमिधारी शेतकऱ्यांचे भूमिस्वामी शेतकऱ्यांत रूपांतर करण्याची विषेश मोहीम राबविण्यात आली. नझूल जमिनीचा भाडेपट्टा ठरवून हस्तांतरणाच्या परवानगीची पद्धत सोपी करणारे नझूल धोरण जाहीर केले. याचा लाभ नागपूर व अमरावती विभागाला झाला.

जमिनीच्या मोजणी प्रकरणात शून्य प्रलंबितता आणण्यासाठी कालबद्ध पद्धतीने काम केले. शेतकऱ्यांची प्रलंबित मोजणी प्रकरणे सत्वर निकाली काढण्यासाठी खाजगी सर्व्हेअरची नियुक्ती करता येईल, अशीही तरतूद केली.

बांधकामासाठी लागणारी वाळू व तिची होणारी अवैध वहतूक हा एक चिंतेचा विषय होता. या व्यवहारात पारदर्शकता आणण्यासाठी ई ऑक्शन पद्धती अवलंबिली.

**सुवर्ण जयंती राजस्व अभियान**

प्रशासकीय यंत्रणेत गतिमानता, सुसूत्रता आणि पारदर्शकता आणणाऱ्या अभिनव कल्पना व प्रयोग प्रशासकीय अधिकारी त्यांच्या जिल्ह्यात करीत असतात. अशा अभिनव प्रयोगाला चांगला प्रतिसाद व यश मिळाले असेल त्यांना राज्य आणि देश पातळीवर लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रत्येक जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या जिल्ह्यात राबवलेल्या सर्व अभिनव प्रयत्नांना एकत्र करून राज्यभर राबवल्यास जनतेला मोठा लाभ होईल ही संकल्पना मांडण्यात आली. निवडक योजनांचे एकत्रीकरण करून सुवर्ण जयंती राजस्व अभियान सुरू करण्यात आले.

वेगवेगळ्या ठिकाणी पूर्वीच घेतलेल्या लोकोपयोगी उपक्रमांचे, यशोगाथांचे एकत्रीकरण करणे हा या योजनेचा पहिला उद्देश होता. कायदा-अधिनियम व कार्यपद्धतीचे सुलभीकरण, शक्तीच्या विकेंद्रीकरणाद्वारे व प्रशासकीय सुधारणांद्वारे लोकहिताची साध्यता, माहिती व तंत्रज्ञानाचा शासकीय कामात प्रभावी वापर, याद्वारे शासनाची प्रतिमा उंचावण्यासाठी अभियानाची सुरुवात करण्यात आली.

अभियानास उदंड प्रतिसाद लाभला. यामध्ये जनता व लोकप्रतिनिधी उत्साहाने योजनांच्या यशस्वितेसाठी झटताना दिसून आले. दाखल्यांचे शिबिरे, फेरफार अदालती व समाधान योजना याद्वारे महसूल प्रशासन जनतेच्या दारी पोहोचले. यामुळे जनतेत प्रशासनाबद्दल सकारात्मक संदेश गेला. माहिती तंत्रज्ञानाची भीती जाऊन कर्मचारी व अधिकारी आत्मविश्वासाने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करू लागले.

मागील वर्षीच्या अनुभवांचा वापर करून विस्तारित स्वरूपात या वर्षीदेखील अभियान राबवण्यात येत आहे. दरवर्षी या अभियानाला जनतेने चांगला प्रतिसाद दिला. या अभियानांतर्गत १ एप्रिल २०१३ ते ३१ मार्च २०१४ या कालावधीत विविध दाखले देण्याकरिता शिबिरे आयोजित करण्यात आली. त्यामध्ये ५३,०८,६७६ दाखले वितरित करून महसूल विभागाने विक्रम केला आहे. या विक्रमाची नोंद लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये झाली आहे. अशा प्रकारे शासकीय उपक्रमाची नोंद होणारे महाराष्ट्र हे देशातील पहिलेच राज्य ठरले. अतिक्रमित व बंद झालेल्या शेतातून जाणाऱ्या रस्त्यांना लोकसहभागातून तयार करण्यात आले, या अभियानतून १५०५३ कि.मी. चे रस्ते अतिक्रमणमुक्त झाले.

सुवर्ण जयंती राजस्व अभियानाने महसूल प्रशासनाला गती दिली. हे प्रशासन अधिक लोकाभिमुख झाले. त्यामुळे सामान्य नागरिक आणि शासन यांच्यामधील दरी कमी झाली. लोकांची कामे वेगाने होऊ लागली. त्यांना होणारा मानसिक आणि इतरही त्रास वाचला, याचे मला फार समाधान आहे. प्रामाणिकपणे केलेल्या कार्याचा प्रभाव फार मोठा असतो, हेच या निमित्ताने दिसून आले.

**- शब्दांकन : अर्चना शंभरकर**

**फेरफार अदालतीत ७,७९,७६४ फेरफार मंजूर**




## थेट जनतेच्या दारी

- सुवर्ण जयंती राजस्व अभियानात एकूण ११ उपक्रमांचा समावेश. जिल्ह्याच्या निकडीप्रमाणे यापैकी किमान ८ उपक्रम राबवणे बंधनकारक
- या उपक्रमांमध्ये विविध दाखले देण्याकरिता शिबिरांचे आयोजन,
- विविध दाखल्यांकरिता आवश्यक असलेल्या अर्जांची ऑनलाइन उपलब्धता व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून अर्ज ऑनलाइन सादर करण्यासाठी सेतू केंद्र व ई-सेवा केंद्रांची पर्यायी सुविधा, (महा ई-सेवा केंद्रात शासकीय सेवांची उपलब्धता)
- गावनकाशाप्रमाणे अतिक्रमित व बंद झालेले पाणंद/ पांधण/ पानधन/ शेतरस्ते/ शिवरस्ते/ शिवाररस्त्यांना मिळाली मोकळीकता
- एक महिन्याच्या वर प्रलंबित असलेले फेरफार निकाली काढण्यासाठी मंडळ मुख्यालयी फेरफार अदालत
- माहिती मिळविण्यासाठी व तक्रार निवारण्यासाठी ई-लोकशाही प्रणालीची (Help Line ) उपलब्धता
- नागरिकांना एका छत्राखाली सर्व सुविधा उपलब्ध करण्यासाठी समाधान योजना
- ई- चावडी योजना
- १ एप्रिल २०११ रोजी प्रलंबित विविध मूळ अधिकारितेमधील महसूल व अपील प्रकरणांचा १ वर्षाच्या आत निपटारा
- विविध शासकीय कामांसाठी मोबाइल, इंटरनेट, व्हीडीओ कॉन्फरन्स, जीपीएस, सॅटेलाईट इमेजचा मोठ्या प्रमाणात वापर
- नागरिकांच्या सोयीकरिता प्रत्येक जिल्हाधिकारी व तहसील कार्यालयात मदत व जनसंपर्क कक्ष.



राजेश टोपे
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री

'राज्यातील तरुणांना अधिक गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार उच्चशिक्षण मिळावे व ते आजच्या स्पर्धात्मक युगाचे आव्हान स्वीकारण्यास सक्षम व्हावेत, यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात येत आहेत. त्यासाठी नवे आणि आधुनिक विषयांचे अभ्यासक्रम गेल्या काही वर्षात प्राधान्याने सुरू करण्यात आले. युवकांना रोजगार स्वयंरोजगारांच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी रोजगाराभिमुख शिक्षणावर लक्ष केंद्रित करण्यात आले. नजीकच्या भविष्यात राज्यातील विद्यापीठांना जागतिक क्रमवारीत अव्वल स्थान मिळावे, यासाठी शासन आटोकाट प्रयत्न करीत आहे.'

# गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार

राज्यातील विद्यापीठे केवळ परीक्षा केंद्रे न रहाता रोजगाराभिमुख ज्ञान देणारी केंद्रे बनावित यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने अनेक योजना कार्यान्वित केल्या आहेत. उत्तम शैक्षणिक दर्जासाठी शैक्षणिक संस्थांना स्वायत्तता देण्याचे धोरणही तयार केले आहे. राज्यातील विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षण संस्थांमध्ये शिक्षण घेता यावे यासाठी काही शिक्षण संस्थांशी करार करण्यात आले आहेत. या सर्व प्रयत्नांमुळे उच्च व तंत्र शिक्षणाचा दर्जा सुधारण्याला मदत होणार आहे.

**स्मार्ट क्लास रूम**

पीएच.डी. करणाऱ्यांच्या संख्येत वाढ व्हावी म्हणून त्यांना अनुदान दिले आहे. या विद्यार्थ्यांना मासिक ६५०० रुपये शिष्यवृत्ती देण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. पंतप्रधान यांनी दिलेले कुशल मनुष्यबळाबाबतचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी उद्योजकांना स्थानिक लोकांमधूनच कुशल मनुष्यबळ उपलब्ध व्हावे यासाठी रोजगार कौशल्य विकास कार्यक्रम राबवला जाणार आहे. ९५७ व्यवसाय प्रशिक्षण प्रवर्तकांमार्फत रोजगार सुलभ कौशल्य कार्यक्रम राबवण्यात येत आहेत. राज्यातील ९५ औद्योगिक प्रशिक्षण संस्थात माहिती तंत्रज्ञान साक्षरता वाढावी म्हणून स्मार्ट क्लास रूम तयार करण्यात आल्या आहेत.

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात संपूर्ण जगात राज्यातील तंत्रज्ञ आघाडीवर आहेत. मुंबई, औरंगाबाद व नागपूर येथे न्यायसाहाय्य विज्ञान महाविद्यालये स्थापन करण्यात आली आहेत.

**तंत्र शिक्षणाचा दर्जा व गुणवत्तेत सुधारणा**

राज्यातील तंत्र शिक्षणाचा दर्जा व गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे, व्ही.जे.टी.आय, मुंबई, यु.आय.सी.टी, मुंबई, श्री. गुरुगोविंदसिंगजी अभियांत्रिकी महाविद्यालय, नांदेड, श्री. संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय, शेगांव, वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगली, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, यशवंतराव चव्हाण अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर, राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, साखराळे, सांगली, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती, विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, पुणे, जी.एच, रायसॉनी कॉलेज, नागपूर, डी.के.टी.इ. सोसायटी टेक्सटाईल ॲन्ड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूट या चार अभियांत्रिकी महाविद्यालयांचा आणि शासकीय तंत्र निकेतन, मुंबई, पुणे व नागपूर या तीन तंत्रनिकेतनांची निवड



करण्यात आली आहे.

**निवासी व्यवसाय प्रशिक्षण आश्रमशाळा**

आदिवासी व डोंगराळ क्षेत्रातील २८ शासकीय निवासी शाळांचे निवासी व्यवसाय प्रशिक्षण आश्रमशाळात रूपांतर करण्यात येणार आहे. अल्पसंख्याकांसाठी स्वतंत्र औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करण्यात आल्या आहेत. स्त्रियांना रोजगार स्वयंरोजगारांच्या संधी प्राप्त व्हाव्यात यासाठी केवळ मुलींसाठी १५ औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत. मुलींची शिक्षणातील गळती थांबविण्यासाठी उच्चशिक्षण सह संचालनालयाच्या मुख्यालयाच्या जागी विद्यार्थिनींसाठी वसतिगृहे बांधण्यात येणार आहेत. दुर्बल घटक, अल्पसंख्यांक व वंचित गटातील विद्यार्थी यांच्यासाठी विद्यापीठ आवारात वसतीगृहे बांधण्यात येणार आहेत. अल्पसंख्याक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना राबवण्यात येत आहे.

**विधी विद्यापीठ**

सर्व विधी अभ्यासक्रम एका छत्राखाली आणण्यासाठी तीन विधी विद्यापीठांची स्थापना करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी औरंगाबाद व मुंबई येथील विद्यापीठे स्थापन झाली असून नागपूर येथील विद्यापीठ प्रस्तावित आहे. या विद्यापीठांमुळे कायद्याचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांची मोठी सोय झाली आहे.

गडचिरोलीसारख्या आदिवासीबहुल आणि नक्षलग्रस्त जिल्ह्यात गोंडवाना विद्यापीठाची स्थापना करून विभागाने या परिसरातील विद्यार्थ्यांना उच्चशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या भागात शिक्षणाचा प्रचार व प्रसार झाल्यामुळे नक्षलवादाकडे आकर्षित होणाऱ्या तरुणांचे प्रमाण कमी होण्यास निश्चित मदत होणार आहे.

**प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन आणि केंद्रीभूत**

प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन आणि केंद्रीभूत करून ती अधिक पारदर्शक आणि सुलभ करण्यात आली आहे. ऑनलाइन प्रक्रियेमुळे विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी महाविद्यालयात माराव्या लागणाऱ्या फेऱ्या कमी झाल्या असून वेळेचा अपव्यय टळला आहे.

उच्च शिक्षणातील मुलींची गळती कमी व्हावी यासाठी व्यवसाय अभ्यासक्रमाच्या ५० टक्के जागा मुलींसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

**प्री आयएएस ट्रेनिंग सेंटर**

राज्यातील अधिकाधिक विद्यार्थ्यांचा केंद्रीय नागरी सेवेमध्ये समावेश व्हावा या उद्देशाने मुंबई, औरंगाबाद, कोल्हापूर व नागपूर या ठिकाणी प्री आयएएस ट्रेनिंग सेंटर पूर्वी स्थापन करण्यात आली आहेत. आता नाशिक व अमरावती येथे ही केंद्रे सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या भागातील विद्यार्थ्यांना नवीन अभ्यासक्रम व परीक्षेसंबंधी मार्गदर्शन मिळून राज्याची भारतीय प्रशासकीय सेवेतील टक्केवारी वाढण्यासाठी या केंद्रांची निश्चित मदत होणार आहे.

**केवळ मुलींसाठी आयटीआय**

केवळ मुलींसाठी राज्यात १५ औद्योगिक शिक्षण प्रशिक्षण संस्था आहेत. राज्यातील एसएनडीटी या मुलींसाठीच्या विद्यापीठात पारंपरिक विषयांबरोबरच संगीत, होमसायन्स, फूड टेक्नॉलॉजी असे विविध पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. मुलींना शिक्षणासाठी परगावी जाण्याची वेळ येते, तेव्हा सुरक्षित निवासस्थान असावे यासाठी राज्यात १३ प्रियदर्शनी वसतिगृहे सुरू असून आणखी १४ वसतिगृहे बांधण्यास मान्यता देण्यात आली आहे. यामुळे वसतिगृहाची प्रवेशक्षमता २२५० ने वाढणार आहे.

**शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना**

व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानीत महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आलेली शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना शैक्षणिक वर्ष २०१३ -१४ मध्येही सुरू ठेवण्यात आली आहे. केंद्रीय कोट्यातून प्रवेश घेणाऱ्या राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना ही योजना लागू आहे.

**सार्वजनिक ग्रंथालये**

राज्यात १२,८५८ शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये असून या ग्रंथालयांच्या व्यवहाराबाबत कुठलेही गैरसमज राहू नयेत यासाठी या सर्व ग्रंथालयांची पट पडताळणी करण्यात आली आहे. ग्रंथालयांना देण्यात येणाऱ्या अनुदानात ५० टक्के वाढ करण्यात आली आहे.

**– शब्दांकन : हेमंतकुमार खैरे**



## उत्तुंग भरारी

- विद्यापीठ अनुदान आयोगाच्या धोरणानुसार ७ जिल्ह्यांमध्ये आदर्श महाविद्यालये.
- विद्यार्थ्यांची कौशल्यवृद्धी करण्यासाठी कौशल्य विकास अभियान.
- २८ आदिवासी निवासी शाळांचे निवासी व्यावसायिक प्रशिक्षण आश्रमशाळांमध्ये (मिनी आयटीआय) रूपांतर.
- सार्वजनिक खाजगी भागीदारीतून २५० हुन अधिक आयटीआय स्थापन. ५५०० कामगारांना आणि ७५ हजार प्रशिक्षणार्थींना फायदा.
- पहिले करिअर मार्गदर्शन आणि समुपदेशन केंद्र गडचिरोली येथे.
- रायगड जिल्ह्यातील लोणेरे येथे तंत्रज्ञान विद्यापीठ तसेच गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यांसाठी गोंडवना विद्यापीठ.
- मुंबई, नागपूर आणि औरंगाबाद येथे राष्ट्रीय कायदा विद्यापीठ स्थापन करणार.
- मुंबई, औरंगाबाद आणि नागपूर येथे न्यायवैद्यक विज्ञान संस्था.
- दारिद्र्य अथवा इतर सामाजिक कारणांमुळे शिक्षण सोडलेल्या विद्यार्थ्यांसाठी पर्यायी शिक्षण व्यवस्था उपलब्ध होण्यासाठी १७ सामुदायिक महाविद्यालये.
- तीन पाळ्यांमध्ये आयटीआय.
- सार्वजनिक खाजगी भागीदारीतून तंत्रनिकेतने स्थापन करण्यासाठी ६ उद्योगांसोबत करार.
- पुणे आणि नागपूर येथे दोन आय. आय. आय. टी. (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी).
- मुलींसाठी १४ वसतिगृहे उभारणार.

# शिक्षणातून सक्षमीकरण...



**राजेंद्र दर्डा**
शालेय शिक्षण मंत्री

'राज्यातील शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्यासाठी विविध उपाययोजना परिणामकारकरीत्या राबवल्या. राज्यातील जनतेला गुणवत्तापूर्ण शिक्षणाची हमी दिली. शिक्षण हक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी, कॉपीमुक्त अभियान, विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, प्राथमिक व माध्यमिक शाळांसाठी बृहत आराखडा, शिक्षकांना इंग्रजीचे प्रशिक्षण, सहायक शिक्षकांच्या मानधनात वाढ, ई- लर्निंग सुविधा, शाळांचे मूल्यमापन, शाळाबाह्य मुलांचा शोध, पटपडताळणी विशेष मोहीम अशा निर्णयांमुळे शिक्षणक्षेत्रात आमूलाग्र बदल झाला.'

गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी गेल्या काही वर्षात शिक्षण विभागाने महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन महत्त्वाकांक्षी पाऊल टाकले आहे. मला सांगायला अतिशय अभिमान वाटतो की, या प्रयत्नांमुळे शिक्षणक्षेत्रातही महाराष्ट्राने देशात अग्रक्रम राखला आहे. २०११ च्या जनगणनेनुसार राज्याचा साक्षरता दर ८२.९ टक्के असून तो राष्ट्रीय साक्षरतेच्या सरासरीपेक्षा जास्त आहे.

सामाजिक, आर्थिक व राजकीय बदलांचा शिक्षण क्षेत्रावर प्रभाव पडत असतो. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २०१० नुसार राज्याच्या अभ्यासक्रमाची आखणी करण्यात आली आहे. जागतिक बदलाचे प्रतिबिंब असणाऱ्या राष्ट्रीयस्तरावरील अभ्यासक्रमाशी समकक्ष असा हा अभ्यासक्रम आहे. भविष्यातील आव्हाने पेलण्यासाठी विद्यार्थ्यांना हा उपक्रम अतिशय उपयुक्त ठरेल.

### आव्हानांचा सामना

स्पर्धेच्या युगातील आव्हाने पेलण्यासाठी सक्षम पिढी घडविण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. राज्यातील मुले इंग्रजी भाषेत मागे राहू नयेत आणि त्यांच्यातील इंग्रजी भाषेचा न्यूनगंड दूर व्हावा यासाठी इंग्रजीत सुधारणा हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. ब्रिटिश कौन्सिलसोबत सामंजस्य करार करून या कार्यक्रमांतर्गत ६७००० प्राथमिक शिक्षकांना इंग्रजीचे प्रशिक्षण देण्यात आले. माध्यमिक शाळांमधील २० हजार शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना गणित विषय कमीत कमी वेळेत कसा शिकवायचा, यासाठी अमृता विद्यापीठ आणि भारत सरकार यांनी विकसित केलेल्या एका विशेष सॉफ्टवेरचा उपयोग करण्यात येत आहे. गणित, इंग्रजी, विज्ञान या विषयात गुणवत्ता वाढविण्यासाठी वेगवेगळ्या प्रशिक्षणाच्या माध्यमातून प्रयत्न करीत आहे.

शिक्षणाच्या गुणात्मक विकासाचा भाग म्हणूनच इयत्ता १० वी आणि १२ वी च्या परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी शालेय शिक्षण विभाग, महसूल विभाग व गृहविभागाच्या समन्वयातून राज्यभर कॉपीमुक्त अभियान यशस्वीपणे राबवण्यात येत आहे.

### आंतरराष्ट्रीय सहकार्य

ब्रिटिश कौन्सिलच्या सहकार्याने काही शाळा इंग्लंडमधील शाळांसोबत ग्लोबल स्कूल पार्टनरशीप आणि कनेक्टिंग क्लासरूम या उपक्रमांतर्गत जोडण्यात आल्या आहेत.



५० हून अधिक शाळा या उपक्रमामध्ये सहभागी झाल्या आहेत. या उपक्रमांतर्गत शिक्षक व अधिकारी यांच्या भेटी तसेच जोडण्यात आलेल्या शाळांचे शैक्षणिक आदानप्रदान यांचा समावेश आहे. कनेक्टिंग क्लासरूम या उपक्रमांतर्गत निवडलेल्या राज्यातील शाळांना आंतरराष्ट्रीय शाळा पुरस्कार (इंटरनॅशनल स्कूल अॅवार्ड) करिता प्रोत्साहित करण्यात आले. यापैकी चार शाळांना आंतरराष्ट्रीय शाळा पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

केंद्र शासनाच्या मदतीने माहिती तंत्रज्ञान संबंधीचे प्रशिक्षण कार्यक्रम माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये राबवण्यात येत आहे. हा कार्यक्रम महाराष्ट्रातील ५०० शाळांमध्ये पहिल्या टप्प्यात तर २५०० शाळांमध्ये दुसऱ्या टप्प्यात सुरू करण्यात आला आहे. तसेच ५००० शाळांमध्येही २०१३-१४ मध्ये मंजुरी दिली आहे.

**शिक्षणक्षेत्रातील गैरप्रकारांवर अंकुश**

स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी व्यवस्थापनांमार्फत प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा चालविण्यात येतात. अशा शाळांची संख्या जवळपास ९२ हजार असून या शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनावरील सर्व खर्च शासनाकडून केला जातो. त्यामुळे अशा शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे टिकवून ठेवण्यासाठी विद्यार्थ्यांची संख्या वाढवून दाखविणे अथवा बोगस विद्यार्थी नोंदविणे यासारख्या घटनांना आळा घालण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली पटपडताळणीची विशेष मोहीम सर्व विभागांच्या मदतीने हाती घेण्यात आली. यातून शिक्षण क्षेत्रातील गैरप्रकारांवर अंकुश ठेवण्यास मोठी मदत झाली आहे.

राज्यात कायम विनाअनुदानित तत्त्वावर प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना मान्यता देण्यात येत होती. इंग्रजी वगळता कायम विनाअनुदानित तत्त्वावर परवानगी दिलेल्या प्राथमिक व माध्यमिक ५ हजार शाळांचा कायम शब्द वगळण्याचा निर्णय घेऊन या शाळा अनुदानावर आणण्यासाठी शाळांचे मूल्यांकन करण्यात आले. एक किलोमीटरच्या आत प्राथमिक शाळा तीन किलोमीटरच्या आत उच्च प्राथमिक शाळा आणि पाच किलोमीटरच्या आत माध्यमिक शाळा उपलब्ध करून देण्यासाठी जिऑग्राफिकल इन्फर्मेशनचा उपयोग करुन त्यानुसार ६५१, उच्च प्राथमिक १५७९ व माध्यमिक शाळा १४५ अशा एकूण २३७५ शाळांचा बृहतआराखडा मंजूर करण्यात आला. ज्या संस्था शासनाच्या कोणत्याही आर्थिक मदतीशिवाय शाळा सुरू करू इच्छित आहेत त्यांना बृहतआराखड्याबाहेर परवानगी देण्यासाठी स्वयंअर्थसाहाय्यित शाळा अधिनियम करण्यात आला. या अधिनियमांतर्गत २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरिता २४१७ शाळा सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

> विद्यार्थ्यांना अभ्यासाचे सुव्यवस्थितपणे नियोजन करता यावे. या दृष्टीने इयत्ता १० वी व १२ वीच्या सर्व विद्यार्थ्यांना परीक्षांचे वेळापत्रक वर्षाच्या सुरुवातीला देण्याचा निर्णय.

**जादा वाढीव तुकड्या**

माध्यमिक शाळांकरिता ६५०० जादा वाढीव तुकड्या मंजूर केल्या आहेत. या तुकड्यांचा लाभ सुमारे ३.५० लाख विद्यार्थ्यांना झाला. उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील वाढीव विद्यार्थीसंख्येनुसार १५५ तुकड्या मंजूर केल्या.

विविध क्षेत्रातील कंपन्या या त्यांच्या कार्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलीटी निधीतून विविध सामाजिक उपक्रम हाती घेतात. शालेय शिक्षणासंबंधी उपक्रम घेण्यासाठी प्रोत्साहन मिळावे तसेच असे उपक्रम घेणाऱ्या कंपन्यांना मार्गदर्शन विभागांतर्गत समन्वय, पूरक मदत यासाठी विशेष कक्षाची निर्मिती करण्यात आली आहे.

शिक्षणाच्या संख्यात्मक विकासामध्ये राज्याने भरीव प्रगती केली आहे. राज्यातील शालेय शिक्षणाची व्याप्ती खूप मोठी आहे. शिक्षक हा शिक्षणव्यवस्थेचा कणा आहे. भावी पिढी घडवणाऱ्या या वर्गाचे लहानमोठे प्रश्न सोडवण्यास मी प्राधान्य दिले. त्याचवेळी शिक्षण क्षेत्रातील अपप्रवृत्तींना अटकाव करण्यासाठी कठोर पावले उचलली. म्हणून मी एवढेच सांगेन जर देशाला महासत्ता करायचे असेल तर शिक्षण हे महत्त्वाचे आहे. त्यासाठी पूर्व प्राथमिकपासूनच दर्जेदार शिक्षण देणे, शिक्षणाचा दर्जा सुधारणे ही काळाजी गरज आहे आणि त्या दृष्टीनेच आम्ही राज्यातील शिक्षणाचा पाया रचला आहे.

**– काशिबाई थोरात**



## आमचे शिक्षण आमचा हक्क

- बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार याची प्रभावी अमंलबजावणी सुरू
- या कायद्याची अमंलबजावणी गतीने होण्यासाठी 'शिक्षण हक्क अभियान'
- शिक्षणाचा हक्क व लाभ याविषयी पोषक वातावरण निर्मिती. शाळा व समाज यांच्यातील स्नेहसंबंधाचे बळकटीकरण, शाळा व्यवस्थापन समितीचे सक्षमीकरण, बालस्नेही विकास आराखडा तयार करण्यासाठी शाळा व्यवस्थापन समितींना साहाय्य, प्रत्येक शाळा व्यवस्थापन समितीचे पुनर्गठन, शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्यांना प्रशिक्षण, शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळामध्ये शाळा विकास आराखडयाची निर्मिती- या बाबींची शिक्षण हक्क अभियानाच्या माध्यमातून अंमलबजावणी सुरू
- शिक्षण हक्क कायद्यानुसार वंचित व आर्थिक दुर्बल घटकांच्या बालकांना विनाअनुदानित व अनुदानित शाळांमध्ये २५ टक्के आरक्षण
- या निर्णयामुळे आर्थिक दुर्बल आणि मागासवर्गीय घटकांतील मुलामुलींना इंग्रजी शाळेत जाण्याचा आत्मविश्वास प्राप्त
- शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात शिष्यवृत्तीची रक्कम थेट जमा. अर्जाची प्रक्रिया सुलभतेने व्हावी, वेळेची बचत व्हावी, याकरिता शिष्यवृत्ती अर्ज भरण्याची प्रक्रिया ऑनलाइन
- विद्यार्थ्यांवरील तणाव कमी करण्यासाठी आणि समानीकरणाच्या हेतूने इयत्ता दहावी परीक्षेसाठी सर्वोत्तम पाच (बेस्ट फाइव्ह) हा निकष लागू

# समानसंधीचे नवे पर्व



**मोहम्मद अरिफ (नसिम) खान**
वस्त्रोद्योग, अल्पसंख्याक विकास
आणि औकाफ मंत्री

‘मागील साडेचार वर्षापासून वस्त्रोद्योग, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ विभागाच्या मंत्रिपदाचा कार्यभार माझ्याकडे आहे. या विभागामार्फत अल्पसंख्याक समूहांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळावी, त्यांची शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक प्रगती व्हावी यावर माझा कटाक्ष राहिला आहे. त्या अनुषंगाने केलेल्या उपाययोजनांमुळे अनेक अल्पसंख्याक युवक-युवतींना रोजगाराच्या संधी मिळाल्या आहेत. तसेच शिष्यवृत्तीमुळे त्यांना चांगले व्यावसायिक शिक्षण मिळू लागले आहे. याचे मला समाधान वाटते.’

सरकारी नोकऱ्या आणि शैक्षणिक संस्थांमध्ये अनारक्षित मुस्लीम समाजाला ५ टक्के आरक्षण देण्याचा मंत्रिमंडळाने नुकताच निर्णय घेतला आहे. हा अत्यंत पुरोगामी, ऐतिहासिक आणि मुस्लीम समाजाच्या हिताच्या दृष्टीने क्रांतिकारक निर्णय आहे.

देशातील मुस्लीम समाजाची सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक अवस्था बिकट झाली असल्याचे विविध सर्वेक्षणातून पुढे आले होते. केंद्र शासनाने नेमलेल्या सच्चर समिती तसेच राज्य शासनाच्या मेहमुदूर रेहमान समितीच्या अहवालातूनही या बाबी अधोरेखित झाल्या होत्या. शासकीय नोकऱ्यांमध्येही मुस्लीम समाजाचे प्रमाण अत्यल्प झाल्याचे या अहवालातून पुढे आले होते. त्या पार्श्वभूमीवर मुस्लीम समाजाचे शैक्षणिक तसेच आर्थिक सक्षमीकरण करण्यासाठी शासकीय नोकऱ्या आणि शैक्षणिक संस्थांमध्ये मुस्लीम समाजाला आरक्षण देण्याची मागणी होती. मेहमुदूर रेहमान समितीनेही याबाबत आपल्या अहवालात सकारात्मक शिफारस केली होती. शासनाने मागील काही वर्षे या मुद्यांवर सर्व कायदेशीर बाबी तपासल्या असता मुस्लीम समाजाला आरक्षण देण्याची गरज असल्याचे लक्षात आले होते. त्या पार्श्वभूमीवर मंत्रिमंडळाच्या बैठकीत अल्पसंख्याक विकास विभागाने मुस्लीम आरक्षणाचा सविस्तर



प्रस्ताव मांडला असता मंत्रिमंडळाने या निर्णयावर एकमताने शिक्कामोर्तब केले.

या निर्णयामुळे मुस्लीम समाजाचे शासकीय नोकऱ्यांमध्ये प्रमाण वाढण्याबरोबरच त्यांचे सामाजिक, आर्थिक सक्षमीकरण होईल. शैक्षणिक संस्थांमध्येही मुस्लीम विद्यार्थ्यांना आरक्षण मिळणार असल्यामुळे त्यांचा शिक्षणाकडील ओढा वाढेल आणि त्यामुळे हा समाज मूळ प्रवाहात येण्यास मोठी मदत होईल, असा मला ठाम विश्वास आहे.

अल्पसंख्याकबहुल जिल्ह्यांत १०,४७१ अल्पसंख्याक नागरिकांना इंदिरा आवास घरकुलाचा लाभ.

**बेरोजगारांना कर्ज**

मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत अल्पसंख्याक समूहांतील बेरोजगारांना व्यवसायासाठी कर्ज आणि विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी कर्ज दिले जाते. यासाठी या महामंडळाला शासनाने ५०० कोटी रुपयांचे भागभांडवल उपलब्ध करून दिले आहे. बेरोजगारांना प्रत्येकी सुमारे ४० हजार रुपयांचे कर्ज वाटप सुरू करण्यात आले आहे. बेरोजगार लाभार्थ्यांची निवड पारदर्शक अशा लॉटरी पद्धतीने करण्यात आली आहे.

**मदरशांतील मुलांसाठी योजना**

डॉ. जाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना ही शासनाची महत्त्वाकांक्षी योजना आहे. त्याद्वारे मदरशांमधील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात सहभागी करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

या योजनेतून मदरसा इमारतीचे नूतनीकरण, पाण्याची व्यवस्था, शौचालये, प्रयोगशाळा, ग्रंथालय आदींसाठी अनुदान दिले जात आहे. मदरशांमध्ये गणित, विज्ञान, समाजशास्त्र, मराठी, हिंदी, इंग्रजी आदी विषय शिकवण्यासाठी शिक्षक उपलब्ध करून दिले जात आहेत. मदरशांतील जे विद्यार्थी ९वी ते १२ दरम्यान शिक्षणासाठी प्रवेश घेतील त्यांना ४ ते ५ हजार रुपयांपर्यंत शिष्यवृत्ती दिली जाईल. मदरशांच्या आधुनिकीकरणासाठीचा निधी २१ कोटी रुपये करण्यात आला आहे. या योजनेंतर्गत यंदा ४४६ मदरशांचे प्रस्ताव प्राप्त झाले. यापैकी पात्र २६३ मदरशांना ८ कोटी ८४ लाख ४० हजार ८०९ रुपयांचे अनुदान आता वितरित केले जात आहे. इतर इच्छुक आणि पात्र मदरशांनाही भरीव अनुदान उपलब्ध करून दिले जाईल. योजनेच्या अंमलबजावणीत पारदर्शकता येण्यासाठी ही योजना ऑनलाइन करण्यात आली आहे.

**विभागाला ५०० कोटी**

शासनाने अल्पसंख्याकांच्या अर्थसंकल्पीय तरतुदीत भरीव वाढ करत हा निधी चालू आर्थिक वर्षासाठी ५०० कोटी रुपये इतका केला आहे.

**पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण**

पोलीस भरतीच्या पूर्वतयारीसाठी अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जात असून या योजनेतून गेल्या ४ वर्षात १२,३५५ विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. अशा शेकडो विद्यार्थ्यांची पोलिस दलात निवड झाली आहे. मौलाना आझाद मोफत शिकवणी व संबध्द योजनेंतर्गत दरवर्षी ४ हजार अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना आयएएस, आयपीएस, आयआरएस, उपजिल्हाधिकारी, डीवायएसपी, पीएसआय, तहसीलदार, बँकिंग, अभियांत्रिकी, वैद्यकीय, व्यवस्थापन आदी क्षेत्रातील प्रवेशासाठी मोफत प्रशिक्षण दिले जाते.

**आयोगामार्फत अल्पसंख्याकांना न्याय**

अल्पसंख्याकांच्या हितरक्षणासाठी अल्पसंख्याक आयोगाला दिवाणी न्यायालयाचे अधिकार देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे आयोगाला कोणत्याही बाबतीत पुरावा गोळा करणे, शपथेवर पुरावा घेणे, साक्षीदारांना समन्स काढून हजर राहण्यास भाग पाडणे असे अधिकार देण्यात आले आहेत.

**अल्पसंख्याकबहुल गावांमध्ये मूलभूत सोयी**

शहरांमधील अल्पसंख्याक मोहल्ले, वस्त्या आदींमध्ये रस्ते, नाले, पाणी, स्वच्छतागृहे, शादीखाना हॉल बांधणे तसेच कब्रस्तानला संरक्षक भिंत इत्यादी प्राथमिक सुविधा निर्माण करण्यासाठी १० ते २० लाख रुपयांपर्यंत अनुदानाची योजना यशस्वी झाली आहे. दरवर्षी सरासरी १६६ शहरांना या योजनेतून अनुदान वितरित केले जाते. या योजनेची व्याप्ती ग्रामीण भागापर्यंत वाढवण्यात आली असून अल्पसंख्याकबहुल ग्रामपंचायतींना पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी १० लाख रुपयांचा निधी दिला जात आहे.

**नागपुरात हज हाऊस**

विदर्भ व मध्य भारतातून हज यात्रेसाठी जाणाऱ्या मुस्लीम बांधवांसाठी नागपूर येथे हज हाऊसची उभारणी करण्यात आली आहे. औरंगाबाद येथे हज हाऊस बांधण्यात येत असून त्यासाठी निधीची तरतूद आणि जागेची उपलब्धता करण्यात आली आहे. या वास्तूच्या शेजारी उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत वंदे मातरम् सभागृह बांधले जात आहे.



## शिकतो आम्ही...

- अल्पसंख्याकबहुल शाळांमध्ये मूलभूत सुविधांच्या निर्मितीसाठी २ लाख रुपयांचा निधी. या योजनेतून मागील साडेचार वर्षात ८,१८५ शाळांना एकंदर १६० कोटी ५० लाख रुपयांचा निधी सुपुर्द. त्याद्वारे या शाळांमध्ये पिण्याचे पाणी, शौचालय, प्रयोगशाळा, संगणक खोली, ग्रंथालय अशा विविध सोयींची उपलब्धता
- मागील साडेचार वर्षात विविध प्रकारच्या ३४ लाखांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती
- अल्पसंख्याक समाजामधील तरुणांना रोजगारक्षम बनवण्यासाठी अल्पसंख्याकबहुल क्षेत्रातील ४४ आयटीआय तसेच १५ पॉलिटेक्निकमध्ये दुसऱ्या पाळीतील वर्ग सुरू. या योजनेतून तीन वर्षात ४,८६० अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शासकीय आयटीआयमध्ये तर १,९०० अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शासकीय पॉलिटेक्निकमध्ये प्रवेश
- अल्पसंख्याक मुलींचे शिक्षणातील प्रमाण वाढावे यासाठी सर्व जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी १०० प्रवेशक्षमतेची वसतिगृहे त्यानुसार १७ जिल्ह्यांमध्ये वसतिगृहांचे बांधकाम सुरू. ४ ठिकाणी बांधकाम पूर्ण
- मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत आतापर्यंत ८,७७० विद्यार्थ्यांना सुमारे ५३ कोटी १५ लाख रुपयांचे शैक्षणिक कर्ज वितरित



**हसन मुश्रीफ**
जलसंपदा मंत्री (कृष्णा खोरे- पाटबंधारे महामंडळ वगळून)

'राज्य शासनाने समन्यायी पाणी वाटपावर लक्ष केंद्रित केले आहे. सिंचन व्यवस्थेला सुव्यवस्थित ठेवण्यासाठी काटेकोर प्रयत्न केले जात आहेत. पर्यावरणाचे संरक्षण व सिंचन प्रकल्पाबाबत आपलेपणा निर्माण करणे अशा बाबींसाठी पाणीवापर संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत. स्वत:ची जलनीती आखणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. सिंचन व्यवस्था निर्माण करण्यासोबतच जलविद्युत निर्मितीवरही जलसंपदा विभागाने भर दिला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना वीज आणि पाणी मिळून त्यांच्या शेतीच्या उत्पन्नात वाढ होत आहे.'

# समन्यायी सिंचनसमृद्धी

महाराष्ट्रात सरासरी पाणी उपलब्धता १,६३,८२० घनमीटर इतकी आहे. कोकणातील पश्चिमवाहिनी नद्या वगळता इतर ४ प्रमुख नद्यांची खोरी आंतरराज्यीय करारानुसार १,२५,९३६ द.ल.घ.मी. पाणी राज्याला वापरता येते. राज्याच्या वाट्याला आलेल्या पाण्यापैकी ६९,२१० द.ल.घ.मी (५५ टक्के) पाणी कोकणातील पश्चिमवाहिनी नद्यांतून उपलब्ध होते परंतु विशिष्ट भौगोलिक परिस्थितीमुळे त्याचा पूर्ण वापर शक्य नाही. राज्यात लागवडी लायक क्षेत्र २२५ लक्ष हेक्टर आहे. जल व सिंचन आयोगाने भूपृष्ठावरील पाण्यात राज्याची अंतिम सिंचन क्षमता ८५ लक्ष हेक्टर (लागवडी लायक क्षेत्राच्या ३८ टक्के) आणि भुजलातून ४१ लक्ष हेक्टर अशी राज्यात एकूण १२६ हेक्टर (लागवडीलायक क्षेत्राच्या ५६ टक्के) अंतिम सिंचन क्षमता आहे.

### जलनियोजनाला महत्त्व

१९९६-१९९८ या काळात राज्यात जलसंपदा विभागाची ५ महामंडळे स्थापन करण्यात आली. योजनापूर्व काळात केवळ २.७४ लक्ष हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली होती. या क्षमतेत वाढ होण्यासाठी जलसंपदा विभागामार्फत सातत्याने प्रयत्न करण्यात आले. त्यामुळे जून २०१२ अखेर राज्य स्तरीय प्रकल्पांमुळे ४९.२६ लक्ष हेक्टरपर्यंत सिंचनक्षमतेत वाढ झाली आणि ३५,८३८ दलघमी पाणीसाठा निर्माण झाला.

२००२-०३ ते २०११-१२ या दहा वर्षाच्या कालावधीत ११.५७ लक्ष हेक्टर अतिरिक्त सिंचन क्षमता निर्माण करण्यात आली. २०१२-१३ मध्ये २.०० लक्ष हेक्टर सिंचन क्षमता निर्मितीचे उद्दिष्ट आहे. राज्याच्या एकूण वीजनिर्मितीपैकी सुमारे १८ टक्के निर्मिती पाण्यापासून होते.

### जलविद्युत प्रकल्पांना प्राधान्य

राज्यात ३६०५.६२५ मेगावॅट स्थापित क्षमतेत ५८ जलविद्युत प्रकल्पातून वीजनिर्मिती सुरू आहे. विजेची वाढती मागणी विचारात घेऊन लहान जलविद्युत प्रकल्प खाजगी प्रवर्तकामार्फत विकसित करण्यात येत आहे. या धोरणांतर्गत २९७.९० मेगावॅट क्षमतेच्या एकूण १०३ प्रकल्पांकरिता प्रवर्तक निश्चित करण्यात आले असून आतापर्यंत ८७.८० मेगावॅट क्षमतेचे २० प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. उर्वरित २१०.१० मेगावॅट क्षमतेचे ८३ प्रकल्प विकासाच्या विविध स्तरावर आहेत. केंद्र शासनामार्फत जलक्षेत्र व्यवस्थापनात सुधारणा करण्याच्या दृष्टीने निधी दिला जातो. २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी ९२ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे. जागतिक बँकेच्या अर्थसाहाय्याने महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्प राबवण्यात येत आहे.



### महाराष्ट्राचा गौरव

राज्याचे पाणीवापर संस्थांचे मॉडेल देशपातळीवर आदर्श असे आहे. पाणीवापर संस्थांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी या संस्थांनी जमा केलेल्या पाणीपट्टीपैकी ९३ टक्केपर्यंत रकमेचा परतावा देण्यात येतो. अशाप्रकारे परतावा देणारे महाराष्ट्र राज्य देशपातळीवरील प्रथम राज्य आहे. याची दखल योजना आयोग तसेच १३ व्या वित्त आयोगाने घेतली आहे. गोसीखुर्द प्रकल्पाला राष्ट्रीय प्रकल्पाचा दर्जा मिळवून देण्याचे काम विभागाने निर्धारपूर्वक केले आहे. ठाणे जिल्ह्यातील २५० मे.वॅट क्षमतेच्या घाटघर उदंचन जलविद्युत प्रकल्पातील धरणाचे बांधकाम भारतात प्रथमच रोलर कॉम्पेक्टेड कॉंक्रिट तंत्रज्ञानाचा वापर करून पूर्ण करण्यात आले आहे.

### आंतरराष्ट्रीय स्तरावरही कौतुक

जागतिक बँकेच्या मदतीचा योग्य विनियोग करीत महाराष्ट्र जलसुधार कार्यक्रमातून, विभागाने सतत पुढे जाण्याचा प्रयत्न चालू ठेवला आहे. राज्यात पूर्ण झालेल्या २७८ प्रकल्पांच्या धरणसुरक्षिततेच्या कामांसह २३५ प्रकल्पांवरील ६.४५ लक्ष हेक्टर लाभक्षेत्र पुन:स्थापित करण्यात येत आहे.

कोयना धरणाच्या सुमारे ९५ मीटर उंचीच्या भागाचे जे मजबुतीकरण केले आहे. त्यात तपमान नियंत्रित संधानकाचा वापर करण्यात आला आहे. हा आशिया खंडातील पहिला यशस्वी प्रयोग आहे. वाघाड पाणी वापर संघाला आंतरराष्ट्रीय वॉटरसेव्ह पुरस्कार मिळण्यामागे जलसंपदा खात्याच्या प्रयोगशील धोरणांचा मोलाचा वाटा आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेतून कालवा स्वच्छता अभियान ही संकल्पना राबवण्यात येत आहे.

### व्हिजन २०२०

राज्याने जलक्षेत्रामध्ये पुरोगामी सुधारणा अंमलात आणून त्याची प्रभावी अंमलबजावणी केली. प्रकल्पांचे बांधकाम हाती घेताना अत्याधुनिक तंत्राचा वापर करून धरणांचे मातीचे, दगडी, कॉंक्रिट असे सर्व प्रकार राज्याने हाताळले. वैशिष्टपूर्ण बोगदे, लेक टॅपिंग प्रक्रियेद्वारा विस्तारित अधिजल भुयारात सोडणे, प्रिस्ट्रेस कॉंक्रिटचा वापर, २५ मेगावॅटपेक्षा कमी क्षमतेच्या लहान जलविद्युत प्रकल्पांना तसेच अभिनव जलविद्युत प्रकल्पांना प्राधान्य इ. अभिनव योजना जलसंपदा विभागाने यशस्वीरीत्या राबवल्या आहेत.

**– शब्दांकन : वर्षा फडके**



## लेक टॅपिंग

कोयना जलविद्युत प्रकल्प टप्पा-४ अंतर्गत लेक टॅप प्रक्रियेद्वारे विस्तारित अधिजल भुयारात पाणी सोडण्याचा ऐतिहासिक क्षण मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. या लेक टॅपिंग मुळे कोयना टप्पा-४ ची वीजनिर्मिती होणार आहे. यामुळे कोयना टप्पा-४ या जलविद्युत प्रकल्पाची वीजनिर्मिती पूर्ण वर्ष अखंडित सुरू ठेवणे शक्य होईल. कोलग्राऊट बांधकामांचे तंत्रज्ञान विकसित करण्यात येऊन राज्यातील ३४ प्रकल्पांच्या बांधकामात ते वापरण्यात आले आहे.



## जलनीती

- स्वतंत्र जलनीती स्वीकारणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य
- देशातील पहिले जलसंपत्ती नियमन प्राधिकरण २००५ मध्ये महाराष्ट्रात स्थापित
- हक्कदारांमध्ये पाण्याचे समन्यायी वाटप, पाणी हक्काच्या कोट्याचे निर्धारण व पाणी वापराच्या ठोक दराची निश्चिती इ. कार्य प्राधिकरणाच्या कक्षेत येतात.
- सिंचन पद्धतीचे व्यवस्थापन अधिनियम-२००५ मध्ये पारित, सिंचन व्यवस्थापनात लाभधारकांचा सहभाग अनिवार्य
- पाणीवापर संस्थांना सिंचन व्यवस्थापन हस्तांतरित करण्याचे धोरण निश्चित
- पाण्याचे वाटप समन्यायी व शेतीला फायदेशीर होईल, असे वेळेवर आणि पारदर्शकरीत्या वितरित करणे हे अंतिम उद्दिष्ट आहे. त्यापैकी जून २०१२ अखेर सुमारे ४९.२६ लक्ष हेक्टर एवढी सिंचन क्षमता निर्माण झाली आहे.
- पाण्याचे समन्यायी वाटप व्हावे यासाठी सिंचन व्यवस्थापन पाणीवापर संस्थांकडे देण्याचा निर्णय, पाणीवापर संस्था स्थापन करणे अनिवार्य, यामुळे संबंधित लाभक्षेत्रातील लाभधारकाला सक्तीचे सभासदत्व बहाल
- पाणी वापर संस्थांच्या व्यवस्थापनामध्ये सुधारणा करण्यासाठी २००९-१० पासून महात्मा फुले पाणीवापर संस्था अभियानांतर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पाणीवापर संस्था पुरस्कार स्पर्धा सुरू. याअंतर्गत प्रत्येक वर्षी पाणीवापर संस्थांना राज्यस्तरीय तीन, तर प्रदेशनिहाय दोन पुरस्कार



**सुरेश शेट्टी**
सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण
आणि राजशिष्टाचार मंत्री

# महाराष्ट्राची वाटचाल सुदृढतेकडे

महाराष्ट्रात आरोग्य यंत्रणेचे जाळे मोठ्या प्रमाणावर विस्तारले आहे. या माध्यमातून सामान्य नागरिकाला उत्तम आरोग्य सेवा उपलब्ध करून दिली जाते. मी जेव्हा या विभागाच्या मंत्रिपदाचा कार्यभार स्वीकारला त्यावेळेस आरोग्य यंत्रणा सक्षम करण्याचे आव्हान होते. सर्वसामान्य माणसाला गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा देण्यासाठी अधिक काय करता येईल यावर मी भर दिला. वैद्यकीय सेवांबरोबरच रिक्त पदांची भरती, बदल्या आणि औषध खरेदीची प्रक्रिया ऑनलाइन करून विभागाची कार्यपद्धती गतिमान आणि पारदर्शक करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

सामान्य नागरिकाला गंभीर आजारांवर महागडे वैद्यकीय उपचार घेताना आर्थिक संकट कोसळते. ही परिस्थिती पाहून मला नेहमी वाटायचे की, अशी एखादी योजना शासनाने सुरू करावी ज्यामुळे सामान्यांना महागडे उपचार आणि शस्त्रक्रिया करणे सुलभ व्हावे. या विचारातूनच राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेचा जन्म झाला.

या योजनेविषयी मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांशी अनेक वेळा चर्चा केली. आमदारांशी बोललो. भरपूर विचारमंथन आणि बैठका घेऊन प्रायोगिक तत्त्वावर आठ जिल्ह्यात राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सुरू करण्यात आली. वर्षभरात या योजनेला मिळालेला प्रतिसाद बघून ही योजना नोव्हेंबर २०१३ मध्ये संपूर्ण राज्यभर लागू करण्यात आली. ही योजना सामान्यांसाठी जीवनदायी ठरली आहे. मी जेव्हा दौऱ्यावर जातो त्यावेळेस मला अनेक लोक भेटतात. बरे झालेल्या रुग्णाच्या चेहऱ्यावरील हास्य पाहून मला समाधान वाटते.

'देशात पथदर्शी ठरणाऱ्या अभिनव आरोग्यविषयक योजनांची सुरुवात महाराष्ट्राने केली आहे. सामान्यांना मोफत उपचार आणि शस्त्रक्रिया सहज उपलब्ध व्हाव्यात यासाठी राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना, जीवन अमृत सेवा (ब्लड ऑन कॉल), आपत्कालीन वैद्यकीय सेवा, मोफत औषधे यासारख्या योजना; सामान्य नागरिकांना दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण उपचार तातडीने मिळावेत या दृष्टीने राबवण्यात येत आहेत. या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे महाराष्ट्राची सुदृढतेकडे वाटचाल सुरू आहे.'



### जीवन अमृत सेवा योजना

रुग्णांना सुरक्षित आणि दर्जेदार रक्त पुरवठा करणारी जीवन अमृत सेवा योजना (ब्लड ऑन कॉल) आम्ही सुरू केली. १०४ क्रमांकावर संपर्क साधल्यास रुग्णाला तासाभरात मोटरसायकलवरून शीतसाखळीद्वारे रक्त उपलब्ध करून देण्यात येते. या योजनेमुळे वेळेवर रक्त उपलब्ध झाल्याने सुमारे पाच हजार रुग्णांना जीवनदान मिळाले आहे. देशातील अशा प्रकारची ही एकमेव योजना आहे.

### आपत्कालीन वैद्यकीय सेवा योजना

कोणत्याही प्रकारच्या आपत्कालीन परिस्थितीमध्ये आपद्ग्रस्तांना पहिल्या सुवर्ण तासामध्ये (Golden Hour) तातडीची वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आपत्कालीन वैद्यकीय सेवा योजना १ मार्च २०१४ पासून राज्यात लागू करण्यात आली आहे. योजनेंतर्गत ९३७ सुसज्ज रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात आल्या असून या प्रत्येक रुग्णवाहिकेत डॉक्टर उपलब्ध आहे. १०८ क्रमांकावर संपर्क साधल्यावर बेसिक लाइफ सपोर्ट आणि ॲडव्हान्स लाइफ सपोर्ट सिस्टिम असलेल्या अत्याधुनिक रुग्णवाहिका आपदग्रस्तांच्या वैद्यकीय उपचारासाठी दाखल होत आहेत.

> राजीव गांधी जीवनदायी योजनेमार्फत आतापर्यंत २ लाख ५० हजार रुग्णांवर मोफत उपचार आणि शस्त्रक्रिया

### रुग्णांना मोफत औषधे

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासकीय इस्पितळांमध्ये आणि वैद्यकीय केंद्रामध्ये सर्व रुग्णांना औषधे मोफत दिली जातात. आमच्या सर्व रुग्णालयांना औषध चिठ्ठी (prescription) मुक्त करण्यात आलेले आहे.

### रुग्णालयात मोफत ने-आण

आरोग्य विभागाच्या विशेष प्रयत्नांमुळे बालमृत्यू आणि मातामृत्यूच्या प्रमाणात लक्षणीय घट झाली आहे. मला याचे समाधान आहे की, २००६ मध्ये असलेले बालमृत्यूचे प्रमाण ३५ वरून (प्रति १००० जन्म) २०१२ मध्ये २५ वर आणण्यात यश आले. २००६ मध्ये असलेले मातामृत्यूचे एका लाखामागे असलेले १३० एवढे प्रमाण २०१२ मध्ये ८७ (प्रति १ लक्ष जन्म) वर आणण्यात आले.

### जननी शिशू सुरक्षा योजना

जननी शिशू सुरक्षा योजनेंतर्गत राज्यातील गरोदर महिला आणि नवजात शिशूंना शासकीय रुग्णालयात मोफत उपचार करण्यात येत आहेत. या योजनेमुळे रुग्णालयात होणाऱ्या बाळंतपणाच्या संख्येत वाढ झाली आहे. परिणामी मातामृत्यू आणि बालमृत्यू रोखण्यात आमचा विभाग यशस्वी ठरला आहे.

### इमेजिंग सेंटर्स

जिल्हा सामान्य रुग्णालयांमध्ये इमेजिंग सेंटर्सचे आधुनिकीकरण सुरू आहे. या सुविधेमुळे सीटी स्कॅन, एमआरआय, सोनोग्राफी, एक्सरे या सेवा राज्यातील ३५ रुग्णालयांमध्ये उपलब्ध होणार आहेत. यामुळे जनतेस खाजगी सोनोग्राफी केंद्रांकडे या सुविधांसाठी धाव घ्यावी लागणार नाही.

० ते १८ वर्षातील बालकांना दुर्धर रोग, अपंगत्व, कमतरता या संदर्भात तपासणीची सुविधा उपलब्ध झाली आहे.

अतिदुर्धर रोगाने पीडित रुग्णांसाठी आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. अशा ज्या रुग्णांना रुग्णालयांपर्यंत जाणे शक्य होत नाही त्यांच्याकडे प्रशिक्षित नर्सेस जाऊन उपचार करणार आहेत.

शालेय विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी कार्यक्रम शालेय शिक्षण विभागाच्या समन्वयाने सुरू करण्यात आला आहे.

### सल्ला केंद्र

रुग्णास चांगल्याप्रकारे व वेळीच योग्य रुग्णसेवा देणे शक्य व्हावे या दृष्टिकोनातून पूर्णवेळ (२४ X ७) मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यासाठी पुणे येथे सल्ला केंद्र सुरू केले आहे. या केंद्राशी दूरध्वनी क्रमांक १०४ वर कोणत्याही दूरध्वनी किंवा भ्रमणध्वनीद्वारे संपर्क साधल्यास आरोग्य कार्यक्रम, वैद्यकीय सल्ला तसेच तज्ज्ञांचे मार्गदर्शन व सल्ला आदी माहिती २४ तास उपलब्ध आहे.

### आरोग्यसंस्थांचे भक्कम जाळे

राज्यात १२,९१७ विविध शासकीय आरोग्य संस्थांचे भक्कम जाळे निर्माण करण्यात आले आहे. जनतेच्या वाढत्या अपेक्षा लक्षात घेऊन आरोग्यसंस्थांच्या बृहतआराखड्याला या वर्षी मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार नव्याने १ हजार २५७ विविध आरोग्यसंस्था स्थापन करण्याबरोबरच पदनिर्मिती करून आरोग्यसंस्थांचे जाळे अधिक घट्ट करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

मानवी अवयव प्रत्यारोपण अधिनियम १९९४ ची प्रभावी अमंलबजावणी आणि दान केलेले अवयव गरजू रुग्णांना त्वरित उपलब्ध होण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले आहेत. इच्छुक दात्यांना अवयव दान करण्यासंदर्भात अवयव दानाबाबतची प्रक्रिया सुलभ करण्याबाबत निर्णय घेतला आहे.

सामान्य नागरिकाला विविध टप्प्यांवर स्वस्त आणि दर्जेदार आरोग्य सेवा मिळावी या व्यापक हेतूने विविध कल्याणकारी निर्णय घेण्यात आले आहेत. दूरदृष्टीने घेतलेल्या या निर्णयांमुळे राज्यातील सामान्य जनतेला फायदा मिळाला तसेच आरोग्य सेवेच्या बाबतीत राज्याचे नाव देशात अग्रेसर होण्यास मदतच झाली आहे.

**- शब्दांकन : अजय जाधव**



## फुलू द्या कळीला

- स्त्री भ्रूणहत्येच्या प्रकारांना आळा बसावा यासाठी गर्भधारणा व प्रसूतीपूर्व गर्भलिंग निदान तंत्र (नियमन आणि गैरवापरास प्रतिबंध) कायद्याची प्रभावी अंमलबजावणी
- या मोहिमेंतर्गत सोनोग्राफी आणि गर्भपात केंद्रांची तपासणीची धडक मोहीम
- आतापर्यंत ४०० प्रकरणे न्यायालयात दाखल, एकूण ३३ डॉक्टरांना शिक्षा, ४९ व्यक्तींना अटक
- सोनोग्राफी यंत्र उत्पादक आणि वितरकांना त्यांची सोनोग्राफी यंत्रे सक्षम प्राधिकाऱ्याकडे नोंदणी करण्याचे बंधनकारक
- स्त्री भ्रूणहत्येसंदर्भात माहिती देण्याऱ्यास त्या घटनेची सत्यता स्पष्ट झाल्यानंतर २५,००० रुपये बक्षीस देण्याची शासनाची घोषणा
- या प्रयत्नांमुळे २०११ मध्ये असलेला दर हजार पुरुषांमागे ८६१ स्त्रिया हे प्रमाण वाढून २०१२ मध्ये ८९४ झाले
- स्त्री-भ्रूणहत्येस आळा बसण्यासाठी जनजागृती करणारे अधिकारी, सरकारी वकील, स्वयंसेवी संस्था, डॉक्टर्स आणि माध्यम प्रतिनिधींना या वर्षापासून पुरस्काराने सन्मानित करण्याचा निर्णय
- नागरिकांना तक्रारी नोंदविण्यासाठी १८००२३३४४७५ हा टोल - फ्री क्रमांक आणि www.amchimulgi.gov.in हे संकेतस्थळ उपलब्ध



**डॉ. नितीन राऊत**
रोजगार हमी योजना
आणि जलसंधारण मंत्री

राज्यात गेल्या साडेचार वर्षांत जलसंधारण आणि रोजगार हमी मंत्रालयाने केलेल्या प्रभावी कामगिरीमुळे सामान्य जनतेला मोठा दिलासा मिळाला आहे. जलसंधारणाच्या कामांना गती देण्यात आल्याने महाराष्ट्राचा दुष्काळी भाग जलक्रांतीचा अनुभव घेत आहे. पाण्याचा साठा निर्माण झाल्याने राज्य टँकरमुक्तीकडे वाटचाल करीत आहे. रोहयोच्या माध्यमातून वर्षभर गरिबांना रोजगार उपलब्ध करून दिल्याने त्यांना आत्मसन्मानाने जगण्याची संधी निर्माण झाल्यामुळे मला मोठे समाधान वाटते.

# जलक्रांतीतून टँकरमुक्ती

मागच्या काही वर्षात राज्याला दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट अशा नानाविध नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागले. राज्यातील काही भाग कमी पर्जन्यछायेत असल्यामुळे कायम दुष्काळीच असतो. पाणी टंचाई ही त्या भागातील गावांची प्रमुख समस्या आहे. जलसंधारण व रोजगार हमी योजना मंत्री म्हणून या दुष्काळी भागातील लोकांच्या समस्या मला सोडविता आल्या.

जलसंधारणाच्या विविध योजनांमुळे शेतीसाठी संरक्षित जलसिंचनाची साधने निर्माण करणे शक्य झाले आहे. तसेच जमिनीची प्रचंड प्रमाणात होणारी धूप थांबवणे आणि पडीक जमीनीचा विकास करून ग्रामीण भागात उत्पन्नाची साधने वाढवणे हे उद्दिष्ट आहे. या योजनांमागे शेतीसाठी संरक्षित जलसिंचनाची साधने निर्माण करण्यासाठी जमिनीची प्रंचड प्रमाणात होणारी धूप थांबविण्यासाठी पडीक जमिनीचा विकास करून ग्रामीण भागातील उत्पन्नाची व उत्पादनाची साधने वाढविण्यासाठी राज्यात जलसंधारणाचा कार्यक्रम विविध योजनांद्वारे राबविण्यात येत आहे. २०१३ मध्ये मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे जिल्ह्यातील पुरंदर, सातारा जिल्ह्यातील माण, खटाव, सोलापूर जिल्हयातील सांगोला, मंगळवेढा, अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर, संगमनेर, सांगली जिल्ह्यातील जत, कवठेमहांकाळ, खानापूर, कडेगांव, मिरज, तासगांव, आटपाडी आणि उस्मानाबाद जिल्ह्यातील भूम या १५ दुष्काळी तालुक्यात १४४ कोटी रुपये खर्च करून १४८७ सिमेंट नालाबांध बांधण्यात आले. या सिमेंट नालाबांधांमध्ये २२६४४ स.घ.मी. एकूण पाणी साठा झाला असून १०३०३ हेक्टर एवढी संरक्षित सिंचन क्षमता निर्माण झाली. या योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात १२७६ व तिसऱ्या टप्पात ५४५ सिमेंट नालाबांध बांधून पूर्ण झाले आहेत. याशिवाय मुख्यमंत्री साहाय्यता निधीतून ३७१, विदर्भ सिंचन विकास कार्यक्रमांतर्गत ४७१ आणि राष्ट्रीय कृषी विकास योजनेमधून सन २०११-१२ पासून ९०५ तर इतर योजनांमधून ४९ असे एकूण ५१११ सिमेंट नालाबांध बांधण्यात आले आहेत. या बंधाऱ्यामुळे एकूण ३५,७७० हेक्टर संरक्षित सिंचन क्षमता



निर्माण झाली असून राज्याला दुष्काळमुक्त करणारी अशी क्रांतिकारी योजना आहे. या योजनेच्या यशामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आणि राज्याची टँकरमुक्तीकडे वाटचाल सुरू झाली याचे मला समाधान वाटते.

जलसंधारण विभागाकडे २५० हेक्टरपर्यंतच्या सिंचन क्षमतेचे २७२ लघुसिंचन प्रकल्प पूर्ण झाले आहेत. त्यातून १०,३६६ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली आहे.

**विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम**

विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रमासाठी ३२५० कोटी रुपये इतकी तरतूद करण्यात आली असून त्याद्वारे विदर्भातील ८ कापूस उत्पादक जिल्ह्यात जलसंधारणाच्या विविध योजना राबवण्यात आल्या आहेत. पिकांची गुणवत्ता वाढविणे व शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीत बदल घडवून आणणे यासाठी राजीव गांधी सिंचन व कृषी कार्यक्रम, एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम, जल व भूमी संधारण अभियान राबवण्यात येत आहेत.

**सामाजिक वनीकरण**

निसर्गाचा समतोल राखून प्रदूषणाला आळा घालण्यासाठी राज्याने सामाजिक वनीकरणाला प्राधान्य दिले. या कार्यक्रमामुळे ३ टक्के वनेतर क्षेत्रात वृक्षलागवडीचा कार्यक्रम पूर्ण करण्यात आला. सामाजिक वनीकरण विभागामार्फत राज्यात बायो-डायव्हर्सिटी पार्क तयार करण्याचे नियोजन असून उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा याबाबतचा प्रस्ताव मंजुरीच्या प्रक्रियेत आहे.

सामाजिक वनीकरणाचे महत्त्व जाणून या योजनेत उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्थां व व्यक्तींना देण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कारांच्या रक्कमेत दुपटीने वाढ करण्यात आली आहे. राज्यात ८८१९ इको क्लबची स्थापना करण्यात आली आहे. ही मोठी उपलब्धी असून पर्यावरण रक्षणाच्या कार्यक्रमाला यामुळे चालना मिळाली आहे.

**पारदर्शक कृतिशीलता**

गोरगरिबांच्या हाताला काम देणारा रोजगार हमी योजना विभाग पारदर्शक करणार, अशी केवळ घोषणाच न करता प्रत्यक्षात कृती करण्यावर मी भर दिला. या योजनेमुळे ग्रामीण भागातील गोरगरीब जनतेच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीत मोठे परिवर्तन झाले आहे.



**वर्षभर कामाची हमी**

रोजगार हमी योजनेंतर्गत शासनाने ३६५ दिवस म्हणजे वर्षभर कामाची हमी दिली आहे. राज्यावर ज्या वेळेस दुष्काळाचे संकट आले त्या वेळेस लोकांना काम देऊन त्यांचे संसार वाचविण्यात रोजगार हमी योजना अत्यंत उपयुक्त ठरली आहे. नरेगामुळे राज्याच्या विविध भागात सकारात्मक बदल घडले आहेत. गोरगरिबांचे सामाजिक जीवन, आर्थिक स्थैर्य, आरोग्य, निश्चितच उंचावले आहे. मेळघाट सारख्या भागातील स्थलांतर रोखण्यात आपण यशस्वी झालो आहोत याचे मला समाधान वाटते.

> भविष्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी या योजनेअंतर्गत ३००० कोटी रूपयांची कामे एका वर्षात करण्याचा मानस. त्यामुळे लाखो लोकांना त्याचा लाभ मिळेल.

**सामाजिक अंकेक्षण**

या योजनेत पारदर्शकता आणण्यासाठी रोजगार हमीवरील मजुरांची नोंदणी आणि जॉब कार्ड, त्यांना दिले जाणारे वेतन हे बँक अथवा पोस्टाद्वारे देणे, साप्ताहिक वेतन देणे, मशिनरी व कॉन्ट्रक्टरला बंदी, हजेरी पटांची पडताळणी आणि सामाजिक अंकेक्षण या बाबी विभागाने सुरू केल्या. सामाजिक अंकेक्षणाची प्रक्रिया गतिमान करण्यासाठी स्वतंत्र सामाजिक अंकेक्षण संचालनालय स्थापन करण्यात येत आहे. त्यानुसार पदांवर योग्य व्यक्तींची निवड, कार्यालय स्थापन करणे याबाबत कार्यवाही सुरू आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीसाठी नागपूर येथे स्वतंत्र आयुक्तालय उभारण्यात आले आहे.

**– शब्दांकन– सुधा महाजन**

## हमी आत्मसन्मानाची

- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेवर २०१२-१३ या वर्षात २,१८७ कोटी रूपये इतका खर्च. २०१३-१४ या वर्षात आतापर्यंत १,२७,०२४ लाख रुपये इतका खर्च
- विविध भागांचा भौगोलिक, सामाजिक विचार करुन नवीन कामांचा समावेश-कृषी संदर्भातील कामे-नाडेप कंपोस्टिंग, गांडूळखत, जैविक खत निर्मिती, सार्वजनिक जमिनीवर मत्स्यव्यवसाय, मासे सुकवण्यासाठी क्षेत्र आणि बेल्ट व्हेजिटेशन.
- ग्रामीण भागात पायाभूत सोयीसुविधांची निर्मिती
- या योजनेंतर्गत आतापर्यंत जवळपास ७२ लाख कुटुंबांना जॉबकार्ड वितरित
- २०१३-१४ मध्ये २५ लाख १५ हजार २६९ इतक्या जॉबकार्डचे नूतनीकरण
- अंदाजे १२ लाख कुटुबांतील २१ लाख व्यक्तींना मिळाला रोजगार
- या योजनेद्वारे १८ वर्षावरील प्रौढ व्यक्तींना वर्षभर अकुशल रोजगाराची हमी
- कामाच्या व्याप्तीत पूर्वीच्या ३४५ कोटी (२०१०-२०१२) वरून २५०० कोटीपर्यंत वाढ
- या योजनेच्या सामाजिक सर्वेक्षणासही प्रारंभ.

# क्रीडासंस्कृतीला जोमदार चालना



**पद्माकर वळवी**
क्रीडा व युवक कल्याण मंत्री

'राज्यात क्रीडासंस्कृतीची जोपासना व संवर्धन करण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. त्या अनुषंगाने सुविधा निर्माण केल्या जात आहेत. दर्जेदार खेळाडूंना परदेशी मार्गदर्शकांची सेवा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. खेळाडूंना अर्थसाहाय्य केले जात आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विजेते खेळाडू घडविणे यासाठी राज्यक्रीडा विकास निधीची स्थापना करण्यात आली आहे. या सर्व प्रयत्नांमुळे महाराष्ट्राने क्रीडा क्षेत्रात आघाडी घेतली आहे.'

क्रीडा धोरण जाहीर करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. खेळाडू हा केंद्रबिंदू मानून सन १९९६ मध्ये सर्वप्रथम क्रीडा धोरण तयार करण्यात आले. या क्रीडा धोरणाची फलश्रुती व क्रीडा विकासाची दिशा लक्षात घेऊन राज्याचे नवीन क्रीडा धोरण २०१२ साली जाहीर करण्यात आले. क्रीडा- संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करणे हे मुख्य ध्येय या धोरणात समाविष्ट करण्यात आले आहे.

**गाव तेथे क्रीडागंण व व्यायामशाळा**

क्रीडासंस्कृतीची जोपासना व संवर्धन करण्यासाठी गाव तेथे क्रीडांगण व व्यायामशाळा, क्रीडापीठ व क्रीडा प्रबोधिनी संकल्पनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे. त्यासाठी राज्य क्रीडा विकास निधीची स्थापना केली जाईल. क्रीडा विकासासाठी विभागीय, जिल्हा व तालुका पातळीवर क्रीडा संकुल उभारून तेथे क्रीडा सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. गाव पातळीवर खेळाच्या किमान सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. उदयोन्मुख व प्रतिभावान खेळाडू घडविणे, बालवयातच खेळाची आवड निर्माण करणे तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू निर्माण करणे हे क्रीडा धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. क्रीडा सुविधांबरोबरच अद्ययावत तंत्रज्ञानारूप प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यात येईल.

**राष्ट्रीय दर्जाच्या पायाभूत क्रीडासुविधा**

खेळाडुंकरिता ग्रामीण व नागरी भागात राज्य/राष्ट्रीय दर्जाच्या पायाभूत क्रीडा सुविधा निर्माण करण्यासाठी विभागीय, जिल्हा व तालुका क्रीडासंकुलांची स्थापना करण्यात येत आहे. यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

**गुणवंत खेळाडूंना शासकीय सेवेत आरक्षण**

गुणवंत खेळाडूंना शासकीय व निमशासकीय सेवेत आरक्षण देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. तसेच गट अ गट ब या सेवेत खेळाडूंना थेट नियुक्ती देण्यात येणार आहे. या निर्णयानुसार कित्येक खेळाडूंना शासकीय नोकरी देण्यात आली आहे. १० व १२ वी तील अनुत्तीर्ण खेळाडूंना त्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी २५ विशेष गुण देण्यात येतील. त्याचा फायदा अनेक अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना झाला आहे. शासनाने खेळाडूंची शिष्यवृत्ती,



वयोवृद्ध खेळाडू आणि महाराष्ट्र केसरी योजनेच्या मानधनात वाढ करण्यात आली आहे.

**क्रीडासंकुल**

क्रीडा विभागामार्फत क्रीडासंकुल बांधली जात आहेत. बांधकाम सुरू असलेल्या तालुका/जिल्हा/विभागीय क्रीडा संकुलाची कामे कालमर्यादेत पूर्ण केली जातील.

राज्यात क्रीडा व खेळांच्या विकासासाठी कार्यरत असलेल्या जिल्हा, राज्य संघटना, संस्था, मंडळे तसेच इतर कार्यक्रमाबरोबर क्रीडा विकासाचे कार्य करणाऱ्या संस्थांना क्रीडा परिषदेच्या निधीतून आर्थिक साहाय्य दिले जाते.

**खेळाडूंना मार्गदर्शन**

आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू तयार करण्यासाठी साहाय्यक अनुदान उपलब्ध करून देण्यात येत आहे. खेळाडुंच्या कामगिरीत वाढ करण्यासाठी अत्याधुनिक साहित्य उपलब्ध करून दिले जात आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मार्गदर्शकाकडून मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यासाठी सर्वतोपरी मदत करण्यात येत आहे. त्यानुसार ५ लक्ष मर्यादेत अर्थसाहाय्य देण्यात येते.

राज्य शासनाने उपलब्ध करून दिलेल्या सुविधांचा जिल्ह्यातील खेळाडुंना फायदा होत आहे. त्यांना मार्गदर्शन व प्रशिक्षणाठी १५३ क्रीडा मार्गदर्शकांची पदे मंजूर करण्यात आली आहेत.

**क्रीडाप्रबोधिनी**

राज्यात आंतरराष्ट्रीय कीर्तीचे खेळाडू तयार व्हावेत यासाठी खेळ, परंपरा, उपलब्ध क्रीडा सुविधा व अंत:सामर्थ्य यांचा सारासार विचार करून पुणे, कोल्हापूर, नाशिक, ठाणे, अमरावती, नागपूर, गडचिरोली, अकोला, औरंगाबाद, प्रवरानगर (जि.अहमदनगर) व सांगली अशा ११ ठिकाणी क्रीडाप्रबोधिनी उभारण्यात आली आहे. या प्रबोधिनीवर देखरेख ठेवणारी तसेच उच्चतम दर्जाचे क्रीडा प्रशिक्षण देणारी मध्यवर्ती क्रीडा संस्था शिवछत्रपती क्रीडानगरी बालेवाडी, पुणे येथे कार्यरत आहे. उपजत क्रीडागुण असलेल्या राज्यातील ८ ते १४ वर्षे वयोगटातील मुलामुलींची भारतीय क्रीडा प्राधिकरणाने अनेक वर्षाच्या संशोधनानंतर तयार केलेल्या निवड चाचण्याद्वारे निवड (बॅटरी ऑफ टेस्ट) करण्यात येते. अशा खेळाडूंना संबंधित खेळाचे विशेष प्रशिक्षण व शालेय शिक्षणाची सुविधा शासनाच्या संपूर्ण खर्चाने उपलब्ध करून देण्यात येते.

**पुरस्कार**

क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती तसेच खेळाडू यांचा यथोचित गौरव करण्यासाठी शासनातर्फे खालील क्रीडा पुरस्कार दिले जातात. शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्कार ■ क्रीडा मार्गदर्शकासाठी उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार ■ शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू, संघटक, कायकर्ते) ■ राज्य साहसी क्रीडा पुरस्कार ■ एकलव्य क्रीडा पुरस्कार ■ महिला संघटक / कायकर्ते यांस जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार ■ जिल्हा क्रीडा पुरस्कार

राज्यामध्ये पंचायत युवा, क्रीडा व खेळ अभियान या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांची अंमलबजावणी. या अभियानाद्वारे ग्रामीण भागात क्रीडा विषयक उपक्रमांना चालना. खेळाच्या किमान सुविधा विकसित करण्याला प्राधान्य.

**युवकांच्या विकासासाठी**

राज्यातील सामाजिक परिस्थिती, भौगोलिक वैविध्य तसेच स्थानिक स्तरावर उपलब्ध व विकसित होऊ शकणाऱ्या संधी व शाश्वत विकास लक्षात घेऊन शासनाने युवा धोरण तयार केले आहे. या धोरणानुसार प्रामुख्याने युवा प्रशिक्षण केंद्रांची स्थापना करण्यात येईल. जिल्हा व राज्यस्तरावर युवा पुरस्कार दिले जातील. युवा वसतीगृहे उभारली जातील. युवा आदान-प्रदान कार्यक्रम राबवला जाईल. सुविधा केंद्र उभारणी केली जाईल. अशा अनेक हितावह योजना राबवण्यात येणार आहेत. या योजनांचा लाभ युवकांना होऊन त्यांच्या चौफेर प्रगतीला साहाय्य होईल, याची मला खात्री आहे.

राज्यशासन व भारतीय ॲथेलॅटिक्स महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने ३ ते ७ जुलै, २०१३ या कालावधीत २० व्या एशियन अजिंक्यपद मैदान स्पर्धांचे आयोजन शिवछत्रपती क्रीडासंकुल, म्हाळुंगे-बालेवाडी, पुणे येथे करण्यात आले. या स्पर्धेत आशिया खंडातील ४३ देशांच्या खेळाडूंनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेत भारताच्या खेळाडूंनी १७ पदके प्राप्त केली. आजतागायत झालेल्या आशिया स्पर्धेत यावेळी भारताची कामगिरी उंचावली आहे. महाराष्ट्र शासनाने अल्पकालावधीमध्ये २० व्या एशियन अजिंक्यपद स्पर्धांचे यशस्वी आयोजन केले आहे. त्यामुळे महाराष्ट्राचे तसेच भारताचे नाव क्रीडाजगतात जागतिक स्तरावर उंचावले आहे.

**- शब्दांकन : राहुल भालेराव**



## सारे काही खेळाडूंसाठी

- अमरावती, नागपूर, गडचिरोली, पुणे, कोल्हापूर, नाशिक, ठाणे, अकोला, औरंगाबाद, प्रवरानगर (जि.अहमदनगर) व सांगली या ११ ठिकाणी क्रीडा प्रबोधिनी
- या प्रबोधिनीवर देखरेख ठेवणारी तसेच उच्च दर्जाचे क्रीडा प्रशिक्षण देणारी मध्यवर्ती क्रीडा संस्था शिवछत्रपती क्रीडानगरी बालेवाडी, पुणे येथे कार्यरत
- दर्जेदार राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विजेते खेळाडू घडवण्यासाठी राज्यक्रीडा विकास निधी
- खेळाडूंसाठी नागरी व ग्रामीण भागात राष्ट्रीय दर्जाच्या पायाभूत क्रीडा सुविधा.
- विभागीय, जिल्हा व तालुका क्रीडासंकुलांची उभारणी
- खेळाडूंच्या मार्गदर्शन व प्रशिक्षणासाठी १५३ क्रीडा मार्गदर्शकांची पदे मंजूर
- आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मार्गदर्शकांकडून खेळाडूंना मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यासाठी सर्वतोपरी साहाय्य
- गुणवंत खेळाडूंना शासकीय व निमशासकीय सेवेत आरक्षण.
- वयोवृद्ध खेळाडू आणि महाराष्ट्र केसरी योजनेच्या मानधनात वाढ
- खेळाडूंच्या शिष्यवृत्तीत वाढ
- क्रीडा व खेळांच्या विकासासाठी कार्यरत जिल्हा, राज्य संघटना, संस्था, मंडळे तसेच इतर कार्यक्रमाबरोबर क्रीडा विकासाचे कार्य करणाऱ्या संस्थांना क्रीडा परिषदेच्या निधीतून आर्थिक साहाय्य

# महिलांना नवे सामर्थ्य



**प्रा. वर्षा गायकवाड**
महिला व बालविकास मंत्री

'मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री म्हणून माझा समावेश झाला आणि खाते मिळाले ते महिला व बालविकास. या विभागात काम करण्याची संधी मिळणे हे एक आव्हान होते, ते मी समर्थपणे पेलले आहे. समाजातील महिला व बालके यांच्यासाठी काम करण्याची संधी मिळाल्याने गेल्या चार वर्षात या विभागात मी मूलगामी निर्णय घेतले. तिसऱ्या महिला धोरणाला सद्य:स्थितीनुसार आकार देण्याचा प्रयत्न करून हे धोरण महिलांसाठी कसे अधिकाधिक उपयुक्त ठरेल यावर लक्ष केंद्रित केले. सुकन्या योजना आणि मनोधैर्य योजना या दोन्ही योजना राज्यातील महिलांना नवे सामर्थ्य मिळवून देण्यासाठी निश्चित उपयुक्त ठरतील, याची मला खात्री वाटते.'

आज महिला विविध क्षेत्रात आपली बुद्धी आणि कर्तृत्वाने नावारूपास आल्या आहेत तरीही एक दुखरी बाजू आहे ती म्हणजे स्त्री-पुरुष भेदभावाची. गरीब आणि अशिक्षित महिलांची स्थिती आणखीनच दयनीय आहे. हे चित्र बदलण्यासाठी गरोदरपणात तिला आरोग्य सुविधा, चांगला आहार मिळावा, बालविवाहांना प्रतिबंध घालावा, त्यांना शिक्षणाची संधी मिळावी, हक्काचा रोजगार आणि स्वयंरोजगार मिळावा म्हणून आम्ही नवे महिला धोरण आणले. राज्याचे हे तिसरे महिला धोरण होय.

धोरण परिपूर्ण व्हावे म्हणून आम्ही अनेक तज्ज्ञांची मते जाणून घेतली. विधानमंडळाचे सदस्य, स्वयंसेवी संघटनाचे प्रतिनिधी, वकील, डॉक्टर्स, प्राध्यापक, तृतीयपंथीयाचे प्रतिनिधी, वरिष्ठ शासकीय अधिकारी आणि जनता यांच्या सूचना विचारात घेतल्या. या धोरणाची सकारात्मक फलश्रुती आपल्याला पुढील काळात जाणवेल.

**नवे बालधोरण**

आमचे नवे बालधोरणसुद्धा अतिशय महत्त्वपूर्ण आहे. राज्याचे हे दुसरे बालधोरण आहे. बालकांचा विकास हे मध्यवर्ती सूत्र या धोरणात अंतर्भूत आहे. या धोरणाची अंमलबजावणी सुरु झाली आहे. कोणतेही बालक आता जीवन, आरोग्य, संगोपन, पोषण, विकास, शिक्षण, संरक्षण, यापासून वंचित राहणार नाही याची काळजी धोरणात घेतली आहे. स्वच्छ पर्यावरण, मनोरंजन, भयमुक्त वातावरण, पुनर्वसन आणि सहभाग हे निर्विवादपणे प्रत्येक बालकाचे अधिकार आहेत. या धोरणाचे चांगले परिणामही नजीकच्या काळात दिसतील.

**मनोधैर्य योजना**

बलात्कार, ॲसिड हल्ला आणि लैंगिक अत्याचाराच्या घटनांमध्ये पीडितांचे दु:ख हलके करणे महत्त्वाचे असते. अशा पीडितांचे तातडीने पुनर्वसन करणे महत्त्वाचे आहे. यासाठी मनोधैर्य योजना आम्ही सुरू केली. या योजनेंतर्गत पीडितांना ३ लाखापर्यंतचे आर्थिक साहाय्य दिले जाते. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा पुनर्वसन मंडळाची स्थापना केली आहे. पीडितांना तातडीने वैद्यकीय, कायदेविषयक मदत व समुपदेशन देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे.

**महिला लोकशाही दिन**

मला अतिशय आनंद होत आहे की, महिलांसाठी आम्ही तालुका, जिल्हा, विभाग आणि राज्यस्तरावर महिला लोकशाही दिन आयोजित करीत आहोत. महिलांच्या समस्यांना एक स्वतंत्र हक्काचे व्यासपीठ मिळावे असा उद्देश महिला लोकशाही दिनाच्या आयोजनाचा आहे. महिला आपल्या तक्रारी, गाऱ्हाणे तहसीलदार, जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त ते थेट मंत्री यांच्यापुढे मांडू शकतात. मी स्वत: या महिला दिनास उपस्थित राहून वरिष्ठ अधिकारी, पोलीस अधिकारी यांच्यासमवेत महिलांच्या समस्या जाणून त्या सोडविण्याचा प्रयत्न करीत आहे.



शरीरविक्रयात अडकलेल्या महिलांची मदत, पुनर्वसन, सुरक्षितता आणि हस्तांतरणासाठी माझ्या विभागाने पश्चिम बंगालच्या शासनाबरोबर सामंजस्य करार केला. त्यामुळे या पीडितांना मोठा दिलासा मिळेल.

**अनाथ बालकांचे पुनर्वसन**

१८ वर्षानंतर अनाथ बालके बालगृहातून बाहेर पडतात. पण त्यांच्याकडे कोणत्याही प्रकारचे पुरावे नसतात. त्यांची अस्तित्वाची खरी लढाई त्यानंतर सुरू होते. यासाठी त्यांना अनाथ प्रमाणपत्र देणे तसेच १८ वर्षानंतर खाजगी कंपन्यामार्फत त्यांना प्रशिक्षण देऊन तेथेच त्याना सामावले जावे, त्यांचे पुनर्वसन व्हावे व आयुष्याला स्थैर्य प्राप्त व्हावे यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील स्वावलंबन योजना आम्ही सुरू केली.

**कुपोषणमुक्तीच्या दिशेने**

कुपोषणापासून कायमची मुक्ती मिळावी यासाठी आम्ही कसोशीने प्रयत्न करीत आहोत. या प्रयत्नांचे फळ म्हणून राज्यातील १७ टक्के बालकांच्या बुटकेपणाचे व ७ टक्के कमी वजनांच्या बालकांचे कुपोषण कमी करण्यात आम्ही यशस्वी झालो आहोत. शासनाने त्रयस्थ संस्थेकडे कुपोषणाच्या प्रयत्नांचे सर्वेक्षण केले त्यात ही तथ्ये समोर आली. शासनाच्या या प्रयत्नांचे अगदी कॅग, लॅन्सेट (Lancet) सारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांनी कौतुक केले.

कुपोषण संपुष्टात यावे यासाठी आम्ही राजमाता जिजाऊ आरोग्य व पोषण अभियानामार्फत आम्ही विशेष प्रयत्न करत आहोत. साधारणपणे बाळाच्या जन्मापासून ते २ वर्षांपर्यंत त्याचे पोषण कसे होते यावर कुपोषणाचा संबंध असतो. हे गृहीत धरून आम्ही कुपोषणाविरुद्ध तिसरे अभियान २०१३-१४ सुरू केले.

**पाळणाघर योजना**

आदिवासीबहुल सहा जिल्ह्यातील महिलांसाठी आम्ही पाळणाघर योजना आणली आहे. ठाणे, नाशिक, नंदुरबार, अमरावती , गडचिरोली आणि चंद्रपुर जिल्ह्यात ही योजना सुरू असून प्रत्येक जिल्ह्यात १०० अशी ६०० पाळणाघरे सुरू केली आहेत. त्यामुळे काम करणाऱ्या आदिवासी भगिनींना दिलासा मिळाला आहे.

मुलींच्या सबलीकरणासाठी असलेल्या केंद्र शासनाच्या वेगवेगळ्या योजना परिणामकारकरीत्या राज्यात राबवत आहोत. इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजनेद्वारे गरोदर तसेच स्तनदा मातांना सुविधा पुरवल्या जातात. याचा लाभ १ लाख ३६ हजार ९४७ मातांना आम्ही दिला आहे. या योजनेंतर्गत आर्थिक साहाय्य देण्यात येते. या योजनेचा विस्तार संपूर्ण राज्यात व्हावा असा माझा प्रयत्न आहे.

**कायदे आणि दंड**

गरोदर व स्तनदा मातांची आहार व आरोग्याची काळजी घेतली जावी म्हणून राज्यात एकात्मिक बाल विकास सेवा योजना सुरू आहे. ही योजना अंगणवाड्यांमधून राबविली जाते. अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या १२,००० जागा रिक्त होत्या. या जागा आम्ही त्वरेने भरल्या आहेत. राज्यात सुमारे एक लाखापेक्षा अधिक अंगणवाड्या सुरू असून त्यात ६ महिने ते ६ वर्षापर्यंतच्या ६१ लाखांपेक्षा अधिक बालकांची काळजी घेतली जाते. शिवाय सुमारे ११ लाख ४५ हजार दरम्यान गरोदर व स्तनदा मातांना या अंगणवाड्यामधून आहार व आरोग्य सुविधा दिल्या जात आहेत.

**शासनाच्या प्रयत्नाने ४,८९० गावे कुपोषणमुक्त**

महिला व बाल विकास विभाग जेव्हापासून माझ्याकडे आला तेव्हापासून मी सुदृढ समाजाचे स्वप्न साकार करण्याचे प्रयन्त सुरु केले आहेत. कुपोषण निर्मूलन तसेच स्त्रियांचे सक्षमीकरण, सबलीकरण यावर आम्ही ठळकपणे लक्ष केंद्रित केले. स्त्री भ्रुणहत्या होऊ नये म्हणून हे करणाऱ्यांना कठोर शिक्षा झाली पाहिजेच. तथापि, स्त्री भ्रुणहत्येचे समाजावर किती वाईट परिणाम होतील हे समाजाला सांगण्यासाठी आम्ही मुलगी वाचवा हे जनजागृती अभियान हाती घेऊन समाजाची मानसिकता बदलविण्याचा प्रयत्न चालविला आहे. मी स्वत: यासाठी राज्यातील कानाकोपऱ्यात फिरून मुलेमुली समान आहेत हे समजावून सांगत आहे.

प्रभावी नियोजन, धोरणे, योजना व निर्णय यामुळे कुपोषण निर्मूलन, महिलांचे सबलीकरण व सक्षमीकरण यात राज्याने गरुडझेप घेतली आहे. कोणत्याही राज्यापेक्षा महाराष्ट्र हे या सामाजिक क्षेत्रात अग्रेसर आहे, असे मी अभिमानाने सांगू शकते यात शंका नाही.

**- शब्दांकन : आकाश जगधने**



## सुकन्येचा सन्मान

- सुकन्या योजनेमुळे मुलींचे आरोग्य, शिक्षण आणि उज्ज्वल भविष्याची हमी
- मुलगी जन्मली की तिच्या नावावर २१,२०० रुपये एलआयसीत शासन भरणार व मुलगी १८ वर्षांची झाली की तिला १ लाख रुपये मिळणार
- ९ वी ते १२ वी पर्यंत दरमहा १०० रुपयाची शिष्यवृत्तीही मिळणार
- १९,००० मुलींना या योजनेचा लाभ मिळेल
- दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील दोन मुलींना या योजनेचा लाभ मिळेल
- मुलीला ११ व १२ वी साठी शिष्यवृत्ती मिळेल
- १८ वर्षाच्या आत लग्न होणार नसल्याने बालविवाहांना आळा बसेल
- अपत्याच्या नावापुढे आईचे अथवा वडिलांचे नाव लावण्याचा अधिकार आता महिलांना. नवऱ्याचे अथवा वडिलांचे नाव लावण्याचा आग्रह धरता येणार नाही.
- आयआयटीयन्स पेस या संस्थेच्या साहाय्याने गरीब व हुशार मुलींना आयआयटीमध्ये प्रवेश मिळावा म्हणून मोफत प्रशिक्षण योजना
- ग्रामीण भागातील व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गातील हुशार मुलींना उच्च शिक्षणाची संधी मिळावी म्हणून आयआयटी, जेईई आणि इंटरनॅशनल ऑलिंपियाड या परीक्षांच्या दर्जात्मक शिक्षणासाठी शासनामार्फत खर्च
- विविध कायद्यांची माहिती महिलांना व्हावी, त्यांना समाजात सन्मानाने वागवण्यात यावे. मुलींच्या जन्माचे स्वागत व्हावे यासाठी राजमाता जिजाऊ, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जाणीवजागृती अभियान



**मधुकर चव्हाण**
परिवहन मंत्री

'राज्यातील परिवहन व्यवस्था सुरक्षित, सुरळीत आणि सुलभ करण्यासाठी गेल्या चार वर्षांत विविध निर्णय घेण्यात आले. ऑटोरिक्षांना इलेक्ट्रॉनिक मीटर्स बसवणे बंधनकारक केल्याने प्रवाशांना योग्य दराने प्रवास करणे शक्य झाले. ऑटोरिक्षांचे परवाने ऑनलाइन पद्धतीने देण्याची कार्यप्रणाली स्वीकारून त्यात पारदर्शकता आणण्यात आली. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी वैशिष्ट्यपूर्ण असे स्कूलबस धोरण अंगीकारून ते कार्यान्वित करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे.'

# सुरक्षित आणि सुलभ

परिवहन विभागाने मागील साडेचार वर्षांच्या कालावधीत जनहितासाठी अनेक व्यापक निर्णय घेतले. या विभागाने लोकसेवा तसेच प्रवाशांच्या सोयीसाठी अनेक उपक्रम यशस्वीरीत्या राबवले आहेत. एसटीचा प्रवास अधिकाधिक सुखकर आणि सुरक्षित व्हावा यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. त्या दृष्टीने वेगवेगळे निर्णय घेऊन त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी केली आहे.

**टॅक्सी, रिक्शांना इलेक्ट्रॉनिक मीटर**

नागरिकांची रिक्षा व टॅक्सीवाल्यांकडून फसवणूक होऊ नये म्हणून सर्व महापालिका व अ वर्ग नगरपालिका क्षेत्रात टॅक्सी / रिक्षांना इलेक्ट्रॉनिक मीटर बसविणे आम्ही सक्तीचे केले. बरेचदा बोगस दरपत्रकाद्वारे प्रवाशांची फसवणूक केली जायची. याला आळा घालण्यासाठी इलेक्ट्रॉनिक मीटर्स खूप उपयुक्त ठरले आहेत.

रिक्षा व टॅक्सी यांचे भाडेदर वाढवण्यासाठी वारंवार आंदोलने केली जातात. याचा फटका सर्वसामान्यांना बसत असतो. हे लक्षात घेऊन हकीम समितीचे भाडेदर सूत्र स्वीकारण्यात आले आहे. चालकांना योग्य मोबदला मिळावा तसेच महागाई, पेट्रोल-डिझेलचे वाढणारे भाव याबाबी लक्षात घेता चालकांच्या कुटुंबासाठीही वाजवी उत्पन्न मिळावे हा यामागचा उद्देश आहे. टॅक्सी / रिक्षा चालकांच्या एकंदरीत कामाचा परिपूर्ण अभ्यास करून भाडेदर सूत्र राबविणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे.

**ऑनलाइन परवाने**

राज्यात सुमारे ८० हजार रिक्षा परवान्यांची मुदत संपली होती. हे परवाने पुन्हा देण्यासाठी ऑनलाइन पद्धतीने अर्ज मागवण्यात आले. यामुळे या कामात पारदर्शकता आली. फसवणुकीला आळा बसला. मुदत संपलेल्या ८० हजार परवान्यांपैकी ६० हजार रिक्षांच्या परवान्यांना पुन्हा आम्ही मंजुरी दिली.

**स्कूलबस धोरण**

शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी आम्ही शालेयबस धोरण मंजूर करून परिणामकारक अंमलबजावणी सुरू केली आहे. त्यामुळे मुलांची सुरक्षा वाढली व पालकांच्या मनातील भीती आम्ही दूर करण्यात यशस्वी झालो आहोत. स्कूलबससाठी शासनाने वाहनकरात सूट



दिली आहे.

**सीमा तपासणी नाक्यांचे आधुनिकीकरण**

वाहतूकदारांचा खोळंबा कमी करणे व करचुकवेगिरीस आळा घालण्यासाठी आम्ही राज्याच्या २२ सीमा तपासणी नाक्यांचे आधुनिकीकरण केले. दापचेरी, नवापूर, हाडाखेड, सावनेर, मानेगांव, उमरगा, पिंपळ कुटी, नांदणी हे आठ आधुनिक तपासणी नाके कार्यान्वित झाले आहेत. आणखी चार आधुनिक तपासणी नाके लवकरच कार्यान्वित होतील.

नागरिकांचे हेलपाटे वाचवण्यासाठी परवाना व वाहननोंदणी प्रमाणपत्रांचे स्पीड पोस्टाने वितरण आम्ही सुरू केले आहे. यामुळे अर्जदाराच्या पत्त्याची अचूक खात्री करता येणे शक्य होत आहे. दलालांनाही चाप बसवणे सोपे झाले आहे. आतापर्यंत सुमारे दीड कोटी लायसन्स व नोंदणी प्रमाणपत्रांचे वाटप पोस्टाद्वारे करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे अर्जदारांची संगणकाद्वारे चाचणी घेऊन पारदर्शीपणे शिकाऊ अनुज्ञप्ती देण्याकरिता २२ परिवहन कार्यालयात संगणकीकृत चाचणी यंत्रणेची उभारणी केली आहे.

**मुंबईत नवीन शेअर टॅक्सी मार्ग**

वाहतुकीची कोंडी कमी व्हावी, इंधनात बचत, प्रदूषणात घट याबरोबरच प्रवासी व चालकांचाही फायदा व्हावा यासाठी आम्ही शेअर टॅक्सी/रिक्षा योजना कार्यान्वित केली आहे. यामुळे गेल्या दोन वर्षात मुंबईत सुमारे ३५० नवीन शेअर टॅक्सी मार्ग सुरु झाले आहेत.

**प्रिपेड टॅक्सी योजना**

बाहेर गावाहून येणाऱ्या प्रवाशांची फसवणूक होऊ नये व विश्वासार्ह टॅक्सी सेवा मिळावी या हेतूने आम्ही सी.एस.टी, दादर, मुंबई सेंट्रल, कुर्ला व वांद्रे या मुंबईतील प्रमुख रेल्वे स्थानकांवरून प्रिपेड टॅक्सी योजना सुरू केली आहे. तसेच नाशिक, पुणे, नागपूर या शहरांमध्ये प्रिपेड रिक्षा बूथ सुरू करण्यात आले आहेत.

**जीआरएस प्रणालीचा वापर**

मोटार वाहनकर भरण्यासाठी वाहन मालकास प्रत्यक्ष परिवहन कार्यालयात यावे लागू नये, कामाचा ताण कमी व्हावा, महसुलाची सुरक्षित हाताळणी व्हावी आणि ताळेबंद अचूक व्हावा यासाठी आम्ही जीआरएस प्रणालीचा वापर करून ई-पेमेंटद्वारा करभरणा स्वीकारण्यास परवानगी दिली आहे. १५ प्रादेशिक परिवहन कार्यालयात ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

वाढते शहरीकरण, वाढणारी वाहने आणि प्रवासी संख्या लक्षात घेता प्रवाशांना अधिक सेवा कशा मिळतील, त्यांची फसवणूक होणार नाही या सर्व बाबींचा विचार करून आम्ही अनेक मूलगामी, पारदर्शी निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी करीत आहोत.

**– शब्दांकन : शांताराम शेरवाडे**

## आपली एस.टी.

- ज्येष्ठ नागरिकांसाठी एस.टी.चे सवलतीचे दर, ई-तिकीट आरक्षण, एस.टी.च्या वातानुकूलित सेवेच्या ई-तिकिटधारक प्रवाशांसाठी एसएमएसची सुविधा, स्मार्ट कार्ड योजना, डिझेल बचतीसाठी एस.टी.मध्ये सिम्युलेटर, तान्हुल्यांसोबत प्रवास करणाऱ्या मातांसाठी एस.टी. स्थानकांवर हिरकणी कक्ष, वाहक व चालकांसाठी समुपदेशकांच्या नियुक्त्या असे विविध उपक्रम एस.टी महामंडळ अत्यंत नियोजनपूर्वक व यशस्वीरीत्या राबवत आहे.
- डोंगराळ, दुर्गम आणि ग्रामीण क्षेत्रातील सार्वजनिक वाहतुकीसाठी मिडी बससेवा सुरू. 'यशवंती' या नावाने ५९५ मिडी बसेस ग्रामीण आणि दुर्गम भागात धावत आहेत.
- मल्टी एक्सल ए सी व्होल्वो या गाडीचा समावेश 'अश्वमेध' या नावाने. या बसेस दादर-पुणे मार्गावर धावत आहेत.
- 'शिवनेरी' ए सी व्होल्वो गाड्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढवली. या गाड्या दादर-पुणे, नाशिक-पुणे, औरंगाबाद-पुणे, ठाणे-स्वारगेट, बोरिवली-स्वारगेट, दादर-स्वारगेट, पुणे-बंगलोर या प्रमुख मार्गांवर धावत आहेत.






## खोळंबा कमी-पारदर्शकतेत वाढ

- सीमा तपासणी नाक्यांचे आधुनिकीकरण हा शासनाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प कार्यान्वित
- राज्याच्या २२ सीमा तपासणी नाक्यांवर या योजनेची अंमलबजावणी
- नाक्यांचे आधुनिकीकरण झाल्याने वाहतूकदारांचा खोळंबा कमी होऊन कामात पारदर्शकता
- या नाक्यांवर अद्ययावत प्रशासकीय इमारत, इलेक्ट्रॉनिक वजनकाट्यासह मार्गिका, आर.एफ.आय.डी. यंत्रणा, व्ही.डी.ओ. कॅमेरे व नंबर प्लेट रिडर यंत्रणा, जादा भारवाहक वाहनांमधून माल उतरविण्यासाठी गोडाऊन, सुसज्ज संगणक यंत्रणा, अधिकारी व कर्मचारी यांच्या निवासाची सुविधा
- नाक्यावरून ये-जा करणाऱ्या मालवाहतूक व प्रवासी वाहनांना केंद्र शासनाने निर्धारित केलेल्या विहित मापदंडाचे आरएफआयडी टॅग बसवून त्यामार्फत कागदपत्रांची तपासणी, यामुळे वाहनाचे इंजिन, चॅसीस क्रमांक, मेक, मॉडेल, भारवाहतुकीची क्षमता याबद्दलची अचूक माहिती मिळणे शक्य
- इलेक्ट्रॉनिक वजनकाटे, संगणक यंत्रणा व सीसीटीव्ही कॅमेरे यांचा वापर आणि नियमांची कडक अंमलबजावणी झाल्याने रस्ता सुरक्षिततेत वाढ
- वाहनतळ, माल उतरविण्यासाठी गोडाऊन,गॅरेज, टायर दुरुस्ती, एटीएम सेंटर यासारख्या सुविधांमुळे वाहनचालकांना मूलभूत सोयी उपलब्ध झाल्या आहेत. कर व शुल्करूपाने शासनाच्या महसुलातही वाढ

# उज्ज्वल सांस्कृतिक वारसा



संजय देवतळे
पर्यावरण आणि सांस्कृतिक कार्य मंत्री

'कोणत्याही समाजाची संस्कृती ही त्या समाजाचे आणि राज्याचे खरे वैभव असते. महाराष्ट्राला मोठा सांस्कृतिक वारसा लाभला आहे. हे क्षेत्र अधिक समृद्ध करण्यासाठी शासन नेहमीच आघाडीवर राहिले आहे. विविध लोककला, संस्कृती, चित्रपट, नाटक, पारंपरिक वाद्यसंगीत यास प्रोत्साहन देण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या योजना राबवण्यात येतात. त्या अनुषंगाने गेल्या ३-४ वर्षांत अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर माझा भर राहिला. त्यामुळे राज्याचे सांस्कृतिक क्षेत्र अधिक दर्जेदार आणि गुणात्मक झाले आहे.

महाराष्ट्र प्रतिभावंत कलावंताची खाण आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. या कलावंतांची जडणघडण उत्कृष्टरीत्या व्हावी म्हणून मुंबईत राष्ट्रीय नाट्य विद्यालयाचे (नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा) उपकेंद्र लवकरच सुरू करण्यात येणार आहे. सध्या राष्ट्रीय नाट्य विद्यालयाचे दिल्ली, बंगलोर, आगरतळा आणि सिक्कीम येथे उपकेंद्र कार्यरत आहे. लवकरच पु.ल.देशपांडे कला अकादमी येथे प्रायोगिक तत्त्वावर आणि नंतर दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव येथे राष्ट्रीय नाट्य विद्यालयाचे उपकेंद्र सुरू करण्याचा आमचा मानस आहे.

पुणे येथे मुख्यालय असलेल्या फिल्म ॲण्ड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट या संस्थेचे भारतात सध्या फक्त कलकत्ता येथे उपकेंद्र आहे. दुसरे उपकेंद्र दादासाहेब फाळके चित्रनगर, गोरेगाव येथे सुरू करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

महाराष्ट्रात दर्जेदार मराठी चित्रपट निर्माण व्हावेत व त्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळावी यासाठी अर्थसाहाय्य देण्याची योजना सुधारित करण्यात आली. त्यानुसार अर्थसाहाय्याची रक्कम जास्तीत-जास्त रु. ४० लाख व कमीत-कमी रु. ३० लाखापर्यंत वाढविण्यात आली आहे.

**वृद्ध कलावंत मानधन**

लोककलेतील आणि विविध कलांमधील वृद्ध कलावंतांसाठी मानधन योजनेमुळे आयुष्यभर रंगभूमीची सेवा केलेल्या वृद्ध कलावंतांना मोठा दिलासा मिळाला आहे. कलावंतांच्या वार्षिक उत्पन्नाच्या मर्यादेत दुपटीने वाढ करण्यात आली असून कलावंतांचे वार्षिक उत्पन्न रु.२४,०००/- ऐवजी रु.४८,०००/- इतके निश्चित झाले आहे. सर्व कलाक्षेत्रातील कलावंत मानधनासाठी पात्र ठरवण्यात आले आहेत.

**जिल्हा मुख्यालयी नाट्यगृह**

जिल्हा मुख्यालय स्तरावर नाट्यगृह बांधण्याची योजना कार्यान्वित करण्यात आली आले. जिल्हा मुख्यालयी महानगरपालिका / अ वर्ग नगरपालिका असल्यास रु.५.०० कोटी व जिल्हा मुख्यालयी ब / क वर्ग नगरपालिका



असल्यास रु.४.०० कोटी एवढ्या रकमेची सुधारित अर्थसाहाय्य योजना अमलात आणण्यात आली आहे.

**संतपीठ स्थापना**

संतपीठाची स्थापना औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण येथे करण्यात आली आहे. संताच्या आध्यात्मिक व मानवतावादी जीवनदर्शनाचे संशोधन, प्रबोधन आणि सर्वधर्मांना अभिप्रेत असणाऱ्या संताच्या जीवनातून व साहित्यातून प्रतीत मूल्यांचे व संस्कारांचा परिपोषण करणे तसेच विविध धर्मातील संतसाहित्याचे संशोधन करणे हा या संतपीठाचा उद्देश आहे.

**शास्त्रीय संगीत प्रोत्साहन योजना**

शास्त्रीय संगीतास प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने २०१२-१३ मध्ये आम्ही नवीन योजना सुरू केली. या योजनेंतर्गत भारतरत्न पं. भीमसेन जोशी यांच्या नावे ४ उपक्रम राबवण्यात येत आहेत. यात शास्त्रीय संगीत क्षेत्रात जीवनगौरव पुरस्कार, युवा शिष्यवृत्ती योजना, शास्त्रीय संगीतातील नोंदणीकृत संस्थाना साहाय्यक अनुदान, शास्त्रीय संगीत महोत्सव आयोजित करणे यांचा समावेश आहे.

**पुरस्काराच्या रकमेत वाढ**

कलावंतांच्या कलेची शासनामार्फत नेहमीच दखल घेण्यात येते व सर्वोकृष्ट कामगिरी करणाऱ्या कलावंतांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. त्यामुळेच शासनाने पुरस्काराच्या दर्जेनुसार पुरस्काराच्या रकमा दुपटीने वाढवण्यात आल्या.

**प्रायोगिक नाटकांचा महोत्सव व अनुदान**

प्रायोगिक रंगभूमी ही व्यावसायिक रंगभूमीची प्रयोगशाळा असून याच रंगभूमीने आजवर नवे नाटककार, दिग्दर्शक, नेपथ्यकार, कलाकार, तंत्रज्ञ घडविले. ज्यांनी पुढे व्यावसायिक रंगभूमीची धुरा समर्थपणे आपल्या खांद्यावर पेलली आहे. उद्याच्या रंगभूमीची आणि रंगकर्मीची पायाभरणी करणाऱ्या प्रायोगिक नाटकांची शासनाने दखल घेतली असून २०१३-१४ या वर्षापासून प्रतिवर्षी प्रायोगिक नाटकांचा महोत्सव आयोजित करणे व प्रायोगिक नाटकांना अनुदान देण्याची योजना सुरू करण्यात आली आहे.

**लोकप्रतिनिधींना प्रशिक्षण**

महाराष्ट्रातील संस्कृतीचा वारसा खऱ्या अर्थाने जतन करावयाचा असेल तर, लोकप्रतिनिधींना सांस्कृतिक जगताचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. ही बाब विचारात घेऊन विभागाने २०१३-१४ या आर्थिक वर्षापासून लोकप्रतिनिधींसाठी यशदा, पुणे येथे प्रशिक्षण शिबिर सुरू केले

सांस्कृतिक कार्य संचालनालयाची क्षेत्रीय कार्यालये उघडण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यानुसार पहिले कार्यालय नागपूर येथे तर दुसरे पुणे येथे सुरू करण्यात आले आहे.

> सांस्कृतिक धोरणातील निर्णयानुसार २०१२-१३ या आर्थिक वर्षापासून सांस्कृतिक निधीची स्थापना. त्यासाठी १ कोटी रुपयांची उपलब्धता.

२०१२-२०१३ हे भारतीय चित्रपटसृष्टीचे शतक महोत्सवी वर्ष साजरे करण्यासाठी राज्यातील ८ शहरात चित्रपट महोत्सवांचे आयोजन करण्यात आले. याअंतर्गत उल्लेखनीय चित्रपटांच्या प्रदर्शनाबरोबरच चर्चासत्र, परिसंवाद, कार्यशाळा, प्रकट मुलाखती असे वैविध्यपूर्ण उपक्रम वर्षभरात राबवण्यात आले.

राज्यात चित्रपट विकास/ प्रसारण/ प्रबोधन करणाऱ्या संस्थांकडून आयोजित होणाऱ्या आंतरराष्ट्रीय चित्रपट, मराठी चित्रपट महोत्सव, लघुपट महोत्सव यांना अर्थसाहाय्य देण्याबाबतचे धोरण शासनाने प्रथम:त घोषित केले आहे.

**लुप्त होणाऱ्या कला / पारंपरिक वाद्यांसाठी अर्थसाहाय्य**

२०१२-१३ मध्ये सांस्कृतिक संस्थांना अनुदान योजनेमध्ये बदल करून त्याद्वारे केवळ प्रयोगात्मक कलेच्या सादरीकरणासाठीच अनुदान न देता त्याशिवाय इतर कलाक्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या संस्थांना ५ लाखापर्यंतचे अर्थसाहाय्य देण्याचा निर्णय घेतला आहे. सांस्कृतिक कार्यक्रम करणाऱ्या संस्थांना कमाल २ लाखापर्यंतचे अर्थसाहाय्य देण्यात येत आहे. मला अभिमान आणि आनंद वाटतो की, गेल्या साडेचार वर्षांमध्ये सांस्कृतिक कार्य विभागाने राज्यभर परिणामकारकरीत्या योजना राबवल्यामुळे राज्यातील सांस्कृतिक वारसा अधिक सक्षम आणि समृद्ध झाला आहे.

**- शब्दांकन : वर्षा फडके**



## समृद्ध वारसा जपण्यासाठी

- राज्यातील ३७१ संरक्षित स्मारकांचे जतन व दुरुस्ती कामाकरिता वाढीव प्रमाणात निधी उपलब्ध.
- किल्ले मालिका योजनेतील लोहगड, राजमाची व शिवनेरी या राष्ट्रीय संरक्षित स्मारकांच्या जतन व दुरुस्तीकरिता भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण यांना निधी उपलब्ध
- वारसा जतन योजनेंतर्गत राज्य संरक्षित स्मारकांच्या जतन व दुरुस्तीसाठी गेल्या चार वर्षात रु.१०० कोटी इतका निधी राज्यास मंजूर
- महाराष्ट्र वैभव स्मारक संगोपन योजनेंतर्गत कै. यशवंराव चव्हाण यांचे देवराष्ट्रे येथील जन्मघर (ता. कडेगांव जि. सांगली) हे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई यांच्याकडे संगोपनार्थ सुपुर्द
- सातारा आणि सिंदखेडराजा वस्तुसंग्रहालयाच्या नवीन इमारतीच्या बांधकामास प्रशासकीय व वित्तीय मान्यता
- स्थानिक कलावंत आणि स्थानिक कलांना वाव देण्यासाठी शासनातर्फे जिल्हास्तरावर स्थानिक कलांच्या सहकार्याने प्रतिवर्षी ३ दिवसाचा सांस्कृतिक महोत्सव आयोजित. त्यासाठी प्रत्येक जिल्ह्याला अनुदान देण्याची नवीन योजना जुलै,२०१३ मध्ये सुरू.
- राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारप्राप्त मराठी चित्रपटकर्मी यांनी महाराष्ट्रास राष्ट्रीय पातळीवर सन्मान प्राप्त करून दिल्याबद्दल शासनातर्फे सन्मान करण्याची योजना जून, २०११ मध्ये सुरू.२०१३ पासून सन्मानाच्या रकमेत रु.१ लाख एवढी वाढ.



**दिलीप सोपल**
पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री

# ग्रामस्वच्छतेचा नवा अध्याय

'लोकसहभागातून स्वच्छता चळवळ राबवण्याचा पाया महाराष्ट्रात घातला गेला. या अभियानापासून प्रेरणा घेऊन केंद्र शासनाने देशभरात निर्मल ग्राम मोहीम राबवायला सुरुवात केली. राज्याने या मोहिमेच्या अंमलबजावणीत सुरुवातीपासूनच आघाडी कायम ठेवली. हजारो गावांनी निर्मल ग्राम पुरस्कार पटकावले. यापुढेही ही योजना प्रभावीपणे राबवून संपूर्ण राज्य हागणदारीमुक्त केले जाईल. प्रत्येक शाळा, अंगणवाडी आणि गावामध्ये पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्नांची पराकाष्ठा करेल.'

ग्रामीण भागात पिण्याचे पाणी तसेच स्वच्छतेच्या मूलभूत सुविधा, प्रत्येक कुटुंबात शौचालय सुविधा निर्माण करण्यासाठी विविध कार्यक्रम, योजना राबवल्या जातात. ग्रामीण भागातील नागरिकांना दिलासा देण्याच्या उद्देशाने या भागात राबवण्यात येणाऱ्या पाणीपुरवठा योजनांची लोकवर्गणी रद्द करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे अनेक प्रलंबित तसेच भावी काळात प्रस्तावित असलेल्या पाणीपुरवठा योजना राबवण्याचा मार्ग मोकळा झाला.

या निर्णयासाठी मी सातत्याने मागील मंत्रिमंडळ बैठकीत प्रयत्न करीत होतो. माझ्या या प्रयत्नाला नुकतेच यश मिळाले आहे. महागाई, दुष्काळ, गारपीट, अतिवृष्टी अशा विविध आपत्तींमुळे होरपळणाऱ्या ग्रामीण भागातील नागरिकांना या निर्णयामुळे मोठा दिलासा मिळणार आहे.

**मागणी आधारित लोकसहभाग**

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी शासनाने आतापर्यंत मागणी आधारीत लोकसहभागाचे धोरण स्वीकारले होते. त्यानुसार ग्रामीण पाणीपुरवठा योजनांसाठी भांडवली खर्चाच्या १० टक्के लोकवर्गणी भरणे अनिवार्य होते. पण अनेक ठिकाणी ग्रामस्थांना लोकवर्गणी भरणे शक्य होत नव्हते. साधारण १ कोटी रुपयांच्या पाणी पुरवठा योजनेस सुमारे १० लाख रुपयांची वर्गणी भरावी लागत असे. ही रक्कम प्रति कुटुंब काही हजारांपर्यंत जात होती. ही रक्कम भरणे शक्य होत नसल्याने संबंधित गाव पाणीपुरवठा योजनेपासून वंचित राहत असे. मागील तीन वर्षांपेक्षा अधिक कालावधीतील रखडलेल्या योजनांपैकी बहुतांश योजना ह्या लोकवर्गणीअभावी रखडल्या होत्या असे लक्षात आले. लोकवर्गणीच्या अटीमुळे योजना राबवण्यास विलंब होत असून केंद्र शासनाकडून प्राप्त होणारा निधीही पुरेशा प्रमाणात प्राप्त होऊ शकत नव्हता. त्यामुळे लोकवर्गणीची अट कायमस्वरूपी रद्द करावी, असा प्रस्ताव पाणीपुरवठा विभागाने तयार केला आणि मंत्रिमंडळाने त्यास तत्काळ मंजुरी दिली.

या निर्णयामुळे शासनाकडे अखर्चित असलेल्या केंद्र व राज्य शासनाच्या निधीतून प्रलंबित पाणीपुरवठा योजना तातडीने पूर्ण करता येणार आहेत. नवीन पाणीपुरवठा योजनांसाठीही लोकवर्गणी आकारली जाणार नाही. त्यामुळे ग्रामीण जनतेस कायमस्वरूपी पाणी पुरवठ्याच्या सोयी उपलब्ध करून देणे सुलभ होईल.



ही अट रद्द केली असली तरी पाणी पुरवठा योजनांचे नियोजन, अंमलबजावणी व देखभाल दुरुस्ती या तीनही टप्प्यांमध्ये ग्रामीण जनतेचा सहभाग येत असल्यामुळे शासनाचे लोकसहभागाचे धोरणही चालू राहणार आहे.

**दरडोई खर्चाच्या निकषात वाढ**

ग्रामीण पाणीपुरवठा योजनेच्या मंजुरीसाठी वापरल्या जाणाऱ्या दरडोई खर्चाच्या निकषात वाढ करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे राज्यातील अनेक प्रलंबित पाणीपुरवठा योजना मार्गी लागून त्यांच्या निधीमध्ये भरीव वाढ होणार आहे.

आतापर्यंत १९९६ च्या शासन निर्णयाप्रमाणे निश्चित केलेल्या दरडोई दराप्रमाणे पाणीपुरवठा योजनांना मंजुरी दिली जात असे. पण मागील काही वर्षात नळ योजनांसाठी लागणारी साहित्यसामग्री तसेच मजुरीच्या दरात झालेली भाववाढ लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला.

**स्वच्छता अभियानाने घातला पाया**

संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा यशस्वीपणे राबविली जात आहे. या योजनांच्या माध्यमातून अनेक गावांनी फक्त स्वच्छतेमध्येच नव्हे तर पर्यावरण, वृक्षसंवर्धन, जलसंवर्धन, मृदसंधारण, बचतगट, अपारंपरिक ऊर्जा, बायोगॅस, शिक्षण, महिला सक्षमीकरण अशा अनेक क्षेत्रात उत्तुंग कामगिरी केली आहे. या अभियानांतर्गत चांगले काम करणाऱ्या गावांना विविध स्तरावर बक्षिसे दिली जात आहेत.

९,५२३ ग्रामपंचायती व ११ पंचायत समित्यांना केंद्र शासनाचा निर्मल ग्राम पुरस्कार. देशात सर्वात जास्त निर्मल ग्राम पुरस्कार मिळवण्यात महाराष्ट्र अग्रेसर.

**निर्मल भारत अभियान**

आपले राज्य पूर्ण हागणदारीमुक्त करण्याच्या उद्देशाने निर्मल भारत अभियान राबवले जात आहे. नव्या कार्यक्रमामध्ये दारिद्र्यरेषेखालील सर्व मागासवर्गीय कुटुंबांना, सर्व आदिवासी कुटुंबांना, अल्पभूधारक, महिला प्रमुख असलेल्या कुटुंबांना, अपंग यांना शौचालयाच्या बांधकामासाठी प्रोत्साहन अनुदान दिले जात आहे. निर्मल भारत अभियानातून दारिद्र्यरेषेखालील सर्व कुटुंबांना आणि दारिद्र्य रेषेवरच्या निवडक कुटुंबांना प्रोत्साहन निधी म्हणून दिला जात आहे.

**सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन**

वैयक्तिक स्वच्छतेबरोबरच संपूर्ण ग्रामीण भागातील घनकऱ्याचे व सांडपाण्याचे व्यवस्थापन होण्यासाठी निर्मल भारत अभियानांतर्गत कुटुंब संख्येच्या आधारावर अर्थसाहाय्याची तरतूद करण्यात आली आहे.

**सुजल निर्मल महाराष्ट्र अभियान**

नागरी भागासाठी पाणीपुरवठा व मलनि:सारणाच्या सर्व व्यापक सुविधा उपलब्ध करणे हा महाराष्ट्र सुजल निर्मल अभियानाचा मुख्य उद्देश आहे. या योजनेसाठी नागरी संस्थांना अनुदान उपलब्ध करून देण्यात येते.

**नागरी दलित वस्त्यांमध्ये पाणीपुरवठा**

महाराष्ट्र सुजल निर्मल अभियानांतर्गत राज्यात महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी नागरी दलितवस्ती पाणीपुरवठा व स्वच्छता योजना राबवली जात आहे. नागरी भागातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकामधील कुटुंबीयांना खाजगी नळ जोडणी व वैयक्तिक शौचालय उपलब्ध करून देण्यासाठी ही योजना राबवली जाते.

**भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा**

ग्रामीण भागातील बहुतांश योजनांचे स्त्रोत भूजलावर आधारित आहेत. ९२ टक्के भूभाग कठीण पाषाणाने व्याप्त आहे. अपुरा व अनियमित पाऊस प्रतिकूल भूस्तरीय रचनेमुळे (कठीण पाषाणामुळे) जमिनीत कमी प्रमाणात मुरतो. याच्याच जोडीला शेतीसाठी विहिरींच्या पाण्याचा उपसा मोठ्या प्रमाणात होतो. या सर्वांचा विपरित परिणाम विहीरींवर होतो. विशेषत: उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याचा विहिरींमधून अपुरा पाणीपुरवठा होतो. वर्षभर पुरेसे पाणी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने त्याचे बळकटीकरण करण्यात येते. याकरिता परिसरात जलसंधारण व जलपुनर्भरणाच्या विविध उपाययोजना राबवण्यात येतात.

**जलस्वराज्य टप्पा – २**

राज्यामध्ये सन २००३ पासून जागतिक बँकेच्या अर्थसाहाय्याने जलस्वराज्य प्रकल्प यशस्वीपणे राबवण्यात आला आहे. ग्रामीण भाग हागणदारीमुक्त करणे, ग्रामस्थांना पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध करून देणे आणि याबरोबरच ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण करणे अशी या प्रकल्पाची उद्दिष्टे होती.

हा प्रकल्प राज्यातील २६ जिल्ह्यांमध्ये राबवण्यात आला असून त्यामध्ये अंतिमत: ३ हजार ७ ग्रामपंचायती समाविष्ट होत्या. त्यामधील २ हजार ९५६ ग्रामपंचायतीमध्ये पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे.

**– शब्दांकन : ईर्शाद बागवान**



## गावागावांत स्वच्छ पाणी

- ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत पाणीपुरवठा योजना आणि जलस्त्रोतांच्या शाश्वततेसाठी उपाययोजना करणे तसेच पाणीपुरवठा योजनांची देखभाल व दुरुस्तीसाठी स्वतंत्र निधीची तरतूद
- या कार्यक्रमांतर्गत २०१३-१४ आणि २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी १३ हजार २३७ गावे वाड्या व वस्त्यांचा समावेश
- १४,४५३ अंशत: हाताळण्यात आलेल्या वाड्यावस्त्यांमध्ये पिण्याच्या पाणी पुरवठा योजना राबवण्यासाठी कृती आराखड्यास मान्यता
- या कार्यक्रमांतर्गत पिण्याच्या पाण्यासाठी करण्यात येत असलेल्या एकूण तरतूदीच्या १० टक्के रक्कम स्रोत शाश्वततेसाठी राखीव
- सुरक्षित जल अभियान कार्यान्वित
- ग्रामीण भागातील सर्व पाणीस्रोतांचे गुणवत्ता संनियंत्रण, देखरेख, दुरुस्ती व सर्वेक्षणामध्ये लोकांच्या सहभागात वाढ
- या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये ग्रामपंचायतींचा सहभाग.
- सुलभ पद्धतीने पाणी तपासणीच्या संचाचा वापर करून गावातल्या गावात पाण्याची तपासणी करण्यावर भर
- स्वच्छ व सुरक्षित पाणीपुरवठ्याबाबत तसेच अशुद्ध पाण्यामुळे आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामाबाबत जनजागृती



**शशिकांत शिंदे**
जलसंपदा (कृष्णा खोरे-पाटबंधारे महामंडळ) मंत्री

# कृष्णेने आणली हरितक्रांती

कृष्णा पाणी तंटा लवादाच्या निर्णयानुसार राज्याच्या वाट्याला जे ५८५ अब्ज घनफूट पाणी आले होते त्या पाण्याचा वापर करण्यासाठी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाची निर्मिती झाली. हे महामंडळ आपल्या उद्दिष्टाकडे निर्धारपूर्वक वाटचाल करीत आहे, ही बाब नमूद करताना मला विशेष आनंद होत आहे.

पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर या जिल्ह्यामध्ये पूर्णत: तर अहमदनगर, उस्मानाबाद, बीड जिल्ह्यात अंशत: असे ८ जिल्ह्यांमध्ये महामंडळाचे कार्यक्षेत्र आहे.

राज्याच्या वाट्याला आलेल्या ५८५ अब्ज घनफूट पाण्याचा संपूर्ण वापर होण्यासाठी २५ मोठे प्रकल्प, ६८ मध्यम प्रकल्प, ९५५ लघुपाटबंधारे प्रकल्प व २० उपसा सिंचन योजना असे एकूण १०६८ प्रकल्प उभारण्याचे नियोजन करण्यात आले होते. या प्रकल्पांपैकी महामंडळाच्या स्थापनेपूर्वी ८ मोठे, ३८ मध्यम व ५१५ लघुपाटबंधारे प्रकल्प असे ५६१ प्रकल्प पूर्ण झाले होते. स्थापनेनंतर २ मोठे, १९ मध्यम, ४०७ लघु पाटबंधारे प्रकल्प अशा ४२८ प्रकल्पांची कामे पूर्ण झाली आहेत. आघाडी शासनाच्या मागील पाच वर्षात १ मोठा,१० मध्यम व ६५ लघुपाटबंधारे प्रकल्प असे ७६ प्रकल्प पूर्ण करण्यात आले.

**सिंचन क्षेत्र निर्मितीचे नियोजन**

कृष्णा खोऱ्यातून प्राप्त झालेल्या पाण्यातून २५.२१ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करण्याचे नियोजन आहे. त्यापैकी महामंडळाच्या स्थापनेपूर्वी ९.६२ लक्ष

'कृष्णा खोरे विकास महामंडळामार्फत पाटबंधाऱ्याचे विविध प्रकल्प उभारण्यात येत आहेत. कृष्णा पाणी तंटा लवादाच्या निर्णयानुसार राज्याच्या वाट्याला आलेल्या पाण्याचा सुव्यवस्थित वापर करण्याच्या अनुषंगाने या महामंडळाने गेल्या अनेक वर्षांत विविध प्रकल्पांमार्फत उत्तम कामगिरी केली आहे. या प्रकल्पांमुळे संबंधित भागात जलक्रांती होऊन पाण्याची टंचाई मिटली आहेच. शिवाय हरितक्रांतीही झाली आहे. याचा निश्चित असा लाभ शेतकऱ्यांना होऊन त्यांच्या समृद्धीत वाढ झाली आहे. ही बाब मला विशेषत्वाने नमूद करावीशी वाटते.'



कुकडी प्रकल्प- डिंभे धरण



हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली होती. महामंडळाच्या स्थापनेनंतर ८.२२ लक्ष सिंचनक्षमता निर्मिती करण्यात आली आहे. त्यातील २.८० लक्ष हेक्टर सिंचन क्षमता मागील पाच वर्षात निर्माण करण्यात आले आहे.

**पिण्याच्या पाण्याची समस्या मिटली**

या खोऱ्यातील पूर्ण होत असलेल्या लहानमोठ्या प्रकल्पांमुळे ग्रामीण भागातील जनतेच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत होत आहे. सातारा जिल्ह्यातील आरफळ कालवा तसेच धोम बलकवडी, उरमोडी धरण, तारळी मोरणा (गुरेघर), नागेवाडी, या प्रकल्पांतर्गत धरणांची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. या व्यतिरिक्त वसना उपसा योजनेचा पहिला टप्पा व वांगणा उपसा सिंचन योजना कार्यान्वित करण्यात आल्या आहेत.

पुणे जिल्ह्यातील कुकडी, चासकमान या प्रकल्पांतर्गत धरणांची कामे पूर्ण झाली असून, मुख्य कालव्यांची ९० टक्के कामे पूर्ण झाली आहेत.

सांगली जिल्ह्यातील टेंभू, ताकारी, म्हैसाळ, वाकुर्डे तर पुणे जिल्ह्यातील जनाई-शिरसाई पुरंदर या उपसा सिंचन योजना अंशत: कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. सोलापूर जिल्ह्यातील पिंपळगाव (ढाळे), सिना माढा, उस्मानाबाद जिल्ह्यातील सिना-कोळेगाव तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील दूधगंगा आंतरराज्य प्रकल्पाचा डावा कालवा या प्रकल्पांची कामे अंशत: झाली असून, या सर्व प्रकल्पांमुळे त्या गावातील लोकांना पिण्याच्या पाण्याबरोबरच सिंचनाचाही लाभ मिळाला आहे.

## सिंचनक्रांती

- राज्याला मिळालेल्या पाण्याचा पूर्ण वापर करणे कृष्णा खोरे विकास महामंडळाचे उद्दिष्ट
- त्यासाठी एकूण ५६० अब्ज घनफूट पाणीसाठा करण्याचे नियोजन
- महामंडळाच्या स्थापनेपूर्वी १७५ अब्ज घनफूट उपयुक्त पाणीसाठ्याची निर्मिती झाली. स्थापनेनंतर १६१ अब्ज घनफूट पाणीसाठा निर्माण
- मागील पाच वर्षात प्रामुख्याने उरमोडी, तारळी, भामा, आसखेड, टेमघर, सिना कोळेगाव, निरा देवघर असे मोठे प्रकल्प, मध्यम प्रकल्प तर लघुपाटबंधारे प्रकल्पांमध्ये एकूण १८.१२७ अब्ज घनफूट उपयुक्त पाणीसाठ्याची निर्मिती
- सोलापूर जिल्ह्यातील भीमा (उजनी) प्रकल्पामध्ये गेल्या ५ वर्षात ज्यादा ५ हजार ५६९ हेक्टर सिंचन क्षमतेची निर्मिती
- या प्रकल्पाद्वारे सोलापूर, पुणे, नगर, उस्मानाबाद या जिल्ह्यातील ४२६ गावातील ३५ लाख लोकसंख्येला पाणी पुरवठा
- या प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात हरितक्रांती झाली असून एकूण २३ साखर कारखाने कार्यान्वित

**सिंचनात वाढ**

कृष्णा प्रकल्पांतर्गत सातारा जिल्ह्यातील आरफळ कालव्याचे १९१ कि.मी. लांबीचे काम पूर्ण करण्यात आले आहे. त्यामुळे वाई, जावळी, सातारा कोरेगांव, कऱ्हाड या तालुक्यातील १८६ गावांना सिंचनाचा लाभ मिळतो आहे.

मागील तीन वर्षात सांगली जिल्ह्याच्या दुष्काळी भागातील कडेगाव पलूस, खानापूर व तासगांव तालुक्यातील एकूण ३७ गावांसाठी आरफळ कालव्याद्वारे पाणी सोडण्यात आले. त्यामुळे सिंचनात वाढ होण्याबरोबरच सुमारे १ लाख १४ हजार ५०० लोकसंख्येंचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला. धोम कालव्याद्वारे दुष्काळी परिस्थितीत सातारा जिल्ह्यातील फलटण व खंडाळा तालुक्यातील सुमारे ५७ पाझर तलाव, ४६ ग्राम तलाव, ६ लघुपाटबंधारे तलाव व २५ कोल्हापूर पद्धतीचे बंधारे भरल्यामुळे दुष्काळी भागातील जनतेला दिलासा मिळाला. सुमारे २ लाख १५ हजार इतक्या लोकांना पाणी पुरवण्यात येत आहे.

**हरितक्रांती**

सोलापूर जिल्ह्यातील सिना माढा उपसा सिंचन प्रकल्पाद्वारे दुष्काळी माढा तालुक्यातील ६० गावांना पिण्यासाठी व सिंचनाचा लाभ मिळतो आहे. दुष्काळी परिस्थितीमध्ये या योजनेचे वीजदेयक स्वत: लाभधारक भरून गेली १० वर्षे ही योजना यशस्वीपणे चालवीत आहेत.

कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या आठ जिल्ह्यातील कार्यक्षेत्रात होत असलेले काम जनतेसाठी मोलाचे आहे. शेती व पिण्याचे नियोजन केल्याने ग्रामीण भागातील विकासासाठी मदत होत आहे. या महामंडळाच्या कार्यक्षेत्रात एकूण ७४ तालुके आहेत. त्यापैकी ४६ तालुके अवर्षणप्रवण आहेत. त्यामुळे या अवर्षणप्रवण तालुक्यांना पाणी पुरवठा करणाऱ्या योजना पूर्ण करण्याकडे शासनाचा विशेष कल आहे. शासनाचे धोरण व लोकसहभाग या माध्यमातून हे उद्दिष्ट पूर्ण करण्यास निश्चितपणे यश मिळेल याचा मला विश्वास आहे.

कृष्णा लवादाचा निकाल लागला असून, भविष्यात ८१ टीएमसी पाणी उपलब्ध होणार आहे. यामध्ये महाराष्ट्र कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळाची भूमिका महत्त्वाची असेल.

**-शब्दांकन : शांताराम शेरवाडे**

# श्वेतक्रांती ते नीलक्रांती



**अब्दुल सत्तार अब्दुल नबी**
पशु संवर्धन, दुग्धव्यवसाय विकास
व मत्स्यव्यवसाय मंत्री

पशुसंवर्धन, दुग्धविकास आणि मत्स्य व्यवसाय विभाग तसा अन्य विभागाच्या तुलनेत छोटा विभाग आहे. सुशिक्षित बेरोजगार, शेतकरी, महिला, दारिद्र्यरेषेखालील व अनुसूचित जाती-जमाती व महिला बचत गटातील लाभार्थी यांना उपजीविकेचे साधन पुरवणारा हा विभाग आहे. म्हणूनच या विभागाचे कामकाज पाहताना शेतकरी आणि गरीब माणसांना वैयक्तिक प्रगती करण्यासाठी बळ देणे हे मोठे आव्हान होते. ते आव्हान यशस्वीपणे पेलल्याचे मला विशेष समाधान आहे.

नैसर्गिक संकटात शेतकऱ्याला शाश्वत मदतीचा हात पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसायाने दिला आहे. सहकारी दूध संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्राला समृद्धीच्या मार्गावर नेण्यास दुधाच्या धवल क्रांतीने मदत केली आहे. दूध उत्पादक शेतकऱ्यांना संकट काळात मदत करण्याचे काम दुग्ध व्यवसायाने केले आहे. मत्स्य व्यवसाय हा कोळी बांधवाचा व्यवसाय पण या व्यवसायात अनेकांना रोजगार मिळतो. परकीय चलन मिळण्याचा हा एक मोठा स्त्रोत आहे.

### मूलभूत सुविधांमध्ये सुधारणा

या विभागाच्या अभ्यासानंतर माझ्या लक्षात आले की, मूलभूत सुविधांमध्ये सुधारणा केल्या तर मोठया प्रमाणावर रोजगार निर्मिती व जनतेला दर्जेदार उत्पादने मिळू शकतात. पशुसंवर्धन विभागात शेतकरी, सुशिक्षित बेरोजगार इत्यादींना रोजगाराच्या संधी मिळाव्या म्हणून आम्ही ६ दुधाळ जनावरे वाटपाचा निर्णय घेतला. दोन वर्षात २८०० लाभार्थ्यांना या योजनेचा फायदा झाला आहे.

कुक्कुट, पक्षिपालन योजनेद्वारे उत्पन्नाचा निश्चित स्त्रोत अल्पभूधारक शेतकरी, अत्यल्प भू-धारक शेतकरी, सुशिक्षित बेरोजगार, महिला बचतगट आणि वैयक्तिक महिला लाभार्थ्यांना व्हावा असा उद्देश ठेवला. या घटकांचे जीवनमान उंचावण्याचा माझा प्रयत्न आहे. या योजनेत १००० मांसल कुक्कुट पक्षी पालनासाठी पक्षिगृह, पाण्याची टाकी, विद्युतीकरण, उपकरणे, खाद्य अन्य साहित्य यांचा समावेश आहे. महिला बचत गटांना स्वयंरोजगार मिळावा म्हणून राष्ट्रीय कृषी योजनेंतर्गत ४०० अंड्यांची क्षमता असणारे छोटे अंडी उबवणारे संयंत्र वाटपाची योजना सुरु केली. रोजगारपूरक व उत्पन्नाचे साधन मिळावे म्हणून सुशिक्षित बेरोजगार, शेतकरी, दारिद्र्यरेषेखालील लाभार्थ्यांसाठी १०+१ शेळी अथवा मेंढी गटवाटपाची योजना सुरु करण्यात आली. या योजनेद्वारे ६,३१७ लाभार्थ्यांना स्वत:च्या पायावर उभे करण्याचे काम केले. या उपक्रमात शेळींच्या प्रजातीप्रमाणे अनुदान दिले जाते. ग्रामीण भागात असे अनेक शेतकरी आहेत जे दारिद्र्यरेषेखाली जीवन कंठित आहेत. त्यांना चांगला प्रथिनेयुक्त आहार मिळावा यासाठी १०० टक्के अनुदानावर परसातील कुक्कुट विकास योजना सुरू केली.

### कामधेनू दत्तक ग्राम योजना

कामधेनू दत्तक ग्राम योजना गावात दूध उत्पादन वाढावे यासाठी सुरू करण्यात



आली. ही मोहीम शेतकऱ्यांना जनावरांची निगा कशी राखावी याचे शिक्षण देणारी आहे. ज्या गावात जनावरांची संख्या ३०० पर्यंत आहे त्या गावात पशू रोगनिदान, लसीकरण, औषधोपचार, गोचीड, गोमाशा निमूर्लन, वैरण विकास, दूधस्पर्धा, जनावरांची निगा आदी बाबींसाठी ही योजना राबवण्यात आली आहे.

**वैरण विकास**

चाऱ्याची टंचाई भासू नये म्हणून आम्ही विविध योजना हाती घेतल्या. त्यात वैरणीचे बियाणे वितरण, मुरघास वितरण, कडबाकुटी संयंत्राचे वाटप या कार्यक्रमांचा समावेश आहे. पशूंना दुष्काळातही चारा पुरवता यावा यासाठी वैरण विकास कार्यक्रम राबवण्यात येत आहे. टंचाईच्या परिस्थितीत पशुसंसर्ग पोषणमूल्य आहार उपलब्ध व्हावा म्हणून खरीप हंगामात अतिरिक्त हिरव्या चाऱ्याची साठवणूक करण्याकरिता मुरघास युनिट तयार करण्यासाठी शेतकऱ्यांना एक लाख पाच हजारांचे अनुदान देण्यात येते. चाऱ्याची बचत व्हावी यासाठी हस्तचलित व विद्युतचलित कडबाकुट्टी संयंत्र घेण्यास अनुदान देण्यात येते.

**दूध पॅकिंग प्रकल्प**

महानंदकडे जमा होणाऱ्या दुधावर योग्य प्रक्रिया करण्याकरिता व त्याची साठवणूक करण्याकरिता गोरेगाव, मुंबई येथे १.०४ लाख लीटर्स प्रतिदिन क्षमतेचे टेट्रा फिनो व टेट्रा ब्रिक पॅकिंग प्रकल्प उभारण्यात आले आहेत. महानंदने दूध भुकटी प्रकल्पाची उभारणी केली आहे. २०१३-१४ मध्ये राज्यातील ५ सहकारी संस्थांचे बळकटीकरण / विस्तारीकरण / आधुनिकीकरण करण्यासाठी एकूण प्रकल्प मंजूर केले आहेत.

एकात्मिक दुग्धशाळा प्रकल्पांतर्गत येणाऱ्या प्रत्येक डेअरी फार्ममध्ये १०० दुधाळ गायी, गायींसाठी निवारा, वैरण गोडाऊन, वैयक्तिक सेवा, विमा इत्यादीसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

दूध उत्पादनात वाढ आणि दूध भुकटीवर निर्यात बंदी यामुळे अतिरिक्त दुधाचा प्रश्न निर्माण झाला होता. शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये व त्यांचे अतिरिक्त दूध, दुधभुकटी प्रकल्पांनी घ्यावे यासाठी प्रकल्पधारकांना प्रतिलीटर दुधासाठी रु. २ प्रमाणे अनुदान दिले.

**मत्स्यव्यवसायाला चालना**

मासेमारी क्षेत्रात रोजगाराची प्रचंड क्षमता असल्याने बंदर व जेट्टी उभारणीचा मोठा कार्यक्रम राबवण्यात येत आहे. मच्छीमारांना मूलभूत सुविधा पुरविणे हा या कार्यक्रमाचा उद्देश असून पहिल्या टप्प्यात १९ ठिकाणी जेट्टी उभारण्यात येतील. त्याचप्रमाणे ग्रामीण पायाभूत विकास कार्यक्रमातंर्गत २० ठिकाणी जेट्टी उभारल्या जाणार आहेत. ३३ ठिकाणी काम अंतिम टप्प्यात आहे. अन्य ठिकाणी बहुतेक कामे पूर्ण झाली असून काही कामे अंतिम टप्प्यात आहे.

**सुसज्ज मासेमारी बंदरे**

मासळी किनाऱ्यावर उतरविणे, साठवणूक याकरिता कोल्ड स्टोअरेज, खरेदी विक्रीसाठी, व्यवहारासाठी निवारा व इतर मूलभूत सुविधांसह अद्ययावत सुसज्ज मासेमारी बंदरे उभारण्याचा कार्यक्रम राबवण्यात येत आहे. रायगड जिल्ह्यातील करंजा, ठाणे जिल्ह्यातील अर्नाळा या ठिकाणी मासेमारी बंदरे उभारण्यात येणार आहेत.

कोकण, मराठवाडा, विदर्भातील भागात दूध व्यवसायाला गती देण्यासाठी एकात्मिक दुग्धशाळा प्रकल्प योजना. त्याअंतर्गत या भागातील २३ जिल्ह्यात ४६ डेअरी फार्मची उभारणी.

मासेमारीसाठी तसेच मत्स्य उत्पादन वाढवण्यासाठी पिंजरा पद्धतीने जलाशयात मत्स्य उत्पादन घेण्याचा महत्त्वाचा कार्यक्रम वर्धा जिल्ह्यातील बोर, अहमदनगर जिल्ह्यातील मुळा व सातारा जिल्ह्यातील तारळी या ठिकाणच्या जलाशयात राबवण्यात येत आहे .

**सुसज्ज व अद्ययावत मासळी बाजार**

उत्तम दर्जाची व सुस्थितीत असलेली मासळी लोकांना उपलब्ध व्हावी यासाठी नागरी क्षेत्रातील ४६ ठिकाणी सुसज्ज व अद्ययावत मासळी बाजार उभारण्यासाठी नगरपालिका व महानगरपालिका यांना अर्थसाहाय्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. १२ ठिकाणी मासळी बाजार स्थापण्याचे काम अंतिम टप्प्यात असून उर्वरित कामे प्रगतिपथावर आहेत. मत्स्यव्यवसायातील जोखीम लक्षात घेता मच्छीमारांना अद्ययावत गट विमा, बोटी, जाळी, रॉकेल खरेदीवर अनुदान दिले जात असून वैयक्तिक लाभार्थ्यांचे जीवन प्रगतीच्या शिखरावर जावे यासाठी शासन प्रभावीपणे प्रयत्न करत आहे.

**- शब्दांकन : आकाश जगधने**



## दुग्धविकास

- राज्यात अपेक्षित दूध उत्पादन होत असले तरी प्रति जनावर दूध उत्पादन क्षमता इतर देशांच्या तुलनेत फार कमी असल्याने त्यांच्या आनुवांशिकतेत सुधारणा होण्यासाठी विशेष प्रयत्न त्या अनुषंगाने दूध उत्पादनात वाढ व्हावी या हेतूने गायी-म्हशींचा सर्वसमावेशक आनुवंशिकता सुधारणा कार्यक्रम
- शेतकऱ्यांच्या दारात कृत्रिम रेतनाची सुविधा पशुवैद्यक पदवीधर व पदविका धारकांमार्फत पोहचवण्यात येत आहे.
- आनुवंशिकता सुधारणा कार्यक्रमास सहाय्य व्हावे व कृत्रिम रेत मात्रा राज्यांतर्गत उपलब्ध यासाठी महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे मोठी अद्ययावत गोठींत रेतमात्रा प्रयोगशाळा उभारण्यात येणार.
- विदर्भ व मराठवाड्यात दूध उत्पादन वाढीसाठी राष्ट्रीय दुग्धविकास मंडळासमवेत सामंजस्य करार, अद्ययावत दुग्धशाळा उभारण्यासाठी या मंडळाला गोवे-भिंवडी, जि.ठाणे येथील शासकीय दूध योजना नाममात्र भाडेतत्त्वावर
- दुधाची गुणप्रत टिकून राहावी यासाठी ग्रामीण पातळीवर प्राथमिक सहकारी संस्थांच्या स्तरावर शीतसाखळी केंद्रांची निर्मिती
- दूधसंघाच्या स्तरावर प्रक्रिया प्रकल्प अद्ययावत करून व त्याची साठवणूक क्षमता वाढवण्यासाठी वेगवर्धक दुग्धविकास कार्यक्रम



जितेंद्र आव्हाड
वैद्यकीय शिक्षण आणि फलोत्पादन मंत्री

'राज्यात चांगले डॉक्टर घडवण्याची जबाबदारी वैद्यकीय शिक्षण विभागावर आहे. त्यामुळे हा विभाग विद्यार्थी केंद्रित करण्यावर माझा भर आहे. यासाठी वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवून अनेक महत्त्वपूर्ण निर्णय तातडीने घेतले. स्वत: अनेक वैद्यकीय महाविद्यालयांना भेटी देऊन विद्यार्थ्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. त्या दूर करण्यासाठी प्रयत्न सुरू केले. राज्यातील प्रत्येक वैद्यकीय महाविद्यालयाची गुणवत्ता आणि दर्जा सुधारण्यासाठी त्यांचे व्हिजन डाक्युमेंट तयार करण्यावर मी भर दिला आहे.'

# दर्जा सुधारणार... गुणवत्ता वाढवणार...

वैद्यकीय शिक्षण मंत्री म्हणून कार्यभार स्वीकारत असतानाच मला याची जाणीव होती की, महाराष्ट्राच्या वैद्यकीय शिक्षणाला एक नवी दिशा देण्याची गरज आहे. कारण वैद्यकीय शिक्षणाची गुणवत्ता व दर्जा वाढवल्यावरच उत्तम डॉक्टर निर्माण होऊ शकतात. महाराष्ट्राची आरोग्यव्यवस्था उत्कृष्ट राखण्यासाठी याच डॉक्टरांचा पुढे उपयोग होणार आहे. ही संकल्पना माझ्या मनात स्पष्ट असल्याने कार्यभार स्वीकारल्यानंतर वैद्यकीय शिक्षणाच्या अनुषंगाने मी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले.

**कॉफी विथ स्टुडंटस्**

वैद्यकीय शिक्षण मंत्री म्हणून मी कामकाजाला सुरुवात केली ती थेट सर्वसामान्यांच्या आयुष्यात महत्त्वाचे मानले जाणाऱ्या रुग्णालयातून. मंत्रिपद स्वीकारल्यावर मी लगेचच जे. जे. रुग्णालयाला भेट दिली तेव्हा तेथील काही वॉर्ड, विद्यार्थ्यांची स्वच्छतागृहे आणि विद्यार्थ्यांच्या वसतिगृहांची पाहणी केली. या वेळी या रुग्णालायातील जवळपास १०० विद्यार्थ्यांशी चर्चा केली. मला विद्यार्थ्यांनी त्यांना भेडसावत असलेल्या समस्या आणि अडचणी सांगितल्या. त्या वेळी माझ्या लक्षात आले की, विद्यार्थ्यांच्या समस्या जाणून घ्यायच्या असतील, त्या समस्यांवर उपाय शोधायचे असतील तर त्यांच्याबरोबर संवाद साधणे आवश्यक आहे. म्हणूनच विद्यार्थ्यांबरोबरचा संवाद मोठ्या प्रमाणावर करण्यासाठी कॉफी विथ स्टुडंट्स असा उपक्रम सुरू केला.

आता सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात मी हा उपक्रम राबवित आहे. विद्यार्थ्यांना कधीही माझ्याशी संपर्क साधता यावा म्हणून मी माझा मोबाइल नंबर, ई-मेल आयडी त्यांना दिला. मला खूप मुलांचे एसएमएस, फोन आले. म्हणूनच आगामी काळात विद्यार्थ्यांच्या समस्या सोडवण्यावर मी भर देणार आहे. हेच विद्यार्थी महाराष्ट्राच्या जनतेचे आरोग्य भविष्यात सांभाळणार असल्याने त्यांना शिक्षण घेताना सर्व सोयीसुविधा मिळणे ही माझी प्राथमिकता आहे. हा उपक्रम राबवताना मी



महाराष्ट्रभर फिरत आहे. नागपूर, कोल्हापूर, औरंगाबाद, धुळे, पुणे आणि अकोला येथे मी दौरे केले. विद्यार्थ्यांशी जवळीक निर्माण करणे, त्यांच्याशी सुसंवाद करणे, त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडवण्याचा प्रयत्न करणे हे माझे प्रमुख उद्दिष्ट आहे.

**विद्यार्थ्यांसाठी तणाव व्यवस्थापन**

आजच्या विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञान माहीत आहे. त्यामुळे प्रत्येक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात वाय फाय सुविधा सुरू करण्यात आली. विद्यार्थ्यांवर असणाऱ्या अभ्यासाचा ताण दूर करण्यासाठी तणाव व्यवस्थापनाचे (स्ट्रेस मॅनेजमेंट) धडे विद्यार्थ्यांना देण्यात येतील. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील सुविधांमध्ये सुधारणा आणि वाढ करण्यात येईल. यामध्ये विद्यार्थ्यांच्या वसतिगृहांचे नूतनीकरण, महाविद्यालयातील उपहारगृह, वातानुकूलित वाचनालय, विश्रांतीगृह यामध्ये सुधारणा करण्यात येतील.

**वैद्यकीय शिक्षण विभागातील पदे**

वैद्यकीय शिक्षण विभागातील पदभरतीबाबत मी स्वत: लक्ष देत आहेत. नुकत्याच झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत वैद्यकीय महाविद्यालयातील साहाय्यक प्राध्यापकांची पदे लोकसेवा आयोगाच्या कक्षेतून वगळण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याचप्रमाणे काही पदे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या धर्तीवर एका वर्षाकरिता लोकसेवा आयोगाच्या कक्षेतून वगळण्याचा निर्णय घेण्यात आला. ही पदे भरण्यासाठी सध्याच्या सेवाप्रवेश नियमांमध्ये सुधारणा करण्यात येतील. वैद्यकीय शिक्षण विभागात परिचारिका आणि वर्ग-४ ची पदे रिक्त असल्याने दैनंदिन कामात अडचणी येतात. त्यामुळे या भरतीला प्राधान्य देऊन याबाबतची कार्यवाही सुरू करण्यात आली.

**व्हिजन डॉक्युमेंट**

प्रत्येक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाने आपल्या महाविद्यालयाचे व्हिजन डॉक्युमेंट तयार करावे, अशा सूचना मी केल्या आहेत. या व्हिजन डॉक्युमेंटमध्ये संबंधित शहरातील एकूण लोकसंख्या, रुग्णालयात येणारे रुग्ण, त्यांना देण्यात येणाऱ्या सुविधा, महाविद्यालयातील यंत्रसामग्री खरेदी आदी बाबींचा समावेश करण्यात येईल. यामुळे भविष्यात या वैद्यकीय महाविद्यालयांची प्रगतीची दिशा स्पष्ट होईल. वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या मुलांना चांगल्या सोयीसुविधा मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रत्येक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे व्हिजन डॉक्युमेंट असावे यासाठी मी आग्रही आहे.

सूर्योदय ते सूर्यास्त या १२ तासांतच शवविच्छेदन (पोस्टमॉर्टेम) होत असल्याने नातेवाईकांना मृतदेह मिळण्यास अनेक तास ताटकळत राहावे लागत असे. मात्र आता २४ तास या निर्णयामुळे ही परिस्थिती बदलेल. त्यामुळेच या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करण्याचे आदेश मी दिले आहेत.




## नवे व्हिजन

- वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समस्या आणि अडचणी तातडीने सोडवण्यासाठी कॉफी वुइथ स्टुडंट्स उपक्रम
- विद्यार्थ्यांवर असणाऱ्या अभ्यासाचा ताण दूर करण्यासाठी तणाव व्यवस्थापन (स्ट्रेस मॅनेजमेंट) धडे
- शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील सुविधांमध्ये सुधारणा आणि वाढ
- विद्यार्थ्यांच्या वसतिगृहांचे नूतनीकरण, महाविद्यालयातील उपहारगृह, वातानुकूलित वाचनालय, विश्रांतीगृह यामध्ये सुधारणा
- विद्यार्थ्यांमधील संसदीय गुणांची ओळख व्हावी, त्यांच्यातील संसदीय कौशल्यांना वाव मिळावा यासाठी प्रत्येक वैद्यकीय महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या निवडणुका
- वैद्यकीय महाविद्यालयातील साहाय्यक प्राध्यापकांची पदे लोकसेवा आयोगाच्या कक्षेतून वगळण्याचा निर्णय.
- परिचारिका आणि वर्ग-४ ची पदे रिक्त असल्याने दैनंदिन कामातील अडचणी दूर करण्यासाठी या भरतीला प्राधान्य
- प्रत्येक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे स्वतंत्र व्हिजन डॉक्युमेंट
- शवविच्छेदन अहवाल कधीही मिळणार

महाराष्ट्र फलोत्पादन क्षेत्रात आघाडीवर आहे. ही आघाडी कायम ठेवत फलोत्पादनासाठी मूल्य साखळी आराखडा तयार करण्याचा निर्णय मी घेतला आहे.

फलोत्पादनात महाराष्ट्र देशात पहिल्या क्रमांकवर आहे. आपल्या राज्यात हापूस आंबा, संत्री, केळी, डाळिंब यांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन होतं. या फळांना जागितक बाजारपेठ मिळवून देण्यासाठी फलोत्पादन मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी अमिताभ बच्चन यांना सदिच्छादूत होण्याची विनंती केली. अमिताभ बच्चन यांनीही श्री. आव्हाड यांच्या विनंतीला मान देऊन



कोणतेही मानधन न घेता सदिच्छादूत म्हणून काम करायला तयारी दर्शविली. श्री.बच्चन यांनी केलेल्या जाहिरातीतून निश्चितच देश आणि विदेश पातळीवर महाराष्ट्रातील फळांना चांगली बाजारपेठ मिळेल असा विश्वास आहे. द्राक्ष, आंबा, संत्री, केळी, डांळिब, काजू यांच्या उत्पादनात आज महाराष्ट्र अव्वल आहे तर आंबा, द्राक्ष, केळी यांच्या निर्यातीतही महाराष्ट्र क्रमांक एकवर आहे. राज्यातील या समृद्ध फलोत्पादनाची माहिती लोकांसमोर आणण्यासाठी अमिताभ बच्चन जाहिराती करीत आहेत.

**– शब्दांकन : वर्षा फडके**



**भास्कर जाधव**
कामगार आणि विशेष साहाय्य मंत्री

'गेल्या साडेचार वर्षात महाराष्ट्रात असंघटित कामगारांच्या हितासाठी महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. त्याद्वारे विविध क्षेत्रातील कामगारांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक उन्नतीला चालना देण्यात आली. बांधकाम कामगार, घर कामगार, रिक्षाचालक, टॅक्सी चालक, मच्छीमार अशा असंघटित घटकांसाठी कल्याणकारी मंडळे स्थापन करून क्रांतिकारक पावले उचलली. याशिवाय इतरही असंघटित घटकांसाठी मंडळे स्थापन करण्यात येऊन त्यांनाही थेट दिलासा दिला जाईल.'

# कामगारांना दिलासा

महाराष्ट्रात असंघटित कामगारांच्या हितासाठी अनेक निर्णय घेऊन त्यांचे सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक हित साधण्यासाठी शासनामार्फत व्यापक प्रयत्न करण्यात आले. बांधकाम कामगार, घर कामगार, रिक्षाचालक, टॅक्सी चालक, मच्छिमार अशा विविध असंघटीत घटकांसाठी कल्याणकारी मंडळे स्थापन करून क्रांतिकारक पावले उचलली. यापुढील काळात इतर क्षेत्रातीलही असंघटित घटकांसाठी कल्याणकारी मंडळे स्थापन करण्यात येतील.

रिक्षा, टॅक्सी चालक आणि मच्छीमारांसाठी असलेल्या स्वतंत्र मंडळामार्फत संबंधित घटकासाठी विविध विमा योजना, मेडिक्लेम योजना, आरोग्य योजना, त्यांच्या मुलांसाठी शिष्यवृत्ती योजना, इतर शैक्षणिक योजना आदी राबवण्यात येईल.

**बांधकाम कामगारांना दिलासा**

इमारत बांधकाम व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाला निधी उपलब्ध करून देण्यासाठी विशेष तरतूद केली जाते. त्यानुसार १० लाख रु. बांधकाम खर्चापेक्षा (जमिनीची किंमत वगळून) जास्त खर्चाच्या रक्कमेवर १ टक्का दराने उपकर वसूल करुन या मंडळाकडे जमा केला जातो. मंडळाकडे आतापर्यंत सुमारे २ हजार कोटी रुपये जमा झाले आहेत. आतापर्यंत सुमारे २ लाख बांधकाम कामगारांनी नोंदणी केली आहे. या निधीमधून विविध योजना राबवण्यात येत आहेत.

बांधकाम कामगारांना कामाच्या ठिकाणी ऊन, वारा, पाऊस, थंडी, डास, इत्यादी समस्यांचा सामना करावा लागतो. त्यांना त्यांच्या कामात मदत व्हावी यासाठी ३ हजार रुपये देण्यात येत आहेत. या रकमेतून जेवणाचा डबा (टिफीन), मच्छरदाणी, ब्लँकेट व दोन चादरी, चटई हे साहित्य खरेदी करता येते. या निधीचे वाटप राज्यभरात सुरू करण्यात आले आहे. ३१ मार्च २०१४ पर्यंत नोंदणी केलेल्या बांधकाम कामगारांना ही मदत मिळेल.

या मंडळात नोंदणीकृत केले कामगारांना विम्याचे मोफत संरक्षण उपलब्ध करून देण्यात आले आहे. कुटुंब आरोग्य विमा योजनेंतर्गत बांधकाम कामगार आणि त्याच्या कुटुंबाला (पत्नी, २ मुले, आई, वडील) दरवर्षी प्रति कुटुंब २ लाख रुपयांपर्यंतचा मेडिक्लेम मिळेल. यात सर्व दुर्धर



आजारांवरील उपचाराचा समावेश आहे.

वैयक्तिक अपघात विमा योजनेंतर्गत सर्व बांधकाम कामगारांचा अपघात विमा उतरवण्यात आला आहे. बांधकाम कामगाराचा अपघाती मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबाला १ लाख रुपयांची भरपाई मिळेल. बांधकाम कामगार अपघातात जखमी झाल्यास त्याला ५० हजार ते १ लाख रुपयांपर्यंत भरपाई दिली जाईल. १८ ते ६० वर्षापर्यंतचे नोंदणीकृत बांधकाम कामगार या योजनेसाठी पात्र आहेत.

या दोन्ही विमा योजनांचा लाभ घेण्यासाठी बांधकाम कामगाराला स्वत: प्रिमिअम (हप्ता) भरण्याची गरज नाही.

**रोहयो कामगारांनाही लाभ**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत काम करणाऱ्या कामगारांची नोंदणी इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात करण्यात येत आहे. या निर्णयामुळे बांधकाम कामगार मंडळामार्फत राबविल्या जाणाऱ्या सर्व योजनांचा लाभ रोहयोवरील पात्र कामगारांनाही मिळत आहे.

**घरेलू कामगारांना १० हजार रुपये**

घरेलू कामगारांसाठीही स्वतंत्र मंडळ गठीत केले आहे. त्यामार्फत घरेलू कामगारांच्या कल्याणासाठी विविध योजना राबवण्यात येत आहेत. कामाच्या ठिकाणी सुरक्षितता, विमा सुरक्षा, वैद्यकीय मदत तसेच त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी विविध योजना राबवण्यात येत आहेत. सुमारे साडेतीन हजार घरेलू कामगार नोंदणीकृत आहेत.

घरेलू कामगार कल्याण मंडळात नोंदणीकृत असलेल्या राज्यातील ५५ वर्षावरील घरेलू कामगारांना १० हजार रुपये सन्मानधन देण्यात येत आहे. कामगार आयुक्तालयाच्या स्थानिक जिल्हा कार्यालयामार्फत सन्मानधनाचे वितरण सुरु आहे.

**योजनांची यशस्वी अंमलबजावणी**

कामगार मंडळाकडे नोंदणी झालेल्या लाभार्थ्यांव्यतिरिक्त इतर मंडळातील लाभार्थ्यांच्या पाल्यांसाठी मंडळाद्वारे इंग्रजी तसेच इतर विदेशी भाषेच्या शिक्षणाचे वर्ग सुरू करण्यात आले आहेत. याशिवाय संगणकाशी संबंधीत प्रशिक्षणाचा कार्यक्रम राबवत आहे. माथाडी कामगारांकडून ५० किलोपेक्षा जास्त वजनाची चढ-उतार किंवा हाताळणी करुन घेण्यास मज्जाव करणारा निर्णय घेण्यात आला आहे. विविध दुकाने, आस्थापना, कारखाने, कंपन्या आदी कोणत्याही ठिकाणी कार्यरत असलेल्या सर्व कामगारांचे वेतन बँकेमार्फत किंवा धनादेशाद्वारे देण्याबाबत नियम करण्यात आला आहे. बंद पडलेल्या गिरण्या, कंपन्या, कारखाने यांच्या जमीनीची विक्री, विकास किंवा हस्तांतरण करताना तसेच एमआयडीसीतील उद्योगांचे हस्तांतरण किंवा विक्री करताना कामगारांची सर्व देणी अदा करून देणी प्रलंबित नसल्याबाबतचे ना हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक करण्यात आले आहे.

बालकामगार प्रथेच्या निर्मूलनासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली टास्क फोर्स. त्याअंतर्गत दुकाने, कारखान्यांवर धाडी टाकून बालकामगारांना मुक्त करून त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न.

अनेक कंपन्यांच्या व्यवस्थापनासोबत झालेल्या बैठकांमध्ये संप संपुष्टात आणून काम पूर्ववत सुरू ठेवणे, निलंबित कामगारांना पुन्हा कामावर घेणे, कामगारांचे वेतन करार, मृत कामगारांच्या वारसास नुकसान भरपाई मंजूर करणे, किमान वेतन दराप्रमाणे वेतन अदा करणे, कामगार कायद्यांची अंमलबजावणी इत्यादी निर्णय मागील साडेचार वर्षात घेतले आहेत.

**भूमिहीन, अल्पभूधारकांसाठी वीमा**

विशेष साहाय्य विभागामार्फत ग्रामीण भागातील १८ ते ५९ वयोगटातील भूमिहीन शेतमजूर तसेच अल्पभूधारकांसाठी आम आदमी विमा योजना राबवली जाते.

या योजनेतून कुटुंबातील नववी ते बारावी इयत्तेत शिकणाऱ्या दोन मुलांना प्रति विद्यार्थी प्रति महिना १०० रुपये शिष्यवृत्ती दिली जाते. लाभार्थ्याचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्याच्या वारसाला ३० हजार रुपये, अपघाती मृत्यू झाल्यास वारसाला ७५ हजार रुपये, अपघातामुळे कायमचे अपंगत्व आल्यास ७५ हजार रुपये, अपघातामुळे दोन्ही डोळे किंवा दोन्ही पाय गमावल्यास ७५ हजार रुपये तसेच अपघातामुळे एक डोळा किंवा एक पाय गमावल्यास ३७ हजार ५०० रुपये आम आदमी विमा योजनेतून दिले जातात.

**राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना**

दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील १८ ते ५९ वयोगटातील कमवत्या व्यक्तीचा अपघाती किंवा नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबीयास राष्ट्रीय कुटुंब लाभ योजनेतून २० हजार रुपयांचे अर्थसाहाय्य दिले जाते.

**- शब्दांकन : इर्शाद ल. बागवान**



## निराधारांना आधार

- विशेष साहाय्य विभागामार्फत वंचित घटकांना दरमहा थेट वेतन (पेन्शन)
- निराधार, वृद्ध, अपंग, विधवा, अनाथ मुले, क्षयरोग, कर्करोग, एड्स, कुष्ठरोग यासारख्या आजारामुळे स्वत:चा चरितार्थ चालवू न शकणारे लोक, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या विधवा, घटस्फोट झालेल्या परंतु पोटगी न मिळालेल्या महिला, घटस्फोटित महिला, अत्याचारित व वेश्या व्यवसायातून मुक्त केलेल्या महिला, तुरुंगात शिक्षा भोगत असलेल्या कुटुंब प्रमुखाची पत्नी, ३५ वर्षे व त्यावरील अविवाहित महिला, तृतीयपंथी यांचा पेन्शन योजनेत समावेश
- संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजनांद्वारे पेन्शन तथा थेट अनुदान
- योजनांमधून प्रतिलाभार्थी ६०० रुपये पेन्शन. या योजनांचे सुमारे ३० लाख लाभार्थी
- या योजनांचा लाभ थेट लाभार्थ्यांपर्यंत जाऊ देण्याचा निर्णय, या पद्धतीत पारदर्शकता राहावी यासाठी बायोमेट्रिक पद्धतीचा अवलंब,
- यामुळे बोगस आणि दुहेरी फायदा घेणाऱ्या लाभार्थ्यांना वगळण्यात यश

# सर्वांत पुढे महाराष्ट्र माझा



**रणजित कांबळे**
पाणी पुरवठा आणि स्वच्छता, अन्न व नागरीपुरवठा, ग्राहक संरक्षण आणि सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री

## गतिमान विकासाचे मार्ग

- राज्याच्या विकासाला गती देण्यासाठी रस्त्याच्या जाळ्यांची निर्मिती. ३९,८०० गावांची बारमाही रस्त्यांनी जोडणी.
- २३ जिल्ह्याची चौपदरी रस्त्यांनी जोडणी.
- नवीन टोल धोरण जाहीर.
- भारतातील तिसऱ्या क्रमांकाच्या उड्डाणपुलाची नाशिक येथे उभारणी.
- राष्ट्रीय महामार्ग क्र. ३ च्या पिंपळगाव-नाशिक -गोंदे मार्गावर ६ पदरी रस्त्याचे बांधकाम पूर्ण. नाशिक शहरातून १२ पदरी रस्ता वाहतुकीसाठी तयार.
- तालुक्याच्या ठिकाणी सर्व शासकीय कार्यालये एकाच इमारतीत असावीत यासाठी कालबद्ध कार्यक्रमाची आखणी. यानुसार ८६ तालुक्याच्या ठिकाणी इमारतीची कामे पूर्ण.

## सर्वांना मुबलक अन्नधान्य

- अन्न सुरक्षा कायद्याची राज्यात १ फेब्रुवारी, २०१४ पासून अंमलबजावणी. या योजनेमुळे ७ कोटी जनतेला अन्नाचा हक्क. त्यांना २ रुपये किलो गहू, ३ रुपये किलो तांदूळ तर इतर भरड धान्य १ रुपया प्रतिकिलो दराने उपलब्ध.
- केरोसीनवर देण्यात येणारे अनुदान आता थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा.
- स्वस्त धान्य दुकानात किती धान्य पाठविले याची माहिती परिसरातील नागरिकांना ग्रुप एसएमएसद्वारे देण्यात येते.
- सार्वजनिक वितरण व्यवस्थेची माहिती घेण्यासाठी अथवा तक्रार नोंदविण्यासाठी १८००२२४९५०/१८००२२२२६२ या नंबरची टोल फ्री हेल्पलाइन सुरु.
- प्रत्येक महिन्याची ७ तारीख हा अन्न दिवस म्हणून पाळण्यात येतो.
- जुलै २०१४ पासून शिधापत्रिकेवर साखरेचे वाटप सुरु.

## घरोघरी स्वच्छ पाणी



- पाणी पुरवठा योजनेबरोबरच जलस्रोतांच्या शाश्वततेसाठी उपाययोजना. बाधित गावे तसेच वाडयांसाठी आवश्यक योजना तसेच पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी स्वतंत्र निधीची तरतूद.
- ग्रामीण पाणीपुरवठा योजनेच्या मंजुरीसाठी वापरल्या जाणाऱ्या दरडोई खर्चाच्या निकषात वाढ.
- राज्यातील सर्व नागरिकांना पाणी पुरवठा व मलनि:सारणाच्या सुविधा करून देण्यासाठी सुजल निर्मल अभियान. या अभियानांतर्गत नागरी भागातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांमधील कुटुंबांसाठी खाजगी नळजोडणी व वैयक्तिक शौचालय बांधणीसाठी अनुदान.
- ग्रामीण भागातील नळ पाणी पुरवठा योजना महिला बचतगटांद्वारे चालविण्यासाठी ग्रामपंचायतीशी लेखी करार.
- दुष्काळी परिस्थितीत गावे-वाड्या वस्त्यांवर आणि दुर्गम भागात टँकरने पाणी पुरवठा.
- सुजल निर्मल योजनेत अनेक ग्रामपंचायती व पंचायत समित्या निर्मलग्राम पुरस्काराने सन्मानित. देशात सर्वात जास्त निर्मल ग्राम पुरस्कार मिळवण्यात महाराष्ट्र अग्रेसर.



# घरकुलाची स्वप्नपूर्ती



**सचिन अहिर**
गृहनिर्माण, गलिच्छ वस्ती सुधारणा, घरदुरुस्ती आणि पुनर्बांधणी, नागरी जमीन कमाल धारणा, उद्योग, खनिकर्म, परिवहन, पर्यावरण व संसदीय कार्य, राज्यमंत्री

- १ जानेवारी २००० पर्यंतच्या झोपडट्टयांना संरक्षण. अशा झोपडीवासीयांची पात्रता तपासण्याबाबत नवीन धोरण निश्चित. १ जानेवारी २००० पूर्वीची झोपडी व त्यामध्ये वास्तव्यास असलेल्या झोपडीधारकाचा निवारा निश्चित. राज्यातील १४ लाख झोपड्यांमधील सुमारे ४० लाख झोपडीवासीयांना लाभ.
- महाराष्ट्र गृहनिर्माण नियमन व विकास अधिनियम २०११ च्या प्रारूपास मान्यता. गृहनिर्माण नियामक प्राधिकरण व अपिलीय प्राधिकरण संपूर्ण राज्याकरिता स्थापन करणार.
- मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतीमधील सुमारे १५ लाख रहिवाशांना पाच लाख रुपयांच्या अपघाती विम्याचे संरक्षण.
- मुंबईतील म्हाडा वसाहतींच्या पुनर्विकासासाठी मुंबई विकास नियंत्रण नियमावलीतील ३३ (५)अंतर्गत तीन चटईक्षेत्र निर्देशांक देण्याचा निर्णय. त्यामुळे म्हाडाच्या जुन्या वसाहतीतील सुमारे ३७०० इमारतींच्या पुनर्वसनाचा मार्ग सुकर.
- सुधारित विकास नियंत्रण नियमावली ३३ (५)अंतर्गत प्रिमियमऐवजी विकासकांकडून तयार घरे (गृहसंचय) घेण्याचा निर्णय.
- म्हाडाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात गृहनिर्मिती करून सर्वसामान्यांना जास्तीत जास्त परवडणारी घरे उपलब्ध करून देण्याचा मानस. त्यासाठी म्हाडाच्या अतिक्रमित जमिनीवर असलेल्या झोपडपट्टयांचा पुनर्विकास.
- म्हाडाची घरे पाच वर्षे भाडयाने न देण्याची अट शिथिल.
- धारावी पुनर्विकास प्रकल्पातील सेक्टर-५ मधील पुनर्विकासाचे काम सुरू. पहिल्या टप्प्यातील १८ मजल्याच्या एका इमारतीचे बांधकाम सुरू. या इमारतींमध्ये ३५६ सदनिका.
- समूह विकास योजनेंतर्गत भेंडी बाजार पुनर्विकास प्रकल्पाला मान्यता.
- मुंबईतील गिरणीकामगारांकरिता बांधण्यात आलेल्या ६९४८ सदनिकांसाठी सोडत काढण्यात आली. या सोडतीमध्ये पात्र कामगारांपैकी सुमारे ४६१५ गिरणीकामगारांना आतापर्यंत घरांचा ताबा.
- सेंच्युरी मीलसह रुबी, प्रकाश कॉटन, ज्युबिली, भारत, वेस्टर्न इंडिया या गिरण्यांच्या जमिनीवर गिरणी कामगारांसाठी घरे व संक्रमण शिबिरे बांधण्याच्या प्रकाल्पाचे भूमीपूजन.
- या प्रकल्पातील ३८४५ सदनिकांपैकी २६१० गिरणी कामगारांसाठी तर १२३५ सदनिका संक्रमण शिबिरासाठी बांधणार.



## सुरळीत आणि सुरक्षित

- राज्यात रिक्षा परवान्यांसाठी लॉटरीद्वारे ६० हजार बेरोजगारांची निवड. त्यांना स्वयंरोजगारांचे साधन उपलब्ध. पूर्णत: पारदर्शक ऑनलाइन पद्धतीने अर्जाची स्वीकृती, छाननी व वाटप .
- नागरिकांचे हेलपाटे टाळण्यासाठी परवाना व नोंदणी प्रमाणपत्रांचा स्पीडपोस्टने बटवडा.
- व्यापारी वाहनांच्या काटेकोर तांत्रिक तपासणीसाठी नाशिक येथे संगणकीकृत वाहन तपासणी केंद्रांची निर्मिती.
- प्रवाशांच्या आरामदायी सेवेसाठी मुंबई महानगरात २० वर्षे जुन्या टॅक्सी व १६ वर्षे जुन्या रिक्षा वापरातून टप्प्याटप्प्याने काढून टाकणे सुरू.
- कर आकारणी अचूकता व नागरिकांच्या सोयींसाठी १५ आरटीओ कार्यालयात इ-पेमेंटद्वारे करभरणा सुविधा.

## समृद्धीची आघाडी

- दिल्ली, मुंबई इंडस्ट्रीयल कॉरिडॉर प्रकल्पातून सुमारे ३ लाख नवीन रोजगार निर्मिती अपेक्षित.
- नवीन औद्योगिक धोरणात लघू व मध्यम उद्योजकांचा प्राधान्याने विचार.
- विदेशी गुंतवणुकीत महाराष्ट्र अव्वल.
- समतोल प्रादेशिक विकासाला प्राधान्य.
- मागील वर्षात २५ नवीन विशाल प्रकल्पांना मान्यता.

## शुद्ध व स्वच्छ

- नदी जलप्रदूषणाची तीव्रता कमी करण्यासाठी व नदीच्या पाण्याची गुणवत्ता राखण्यासाठी राज्य नदी संवर्धन योजना.
- राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजनेंतर्गत राज्यातील १४ तलावांच्या पर्यावरणीयदृष्ट्या संवर्धनाचे प्रकल्प.
- राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत २५ तलावांच्या पर्यावरणीयदृष्ट्या संवर्धनाचे प्रकल्प.

**- शब्दांकन : शांताराम शेरवाडे**

# सक्षम महिला... समर्थ महिला



**प्रा. फौजिया खान**
अल्पसंख्याक विकास (औकाफसह), सांस्कृतिक कार्य, सामान्य प्रशासन, शालेय शिक्षण, माहिती व जनसंपर्क, महिला व बालविकास, राजशिष्टाचार, राज्यमंत्री

- सुकन्या योजना - दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील मुलींच्या जन्मवर्षात शासन २१,२०० रुपयांचा विमा उतरवून १८ व्या वर्षी रु.१ लाख रुपये देणार.
- गुन्हेगारांना कठोरात कठोर शिक्षा शक्य तितक्या लवकर व्हावी यासाठी २५ विशेष जलदगती न्यायालये.
- महिला लोकशाही दिनाचे आयोजन.
- एकात्मिक बाल संरक्षण योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी, अंमलबजावणी व संनियंत्रण समितीच्या भरारी पथकाची स्थापना.
- कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठी ३० संरक्षण अधिकाऱ्यांची भरती.
- अंगणवाड्यांमधील आहाराची महिन्यातून किमान एकदा तपासणी करण्यासाठी माता समितीची स्थापना.
- महिलांच्या तक्रारींसाठी १०५ समुपदेशन केंद्रे.
- बालवाड्यांमधून मातृभाषेतून शिक्षण.



## शैक्षणिक आघाडी

- विद्यार्थ्यांच्या उपस्थितीबद्दल विशेष पटपडताळणी मोहीम. ५००० शाळांच्या मूल्यांकनास मान्यता. वाढीव तुकड्यांना मान्यता
- विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात शिष्यवृत्तीची रक्कम जमा.
- राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यानुसार अभ्यासक्रमाची मांडणी

## आम्ही सर्वांसोबत

- सरकारी नोकऱ्या आणि शैक्षणिक संस्थांमध्ये अनारक्षित मुस्लिम समाजाला ५ टक्के आरक्षण.
- अल्पसंख्याकबहुल शाळांमध्ये मूलभूत सुविधांच्या निर्मितीसाठी ८,१८५ शाळांना एकंदर १६० कोटी रुपयांच्या निधीचे वितरण.
- मागील साडेचार वर्षात सुमारे २५ लाख विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी शिष्यवृत्तीचे वितरण
- मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत आतापर्यंत ८,७७० विद्यार्थ्यांना सुमारे ५३ कोटी रुपयांचे शैक्षणिक कर्ज वितरित. बेरोजगारांना प्रत्येकी सुमारे ४० हजार रुपयांचे कर्ज वाटप सुरू.
- अल्पसंख्याक मुलींचे शिक्षणातील प्रमाण वाढावे यासाठी सर्व जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी १०० प्रवेश क्षमतेची वसतिगृहे बांधण्याचा निर्णय.
- अल्पसंख्याकांच्या अर्थसंकल्पीय तरतुदीत भरीव वाढ. चालू आर्थिक वर्षासाठी ५०० कोटी रुपयांची तरतूद.
- पोलीस भरतीच्या पूर्व तयारीसाठी शासनामार्फत अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना प्रशिक्षण.

## आरोग्यम् धनसंपदा

- गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदानतंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी.
- राज्यात सोनोग्राफी केंद्रांची तपासणी करण्यासाठी धडक मोहीम.
- मानवी अवयव प्रत्यारोपण अधिनियम १९९४ ची प्रभावी अंमलबजावणी
- दंतशल्य चिकित्सक सेवेचे विस्तारीकरण
- प्रत्येक जिल्हयात १०० खाटांची स्त्री रुग्णालये.
- राजीव गांधी जीवनदायी योजना, जीवन अमृत सेवा योजना (ब्लड ऑन कॉल) आणि आप्तकालीन वैद्यकीय सेवेची राज्यात यशस्वी अंमलबजावणी. राजीव गांधी जीवनदायी योजनेंतर्गत सुमारे २.५० लाख रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया.

## स्मार्ट प्रशासन

- स्वत:चे ई-प्रशासन धोरण तयार करून ते राबविणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य.
- आधार प्रकल्पांतर्गद १५ जून, २०१४ अखेर राज्यातील ९.७३ कोटी रहिवाशांची नोंदणी. ८.७३ कोटी रहिवाशांच्या आधारक्रमांकाची निर्मिती.
- ३११७५ महा-ई-सेवा केंद्रांची स्थापना. या केंद्रांद्वारे शासनाकडून देण्यात येणारे विविध २७ प्रकारचे दाखले वितरित.
- माहिती तंत्रज्ञान संचालनालयातर्फे नागरिकांना सर्व्हे, ऑडिट, जीआर सर्च. इत्यादि ॲन्ड्रॉइड मोबाइल ॲप्लिकेशन उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत.

## सांस्कृतिक कार्य विभाग

- वृद्ध कलावंत मानधन योजना
- प्रायोगिक नाटकांचा महोत्सव व अनुदान योजना
- भारतरत्न पं. भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत प्रोत्साहन योजना
- लुप्त होणाऱ्या कला/पारंपरिक वाद्ये यांचे जतन करण्यासाठी अर्थसाहाय्य
- राज्य संरक्षित स्मारकांचे जतन व दुरुस्ती
- जिल्हा मुख्यालय नाटयगृह बांधकाम अर्थसाहाय्य योजना.

**- शब्दांकन: अजय जाधव**

# गावांचा चौफेर विकास



**सतेज पाटील**
गृह (शहरे व ग्रामीण), ग्रामविकास
आणि फलोत्पादन, राज्यमंत्री



- 'संग्राम प्रकल्प' (संगणकीय ग्रामीण महाराष्ट्र) या नावाने ई पंचायतीची संपूर्ण राज्यात अंमलबजावणी.
- राज्यातील ग्रामपंचायतीच्या दैनंदिन कामाचे डिजिटायझेशन करण्यासाठी (१ ते २७ नमूने) संग्रामसॉफ्ट विकसित पंचायतीराज संस्थांकडून देण्यात येणारे सर्व दाखले संगणकीकृत स्वरूपात देणे बंधनकारक.
- ई-पंचायत प्रकल्पांतर्गत आतापर्यंत एकूण १० सॉफ्टवेअर ऑनलाइन वापरासाठी उपलब्ध. या वापराबाबत महाराष्ट्र संपूर्ण देशात अग्रेसर आहे.
- राज्यातील पंचायतीपैकी २५,९४५ ग्रामपंचायतींना इंटरनेटसेवा उपलब्ध. त्यामुळे ग्रामपंचायतींचे काम गतिमान आणि पारदर्शक.
- प्रत्येक जिल्हापरिषदेची व्हिडिओ कॉन्फरन्स यंत्रणेद्वारे मंत्रालयाला जोडणी.
- ई-पंचायत प्रकल्प अंमलबजावणीमध्ये संपूर्ण देशात महाराष्ट्र अग्रेसर.
- इंदिरा आवास योजनेंतर्गत निवारा नसलेल्या दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांसाठी ५ लाख घरांचे बांधकाम.
- स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेंतर्गत ३४,५५७ बचत गटांना रु. ९८१ कोटींच्या पतरकमेसह रु. ३९८ कोटींची सबसिडी.
- १६,४४३ ग्रामपंचायतींना पर्यावरण समृद्ध ग्राम योजनेंतर्गत स्वच्छ, हरित गावाच्या शाश्वत विकासासाठी ६९० कोटी रुपयांचे अनुदान.



- पर्यावरणसमृद्ध ग्राम योजनेला मुदतवाढ.
- पंचायती राज संस्थांमधील तिन्ही स्तरांवर महिलांसाठी ५० टक्के आरक्षण.
- ग्रामविकासाच्या विविध योजना प्रभावीपणे राबविल्याबद्दल व ई-पंचायत योजनेमध्ये उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल महाराष्ट्राला देश पातळीवर विविध पुरस्कार.
- पंचायतराज संस्थांच्या तिन्ही स्तरांवर निवडून आलेल्या महिलांमधून ९९ महिलांची पंचायत महिलाशक्ती अभियान संघटनेची स्थापना. ही संघटना महिला सक्षमीकरणासाठी प्रयत्न करणार. देशातील हा पहिलाच उपक्रम.
- राज्यातील २०००० ग्रामपंचायतींमध्ये ई-बँकिंग सेवा उपलब्ध करून देणार.

## सद्‌रक्षणाय खलनिग्रहणाय

- ४५ पोलीस मुख्यालयांमध्ये आणि सर्व पोलीस ठाण्यांमध्ये महिला सुरक्षा समित्या. संकटात असणाऱ्या महिलांना कायदेशीर साहाय्य.
- महिलांबाबतची प्रकरणे हाताळण्यासाठी पोलीस मुख्यालयांमध्ये सामाजिक सुरक्षा कक्ष.
- राज्यातील पोलीस ठाण्यांमध्ये ९० समुपदेशन केंद्रे. आपत्तीत असलेल्या महिलांसाठी आणि खासकरून कौटुंबिक भांडणे सोडवण्यासाठी या केंद्रांचे साहाय्य.
- महिला आणि बालकांच्या अनैतिक व्यापाराला प्रतिबंध घालण्यासाठी एस.टी. स्थानकांवर ३३० मदत केंद्रे.
- आपत्तीमधील महिलांना मदत करण्यासाठी मुंबई, ठाणे आणि नवी मुंबई येथे १०३ आणि राज्यातील इतर ठिकाणी १०९१ हा टोल फ्री क्रमांक.
- महिलांविरुद्धचे गुन्हे त्वरित निकालात काढण्यासाठी खास न्यायालय.
- ४५ पोलीस मुख्यालयांमध्ये तसेच सीआयडी मुख्यालय, पुणे येथे तक्रार समित्या.


**- शब्दांकन : राहुल भालेराव**

# सुयोग्य नियोजन.. गतिमान प्रगती



**राजेंद्र मुळक**
वित्त, ऊर्जा, नियोजन, जलसंपदा
आणि संसदीय कार्य राज्यमंत्री


- तुकाराम महाराज जन्म चतु:शताब्दी वर्षानिमित्त श्रीक्षेत्र देहू आळंदी, भंडारा डोंगर, पंढरपूर व पालखी तळ/ मार्गावरील पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी विशेष आराखडा मंजूर. ही सर्व कामे जून २०१६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन.



- शासनाच्या धोरणात्मक व प्रशासकीय निर्णय प्रक्रियेकरिता एकसूत्र, अचूक व अद्ययावत सांख्यिकी माहिती एकत्रित उपलब्ध व्हावी यासाठी वेबआधारित राज्य माहिती संचयिकेची निर्मिती.
- जिल्ह्यांच्या अडचणी दूर करण्यास वाव राहावा या हेतूने जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत नावीन्यपूर्ण योजना राबवण्याचा निर्णय.
- राज्यात काही जिल्ह्यांमध्ये २०१३-१४ मध्ये अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या नुकसानीच्या अनुषंगाने करावयाच्या विविध २२ उपाययोजनांसाठी जिल्हा वार्षिक योजनेमधून संबंधित जिल्ह्यांच्या एकूण नियतव्ययापैकी १५ टक्के इतका निधी खर्च करण्याचा निर्णय.
- कृषिभूषण व शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख ऊर्फ भाऊसाहेब देशमुखांच्या (पापळ, ता. नांदगाव (खंडेश्वर), जि. अमरावती) येथील जन्मस्थळाचा विकास आराखडा तयार.
- नागपूर शहरातील हजरतबाबा ताजुद्दीन यांचा ताजबाग येथे असलेला दर्गा व त्या परिसराचा विकास व सौंदर्यीकरण आराखडा तयार. या वित्तीय वर्षापासून सेवाग्राम विकास योजना प्रस्तावित. त्यास प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सुरू.
- या वर्षात नागपूर येथील रामटेक गडमंदिर परिसराचा विकास करण्याची योजना प्रस्तावित.
- विक्रीकर विभागाचा पहिले अडथळा विरहित आधुनिक संगणकीकृत सीमा तपासणी नाके सुरू करण्याचा निर्णय. राज्यातील सर्व व्यापारी आणि वाहतूकदार यांना परराज्यातून माल मागवण्यासाठी तसेच परराज्यात माल पाठवण्यासाठी बिनचूक ई-वे-बिल भरल्यास त्या वाहनास महाराष्ट्राच्या सीमेवर तपासणीसाठी थांबवले जाणार नाही. अशाप्रकारचे देशातील किंबहुना जगातील पहिले ३२ तपासणी नाके विक्रीकर विभाग सुरू करीत आहे.
- बंदरे आणि काही रेल्वे स्थानकांवर ही आधुनिक संगणकीकृत सीमा तपासणी नाके सुरू करण्यात येणार आहेत.

## उजळता महाराष्ट्र

- गावठाण फिडर सेपरेशन योजनेंतर्गत १६,४८० गावांना फायदा. सिंगल फेजिंग योजनेंतर्गत १४९४७ गावांना फायदा. वर्षाला १,२०,०० कृषिपंपाना वीज पुरवठा.
- ग्राहकांना चांगली सेवा देणे, विद्युत वितरण प्रणालित वीज हानी कमी करणे, ग्राहकांना सुरळीत व पुरेशा दाबाने वीजपुरवठा व्हावा म्हणून पायाभूत सुविधा आराखडा प्रकल्प मागील तीन वर्षे राबवण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत ६०६ नवीन उपकेंद्रे व ३७६ उपकेंद्रांची क्षमतावाढ तसेच ६९,८७० नवीन वितरण रोहित्रे, उच्चदाब वाहिनी ४,२८९ कि.मी., लघुदाब वाहिनी १२,१२७, कि.मी. इत्यादींची कामे पूर्ण.



- विजेच्या झपाट्याने वाढणाऱ्या मागणीचा विचार करून महावितरण कंपनीच्या रु. ५,५५६ कोटी इतक्या रकमेचा पायाभूत आराखडा योजना - टप्पा दोन तसेच रु.९४३५ कोटी इतक्या रकमेच्या वितरण प्रणालीच्या वृद्धीकरण व आधुनिकीकरण प्रकल्पास शासनाची मंजुरी.
- महानिर्मितीच्या माध्यमातून ९३८५ मेगावॅट अतिरिक्त वीजनिर्मितीची क्षमता उपलब्ध होणार.
- भुसावळ येथे ५०० मे. वॅटचे दोन, खापरखेडा येथे ५०० मे. वॅटचा एक प्रकल्प सुरू. नवीन वीज प्रकल्प उभारणीचे काम युद्धपातळीवर सुरू असून या प्रकल्पातून ३२३० मे. वॅट वीजनिर्मिती शक्य.
- पारस येथे २५० तर धुळे जिल्ह्यातील दोडांई येथे ६६० मे. वॅटचे ५ संच उभारण्याचे नियोजन. चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र येथे एकूण ५ मेगावॅट क्षमतेचे सौर संच उभारण्याचे काम पूर्ण. साक्री, शिवाजीनगर, जिल्हा धुळे येथील सौर प्रकल्प उभारणीची कामे पूर्ण. १२५ मेगावॅट प्रकल्पातून प्रत्यक्ष वीजनिर्मिती सुरू.
- ओरिसातील मच्छकट्टा कोळसा क्षेत्रातून २० दशलक्ष मेट्रिक टन इतक्या कोळशाचे अतिरिक्त उत्खनन करण्यासाठी शासनाची मान्यता. त्यामुळे ५० दशलक्ष मेट्रिक टन कोळसा आगामी काळात महानिर्मितीच्या विस्तारित प्रकल्पांना मिळेल.

**-शब्दांकन : हेमंतकुमार खैरे**

# दर्जेदार उच्चशिक्षण



**डी. पी. सावंत**
वैद्यकीय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण आणि विशेष साहाय्य, राज्यमंत्री

- शिक्षण अधिकाधिक रोजगाराभिमुख करण्यावर लक्ष केंद्रित.
- राज्यातील सर्व महाविद्यालयांना नॅकचे मानांकन घेणे अनिवार्य.
- रोजगार कौशल्य विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी ९५७ व्यवसाय प्रशिक्षण प्रवर्तकांमार्फत रोजगार सुलभ कौशल्य कार्यक्रमास सुरुवात.
- मुंबई, औरंगाबाद व नागपूर येथे न्याय साहाय्य विज्ञान महाविद्यालये स्थापन.
- तंत्र शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता सुधारण्यासाठी ३३७ कोटी रुपयांची तरतूद.
- आदिवासी व डोंगराळ क्षेत्रातील २८ शासकीय निवासी शाळांचे निवासी व्यवसाय प्रशिक्षण आश्रमशाळात रूपांतर. प्रवेशप्रक्रियेत मुलींसाठी ५० टक्के जागा राखीव.
- सर्व विधी अभ्यासक्रम एका छत्राखाली आणण्यासाठी राज्यात तीन विधी विद्यापीठांची स्थापना करण्यास मान्यता. त्यापैकी औरंगाबाद व मुंबई येथील विद्यापीठे स्थापन. नागपूर येथील विद्यापीठ प्रस्तावित.
- प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रमांचा प्रवेश पारदर्शक आणि सुलभ करण्यासाठी ऑनलाइन आणि केंद्रीभूत प्रक्रिया.
- शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या व्यवहाराबाबत गैरसमज राहू नयेत म्हणून सर्व ग्रंथालयांची पटपडताळणी.
- मुलींची उच्च शिक्षणातील गळती कमी व्हावी यासाठी व्यवसाय अभ्यासक्रमाच्या ५० टक्के जागा मुलींसाठी राखीव. उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी राज्यात १३ प्रियदर्शनी वसतिगृहे. आणखी १४ वसतिगृहे बांधण्यास मान्यता. यामुळे वसतिगृहांची प्रवेश क्षमता २२५० ने वाढणार.
- शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना शैक्षणिक वर्ष २०१३ -१४ मध्येही सुरू. अभियांत्रिकी, औषध निर्माण शास्त्र, एचएमसीटी या पदविका आणि पदवी अभ्यासक्रमांचा तसेच वास्तुशास्त्र या पदवी आणि एम.बी.ए. व एम.सी.ए. या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांचा या योजनेत समावेश. आर्थिक दुर्बल घटकातील ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न १ लाख रुपयांच्या आत आहे त्यांना या योजनेचा लाभ.



## वैद्यकीय शिक्षण

- प्रत्येक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे 'व्हिजन डॉक्युमेंट' तयार करणार. भविष्यात या वैद्यकीय महाविद्यालयांची प्रगती कशी होणार याचा स्वयंस्पष्ट आराखडा यामध्ये समाविष्ट केला जाणार.



- सर्व शासकीय महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या निवडणुका होणार.
- वैद्यकीय महाविद्यालयाशी निगडित रुग्णालयात २४ तास पोस्टमार्टम सेवा उपलब्ध. त्यामुळे मृताच्या नातेवाईकांना यापुढे ताटकळत रहावे लागणार नाही व त्यांच्यावरचा ताण कमी होईल.
- परिचारिका आणि वर्ग-४ ची पदे रिक्त असल्याने शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या दैनंदिन कामात अडचणी येतात. त्यामुळे या भरतीला प्राधान्य देऊन याबाबतची कार्यवाही सुरू.

# आदिवासींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी



**राजेंद्र गावित**
आदिवासी विकास, कामगार, लाभक्षेत्र विकास, राज्यमंत्री




- आदिवासी विकास विभागांतर्गत स्वतंत्र शिक्षण विभागाची स्थापना. या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी १९६१ नवीन पदे निर्माण करण्यास मान्यता.
- शासकीय आश्रमशाळेतील इ. १ ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या जात पडताळणी प्रमाणपत्राची शालेय स्तरावरच उपलब्धता.
- आदिवासी क्षेत्रात आठ जिल्ह्यातील २९ तालुक्यात एकाधिकार खरेदी योजना पुन्हा सुरु. १९५ खरेदी केंद्रांना मान्यता व अंमलबजावणी सुरू.
- केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्यूक्लिअस बजेट योजना) या योजनेच्या प्रतिलाभार्थी अनुदान मर्यादेत रु. १५,००० वरून रु. ५०,००० वाढ
- ठक्करबाप्पा वस्ती सुधार योजनेसाठी २०१४-१५ या वर्षाकरिता रु. २६१ कोटींची तरतूद.
- आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती ऑनलाइन.
- आदिवासी मुलींकरिता सुकन्या योजनेंतर्गत २०१४-१५ साठी रु. २४ कोटींची तरतूद.
- आदिवासी उपाययोजनेच्या पुनर्विलोकनासाठी समितीची स्थापना.
- आदिवासींना सुलभ सेवा पुरवण्यासाठी नवीन ५ प्रकल्प कार्यालयांची निर्मिती. विद्यमान प्रकल्प कार्यालयात कर्मचारी संख्येत वाढ.
- अनुसूचित जमातींच्या २३५ विद्यार्थ्यांना दरवर्षी संघ लोकसेवा आयोग व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या प्रशासकीय सेवेतील संधी प्राप्त करून देण्यासाठी स्पर्धापरीक्षांचे प्रशिक्षण.
- कौशल्य विकास योजनेंतर्गत १ लाख आदिवासी तरुणांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण. स्पर्धा परीक्षांसाठी विद्यापीठांमार्फत अनुसूचित जमाती सवंर्गातील विद्यार्थ्यांना प्रशिक्षण. आदिवासी आश्रमशाळांमध्ये औद्योगिक प्रशिक्षण केंद्रे स्थापन करणार.
- आदिवासी विद्यार्थ्यांमधील शाळा सोडण्याचे प्रमाण कमी व्हावे या हेतूने सुवर्ण जयंती आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना. या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ अंदाजे १२ लाख विद्यार्थ्यांना.



## कामगारांचे कल्याण

- बांधकाम व्यवसायातील असंघटित कामगारांची सुरक्षितता व कल्याणाकरिता महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ
- औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाचे बळकटीकरण.
- महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळाची स्थापना.
- औद्योगिक न्यायालयांचे बळकटीकरण.

## फळे रसाळ गोमटी



- दुष्काळग्रस्त १८ जिल्ह्यांमध्ये राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत फळबाग पुनर्जीवनासाठी रु.६५६ कोटींचे शेतकऱ्यांना वाटप. प्रति हेक्टर रु. ३०,००० प्रमाणे आर्थिक मदत.
- २०१२-१३ पर्यंत ६,४९० सामूहिक शेततळी पूर्ण.
- नारळ पिकासाठी स्वतंत्र फळपीक विमा योजना कार्यान्वित.
- राज्यातील २०१३-१४ मध्ये पडलेल्या दुष्काळात संपूर्ण जळालेल्या फळबागांना रोजगार हमी योजनेशी निगडित पुनर्लागवड कार्यक्रम. २०,००० हेक्टरला मंजुरी.

**– शब्दांकन : आकाश जगधने**

# तत्पर प्रशासन... तत्काळ दिलासा



**सुरेश धस**

महसूल, पुनर्वसन व मदत कार्य, भूकंप पुनर्वसन, सहकार, पणन व वस्त्रोद्योग, जलसंधारण व रोजगार हमी योजना, राज्यमंत्री



- २०१३ च्या अतिवृष्टी/ पुरामुळे बाधित शेतकऱ्यांना १०४१ कोटी रुपये अर्थसाहाय्य.
- गेल्या दोन वर्षात खरीप व रब्बी शेतकऱ्यांना केलेले अर्थसाहाय्य २७८३ कोटी रुपये.
- कापूस, सोयाबीन, धान उत्पादन शेतकऱ्यांना २००० कोटी रुपयांचे अर्थसाहाय्य.
- २०१३-१४ मध्ये चारा छावण्यांकरिता ६७६.९७ कोटी रुपये निधी वितरित .
- २०१४ (फेब्रुवारी- मार्च) गारपीट व अवकाळी पाऊस यामुळे बाधित व्यक्तींना ५४० कोटी रुपयांचे अर्थसाहाय्य.
- टंचाईग्रस्त जिल्ह्यांना पेयजल पुरवठा करण्यासाठी आवश्यक व निकडीच्या पाणीपुरवठा योजनांच्या दुरुस्तीसाठी ४१८ कोटी रुपये .
- उत्तराखंड राज्यास पूर परिस्थितीत मदत म्हणून १० कोटी रुपये.

## सहकार

- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम २०१३ संमत
- सहकारी संस्था स्थापनेच्या अधिकाराला घटनेच्या मूलभूत अधिकाराचा दर्जा देणारी ९७वी घटना दुरुस्ती मंजूर. या दुरुस्तीन्वये सहकारी संस्था अधिनियम १९६० यामध्ये बदल.




- सावकारी पाशाला आळा घालण्यासाठी महाराष्ट्र सावकारी नियमन अधिनियम २०१४ हा कायदा राज्यात लागू

## पणन

- बाजार समित्यांच्या संख्येत २९५ वरून ३०२ अशी वाढ.
- बाजार समित्यांच्या वार्षिक उलाढालीत रु.३८,७४३ कोटीवरून रु.४६,२८७ कोटीपर्यंत वाढ, तर उत्पन्नात रु.४३९.४७ कोटीवरून रु.५४२.८५ कोटीपर्यंत वाढ.
- शासनाच्या पाठपुराव्यामुळे केंद्राकडून कांदा निर्यातबंदी मागे
- शेतमाल तारण योजनेंतर्गत रु. २० कोटीचे अर्थसाहाय्य.
- ४० वखार केंद्र विकसित.
- पणन मंडळास ॲक्रेडिशन एजन्सी म्हणून मान्यता.

## रोजागाराची हमी



- रोजगार हमी योजनेच्या भत्यात २५ टक्क्यांवरून ५० टक्क्यांपर्यंत वाढ.
- सर्व मनरेगा प्रकल्पांमध्ये ई-हजेरीपत्रकांचा १०० टक्के उपयोग.
- प्रत्येक पंधरवड्यात ग्राम रोजगार दिवसाचे आयोजन.
- मनरेगामधून जवाहर विहिरींचे काम पूर्ण करण्याचा निर्णय.
- १४२ 'क' वर्गीय नगरपालिका आणि पंचायतीमध्ये महाराष्ट्र रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी.
- १५ जिल्ह्यांमध्ये सूक्ष्म पाणलोट कार्यक्रम. १० ते १५ गावांमधील ५,००० ते ७,००० हेक्टर पाणलोट गटाचा विकास.

## एक धागा समृद्धीचा



- राज्यात उत्पादित होणाऱ्या संपूर्ण कापसावर राज्यातच प्रक्रिया व्हावी यासाठी नवीन वस्त्रोद्योग धोरण
- या धोरणाच्या माध्यमातून येत्या पाच वर्षात सुमारे ४० हजार कोटी रुपयांची नवी गुंतवणूक अपेक्षित.
- या धोरणामुळे सुमारे ११ लाख नव्या रोजगाराची निर्मिती शक्य. कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या कापसालाही यामुळे वाढीव भाव मिळेल.
- वस्त्रोद्योग कामगारांसाठी घरकूल योजना

## तत्पर प्रशासन



- वास्तव्य, उत्पन्न, जात, ज्येष्ठ नागरिक यांसारखे विविध दाखले त्वरित देण्यासाठी शिबिरे. २०११-१२ आणि २०१२-१३ मध्ये १ कोटी १७ लाख ११ हजार ९१९ दाखले वितरित.
- शेतातील वहिवाटींच्या रस्त्यांवरील अतिक्रमणे काढून टाकण्यासाठी विशेष मोहीम. लोक सहभागातून २०११-१२ मध्ये २५ हजार ३२५ किमी तसेच २०१२-१३ मध्ये १८ हजार ३६० किमी रस्ते अतिक्रमणमुक्त.
- फेरफार अदालतीच्या माध्यमातून ८.७ लाख प्रकरणे निकाली.
- आदिवासींना जमिनीच्या व्यवहारात संरक्षण मिळावे यासाठी १९७४ च्या महाराष्ट्र जमीन महसूल (अनुसूचित जमातीस जमिनीची पुन:स्थापना करणे) कायद्यास २०३४ सालापर्यंत मुदतवाढ.
- जमीन मोजणीतील दिरंगाई आणि अनिश्चितता दूर करण्यासाठी ई-मोजणी. गेल्या वर्षभरात ६७ हजार ८७६ प्रकरणे मार्गी.

# गौरव मराठीचा; सन्मान मराठीचा



**उदय सामंत**
नगर विकास, वने, बंदरे, खार जमीन, क्रीडा व युवक कल्याण, माजी सैनिकांचे कल्याण, विधी व न्याय, मत्स्यव्यवसाय व मराठी भाषा, राज्यमंत्री



- मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी समिती स्थापन करुन समितीचा अहवाल केंद्र शासनाकडे पाठवण्यात आला आहे.
- मराठी विश्वकोशाचे १९ खंड डिजिटाइज्ड स्वरूपात संकेतस्थळावर
- दुर्मीळ ग्रंथांचे डिजिटायझेशन.
- साहित्य संस्कृती मंडळ, भाषा संचालनालय, राज्य मराठी विकास संस्था यांनी प्रकाशित केलेल्या ग्रंथांच्या ई पुस्तकाची निर्मिती.
- निवडक संत साहित्य, ज्ञानपीठ पारितोषिक विजेते व इतर सर्वोत्कृष्ट साहित्यावर आधारित श्राव्य पुस्तके (ऑडिओ बुक)
- मुंबई येथे मराठी भाषा भवन बांधणार
- मोडी हस्तलिखितांचे देवनागरीमध्ये (मराठीत) रूपांतर करण्याचा प्रकल्प.

## गतिमान न्यायव्यवस्था

- न्यायप्रक्रिया जलद व पारदर्शक करण्यासाठी केंद्र पुरस्कृत योजनेची समाप्ती झाल्यानंतर राज्यशासनाने आपल्या आर्थिक तरतूदीमध्ये १०० जलदगती न्यायालये सुरू ठेवली आहेत.
- महिलांवरील अत्याचारांची प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी १३ विशेष न्यायालये.
- उच्च न्यायालयातील २५ जलदगती न्यायालये सुरू करण्याची विनंती.
- भ्रष्टाचाराची प्रकरणे हाताळण्यासाठी ९ विशेष न्यायालये तर अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंध प्रकरणांसाठी ६ विशेष न्यायालये.
- लोकअदालत व महालोकअदालतीद्वारे १७ लाखांपेक्षा अधिक प्रकरणे निकाली.
- राज्यात २०० सकाळ आणि २०० सायंकालीन न्यायालये सुरू.
- ई-कोर्टाची स्थापना केल्यामुळे इंटिग्रेटेड इलेक्ट्रॉनिक लिटिगेशन पद्धतीद्वारे वेळेची बचत
- २४ कौटुंबिक न्यायालये सुरू
- निबंधक कार्यालयाचे संगणकीकरण, धर्मादाय आयुक्त कार्यालयाचे संगणकीकरण
- ठाणे जिल्हयातील उत्तन येथे जागतिक दर्जाची न्यायिक प्रशिक्षण अकादमी

## समृद्धीची हिरवाई

- दहा वन्यप्राणी अभयारण्ये जाहीर. संरक्षित क्षेत्रातील खेड्यांचे पुनर्वसन.
- वाघ संरक्षण आणि संवर्धन उपाययोजनांमुळे वाघांची संख्या २०० वर.
- महाराष्ट्राचा सर्वोत्कृष्ट व्याघ्र राज्य २०१३ म्हणून सँक्च्युअरी मासिकामार्फत गौरव.
- राज्य जैवविविधता मंडळाची स्थापना.
- स्थानिक गावकऱ्यांच्या समितीस तेंदू पत्ता विक्रीचे परवाने.

## बंदरे

- ग्रीनफील्ड पोर्ट पॉलिसी मंजूर. बंदर विकासाची प्रक्रिया गतिमान झाली.
- नवीन बंदर धोरण जाहीर. बंदरांना प्रथमच उद्योगाचा दर्जा.
- बंदर विकासकांना गौणखनिजावरील रॉयल्टी आणि मुद्रांक शुल्कातून सुट
- महाराष्ट्र मेरिटाइम बोर्डामार्फत मासेमारी नौकांची ऑनलाइन नोंदणी सुरू.
- समुद्र किनारपट्टीनजीक राहणाऱ्या नागरिकांच्या जीविताचे व मालमत्तेचे समुद्राच्या लाटांपासून संरक्षण करण्यासाठी समुद्रधूपप्रतिबंधक उपाययोजनांसाठी किनारा संरक्षण व व्यवस्थापन प्रकल्प.

## स्मार्ट शहरे

- नवी मुंबई, पुणे व नागपूर मेट्रो रेल प्रकल्पांना तत्वत: मंजुरी.
- मोबाईल टॉवर्स उभारणीसाठीचे धोरण प्रारूप प्रसिद्ध. अंतिम धोरण लवकरच.
- बृहन्मुंबईतील कोळीवाड्याच्या पुनर्विकासासाठी गावठाणांच्या धर्तीवर २ चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय. अधिसूचना निर्गमित.
- मुंबईत २५ हजारांपेक्षा अधिक शौचालयांची निर्मिती.
- टाऊनशिप प्रकल्पांसाठी आकर्षक धोरण, भाडेतत्त्वावरील गृहनिर्मितीसाठी सवलती.
- विकास नियंत्रक नियमावलीमध्ये शासनाने सुधारणा केल्याने अत्यल्प, अल्प, मध्यम आणि उच्च उत्पन्न गटासाठी वाढीव चटईक्षेत्रासह अधिक सदनिका उपलब्ध.
- इंदू मिल क्रमांक ६ च्या जमिनीवर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक उभारण्यासाठी केंद्र शासनाची मान्यता.
- १३८ तालुक्यांमध्ये नवीन नगरपंचायत आणि नगरपरिषदांची स्थापना.
- मुंबईत ३६ स्कायवॉक पादचाऱ्यांसाठी खुले.



**- शब्दांकन : विष्णू काकडे**

# सर्वांचा सन्मान.. सर्वांना न्याय



**संजय सावकारे**

कृषी, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास, रोजगार व स्वयंरोजगार, सामाजिक न्याय, व्यसनमुक्ती कार्य, विमुक्त/भटक्या जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण, राज्यमंत्री



- व्यसनामुळे माणसाची व्यक्तिगत आणि सामाजिक हानी रोखण्यासाठी व्यसनमुक्ती धोरण.
- ज्येष्ठ नागरिकांचे आयुष्य सुसह्य व्हावे यासाठी ज्येष्ठ नागरिक धोरण जाहीर
- ज्येष्ठ नागरिक धोरणानुसार ज्यष्ठांसाठी समुपदेशन केंद्रे, वृद्धाश्रमांना सवलती व अनुदान.
- रमाई आवास योजनेंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द कुटुंबाला २६९ चौ.फूटाचे घर स्वत:च्या जागेवर अथवा कच्च्या घराच्या जागेवर बांधून देणार.
- भटक्या जाती व जमाती या घटकास मूळ प्रवाहात आणण्यासाठी शासनाने यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना. ग्रामपंचायत, पंचायत समिती क्षेत्रातील विमुक्त जाती व भटक्या जमाती या घटकास २६९ चौ.फू. क्षेत्रफळाची पक्की घरे बांधून देण्यात येणार.
- अनुसूचित जातींच्या ज्या विद्यार्थ्यांना परदेशात जाऊन उच्चशिक्षण घ्यायचे आहे त्यांच्यासाठी परदेश शिष्यवृत्ती योजना. विद्यार्थ्यांचा शैक्षणिक खर्च आणि राहण्याचा खर्च शासनामार्फत. आतापर्यंत जवळपास १५० विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ. देशांतर्गत उच्चशिक्षण घेण्यासाठी प्रत्येक वर्षी १०० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती.

## कृषी




- ९ कृषी हवामान विभागातील भौगोलिक परिस्थितीचा विचार करून पीकरचना निश्चित.
- जागतिक हवामान बदल व त्याअनुषंगाने शेतकऱ्यांनी घ्यावयाची काळजी, पीक पद्धतीत करावयाचा बदल या दृष्टिकोनातून मार्गदर्शन करण्यासाठी व पीक विमा योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी २०६१ महसूल मंडलात स्वयंचलित हवामान केंद्र उभारणी.
- २०११-१२ पासून राज्यात प्रायोगिक तत्त्वावर साधारण १ लाख हेक्टर क्षेत्रावर फळपिकांसाठी हवामान आधारित पीक विमा योजना.
- राष्ट्रीय कृषी विमा योजनेंतर्गत रब्बी हंगाम २०१२-१३ मध्ये गहू, ज्वारी, हरभरा, सूर्यफूल व करडई या पिकांसाठी जोखीमस्तरात ६० टक्केहून ८० टक्के वाढ केली व पिकांच्या विमा संरक्षित रकमेत ३३ ते ३५ टक्के वाढ. यामुळे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याची जास्त संधी उपलब्ध.
- खरीप २०१२ च्या हंगामापासून शेतकऱ्यांच्या गटाद्वारे आवश्यक खते कृषी उद्योग, मार्केटिंग फेडरेशन किंवा कंपनीकडून थेट त्यांच्या शेतावर पोचवण्याचा उपक्रम.
- गुणनियंत्रणासाठी टोल फ्री क्रमांक १८००-२३३ - ४००० सुविधा उपलब्ध.
- कोरडवाहू क्षेत्राची उत्पादकता वाढवण्यासाठी कोरडवाहू शेती अभियान. पाच वर्षांसाठी रु. १०,००० कोटी गुंतवणुकीचा कार्यक्रम.

## पणन

- बाजार समित्यांच्या संख्येत २९५ वरून ३०२ वर वाढ.
- बाजार समित्यांच्या वार्षिक उलाढालीत रु.३८,७४३ कोटीवरून रु.४६,२८७ कोटीपर्यंत वाढ.
- उत्पन्नात रु.४३९.४७ कोटींवरून रु.५४२.८५ कोटीपर्यंत वाढ.
- राज्य शासनाच्या पाठपुराव्यामुळे केंद्राकडून कांदा निर्यातबंदी मागे.
- शेतमाल तारण योजनेंतर्गत रु. २० कोटीचे अर्थसाहाय्य
- आंबा व काजू बोर्ड स्थापन करण्यासंदर्भात डॉ. कृष्णा लव्हेकर, माजी आयुक्त कृषी यांचे अध्यक्षतेखाली अभ्यासगटाची स्थापना.
- मुंबई टर्मिनल मार्केट खाजगी भागीदार निवड तर नागपूरकरिता जागा हस्तांतरण प्रक्रिया अंतिम टप्प्यात.

## पशुसंवर्धन व दुग्धविकास



- सुशिक्षित बेराजगार, शेतकरी , महिला, दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे, अनुसूचित जाती व जमातीचे घटक इत्यादी घटकांना निश्चित उत्पन्नाचे साधन मिळावे व ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान उंचावे यासाठी सहा दुधाळ जनावरांचे वाटप योजना.
- ग्रामीण भागातील महिलांना सुरक्षित रोजगार मिळावा यासाठी ४०० अंडी उबवण संयंत्राचे महिला बचत गटांना वाटप .
- १०+१ शेळी व मेंढी गट वाटप योजनेंतर्गत २०११-१२ मध्ये ३०६४ व २०१३-१३ मध्ये ३२५३ व्यक्तींना लाभ.
- अवर्षणप्रवण भागामध्ये ग्रामीण भागातील जनतेला प्रोत्साहित करण्यासाठी शेळी पालनाच्या व्यवसायाला उत्तेजन देण्यासाठी करण्याकरिता विशेष कार्यक्रम.

**शब्दांकन- राहुल भालेराव**

# महाराष्ट्र अनलिमिटेड



**अमित देशमुख**
पर्यटन, अन्न व औषध प्रशासन,
राज्य उत्पादन शुल्क, नवीन व
नवीकरणीय ऊर्जा, राज्यमंत्री


- देशभरात सर्वाधिक विदेशी पर्यटकांनी भेट दिलेले राज्य म्हणून महाराष्ट्राचा गौरव
- कॅनडातील क्युबेक प्रांत, जपानच्या वाकायामा प्रांतासोबत पर्यटन वृद्धीसाठी महत्त्वपूर्ण करार. जर्मनीतील स्टुटगार्ड येथे वाइन टुरिझम संदर्भात सामंजस्य करार.
- दिल्ली व हैद्राबाद येथे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे माहिती केंद्र सुरू.
- युनेस्कोने जागतिक वारसा म्हणून घोषित केलेल्या अजिंठा व वेरूळ येथे जागतिक दर्जाचे पर्यटक केंद्र पर्यटकांसाठी खुले.
- बॉलिवुडमधील चित्रपट व मालिकांमध्ये काम करणाऱ्या कलाकारांना प्रत्यक्ष चित्रीकरण करताना पाहण्याची संधी पर्यटकांना उपलब्ध करून देण्यासाठी पर्यटन विकास महामंडळ व चित्रनगरी यांचा सहकार्याने बॉलिवूड टुरिझम उपक्रम.
- सी-प्लेन प्रकल्प प्रायोगिक तत्त्वावर सुरू.
- जिल्हानिहाय पर्यटन बृहत विकास आराखडा.
- सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तोंडवली - वायंगणी येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचा समुद्र विश्व प्रकल्प.
- विदर्भातील इको पर्यटनांतर्गत मेळघाट-नवेगाव-नागझिरा-पेंच-ताडोबा ही ४ सर्किट मंजूर
- किल्ले मालिकेंतर्गत शिवनेरी, राजगड, तोरणा, सिंहगड, लोहगड, राजमाची या किल्ल्यांचा पहिला पथदर्शी प्रकल्प मंजूर. या कामांमध्ये पर्यटकांसाठी पायाभूत सुविधांची उपलब्धता.
- लोणार सरोवराचा एकात्मिक विकास. पहिल्या टप्प्यामध्ये सांडपाणी निर्मूलन प्रकल्प व भूसंपादनाचे काम कार्यान्वित. या प्रकल्पासाठी रु. १० कोटींची आर्थिक तरतूद.
- महामंडळामार्फत अस्तित्वातील पर्यटक निवासांच्या नूतनीकरणाचा / विस्तारीकरणाचा कार्यक्रम. प्रथम टप्प्यात माथेरान, माळशेज घाट, हरिहरेश्वर, पानशेत, बोर्डी, गणपतीपुळे, भंडारदरा व ताडोबा येथील पर्यटक निवासांचे नूतनीकरण.



## नवी ऊर्जा... नवी आशा

- देशात सर्वात जास्त म्हणजे १९४८ किलोवॅट क्षमतेच्या पवन-सौर संकरित संयंत्रांची राज्यात स्थापना. आणखी ५०० कि.वॅ. क्षमतेची संयंत्रे स्थापित करण्याचे काम प्रगतिपथावर.
- **सौर ऊर्जा मापन केंद्र :** सौर ऊर्जेपासून वीजनिर्मिती प्रकल्पांच्या उभारणीस चालना देण्यासाठी निरनिराळ्या भौगोलिक क्षेत्रांमध्ये सौर प्रारणाचा अभ्यास करण्यासाठी सौरप्रारण मापन केंद्रांची स्थापना.
- **सौर उष्णजल :** राज्यात २००९ अखेर लक्ष चौ.मी. (१२५.०२) लक्ष मीटर प्रतिदिन क्षमतेची सौर उष्णजल संयंत्रे स्थापित. गेल्या पाच वर्षात यात वाढ होऊन २०१४ अखेर १०.२४ लक्ष चौ.मी. ६४० लक्ष लीटर प्रतिदिन क्षमतेची सौर उष्णजल संयंत्रे विविध क्षेत्रात स्थापित.
- **ग्रामीण पाड्यांचे विद्युतीकरण :** अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांच्या साहाय्याने दुर्गम गावाचे विद्युतीकरण. मागील पाच वर्षाच्या कालावधीत दुर्गम व आदिवासी भागातील १८९ गावे व १७९ पाड्यांमध्ये अपांरपरिक ऊर्जाद्वारे विद्युतीकरणाची योजना कार्यान्वित. यापैकी १३८ गावे नक्षलग्रस्त भागातील.
- ऊर्जा कार्यक्षमतेसाठी शासकीय इमारती, स्थानिक स्वराज्य संस्था यांना विविध योजनांद्वारे प्रोत्साहन .

**- शब्दांकन : काशिबाई थोरात**



# लोकाभिमुख प्रशासन आणि पारदर्शकतेतेवर भर



**दुपारची दोनची वेळ..मंत्रालायाच्या सहाव्या मजल्यावरील मुख्य सचिवांच्या दालनासमोर नेहमीची वर्दळ.. टेबलावरील फाइल्सचा निपटारा करत क्रिम रंगाचा सुट परिधान केलेले मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय राज्याच्या प्रशासनाविषयी आपला दृष्टिकोन स्पष्ट करीत असतात... प्रशासन गतिमान आणि लोकभिमुख करण्याबरोबरच कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी आपल्या वैयक्तिक आरोग्याची काळजी घेण्यासाठी व्यायाम, खेळ यासाठी वेळ द्यावा अशी सूचना करणारे आणि उत्कृष्ट बॅडमिंटनपटू असलेले नवनियुक्त मुख्य सचिव यांची लोकराज्यसाठी विशेष मुलाखत.**

मुख्य सचिव म्हणून पदभार स्वीकारण्यापूर्वी मी महसूल विभागाचा अपर मुख्य सचिव म्हणून काम पाहात होतो. सामान्य नागरिकाचा महसूल विभागाशी संबंध येतो तो विविध प्रकारच्या दाखल्यांसाठी. हे दाखले सुलभ पद्धतीने मिळावेत यासाठी महसूल विभाग अधिक गतिमान आणि पारदर्शक केला. विविध प्रकारचे दाखले देण्यासाठी शिबिरे, पाणंद रस्ते अतिक्रमण मुक्त करणे, फेरफार अदालत, महसूल अदालत, ई-चावडी, ई-फेरफार, ई-मोजणी यासारखे लोकाभिमुख उपक्रम सुरू केले. हे सर्व उपक्रम सुवर्ण जयंती राजस्व अभियानांतर्गत राबवण्यात आले. मला सांगायला आनंद वाटतो की या अभियानामुळे विविध विभाग एकाच छताखाली आणण्यात यश मिळाले. विविध शिबिरांचे आयोजन करून लाभार्थ्यांना पारदर्शक व गतिमान पद्धतीने लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

**प्रशासकीय सेवेची पुनर्रचना**

प्रशासकीय गतिमानता आणण्याबरोबरच महसूल विभागाच्या प्रशासकीय यंत्रणेची पुनर्रचना करण्यात आली. त्या अनुषंगाने दोन तालुक्यांसाठी एक प्रांत अधिकारी नेमण्यात आला. ठाणे जिल्ह्याचे विभाजन करून आदिवासी व वनक्षेत्रबहुल असलेल्या पालघर जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली. महसुल विभागाचा अपर मुख्य सचिव म्हणून सातत्याने माझा संपर्क सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यांच्याशी असायचा त्यामुळे राज्यातील जिल्हा प्रशासन मी जवळून अनुभवले आहे. मुख्य सचिव म्हणून काम पाहतांना मला या अनुभवाचा निश्चित फायदा होणार आहे.

**नागरिकांना ऑनलाइन सेवा**

मी मुख्य सचिवपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, महापालिका आयुक्त यांच्याशी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे संवाद साधला. आपल्या विभागाशी संबंधित १० सेवा नागरिकांना ऑनलाइन उपलब्ध करून देण्याचे उद्दीष्ट मी संबंधितांना दिले आहे. ज्या सेवा क्लिष्ट नसतील, कमीत कमी वेळात सुरू करता येतील अशा सेवा ऑनलाइन करण्यात येतील. यामुळे सामान्य नागरिकांना



प्रशासकीय कामांमुळे विलंब होणार नाही.

आपले राज्य प्रशासकीय सुधारणांमध्ये देशात नेहमीच आघाडीवर राहिलेले आहे. हा लौकिक कायम राखण्यासाठी सर्वच अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी लोकाभिमुख, पारदर्शक आणि गतिमान निर्णय प्रक्रियेचा अवलंब केला पाहिजे. दप्तर दिरंगाईचा आणि नियमावलीचा अभ्यास अधिकारी/कर्मचाऱ्यांनी करायला हवा. प्रशासकीय बाबीतील निर्णयांचे टप्पे कमी करण्यासाठी आणि सामान्य नागरिकाला लोकाभिमुख प्रशासनाचा लाभ घेता येणे शक्य व्हावे म्हणून हा अभ्यास अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळे जनतेला चांगली सेवा देता येईल.

**आरोग्याकडे लक्ष**

अधिकारी असो वा कर्मचारी हादेखील सामान्य माणूसच असतो. नित्य प्रशासकीय कामे करीत असताना सर्वांनीच आपल्या आरोग्याकडे लक्ष दिले तर त्याचा सकारात्मक परिणाम दैनंदिन आयुष्य आणि शिवाय कार्यालयीन कार्यक्षमतेवर देखील होताना दिसून येईल. त्यासाठी प्रत्येकाने थोडा का होईना वेळ काढला पाहिजे. धावणे, पायी फिरणे, पोहणे असे आपल्या आवडीनुसार व्यायाम करणे आवश्यक आहे. मला स्वताला बॅडमिंटन, क्रिकेट आणि सकाळी तासभर पायी फिरायला आवडते. त्यातून शारीरिक तंदुरुस्ती जपली जाते. आपले आरोग्य चांगले राहिले तर कामेही वेळेवर होतील, हे लक्षात ठेवले पाहिजे.

**– शब्दांकन : अजय जाधव**

आपले राज्य प्रशासकीय सुधारणांमध्ये देशात नेहमीच आघाडीवर राहिले आहे. हा लौकिक कायम राखण्यासाठी प्रशासनातील सर्वच अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी लोकाभिमुख, पारदर्शक आणि गतिमान निर्णय प्रक्रियेचा अवलंब केला पाहिजे. राज्यात दप्तर दिरंगाईचा कायदा आणि नियमावलीमध्ये या तीनही बाबींवर भर देण्यात आला आहे. नियमावलीतील या बाबींचा अधिकाऱ्यांनी सखोल अभ्यास करावा.





# गौरवशाली कारकीर्द

भारतीय प्रशासकीय सेवेच्या १९८०च्या बॅचमधील स्वाधीन क्षत्रीय यांनी राज्यशास्त्रातील पदवी संपादन केली असून लोकप्रशासन या विषयात एमफील तसेच राज्यशास्त्र विषयात पदव्युत्तर शिक्षण घेतले आहे. पुसद आणि वाशिम उपसाहाय्यक जिल्हाधिकारी म्हणून त्यांनी आपल्या प्रशासकीय कारकिर्दीस सुरुवात केली. अहमदनगर जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, नांदेडचे जिल्हाधिकारी अशा विविध पदांवर त्यांनी काम केले. केंद्रात प्रतिनियुक्तीवर गेल्यानंतर त्यांनी स्टिल अँड माइन्सचे उपसचिव, ऊर्जा मंत्रालयात उप सचिव तसेच गृह विभागाचे उप सचिव म्हणून आपल्या कार्याची छाप उमटविली. राज्यात म्हाडाचे उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर या विभागात महत्त्वपूर्ण बदल केले. बेस्टचे महाव्यवस्थापक, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मुंबई महानगरपालिका आयुक्त या पदांवर त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटवला. गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव या पदावर कार्यरत असताना असताना राज्याचे गृहनिर्माण धोरण तयार केले. विक्रीकर आयुक्त म्हणून वस्तूंच्या वर्गीकरणाचा मेळ घातला. मूल्यवर्धित करप्रणाली (व्हॅट) संदर्भात कायदा करण्यात महत्त्वाचे योगदान दिले.

अपर मुख्य सचिव (महसूल) म्हणून काम करताना भाडेपट्टा नूतनीकरणाचे धोरण, बिनशेती परवानगीचे सुलभीकरण, पालघर जिल्हा तसेच दोन तालुका उपविभागांची निर्मिती आणि सुवर्ण जयंती राजस्व अभियान आदी महत्त्वपूर्ण बाबी त्यांच्या अप्पर मुख्य सचिवपदाच्या कार्यकाणात घडल्या .

# मेकिंग ऑफ → सर्वांत पुढे महाराष्ट्र माझा

सर्वांत पुढे महाराष्ट्र माझा... महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात, घराघरांत पोहचलेलं घोषवाक्य... १८०० च्या आसपास वर्तमानपत्रे, साप्ताहिके, आकाशवाणी, एफएम रेडिओ, दूरदर्शन, खाजगी वृत्तवाहिन्या यांच्या माध्यमातून 'सर्वांत पुढे...' चा हा संदेश महाराष्ट्रातल्या प्रत्येकाच्या ओठावर रुळला. हे घोषवाक्य आता केवळ घोषवाक्य राहिले नसून ते महाराष्ट्राच्या प्रगतीचे, सर्व क्षेत्रातील आघाडीचे अभिमानास्पद प्रतीक बनले आहे.

शासकीय जाहिरात म्हणजे साचेबद्ध व रूक्ष हा आजवरचा समज. पण या समजाला छेद देणारी 'सर्वांत पुढे महाराष्ट्र माझा' ही जाहिरात मोहीम माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने यशस्वीपणे राबवली. सर्जनशीलता व कल्पकतेचे निकष पूर्ण करणाऱ्या या जाहिरातींचे वितरणही तितक्याच व्यावसायिक पद्धतीने करण्यात आले. या मेगा कॅम्पेनच्या निर्मितीची ही कथा.

महाराष्ट्राच्या इतिहासातील शासकीय पातळीवरुन निर्माण झालेली आणि प्रसारित केलेली सर्वांत मोठी जाहिरात कॅम्पेन ठरली. महाराष्ट्रातील १२ कोटी जनतेपर्यंत पोहचणे हे या मोहिमेचे उद्दिष्ट होते.

या जाहिरात कॅम्पेनची संकल्पना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांची. या संकल्पनेला मूर्त रूप दिले ते माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या सचिव श्रीमती मनीषा पाटणकर-म्हैसकर यांनी. महाराष्ट्र हे आजघडीला देशातील सर्वाधिक प्रगतीशील राज्य आहे. विकासाच्या सर्वच क्षेत्रात राज्याने मानदंड निर्माण केले आहेत. संपूर्ण देशाला मार्गदर्शक ठरतील अशा योजनांची देण महाराष्ट्राने दिली आहे. महाराष्ट्राची पुरोगामी परंपरा कायम








राखण्यात आपण यशस्वी ठरलो आहोत.

आज घडीला महाराष्ट्रात विकासाच्या अनेक योजना राबवण्यात येतात. या योजनांचा लाभ तळागाळापर्यंत पोहोचला आहे. लाखो लाभार्थ्यांना या योजनांनी दिलासा दिला आहे. जनहिताच्या या योजनांचा प्रसार अधिकाधिक व्हावा आणि योजनांची माहिती सर्वसामान्य जनतेला व्हावी, हा या जाहिरात मोहिमेचा मुख्य उद्देश.

राज्य शासनाच्या विविध विभागाच्या शेकडो योजना आहेत. यातून काही निवडक योजना हेरून त्यांना प्रसिद्धी देणे, याअर्थी ही मोहीम म्हणजे एक शिवधनुष्य होते. एवढ्या मोठ्या प्रमाणातली कॅम्पेन राबवण्याचा कुणालाच अनुभव नव्हता. लोकांचा प्रतिसाद कसा असेल याविषयी साशंकता होती. कारण इथे फक्त जाहिरातींचे वितरण करणे एवढेच कार्य नव्हते तर सर्जनशील जाहिराती तयार करायच्या होत्या. त्यामुळे सर्जनशीलतेबरोबरच व्यावसायिक दृष्टी देखील आवश्यक होती.

एखाद्या वस्तूची जाहिरात करणे ही सोपी






गोष्ट असते. ग्राहकांना ती आकर्षित करून घेऊ शकते. मात्र शासन देत असलेल्या सेवांची जाहिरात ही अत्यंत अवघड गोष्ट असते. शासकीय प्रसार माध्यमात काम करणाऱ्यांनाच त्यामागील कष्टाची कल्पना येऊ शकते. पण आमच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी नेहमीच्या निष्ठेने-चिकाटीने आणि निस्पृहपणे ही कामगिरी पार पाडली हे नमूद करणे आवश्यक आहे.

प्रारंभी विभागीय संपर्क अधिकाऱ्यांच्या वारंवार बैठका घेण्यात आल्या. विविध निर्णय, योजना, उपक्रम यांच्या मंथनातून हळूहळू मुद्दे हाती येऊ लागले. जाहिरात मोहिमेचा पहिला टप्पा ८ जुलै पासून सुरु झाला. या मोहिमेतील दुसरा टप्पा अतिशय कसोटीचा ठरला. प्रत्यक्ष लाभार्थी 'मला त्या त्या योजनेचा लाभ कसा झाला' हे या जाहिरातीमधून सांगतो आहे. खरं तर अशा स्वरुपाची जाहिरात करावी ही संकल्पना अप्रतिम होती. जाहिरात मोहिमेसाठी दिवसातून अनेक वेळा विचारमंथन (ब्रेन स्टॉर्मिंग) होत असे. अशीच एक बैठक सुरू




वृत्तपत्रांसाठी तयार करण्यात आलेल्या जाहिराती तसेच दृकश्राव्य माध्यमांसाठी तयार करण्यात आलेल्या जाहिराती दि. २७ जून आणि दि. २ जुलै रोजी मा. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि मंत्रीमंडळातील अनेक सदस्यांसमोर सादर करण्यात आल्या.

---

दृकश्राव्य माध्यमामधूनही या मोहिमेला पोहचवण्यासाठी विशेष स्पॉटस् आणि जिंगल्स बनविण्यात आले. वृत्त वाहिन्यांसोबत मनोरंजन कार्यक्रम दाखवणाऱ्या वाहिन्यावर आणि एफ.एम चॅनेल्सवर या जाहिराती येऊ लागल्या. एकाच वेळेला अशा बहुवीध माध्यमांचा (मल्टी मीडिया) उपयोग अत्यंत सुत्रबद्धरीत्या करण्यात आल्याने 'सर्वांत पुढे महाराष्ट्र माझा' चा संदेश सर्वदूर प्रभावीपणे पोहचला.

## वितरणाचे शिवधनुष्य

जाहिरातीची आर्टपूल प्राप्त झाल्यानंतर सर्वात महत्त्वाचे काम असायचे ते वितरणाचे. चांदा ते बांदा असे संपूर्ण महाराष्ट्रातील पावणेदोन हजाराहून अधिक(१७६६) नियतकालिकांपर्यंत जाहिराती पोहोचवणे हे मोठे दिव्यच. त्यातूनही मराठी, हिंदी, उर्दू, गुजराती अशा अनेक भाषांमधून जाहिराती तयार करुन घेणे आणि दररोज प्रत्येक नियतकालिकातून वेगवेगळी जाहिरात प्रसिध्द होईल असे पाहणे म्हणजे फारच मोठी गोष्ट.

दररोज एक जाहिरात वितरीत करायची म्हणजे १६ पेक्षाही अधिक आर्टपूल्स बनवून वितरीत करावी लागायची. चार भाषांमधून जाहिराती,नियतकालिकांचा आकार लक्षात घेऊन प्रत्येक जाहिरातीचे दोन वेगवेगळे आकार इतकेच नाही तर रंगीत आणि कृष्णधवल अशा दोन प्रकारातील जाहिराती रोजच्या रोज संबंधितांना पाठवायच्या तेही एकही चूक न करताा

सर्व जाहिराती वेबसाईटवर अपलोड केल्या. विषयांचे नियतकालिकनिहाय वेळापत्रक तयार करुन संबंधितांना दिले. त्यामुळे वृत्तपत्रांनादेखील वेळेवर जाहिरातींची आर्टपूल मिळून ठरल्याप्रमाणे वेगवेगळ्या नियतकालिकांमधून वेगवेगळया जाहिराती प्रसिध्द झाल्या. केवळ जाहिरात वितरणच नव्हे तर आदल्या दिवशी प्रसिद्ध झालेल्या जाहिरातीचा तपशील राज्यभरातून गोळा करणे आणि त्याचा अहवाल वरिष्ठांना सादर करणे अशी दुहेरी जबाबदारी आम्ही दररोज पार पाडायचो.

सुरुवातीला अगदी रात्री उशिरापर्यंत मुख्यालयातील अधिकारी/कर्मचारी नियतकालिकांच्या जाहिरात प्रतिनिधींशी संपर्क साधून वितरण आदेश पोहोचते करायचे. पण नंतर कामकाजात सुसूत्रता आणून साप्ताहिक वेळापत्रक तयार केले. आमच्या विभागीय तसेच जिल्हा माहिती कार्यालयांचेही या कामी मोलाचे सहकार्य लाभले. या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांमुळेच प्रसिध्दी मोहिमेचे शिवधनुष्य आम्ही पेलू शकलो.

**- मयुरा देशपांडे-पाटोदकर**

जाहिरातीत झळकलेले फोटो महाराष्ट्राभर गाजले. आपआपल्या भूमिकेतून त्याकडे बघितले गेले. पण एक जाहिरात वृत्तपत्रात प्रकाशित होण्यामागे मंत्रालयात अनेक हात कार्यरत होते. या जाहिरातींचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे यामधील प्रत्येक लाभार्थ्यांशी संपर्क साधला गेला. त्याची तोंडी परवानगी दूरध्वनीवर मंत्रालयातून घेतली जात होती. तर जिल्ह्याच्या ठिकाणी प्रत्येक जिल्हा माहिती अधिकारी स्वत: लाभार्थ्यांकडून त्यांच्या स्वाक्षरीसह परवानगी पत्र येत होते. याशिवाय संबंधित योजनेच्या जिल्हा स्तरावरील अधिकाऱ्याकडून लाभार्थी कोणत्या योजनेत सहभागी आहेत. राज्य शासनाच्या मदतीची सद्य:स्थिती काय आहे, याची अद्ययावत माहिती असणारे प्रमाणपत्रही मिळवली जात होते. हे सर्व सोपस्कार पार पाडल्यावर ती जाहिरात अंतिम केली गेली. त्यामुळे जाहिरातीची विश्वसनियता वाढण्यास मदत झाली.

**- प्रवीण टाके**

# जाहिरातींची कलात्मक मांडणी...

मोहिमेची रणनीती आखण्यासाठी वारंवार बैठका होऊ लागल्या. अर्थपूर्ण बोधवाक्य व बोधचिन्हाचा शोध सुरू झाला. त्यासाठी क्रियेटीव्ह टिमची  निर्मिती झाली. शंभरहून अधिक घोषवाक्य व बोधचिन्हाची निर्मिती करून त्याचे सादरीकरण मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री व अन्य ज्येष्ठांसमोर तीन ते चार वेळा करण्यात आले. सहकारमंत्री मा. हर्षवर्धन पाटील यांच्या पुढाकाराने 'सर्वांत पुढे महाराष्ट्र माझा' या घोषवाक्याची निवड झाली. विविध खात्यांच्या जनसंपर्क अधिकाऱ्यांमार्फत त्या-त्या विभागांच्या सचिवांकडून शासनाच्या महत्वपूर्ण योजनांची अधिकृत आकडेवारीसह माहिती एकत्रित करून प्रत्येक विषयासाठी स्वतंत्र जाहिरात करण्यात आली. केलेल्या सूचनांचे व आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्यात आले. पहिल्या टप्प्यातील जाहिराती ह्या योजनांची माहिती देण्याऱ्या होत्या. त्याचे पुढचे पाऊल म्हणून दुसऱ्या टप्प्यात योजनेच्या लाभार्थ्यांवर आधारित जाहिरातींची निर्मिती करण्यात आली. दोनही टप्प्यांचे परस्परांमध्ये सुसूत्रीकरण ठेवण्यात आल्याने अधिक परिणामकारकता साधण्यात यशस्वी होता आलं. वृत्तपत्रातील जाहिरातींचे वितरण करतांना जाहिरातीचा आकार व पृष्ठ क्रमांक यांचा विशेषत्वाने विचार करण्यात आला. त्याच बरोबर प्रिन्ट मीडियातील विविध माध्यामांवर (उदा. होर्डिंग, रेल्वे, एस.टी.बस, बेस्ट शेल्टर, बेस्ट बस इ.) सदर जाहिराती एकाच वेळी कशा प्रकारे प्रसारित करता येतील व त्यांचा जनसामान्यात योग्य ठसा कसा उमटवता येईल त्यासाठी कमी वेळात एकाद्या प्रथितयश जाहिरात संस्थेप्रमाणे प्रयत्न करण्यात आले.

**– सीमा रनाळकर**




असताना जुलै महिन्याचा लोकराज्य अंक प्रकाशित होऊन आला. या अंकात प्रत्येक लेखासोबत एक यशकथा देण्यात आली होती. अंक चाळत असतानाच म्हैसकर मॅडम म्हणाल्या की, या यशकथा खूप छान आहेत. जर आपण त्यांचीच जाहिरात केली तर? ही संकल्पना सर्वांनीच उचलून धरली. मॅडमनी मला प्राथमिक स्वरूपात ही जाहिरात तयार करायला सांगितली. लोकराज्य यशकथेमधील लाभार्थी घेऊन तीन जाहिराती तयार केल्या. त्या सर्वांना आवडल्या. पुन्हा मंथन सुरु झाले. लाभार्थी कोण असावेत, कोणत्या योजना निवडायच्या, संदेश काय असावा, आकडेवारी कोणकोणती द्यायची, विविध जिल्ह्यातील लाभार्थी निवडताना प्रादेशिक समतोल कसा राखायचा, जाहिरातींचा आकार, रंगसंगती यावर विचार झाला. शेवटी सर्व मुद्यावर सुक्ष्म नियोजन करून सात




सर्वांत पुढे महाराष्ट्राची व्यापकता आणखी वाढावी यासाठी इतरही माध्यमांचा वापर करण्याची कल्पना 'ब्रेनस्टार्मिंग' च्या दरम्यान आली. त्यानुसार मग मुंबईतील पश्चिम, मध्य व हार्बर रेल्वे लाईनवर लोकल ट्रेन्स 'सर्वांत पुढे महाराष्ट्र माझा'च्या विविध संदेशांनी रंगल्या.  या ट्रेन्सनीं लाखो प्रवाशांचे लक्ष वेधून घेतले. त्याचप्रमाणे मुंबईतील वेस्ट आणि महाराष्ट्रातील एस.टी. बसेसचाही या संदेशाच्या प्रसारासाठी उपयोग करण्यात आला. राज्यातील ३५० हून ठिकाणी असलेल्या जाहिरात फलकावरही 'सर्वांत पुढे महाराष्ट्र माझा' ही मोहीम झळकली. दृकश्राव्य जाहिराती, यू ट्यूबवरूनही प्रसारित करण्यात आल्या.



विधिमंडळात सादर केलेल्या पूरक मागण्यांमध्ये विशेष प्रसिद्धी मोहिमेसाठी निधी मंजूर करण्यात आला. मंजूर निधी उपलब्ध करुन घेणे, त्याच्या विनियोगाचे काटेकोर नियोजन करणे, त्यासाठी आवश्यक असणारी वित्तीय शिस्त सांभाळत संबंधित नियमांच्या चौकटी सांभाळत मोहिमेची अमलबजावणी करणे हे एक मोठे आव्हान होते. त्यासाठी सामान्य प्रशासन/ नियोजन /वित्त विभागातील वरिष्ठ अधिकारी तसेच महासंचालनायातील आस्थापना शाखेच्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी स्पृहणीय स्वरुपाचे काम केले. या सर्वांचे या निमित्त आभार मानणे आवश्यक आहे.

जाहिरातींची रुपरेखा तयार झाली. त्यासाठी जिल्हा माहिती अधिकाऱ्यांना सूचना दिल्या गेल्या. जे लाभार्थी निवडले गेले, ते प्रत्यक्षात लाभार्थी असल्याची खातरजमा केली गेली. त्यासाठी संबंधित विभागाच्या







अधिकाऱ्यांकडून पडताळणी करण्यात आली. त्याचे पुरावे जमा केले. लाभार्थ्यांचे उत्तमोत्तम फोटोग्राफ काढण्यात आले. 'मी या योजनेचा लाभार्थी असून माझे छायाचित्र वापरण्यास हरकत नाही' असे लेखी घेण्यात आले. अल्पावधीतच संबंधित मजकूर आणि छायाचित्रे मुख्यालयात जमा झाली. प्राथमिक काम सुरू झाले. त्यानंतर प्राथमिक स्वरुपातील तीन जाहिराती मा. मुख्यमंत्र्यांना दाखवल्या गेल्या. त्यांना त्या खूपच आवडल्या आणि प्रत्यक्ष लाभार्थींवर आधारलेल्या कॅम्पेनला त्यांनी मंजुरी दिली. लाभार्थींच्या छायाचित्रावर त्यांची सही असावी, अशी एक मोलाची सूचनाही मुख्यमंत्र्यांनी केली. ती आम्ही त्वरित अंमलात आणली.

एवढी मोठी मोहीम राबवायची तर त्यासाठी सूक्ष्म नियोजन आवश्यक होते. माहिती व जनसंपर्क विभागाच्या सचिव मा. मनीषा म्हैसकर यांच्या कुशल प्रशासकीय मार्गदर्शनाखाली ही जबाबदारी लीलया पेलली गेली. सर्वप्रथम कामाचे सुयोग्य नियोजन करण्यात आले. यासाठी वेगवेगळ्या टीम तयार करण्यात आल्या. प्रल्हाद जाधव यांच्याकडे समन्वयक म्हणून जबाबदारी सोपविली. जाहिरातीचा ठाव घेणारे शीर्षक देणे, फोटो निवडणे यासाठी क्रिएटिव्ह टीम तयार केली गेली. यामध्ये सुरेश वांदिले, श्रीमती कीर्ती पांडे, हेमराज बागुल, प्रवीण टाके, किरण मोघे, अजय जाधव, श्रीमती क्रीती लाला, किरण केंद्रे यांचा समावेश होता. आकर्षक आर्ट वर्क तयार करण्याची जबाबदारी श्रीमती सीमा रनाळकर व त्यांच्या सहकाऱ्यांवर सोपविली. या जाहिराती दृकश्राव्य माध्यमातून देखील झळकत होत्या. हे कार्य श्रीमती मीनल जोगळेकर यांनी पार पाडले. वृत्तपत्रांसाठी राज्यभरात जाहिरातीचे वितरण ही किचकट प्रक्रिया होती. शिवाजी मानकर, श्रीमती मयुरा देशपांडे व हर्षवर्धन पवार यांनी ही धुरा सांभाळली. या कॅम्पेनला मुख्यमंत्र्यांचे जनसंपर्क अधिकारी सतीश लळीत व अनिरुद्ध अष्टपुत्रे यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. तसेच महाराष्ट्रातील सर्व विभागीय व जिल्हा माहिती कार्यालयांचा देखील सहयोग लाभला.

राज्यातील जवळपास १८०० वर्तमानपत्रे व नियतकालिके, आकाशवाणी–दूरचित्रवाणी, होर्डिंग, बस शेल्टर यांच्या माध्यमातून हे प्रत्यक्ष लाभार्थी विकासाचा संदेश देऊ लागले. 'माझ्यासारख्या गरीब कुटुंबातील मुलीला शासनाच्या शिष्यवृत्तीमुळे




## अशीही दखल

जाहिरात प्रसारित होऊ लागताचा प्रतिक्रिया उमटू लागल्या. समाजातील मान्यवर नेते, विविध संस्था, व्यक्ती यांच्या प्रतिक्रिया बातमी स्वरूपात वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होऊ लागल्या. वाचकांची पत्रे प्रसिद्ध होऊ लागली. काही वृत्तवाहिन्यांनी जाहिरातींचा खरेपणा पडताळण्यासाठी मोहिमा सुरू केल्या. 'सह्याद्री'वर एका पत्रकार परिषदेत थेट मुख्यमंत्र्यांना याविषयी प्रश्न विचारण्यात आला, मा. मुख्यमंत्री महोदयांनी बिनतोड आणि सुस्पष्ट प्रतिक्रिया दिली. योजनांची माहिती सर्वांना झाली पाहिजे आणि प्रतिकात्मक स्वरूपात देण्यात येत आहे, हे त्यांनी स्पष्ट केले. विविध ठिकाणी विविध मंत्री महोदयांनी अशीच भूमिका घेतली.

या जाहिरात मोहिमेला सर्वदूर प्रसिद्धी मिळवून देण्यात 'घेताच नाव त्याचे...' या जिंगलचा महत्त्वाचा वाटा आहे. महाराष्ट्र प्रेमाची आणि अभिमानाची भावना जागवणारे हे गीत कवी अरुण म्हात्रे यांनी लिहिले असून अशोक पत्की यांनी संगीतबद्ध केले आहे. सुचित्रा भागवत, मंदार आपटे व



सहकाऱ्यांचा स्वर या गाण्याला लाभला. आसावरी जोशी, संदीप कुलकर्णी, अविनाश नारकर, ऐश्वर्या नारकर, सचिन सुरेश, लीना भागवत आणि मधु कांबीकर या सर्वपरिचित कलाकारांमुळे हे गाणे सर्वांच्याच मनात घर करून राहिले आहे. महाराष्ट्राचा गौरवशाली वारसा सांगणारे हे गीत पुढीलप्रमाणे आहे.

*घेताच नाव ज्याचे/हो उनत हा माथा/सर्वांत पुढे आहे/हा महाराष्ट्र माझा*
*अभिमान विकासाचा/विश्वास भविष्याचा/सर्वांत पुढे आहे/हा महाराष्ट्र माझा.*

*हे राज्य विकासाचे/व्यापार-उद्यमाचे/प्रगतीचे पूल इथे/पायाभूत सुविधांचे*
*ठेवला जगापुढती/साचा जणु प्रगतीचा/सर्वांत पुढे आहे/हा महाराष्ट्र माझा.*

*ही जननी वीरांची/हा मुलुख विचारांचा/सामर्थ्य चळवळींचे/इतिहास कणा त्यांचा*
*चालवितो निर्धारे/वारसाच शिवबाचा/रे म्हणूनी पुढे आहे/हा महाराष्ट्र माझा.*

*जाणून प्रश्न चाले/अभ्यास जनहिताचा/येऊदे शिरावरती/किती भार अपेक्षांचा*
*घेतला विडा हाती/परिवर्तन क्रांतीचा/राहिल पुढे नेहमी /हा महाराष्ट्र माझा.*

या मोहिमेतील 'हा पहा पसरला' हे दुसरे गीतही तितकेच लोकप्रिय झाले.

*हा पहा पसरला प्रकाश समृध्दीचा*
*पंखात जोम अन् उदात्त आकांक्षाचा*
*या नव्या पिढ्यांना, नव तंत्राची ओढ*
*त्या हातांमध्ये दिवा दिला प्रगतीचा*

*कष्टास लाभले, सन्मानाचे कोंदण*
*आरोग्य, शांतता सोबत हे शिक्षण*
*धन ओघ वाढला, फुलली ही शिवारे*
*गाव नवे अन् आम्ही जोडली शहरे*

*न भूतो झाला पालट महाराष्ट्राचा*
*हा प्रवास सारा उज्ज्वल भवितव्याचा*

कवी- अनंत खासबारदार
संगीतकार- अशोक पत्की
गायक- सुचित्रा भागवत,
मंदार आपटे




परदेशात जाऊन डॉक्टर होता आलं' म्हणणारी पिंपरी चिंचवडच्या झोपडपट्टीतील अश्विनी कांबळे, 'नेमबाजीतील यशाने क्लास वनची नोकरी मिळाली' हे सांगणारा बीडचा नवनाथ फरताडे, 'शासनाने पाच एकर जमीन आमच्या नावावर केली, आम्ही जमिनीचे मालक झालो' म्हणणारे वर्ध्याचे जीवतोडे बंधू अशी सामान्य माणसे राज्यभर झळकू लागली. स्वत:च्या उदाहरणातून विकासाचा संदेश देऊ लागली. जाहिरातीची मांडणी, लाभार्थ्यांचे मनोगत, आकर्षक रंगसंगती यामुळे जाहिरातीचा सकारात्मक परिणाम होत असल्याचा फीडबॅक मिळू लागला. जाहिरातीचे सर्वत्र कौतुक होऊ लागले. रेल्वेमध्ये, नाक्यांवर, कट्ट्यांवर गावागावांमध्ये जाहिरातींची चर्चा होऊ लागली. काही ठिकाणी नकारात्मक प्रतिसादही मिळाला. लाभार्थ्यांविषयी शंका घेतली गेली. मात्र कॅम्पेनच्या यशाचेच ते लक्षण आहे, हे आमच्या लक्षात आले.

'सर्वात पुढे महाराष्ट्र माझा' ही कॅचलाइन घेऊन सुरू झालेल्या या जाहिरात कॅम्पेनने एक नवा इतिहास घडविला. शासकीय पातळीवरुन देखील जाहिरातीसारखी सर्जनशील कॅम्पेन यशस्वीपणे राबविता येऊ शकते हे सिध्द झाले. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयावर वरिष्ठांनी दाखवलेला विश्वास सार्थ ठरला. या कॅम्पेनमधून खूप काही शिकता आले. माध्यमातील नवनवीन संकल्पना समजून घेता आल्या. काळ वेळेचे भान न ठेवता काम केल्याने मिळणारा आनंद उपभोगता आला. टीमवर्कचं महत्त्व कळाले.




महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात होणारी विकासकामे, योजनांचा प्रसार समजण्यास मदत झाली. एकूणच शासनाचा जनसंपर्क विभाग नव्या काळातील तंत्रज्ञानाचा आधार घेत कुठल्याही व्यावसायिक संस्थेप्रमाणे जाहिरात मोहीम यशस्वीपणे राबवू शकतो हे या निमित्ताने सिध्द झाले.

**– किरण केंद्रे**

महाराष्ट्र शासन

माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाद्वारे निर्मित

# शासन आणि जनता यांच्यात संवाद दृढ करणारे...



ऐकायलाच हवा
दिलखुलास
संवाद...
@२०३३

सर्वत्र : सर्वोत्तम
लोकराज्य
४ लाख खप
४० लाख वाचक

जय महाराष्ट्र
लाखो दर्शकांची थेट-भेट घडवून देणारे...
नाबाद...६७७ भाग

MAHARASHTRA
Ahead

لوک راجیہ
ऊर्दु लोकराज्य

बातमी खात्रीची
माहिती प्रगतीची
वेध भविष्याचा
महान्यूज
@१ कोटी ५० लाख

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
https://dgipr.maharashtra.gov.in

## माध्यमं संवादाची : जनतेच्या विश्वासाची

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MH/MR/South - 210/2012-14
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From18th to 25th August 2014
Date of Publication : 10th of every Month

# फार्म्युला उमेदवारांच्या यशाचा

## सप्टेंबर २०१४चा प्रेरणा विशेषांक

# लोकराज्य

## केंद्रीय लोकसेवा आयोग,
## राज्य लोकसेवा आयोग आणि
## इतर परीक्षांसाठी तज्ज्ञांकडून मार्गदर्शन

**आपली प्रत आजच निश्चित करा**

**अवघ्या १० रुपयात**

## यशस्वी उमेदवारांचा कानमंत्र

लोकराज्य LOKRAJYA

प्रति/To :

प्रेषक/From

दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक प्रल्हाद दत्तात्रय जाधव, महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी एच. टी. मीडिया लि. प्लॉट नं. ६, टी. टी. सी. एम. आय. डी. सी. इंडस्ट्रियल एरिया, दिघे, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई – ४०० ७०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : प्रल्हाद दत्तात्रय जाधव